भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५

(१९२५ चा अधिनियम क्रमांक ३९)

[ दिनांक १ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान ]

# The Indian Succession Act, 1925

(Act No. 39 of 1925)

[*As in force on the 1st March 1998*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रीत व प्रकाशित केले

२००७

[ **किंमत :** रुपये ७५-०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत दिनांक १ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान असलेला दि इंडियन सक्सेशन ॲक्ट, १९२५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ९, अंक २, दिनांक १५ ऑक्टोबर १९९८ यात पृष्ठ ११८ ते २०५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधी) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १५ ऑक्टोबर १९९८

**डॉ. रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of The Indian Succession Act, 1925 as on the 1st March 1998 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 9, dated 15th October 1998 on pages 118 to 205.

This authoritative text in Marathi was published under the authority of the President under Clause (*a*) of the Section 2 of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of the Act in Marathi.

New Delhi,
Date 15th October 1998

Dr. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

## विशोधन अधिनियमांची व अनुकूलन आदेशांची सूची

१. 'भारतीय उत्तराधिकार (विशोधन) अधिनियम, १९२६' (१९२६ चा ३७).
२. 'भारतीय उत्तराधिकार (दुसरे विशोधन) अधिनियम, १९२६' (१९२६ चा ४०).
३. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९२७' (१९२७ चा १०).
४. 'निरसन अधिनियम, १९२७' (१९२७ चा १२).
५. 'भारतीय उत्तराधिकार (विशोधन) अधिनियम, १९२७' (१९२७ चा १८).
६. 'भारतीय उत्तराधिकार (विशोधन) अधिनियम, १९२८' (१९२८ चा १४).
७. 'भारतीय उत्तराधिकार (विशोधन) अधिनियम, १९२९' (१९२९ चा १८).
८. 'संपत्ती हस्तांतरण (विशोधन) पुरवणी अधिनियम, १९२९' (१९२९ चा २१).
९. 'भारतीय उत्तराधिकार (विशोधन) अधिनियम, १९३१' (१९३१ चा १७).
१०. 'विशोधन अधिनियम, १९३४' (१९३४ चा ३५).
११. 'भारत शासन (भारतीय विधी अनुकूलन) आदेश, १९३७'.
१२. 'भारतीय उत्तराधिकार (विशोधन) अधिनियम, १९३९' (१९३९ चा १७).
१३. 'भारतीय स्वतंत्रता (केंद्रीय अधिनियमांचे व अध्यादेशांचे अनुकूलन) आदेश, १९४८'
१४. 'भारतीय उत्तराधिकार (विशोधन) अधिनियम, १९४९' (१९४९ चा ३५).
१५. 'विधी अनुकूलन आदेश, १९५०'
१६. 'भाग 'ख' राज्ये (विधी) अधिनियम, १९५१' (१९५१ चा ३).
१७. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९५२' (१९५२ चा ४८).
१८. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९५३' (१९५३ चा ४२).
१९. 'भारतीय उत्तराधिकार (विशोधन) अधिनियम, १९५७' (१९५७ चा ३४).
२०. 'भारतीय उत्तराधिकार (विशोधन) अधिनियम, १९६२' (१९६२ चा १६).
२१. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९६४' (१९६४ चा ५२).
२२. 'प्रत्यायोजित विधीविधान उपबंध (विशोधन) अधिनियम, १९८३'.
२३. 'भारतीय उत्तराधिकार (विशोधन) अधिनियम, १९९१' (१९९१ चा ५१).

# भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५

## कलमांचा क्रम

कलमे.


भाग एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव .. .. ..

२. व्याख्या .. .. ..

३. राज्यातील कोणत्याही वंशास, पंथास किंवा जनजातीस अधिनियमाच्या प्रवर्तनातून सूट देण्याची राज्य शासनाची शक्ती

भाग दोन

**अधिवासाविषयी**

४. हा भाग लागू असणे .. .. .. ..

५. मृत व्यक्तीच्या अनुक्रमे स्थावर व जंगम संपत्तीवरील उत्तराधिकाराचे विनियमन करणारा कायदा

६. जंगम संपत्तीवरील उत्तराधिकारावर एकच अधिवास परिणाम करतो .. ..

७. जन्माने औरस असलेल्या व्यक्तीचा मूळचा अधिवास .. .. ..

८. अनौरस अपत्याचा मूळचा अधिवास .. .. .. ..

९. मूळचा अधिवास चालू राहणे .. .. .. ..

१०. नवीन अधिवासाची प्राप्ती .. .. .. ..

११. भारतात अधिवास प्राप्त करण्याची विशेष पद्धत .. .. ..

१२. विदेशी शासनाचा प्रतिनिधी म्हणून किंवा त्याच्या कुटुंबाचा घटक म्हणून राहिल्याने अधिवास प्राप्त होत नाही.

१३. नवीन अधिवास चालू राहणे .. .. .. ..

१४. अज्ञान व्यक्तीचा अधिवास .. .. .. ..

१५. विवाहामुळे स्त्रीला मिळणारा अधिवास .. .. .. ..

१६. विवाहकाळात पत्नीचा अधिवास .. .. .. ..

१७. अज्ञान व्यक्तीला नवीन अधिवास प्राप्त होणे .. .. ..

१८. वेड्या माणसाला नवीन अधिवास प्राप्त होणे .. .. ..

१९. अधिवास अन्यत्र असल्याच्या पुराव्याच्या अभावी भारतातील जंगम संपत्तीवरील उत्तराधिकार ..

भाग तीन

**विवाह**

२०. विवाहामुळे हितसंबंध व अधिकार प्राप्त होत नाहीत किंवा गमावले जात नाहीत .. ..

२१. भारतात अधिवास असलेली व अधिवास नसलेली व्यक्ती यांच्यामधील विवाहाचा परिणाम ..

२२. अज्ञान व्यक्तीच्या संपत्तीची विवाहलक्षी संव्यवस्था .. .. ..

भाग चार

**रक्तसंबंधाविषयी**

२३. भाग लागू असणे .. .. .. .. ..

२४. आप्तसंबंध किंवा रक्तसंबंध. . .. .. ..

२५. रेषीय रक्तसंबंध .. .. .. .. ..

२६. सांपार्श्विक रक्तसंबंध .. .. .. .. ..

२७. उत्तराधिकाराच्या प्रयोजनार्थ मूळ व्यक्तीशी सारख्याच संबंधित म्हणून मानलेल्या व्यक्ती ..

२८. आप्तसंबंधाच्या श्रेणींची संगणना करण्याची पद्धत .. .. ..

कलमे.

भाग पाच

**विनामृत्युपत्र उत्तराधिकार**

प्रकरण एक

**प्रारंभिक**

२९. भाग लागू असणे .. .. .. ..

३०. मृत व्यक्ती कोणत्या संपत्तीबाबत विनामृत्युपत्र मृत्यू पावली असल्याचे मानले जाते .. ..

**प्रकरण दोन**

**पारशांहून अन्य विनामृत्युपत्र व्यक्तींच्या बाबतीतील नियम**

३१. पारशांना प्रकरण लागू नाही. .. .. .. ..

३२. अशा संपत्तीची प्रक्रांती .. .. .. .. ..

३३. विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा आणि रेषीय वंशज असतील अथवा विधवा आणि केवळ आप्तसंबंधीच असतील अथवा विधवा असून कोणीही आप्तसंबंधी नसतील त्याबाबतीत.

३३क. विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा राहिली असेल पण कोणीही रेषीय वंशज नसतील त्याबाबतीत विशेष उपबंध.

३४. विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा राहिली नसेल आणि त्या व्यक्तीच्या मागे कोणीही आप्तसंबंधी राहिला नसेल त्या बाबतीत.

३५. विधुराचे हक्क .. .. .. .. ..

**रेषीय वंशज असतील त्या बाबतीतील वितरण**

३६. वितरणाचे नियम .. .. .. .. ..

३७. विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे केवळ एखादे अपत्य किंवा अपत्ये राहिली असतील त्या बाबतीत ..

३८. विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे कोणीही अपत्य नव्हे तर नातवंड किंवा नातवंडे असतील त्याबाबतीत

३९. विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे केवळ पणतवंडे किंवा दूरचे रेषीय वंशज राहिले असतील त्याबाबतीत.

४०. ज्यांच्यापैकी सर्वच जण विनामृत्युपत्र व्यक्तीशी समान आप्तसंबंध श्रेणीने संबंधित नाहीत असे रेषीय वंशज तिने मागे ठेवले असून त्यांच्याहून दूरचे रेषीय वंशज ज्यांच्यामार्फत संबंधित आहेत ते मृत असतील त्याबाबतीत.

**रेषीय वंशज नसतील त्या बाबतीलील वितरण**

४१. विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे कोणीही रेषीय वंशज राहिले नसतील त्या बाबतीतील वितरणाचे नियम.

४२. विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप हयात असेल त्या बाबतीत

४३. विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप मृत्यू पावला असेल, पण त्या व्यक्तीची आई, भाऊ आणि बहिणी हयात असतील त्या बाबतीत.

४४. विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप मृत्यू पावला असून, त्या व्यक्तीची आई, भाऊ किंवा बहीण आणि कोणाही मृत भावाची अपत्ये हयात असतील त्या बाबतीत.

४५. विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप मृत्यू पावला असून, त्या व्यक्तीची आई व कोणाही मृत भावाची किंवा बहिणीची अपत्ये हयात असतील त्या बाबतीत.

४६. विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप मृत्यू पावला असेल, पण त्या व्यक्तीची आई हयात असून, कोणीही भाऊ, बहीण, भाचा/पुतण्या किंवा भाची/पुतणी नसेल त्या बाबतीत.

४७. विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे कोणीही रेषीय वंशज, बाप किंवा आईही राहिली नसेल त्या बाबतीत.

४८. विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे कोणीही रेषीय वंशज किंवा आई वा बाप किंवा भाऊ किंवा बहिणही नसेल त्या बाबतीत.

४९. अपत्यांचे प्राग्दायांश एकराशीत आणावयाचे नाहीत

कलमे.

प्रकरण तीन

**विनामृत्युपत्र पारशी व्यक्तींकरता विशेष नियम**

५०. विनामृत्युपत्र उत्तराधिकारासंबंधी सर्वसाधारण तत्त्वे .. .. ..

५१. विनामृत्युपत्र व्यक्तीच्या संपत्तीची विधवा, विधूर, अपत्ये व आई-बाप यांच्यात विभागणी. ..

५२. [वगळले.]

५३. ज्या विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे रेषीय वंशज राहिला आहे तिच्या पूर्वमृत अपत्याच्या हिश्श्यांची विभागणी.

५४. जेथे विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे कोणताही रेषीय वंशज राहिला नसेल, पण विधवा किंवा विधूर किंवा कोणत्याही रेषीय वंशजाची विधवा राहिली असेल त्या बाबतीतील संपत्तीची विभागणी.

५५. जेथे विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे रेषीय वंशज किंवा विधवा किंवा विधूर किंवा कोणत्याही रेषीय वंशजाची विधवा राहिली नसेल त्या बाबतीतील संपत्तीची विभागणी.

५६. या प्रकरणाच्या उपबंधाखाली उत्तराधिकारी होण्यास हक्कदार असा कोणीही नातलग नसेल त्या बाबतीतील संपत्तीची विभागणी.

भाग सहा

**मृत्युपत्रीय उत्तराधिकार**

प्रकरण एक

**प्रास्ताविक**

५७. या भागाचे विवक्षित उपबंध हिंदू, इत्यादींनी केलेल्या मृत्युपत्रांच्या एका वर्गास लागू असणे. ..

५८. भागाची सर्वसाधारण प्रयुक्ती. .. .. .. ..

प्रकरण दोन

**मृत्युपत्रे व क्रोडपत्रे याविषयी**

५९. मृत्युपत्रे करण्यास क्षम असणारी व्यक्ती .. .. .. ..

६०. मृत्युपत्रीय पालक .. .. .. .. ..

६१. कपटाने, जबरदस्तीने किंवा गळ घालून मिळविलेले मृत्युपत्र .. .. ..

६२. मृत्युपत्र प्रत्याहृत करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल .. ..

प्रकरण तीन

**विनाविशेषाधिकार मृत्युपत्रांच्या निष्पादनाविषयी**

६३. विनाविशेषाधिकार मृत्युपत्रांचे निष्पादन .. .. .. ..

६४. निर्देशामुळे कागदपत्रांचे समाविष्ट होणे .. .. .. ..

प्रकरण चार

**विशेषाधिकार मृत्युपत्रांविषयी**

६५. विशेषाधिकार मृत्युपत्रे .. .. .. .. ..

६६. विशेषाधिकार मृत्युपत्रे करण्याची पद्धत व ती निष्पादित करण्याचे नियम .. ..

प्रकरण पाच

**मृत्युपत्रांचे साक्षांकन, प्रत्याहरण, फेरबदल आणि पुनरुज्जीवन यांविषयी**

६७. साक्षांकन करणाऱ्या साक्षीदाराला दिलेल्या दानाचा परिणाम .. .. ..

६८. साक्षीदार हा, हितसंबंधित असल्यामुळे किंवा मृत्युपत्रव्यवस्थापक असल्यामुळे निरर्ह नाही ..

कलमे.

६९. मृत्युपत्रकर्त्यांच्या विवाहामुळे मृत्युपत्राचे प्रत्याहरण. .. .. ..

७०. विनाविशेषाधिकार मृत्युपत्राचे किंवा क्रोडपत्राचे प्रत्याहरण. .. .. ..

७१. विनाविशेषाधिकार मृत्युपत्रातील मजकूर पुसून टाकणे, ओळींच्या मध्ये मजकूर घालणे, किंवा मजकुरात फेरबदल करणे यांचा परिणाम.

७२. विशेषाधिकार मृत्युपत्राचे किंवा क्रोडपत्राचे प्रत्याहरण. .. .. ..

७३. विनाविशेषाधिकार मृत्युपत्राचे पुनरुज्जीवन. .. .. .. ..

## प्रकरण सहा

### मृत्युपत्रांचा अर्थ लावण्याविषयी

७४. मृत्युपत्राची शब्दयोजना .. .. .. .. ..

७५. मृत्युपत्राचे उद्दिष्ट किंवा विषय याबाबतचे प्रश्न निर्णीत करण्यासाठी चौकशी. .. ..

७६. उद्दिष्टांचे चुकीचे नाव किंवा चुकीचे वर्णन. .. .. .. ..

७७. शब्द केव्हा पुरवता येतील. .. .. .. ..

७८. विषयाच्या वर्णनातील चुकीचा तपशील सोडून देणे. .. .. ..

७९. वर्णनाचा भाग चुकीचा म्हणून केव्हा सोडून देऊ नये. .. .. ..

८०. प्रकट संदिग्धतेच्या बाबतीत बाह्य पुरावा ग्राह्य. .. .. ..

८१. प्रकट संदिग्धतेच्या किंवा न्यूनतेच्या बाबतीत बाह्य पुरावा अग्राह्य. .. ..

८२. खंडाचा अर्थ संपूर्ण मृत्युपत्रावरून ग्रहण करावयाचा. .. .. ..

८३. शब्द केव्हा मर्यादित अर्थाने आणि केव्हा नेहमीपेक्षा व्यापक अर्थाने समजता येतील. ..

८४. शक्य असलेल्या दोन अन्वयार्थांपैकी कशाला अधिमान द्यावयाचा. .. ..

८५. कोणत्याही भागाचा जर तर्कशुद्ध अर्थ लावता येत असेल तर तो सोडून द्यावयाचा नाही. ..

८६. मृत्युपत्राच्या भिन्नभिन्न भागात पुनरावृत्ती केलेल्या शब्दांचे निर्वचन. .. ..

८७. मृत्युपत्रकर्त्यांचा उद्देश शक्य तेथवर अंमलात आणावयाचा. .. .. ..

८८. दोन विसंगत खंडांपैकी शेवटचा प्रभावी ठरतो. .. .. ..

८९. अनिश्चिततेमुळे मृत्युपत्र किंवा मृत्युपत्रित दान शुन्य. .. .. ..

९०. विषयाचे वर्णन करणारे शब्द मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी ज्या वर्णनाशी जुळते त्या संपत्तीचा निर्देश करतात.

९१. सर्वसाधारण मृत्युपत्रित दानाने दिलेली विनियुक्तीची मुखत्यारी. .. ..

९२. विनियुक्तीच्या अभावी अधिकाराच्या उद्दिष्टांपत्र उपलक्षित दान. .. ..

९३. विशिष्ट व्यक्तींचे " वारस " इत्यादींना विशेषक शब्दांशिवाय मृत्युपत्रित दान. .. ..

९४. विशिष्ट व्यक्तींचे " प्रतिनिधी " इत्यादींना मृत्युपत्रित दान. .. .. ..

९५. मर्यादावाचक शब्दांशिवाय मृत्युपत्रित दान. .. .. .. ..

९६. पर्यायी मृत्युपत्रित दान. .. .. .. .. ..

९७. व्यक्तीला मृत्युपत्रित दान देऊन त्यात, एखाद्या वर्गाचे वर्णन करणारे शब्द अधिक घातले असता त्यांचा परिणाम.

९८. केवळ सर्वसाधारणपणे वर्णन केलेल्या व्यक्तिवर्गास मृत्युपत्रित दान. .. ..

९९. संज्ञांचा अर्थ लावणे. .. .. .. .. ..

१००. नातेसंबंध व्यक्त करणारे शब्द केवळ औरस नातलग किंवा अशांचा अभाव असल्यास औरस म्हणून लौकिक असलेले नातलग दर्शवतात.

१०१. जेथे मृत्युपत्र त्याच व्यक्तीला दोन मृत्युपत्रित दाने केल्याचे दर्शवते तेथे अर्थ लावण्याचे नियम. ..

१०२. अवशिष्ट उत्तरदानग्राही बनवणे. .. .. .. ..

कलमे.

१०३. अवशिष्ट उत्तरदानग्राही जिला हक्कदार असतो ती संपत्ती. .. .. ..

१०४. सर्वसाधारण शब्दांतील उत्तरदान निहित होण्याची वेळ. .. .. ..

१०५. कोणत्या प्रकरणी उत्तरदान व्यपगत होते. .. .. .. ..

१०६. जर दोन संयुक्त उत्तरदानग्राहींपैकी एक मृत्युपत्रकर्त्याच्या आधी मृत्यू पावला तर उत्तरदान व्यपगत होत नाही.

१०७. विभिन्न हिस्से देण्याचा मृत्युपत्रकर्त्याचा उद्देश दर्शविणाऱ्या शब्दांचा परिणाम. .. ..

१०८. व्यपगत हिस्सा, हा त्याचा विनियोग केला नसल्याप्रमाणे केव्हा जातो. .. ..

१०९. मृत्युपत्रकर्त्याच्या अपत्याला किंवा रेषीय वंशजाला दिलेले मृत्युपत्रित दान त्याचा मृत्युपत्रकर्त्याच्या हयातीत मृत्यू झाल्याने केव्हा व्यपगत होत नाही.

११०. " ख " च्या लाभार्थ " क " ला दिलेले मृत्युपत्रित दान " क " च्या मृत्यूने व्यपगत होत नाही.

१११. वर्णिलेल्या व्यक्तीवर्गाला दिलेल्या मृत्युपत्रित दानाच्या बाबतीत उत्तरजीविता. .. ..

प्रकरण सात

**शून्य मृत्युपत्रित दानांविषयी**

११२. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नसलेल्या, विशिष्ट वर्णनाने निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला मृत्युपत्रित दान.

११३. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नसलेल्या व्यक्तीला पूर्वमृत्युपत्रित दानाच्या अधीनतेने केलेले मृत्युपत्रित दान.

११४. शाश्वतता विरोधी नियम. .. .. .. ..

११५. ज्यापैकी काहीजण कलमे ११३ आणि ११४ मधील नियमाखाली येऊ शकतील त्या वर्गाला मृत्युपत्रित दान.

११६. पूर्व मृत्युपत्रित दान निष्फळ झाल्यावर परिणामक व्हावयाचे मृत्युपत्रित दान. .. ..

११७. संचयाकरता दिलेल्या निदेशाचा परिणाम. .. .. .. ..

११८. धार्मिक किंवा धर्मादायी उपयोगांसाठी मृत्युपत्रित दानं. .. .. ..

प्रकरण आठ

**मृत्युपत्रित दाने निहित होण्याविषयी**

११९. जेव्हा प्रदान किंवा कब्जा लांबणीवर टाकलेला असेल तेव्हा उत्तरदान निहित होण्याचा दिनांक. ..

१२०. जेव्हा उत्तरदान विनिर्दिष्ट घटनेवर समाश्रित असेल तेव्हा ते निहित होण्याचा दिनांक. ..

१२१. एखाद्या वर्गातील जे सदस्य विशिष्ट वयाचे होतील अशांना दिलेल्या मृत्युपत्रित दानातील हितसंबंध निहित होणे.

प्रकरण नऊ

**भारयुक्त मृत्युपत्रित दानांविषयी**

१२२. भारयुक्त मृत्युपत्रित दाने. .. .. .. .. ..

१२३. त्याच व्यक्तिला दिलेल्या दोन अलग आणि स्वतंत्र मृत्युपत्रित दानांपैकी एक स्वीकारता येईल आणि दुसरे नाकारता येईल.

प्रकरण दहा

**समाश्रित मृत्युपत्रित दानांविषयी**

१२४. विनिर्दिष्ट अनिश्चित घटनेवर समाश्रित मृत्युपत्रित दान-ती घडण्यासाठी कोणतीही वेळ उल्लेखिलेली नसताना.

१२५. विनिर्दिष्ट नसेल अशा एखाद्या काळी विवक्षित व्यक्तींपैकी हयात राहतील अशांना मृत्युपत्रित दान.

कलमे.


## प्रकरण अकरा

### सशर्त मृत्युपत्रित दानांविषयी

१२६. अशक्य शर्तींवर दिलेले मृत्युपत्रित दान. .. .. .. ..

१२७. अवैध किंवा अनैतिक शर्तींवर मृत्युपत्रित दान. .. .. ..

१२८. उत्तरदान निहित होण्यास पूर्ववर्ती असलेल्या शर्तीची पूर्तता. .. .. ..

१२९. " ख " ला दिलेले पूर्व मृत्युपत्रित दान निष्फळ झाल्यास " क " ला मृत्युपत्रित दान. ..

१३०. पहिले मृत्युपत्रित दान निष्फळ झाल्यावर दुसरे केव्हा परिणामक व्हावयाचे नाही. ..

१३१. विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडण्याच्या किंवा न घडण्याच्या शर्तीवर आपरवर्ती मृत्युपत्रित दान. ..

१३२. शर्त काटेकोरपणे पुरी झाली पाहिजे. .. .. .. ..

१३३. मूळच्या मृत्युपत्रित दानावर दुसऱ्या मृत्युपत्रित दानाच्या विधिबाह्यतेचा परिणाम होत नाही. ..

१३४. विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडल्यास किंवा न घडल्यास मृत्युपत्रित दान परिणामक असण्याचे बंद होईल अशा शर्तीवर मृत्युपत्रित दान.

१३५. अशी शर्त कलम १२० खाली विधिबाह्य असता कामा नये.

१३६. ज्या कृतीसाठी अवधी विनिर्दिष्ट केलेला नाही आणि जिथे पालन न झाल्यास विषयवस्तू दुसऱ्याकडे संक्रमित व्हावयाची आहे, ती कृती उत्तरदानग्राहीने अशक्य केल्याची किंवा अनिश्चित काळ लांबणीवर टाकल्याची परिणती.

१३७. विनिर्दिष्ट पूर्ववर्ती किंवा उत्तरवर्ती शर्तींचे पालन कपट प्रकरणी आणखी अवधी. ..

## प्रकरण बारा

### उपयोजन किंवा उपभोग यांबाबतच्या निदेशांसह केलेल्या मृत्युपत्रित दानांविषयी

१३८. कोणत्याही व्यक्तीला किंवा तिच्या लाभार्थ अबाधित मृत्युपत्रित दान देऊन तो निधी विशिष्ट रीतीने वापरावायाचा असा निदेश देणे.

१३९. उत्तरदानग्राहीला विनिर्दिष्ट लाभ प्राप्त करून देण्यासाठी अबाधित मृत्युपत्रित दानाच्या पद्धतीवर निर्बंध घालावयाचा असा निदेश.

१४०. विवक्षित प्रयोजनांसाठी निधीचे मृत्युपत्रित दान केले असून त्यांपैकी काही पुरी होऊ शकत नसतील तर.

## प्रकरण तेरा

### मृत्युपत्रव्यवस्थापकाला दिलेल्या मृत्युपत्रित दानांविषयी

१४१. मृत्युपत्र व्यवस्थापक म्हणून नामनिर्दिष्ट केलेल्या उत्तरदानग्राहीने मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून कार्य करण्याचा उद्देश दर्शविल्याशिवाय त्याला काही मिळू शकत नाही.

## प्रकरण चौदा

### विनिर्दिष्ट उत्तरदानांविषयी

१४२. 'विनिर्दिष्ट उत्तरदान' याची व्याख्या. .. .. .. ..

१४३. विवक्षित रक्कम ज्यात गुंतवलेली आहे ते पुंजरोखे, इत्यादी याचे वर्णन केले असेल त्या बाबतीतील तिचे मृत्युपत्रित दान.

१४४. पुंजरोख्याचे मृत्युपत्रित दान, जेथे मृत्युपत्राच्या दिनांकास, मृत्युपत्रकर्त्याकडे त्याच प्रकारच्या पुंजरोख्यांची तितकीच किंवा त्याहून अधिक रक्कम असेल तेथे.

१४५. मृत्युपत्रकर्त्याच्या संपत्तीच्या काही भागाची विवक्षित मार्गाने विल्हेवाट होईपर्यंत जेथे पैशांचे मृत्युपत्रित दान प्रदेय नसते तेथे.

१४६. प्रगणित वस्तूंचे मृत्युपत्रित दान विनिर्दिष्टपणे केव्हा दिल्याचे मानावयाचे नाही.

१४७. क्रमाक्रमाने अनेक व्यक्तींना दिलेले विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दान त्याच रुपात राखणे.

कलमे.

१४८. क्रमाक्रमाने दोन किंवा अधिक व्यक्तींना मृत्युपत्राने दिलेल्या संपत्तीचा विक्रय व विक्रीच्या उत्पन्नाची गुंतवणूक.

१४९. जेथे उत्तरदाने देताना मत्ता अपुरी पडत असेल तेथे, विनिर्दिष्ट उत्तरदान सर्वसाधारण उत्तरदानाबरोबर घट पावावयाचे नाही.

## प्रकरण पंधरा

### निदर्शक उत्तरदानांविषयी

१५०. "निदर्शक" उत्तरदान याची व्याख्या. .. .. .. ..

१५१. विनिर्दिष्ट उत्तरदानाचा विषय असलेल्या निधीतून उत्तरदान देण्याचा निदेश असतो तेव्हा प्रदानाचा क्रम.

## प्रकरण सोळा

### उत्तरदानांच्या लोपनाविषयी

१५२. "लोपन" याचे स्पष्टीकरण. .. .. .. ..

१५३. निदर्शक उत्तरदान लोप न पावणे.

१५४. त्रयस्थ पक्षाकडून एखादी वस्तू घेण्याच्या अधिकाराच्या विनिर्दिष्ट उत्तरदानाचे लोपन.

१५५. मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेल्या संपूर्ण वस्तूचा भाग मृत्युपत्रकर्त्याला मिळण्याने यथाप्रमाण लोपन.

१५६. ज्याचा एखादा अंश मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला असेल त्या संपूर्ण निधीचा एखादा अंश मृत्युपत्रकर्त्याला मिळण्याने यथाप्रमाण लोपन.

१५७. जेथे निधीचा एखादा अंश मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे एका उत्तरदानग्राहीला दिला असून त्याच निधीवर प्रभारित असे उत्तरदान दुसऱ्यास दिलेले असेल आणि मृत्युपत्रकर्त्याला निधीचा एखादा अंश मिळालेला असून उर्वरित अंश दोन्ही उत्तरदाने देण्यास अपुरा असेल तेथे प्रदानाचा क्रम.

१५८. मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला पुंजरोखा मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नसेल तर लोपन.

१५९. मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला पुंजरोखा अंशतः अस्तित्वात असेल तर यथाप्रमाण लोपन.

१६०. विवक्षित जागेशी संबंद्ध म्हणून वर्णिलेल्या वस्तूंचे विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दान, त्या हलवल्याकारणाने लोप पावत नाही.

१६१. मृत्युपत्राने दिलेल्या वस्तू हलवणे म्हणजे लोपन असे केव्हा होत नाही.

१६२. जेव्हा मृत्युपत्राने दिलेली वस्तू म्हणजे मृत्युपत्रकर्त्याला त्रयस्थ व्यक्तीकडून मिळावयाची मूल्यवान वस्तू असून खुद्द मृत्युपत्रकर्त्याला किंवा त्याच्या प्रतिनिधीला ती मिळते तेव्हा.

१६३. मृत्युपत्राचा दिनांक व मृत्युपत्रकर्त्याचा मृत्यू यांच्या दरम्यान विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दानाच्या विषयात कायद्याच्या प्रवर्तनामुळे बदल.

१६४. मृत्युपत्रकर्त्याच्या नकळत विषयात बदल.

१६५. मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला पुंजरोखा त्रयस्थ व्यक्तीला, तो पूर्ववत परत केला पाहिजे या शर्तीवर उसनवार दिल्यास.

१६६. मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला पुंजरोखा विकला तरी पुनःस्थापित करण्यात आल्यास आणि मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी तो त्याच्या मालकीचा असल्यास.

## प्रकरण सतरा

### मृत्युपत्रित दानाविषयीच्या बाबतीतील देणे रकमांच्या प्रदानविषयी

१६७. विनिर्दिष्ट उत्तरदानग्राहींना भारमुक्त करण्याचे दायित्व मृत्युपत्रव्यवस्थापकावर नसणे.

१६८. मृत्युपत्राने दिलेल्या वस्तूंवरील मृत्युपत्रकर्त्याचा स्वत्वाधिकार त्याच्या संपदेच्या खर्चाने पूर्ण करावयाचा.

१६९. जिच्यासाठी नियतकालागणिक जमीन महसूल किंवा भाडे प्रदेय आहे अशा, उत्तरदानग्राहीच्या स्थावर संपत्तीची भारमुक्ती.

१७०. संयुक्त भांडवल कंपनीत विनिर्दिष्ट उत्तरदानग्राहीचा जो पुंजरोखा असेल त्याची भारमुक्ती.

कलमे.

प्रकरण अठरा

**सर्वसाधारण शब्दांत वर्णिलेल्या वस्तूंच्या मृत्युपत्रित दानांविषयी**

१७१. सर्वसाधारण शब्दांत वर्णिलेल्या वस्तूंचे मृत्युपत्रित दान. .. .. ..

प्रकरण एकोणीस

**निधीच्या व्याजाच्या किंवा उत्पन्नाच्या मृत्युपत्रित दानांविषयी**

१७२. निधीच्या व्याजाचे किंवा उत्पन्नाचे मृत्युपत्रित दान .. .. ..

प्रकरण वीस

**वर्षासनाच्या मृत्युपत्रित दानांविषयी**

१७३. मृत्युपत्राने निर्मिलेले वर्षासन, मृत्युपत्रावरून विरूद्ध उद्देश दिसून न आल्यास, केवळ हयातीपुरतेच प्रदेय.

१७४. जेव्हा संपत्तीच्या उत्पन्नातून किंवा सर्वसाधारण संपत्तीतून वर्षासन पुरवावे असा मृत्युपत्राने निदेश दिलेला असतो अथवा मृत्युपत्राने दिलेला पैसा वर्षासनाच्या खरेदीत गुंतवावयाचा असतो तेव्हा निहित होण्याचा कालावधी.

१७५. वर्षासन घट. .. .. .. .. ..

१७६. जेथे वर्षासनाचे दान व अवशिष्टाचे दान केलेले असेल तेथे संपूर्ण वर्षासन प्रथम भागवावयाचे.

प्रकरण एकवीस

**धनकोंना व अंशाधिकाऱ्यांना द्यावयाच्या उत्तरदानांविषयी**

१७७. धनको प्रथमदर्शनी उत्तरदानाला व त्याचप्रमाणे ऋणाला हक्कदार. .. ..

१७८. अपत्य प्रथमदर्शनी उत्तरदानास व त्याचप्रमाणे अंशास हक्कदार. .. ..

१७९. उत्तरदानग्राहीसाठी मागाहून केलेल्या तरतुदीमुळे लोपन नाही. ..

प्रकरण बावीस

**निवडीविषयी**

१८०. ज्या परिस्थितीत निवड होते ती परिस्थिती. .. .. .. ..

१८१. मालकाने सोडून दिलेल्या हितसंबंधाची प्रक्रांती. .. .. ..

१८२. मृत्युपत्रकर्त्याचा आपल्या मालकीबद्दलचा समज महत्त्वाचा नाही. .. ..

१८३. एखाद्या माणसाच्या लाभार्थ केलेले मृत्युपत्रित दान निवडीच्या प्रयोजनार्थ काय म्हणून मानावयाचे.

१८४. अप्रत्यक्षपणे लाभ घेणाऱ्या व्यक्तीला निवड करावी लागत नाही. .. ..

१८५. व्यक्ती या भूमिकेत मृत्युपत्रित लाभ घेणाऱ्या व्यक्तीला अन्य भूमिकेतून त्यास विरोधून लाभ घेण्याची निवड करता येईल.

१८६. लगतपूर्वीच्या सहा कलमांच्या उपबंधांना अपवाद. .. .. ..

१८७. मृत्युपत्राने दिलेल्या लाभाचा स्वीकार म्हणजे मृत्युपत्राखाली लाभ घेण्याच्या पर्यायाची निवड असे केव्हा होते.

१८८. जेव्हा जाणीव किंवा हक्कवर्जन गृहित धरले जाते किंवा त्याचे अनुमान केले जाते ती परिस्थिती.

१८९. मृत्युपत्रकर्त्याच्या प्रतिनिधींना उत्तरदानग्रहीकडे निवड करण्याची मागणी केव्हा करता येईल.

१९०. निःसमर्थतेच्या बाबतीत निवड लांबणीवर टाकणे. .. .. ..

प्रकरण तेवीस

**मृत्यूच्या पूर्वकल्पनेने केलेल्या दानांविषयी**

१९१. मृत्यूच्या पूर्वकल्पनेने केलेल्या दानाद्वारे हस्तांतरणीय संपत्ती. .. .. ..

कलमे.

## भाग सात

### मृताच्या संपत्तीचे संरक्षण

१९२. मृताच्या संपत्तीवर उत्तराधिकारान्वये हक्क सांगणाऱ्या व्यक्तीला गैर कब्जाविरूद्ध दाद मिळण्यासाठी अर्ज करता येईल.

१९३. न्यायाधीशाने करावयाची चौकशी.

१९४. प्रक्रिया.

१९५. कार्यवाहीचा निर्णय होईतोवर अभिरक्षकाची नियुक्ती.

१९६. अभिरक्षकास प्रदान केल्या जाऊ शकतील अशा शक्ती.

१९७. अभिरक्षकांनी विवक्षित शक्ती वापरण्यास मनाई.
अभिरक्षकाकडे ऋणे, इत्यादींचा भरणा.

१९८. अभिरक्षकाने प्रतिभूती द्यावयाची आणि त्याला पारिश्रमिक मिळू शकेल.

१९९. संपदेत महसूल देणारी जमीन अंतर्भूत असेल तेथे जिल्हाधिकाऱ्याकडून अहवाल.

२००. दावा मांडणे व त्यात बचाव देणे.

२०१. अभिरक्षकाकडे अभिरक्षा असेतोवर दृश्यमान मालकांना भत्ते.

२०२. अभिरक्षकाने हिशेब दाखल करावयाचे.

२०३. हिशेबांचे निरीक्षण आणि हितसंबंधित पक्षाचा प्रतिरूप हिशेब ठेवण्याच हक्क.

२०४. त्याच संपत्तीसाठी दुसरा अभिरक्षक नियुक्त करण्यास आडकाठी.

२०५. अभिरक्षकाकरता अर्ज करण्याची कालमर्यादा.

२०६. लोकहितर्थ संव्यवस्था किंवा मृताने दिलेले वैध निदेश यांच्याविरूद्ध या भागाची बजावणी करण्यास आडकाठी.

२०७. अज्ञानाची संपत्ती पाल्याधिकरणाच्या अधिकारितेस अधीन असेल त्या बाबतीत पाल्याधिकरणास अभिरक्षक करावयाचे.

२०८. वाद आणण्याच्या हक्काची व्यावृत्ती.

२०९. संक्षिप्त कार्यवाहीच्या निर्णयाचा परिणाम.

२१०. लोक अभिरक्षकांची नियुक्ती.

## भाग आठ

### उत्तराधिकारामुळे मृताच्या संपत्तीवरील प्रातिनिधिक स्वत्वाधिकार

२११. मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक याची त्या नात्याने भूमिका व संपत्ती.

२१२. विनामृत्युपत्र व्यक्तीच्या संपत्तीवर हक्क.

२१३. मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा उत्तरदानग्राही म्हणून हक्क केव्हा प्रस्थापित होतो.

२१४. प्रातिनिधिक स्वत्वाधिकार सिद्ध करणे ही मृत व्यक्तींच्या ऋणकोंकडून न्यायालयामार्फत ऋण वसूल करण्याची पूर्ववर्ती शर्त.

२१५. मागाहून दिलेल्या संप्रमाणाचा किंवा प्रशासनपत्राचा प्रमाणपत्रावर परिणाम.

२१६. संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रत्याहृत होईपर्यंत केवळ त्याच्या प्रदानग्राहीने दावा लावणे, इ. करावयाचे.

## भाग नऊ

### संप्रमाण, प्रशासनपत्र आणि मृताच्या संपदेचे प्रशासन

२१७. भाग लागू असणे.

कलमे.

## प्रकरण एक

### संप्रमाण व प्रशासनपत्र यांच्या प्रदानाविषयी

२१८. मृत व्यक्ती जेथे हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख, जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती असेल तेथे प्रशासन कोणाला प्रदान केले जाऊ शकेल.

२१९. मृत व्यक्ती जेथे हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख, जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती नसेल तेथे.

२२०. प्रशासनपत्राचा परिणाम.

२२१. प्रशासनामुळे कृती विधिग्राह्य न होणे.

२२२. केवळ नियुक्त केलेल्या मृत्युपत्रव्यवस्थापकालाच संप्रमाण.

२२३. ज्यांना संप्रमाण प्रदान केले जाऊ शकत नाही त्या व्यक्ती.

२२४. अनेक मृत्युपत्र व्यवस्थापकांना एकाच वेळी किंवा निरनिराळ्या वेळी संप्रमाण प्रदान करणे.

२२५. संप्रमाण प्रदान केल्यानंतर अढळून आलेल्या क्रोडपत्रास वेगळे संप्रमाण.

२२६. मागे हयात राहणाऱ्या मृत्युपत्रव्यवस्थापकाकडे प्रतिनिधित्व येणे.

२२७. संप्रमाणाचा परिणाम.

२२८. देशाबाहेर सिद्ध केलेल्या मृत्युपत्राच्या अधिप्रमाणित प्रतीच्या प्रतीने युक्त प्रशासनपत्र.

२२९. मृत्युपत्रव्यवस्थापकाने पदत्याग केला नसेल त्याबाबतीतील प्रशासन प्रदान.

२३०. मृत्युपत्रव्यवस्थापकत्वाचा त्याग करण्याची पद्धत व परिणाम.

२३१. जेव्हा मृत्युपत्रव्यवस्थापक कालमर्यादेच्या आत पदाचा त्याग करतो किंवा स्वीकार करण्यास चुकतो त्याबाबतीतील प्रक्रिया.

२३२. सर्वस्व किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राहीला प्रशासन प्रदान करणे.

२३३. मृत अवशिष्ट उत्तरदानग्राहीच्या प्रतिनिधीचा प्रशासनावर अधिकार.

२३४. जेथे मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राही किंवा अशा उत्तरदानग्राहीचा प्रतिनिधीही नसेल त्या बाबतीतील प्रशासन प्रदान.

२३५. सर्वस्व किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राहीहून अन्य उत्तरदानग्राहीला प्रशासन प्रदान करण्यापूर्वी प्रावाहन.

२३६. प्रशासन कोणाला प्रदान केले जाऊ शकत नाही.

२३६क. नियम विधानमंडळासमोर ठेवणे.

## प्रकरण दोन

### मर्यादित प्रदानांविषयी मर्यादित अवधीची प्रदाने

२३७. गहाळ झालेल्या मृत्युपत्राच्या प्रतीचे किंवा खड्यांचे संप्रमाण.

२३८. गहाळ झालेल्या किंवा नष्ट झालेल्या मृत्युपत्राच्या मजकुराचे संप्रमाण.

२३९. मूळ प्रत विद्यमान असताना प्रतीचे संप्रमाण.

२४०. मृत्युपत्र हजर केले जाईपर्यंत प्रशासन पत्र.

### हक्क असलेल्या अन्य व्यक्तींच्या उपयोगाकरिता व लाभाकरिता प्रदाने

२४१. अनुपस्थित मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या मुखत्याराला मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र.

२४२. जी अनुपस्थित व्यक्ती उपस्थित असती तर प्रशासन करण्यास हक्कदार झाली असती तिच्या मुखत्यारास मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र.

२४३. विनामृत्युपत्रतेच्या बाबतीत प्रशासन करण्यास हक्कदार असलेल्या अनुपस्थित व्यक्तींच्या मुखत्याराला प्रशासनपत्र.

२४४. एकमेव मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राहीच्या अज्ञानदशेच्या काळातील प्रशासनपत्र.

२४५. अनेक मृत्युपत्रव्वस्थापकांच्या किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राहींच्या अज्ञानदशेच्या काळातील प्रशानपत्र.

कलमे.

२४६. वेडा किंवा अज्ञान यांच्या उपयोगाकरिता व लाभाकरिता प्रशासनपत्र.

२४७. दावा प्रलंबित असताना प्रशासक.

**विशेष प्रयोजनाकरिता प्रदाने**

२४८. मृत्युपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनापुरते मर्यादित संप्रमाण.

२४९. विवक्षित प्रयोजनापुरते मर्यादित असे मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र.

२५०. ज्या संपत्तीत व्यक्तीचा लाभप्रद हितसंबंध असेल तिच्यापुरते मर्यादित प्रशासनपत्र.

२५१. दाव्यापुरते मर्यादित प्रशासनपत्र.

२५२. प्रशासकाविरूद्ध आणावयाच्या दाव्यात पक्षकार होण्याच्या प्रयोजनापुरते मर्यादित प्रशासनपत्र.

२५३. मृताची संपत्ती एकत्रित करण्याच्या व तिचे जतन करण्याच्या प्रयोजनापुरते मर्यादित प्रशासन.

२५४. सर्वसामान्य परिस्थितीत जी प्रशासनास हक्कदार झाली असती तिच्याहून अन्य व्यक्तीची प्रशासक म्हणून नियुक्ती.

**अपवादासह प्रदाने**

२५५. अपवादास अधीन असे संप्रमाण किंवा मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र.

२५६. अपवादासह प्रशासनपत्र.

**उर्वरित संपदेचे प्रदान**

२५७. उर्वरित संपदेचे संप्रमाण किंवा प्रशासनपत्र.

**अप्रशासित चीजवस्तूंसंबंधी प्रदान**

२५८. अप्रशासित चीजवस्तूसंबंधी प्रदान.

२५९. अप्रशासित चीजवस्तूसंबंधीच्या प्रदानाबाबत नियम.

२६०. जेव्हा मर्यादित प्रदान संपले असले तरीही संपदेचा काही भाग अप्रशासित राहतो तेव्हाचे प्रशासनपत्र.

प्रकरण तीन

**प्रदानांमध्ये फेरबदल व त्यांचे प्रत्याहरण**

२६१. कोणत्या चुका न्यायालयाला दुरूस्त करता येतील.

२६२. मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र प्रदान करण्यात आल्यानंतर जेथे क्रोडपत्र आढळून येईल त्या बाबतीतील प्रक्रिया.

२६३. न्याय कारणाखातर प्रत्यहृत करणे किंवा निर्भावित करणे.

प्रकरण चार

**संप्रमाणे व प्रशासनपत्रे प्रदान करण्याच्या व प्रत्याहृत करण्याच्या कार्यपद्धतीविषयी**

२६४. संप्रमाणे, इत्यादी प्रदान व प्रत्याहृत करताना जिल्हा न्यायाधीशांची अधिकारिता.

२६५. अविरोध प्रकरणांचा परामर्श घेण्यासाठी जिल्हा न्यायाधीशाचा प्रत्यायुक्त नियुक्त करण्याची शक्ती.

२६६. संप्रमाण व प्रशासन यांच्या प्रदानाबाबत जिल्हा न्यायाधीशाची शक्ती.

२६७. जिल्हा न्यायाधीश व्यक्तीला मृत्युपत्रीय कागदपत्रे हजर करण्याचा आदेश देऊ शकेल.

२६८. संप्रमाण व प्रशासन यासंबंधात जिल्हा न्यायाधिशाच्या न्यायालयाची कार्यवाही.

२६९. संपत्तीच्या संरक्षणाकरिता जिल्हा न्यायाधीशाने केव्हा व कसा हस्तक्षेप करावयाचा.

२७०. जिल्हा न्यायाधीश संप्रमाण किंवा प्रशासन केव्हा प्रदान करू शकेल.

२७१. ज्या जिल्ह्यात मृताचे स्थिर वास्तव्यस्थळ नव्हते त्या जिल्ह्याच्या न्यायाधीशाकडे केलेल्या अर्जाचा निकाल करणे.

२७२. प्रत्यायुक्त हा संप्रमाण व प्रशासनपत्र प्रदान करू शकेल.

कलमे.

२७३. संप्रमाणाची किंवा प्रशासनपत्राची निर्णायकता.

२७४. कलम २७३ च्या परंतुकाखाली केलेल्या प्रदानांचे प्रमाणपत्र उच्च न्यायालयाकडे पाठविणे.

२७५. संप्रमाणासाठी किंवा प्रशासनासाठी करावयाचा अर्ज योग्य रीतीने केल्यास व सत्यापित केल्यास त्याची निर्णायकता.

२७६. संप्रमाणासाठी विनंतीअर्ज.

२७७. कोणत्या प्रकरणी मृत्युपत्राचा अनुवाद विनंती-अर्जासोबत जोडावयाचा न्यायालयीन अनुवादकाहून अन्य व्यक्तीने अनुवादाबाबत सत्यापन करणे.

२७८. प्रशासनपत्रासाठी विनंती-अर्ज.

२७९. विवक्षित बाबतीत संप्रमाण किंवा प्रशासनपत्र याकरिता केलेल्या विनंती-अर्जातील निवेदनात भर.

२८०. संप्रमाण इत्यादीकरिता करावयाचा विनंती-अर्ज स्वाक्षरित व सत्यापित करावयाचा.

२८१. संप्रमाणाकरिता केलेल्या विनंतीअर्जाचे मृत्युपत्राच्या एका साक्षीदाराने सत्यापन करणे.

२८२. विनंती-अर्जातील किंवा अधिकथनातील खोट्या प्रकथनाबद्दल शिक्षा.

२८३. जिल्हा न्यायाधीशाची शक्ती.

२८४. संप्रमाण किंवा प्रशासनपत्र यांच्या प्रदानाविरुद्ध सावधानपत्र.
सावधानपत्राचा नमुना.

२८५. सावधानपत्र दाखल करण्यात आल्यानंतर सावधानकर्त्याला नोटीस देऊन होईपर्यंत विनंती-अर्जावर कार्यवाही करावयाची नाही.

२८६. जिल्हा प्रत्यायुक्ताने संप्रमाण किंवा प्रशासनपत्र केव्हा द्यावयाचे नाही.

२८७. विरोध नसेल अशा शंकास्पद प्रकरणी जिल्हा न्यायाधीशाकडे निवेदन प्रेषित करण्याची शक्ती.

२८८. विरोध असेल त्याबाबतीत किंवा आपल्या न्यायालयात संप्रमाण किंवा प्रशासनपत्र नाकारले जावे असे जिल्हा प्रत्यायुक्ताला वाटेल त्या बाबतीतील प्रक्रिया.

२८९. संप्रमाणाचे प्रदान न्यायालयाच्या मोहोरेनिशी करावयाचे.

२९०. प्रशासनपत्राचे प्रदान न्यायालयाच्या मोहोरेनिशी कारवयाचे.

२९१. प्रशासन बंधपत्र.

२९२. प्रशासन बंधपत्राचे अभिहस्तांकन.

२९३. संप्रमाण व प्रशासनपत्र प्रदान करण्याची वेळ.

२९४. ज्याचे संप्रमाण किंवा मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र देण्यात आले आहे ती मूळ मृत्युपत्रे दप्तर दाखल करणे.

२९५. विरोध असलेल्या प्रकरणांतील प्रक्रिया.

२९६. प्रत्याहृत संप्रमाण किंवा प्रशासनपत्र परत स्वाधीन करणे.

२९७. संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रत्याहृत होण्यापूर्वी प्रशासकाकडे किंवा मृत्युपत्रव्यवस्थापकाकडे केलेला भरणा.

२९८. प्रशासनपत्र नाकारण्याची शक्ती.

२९९. जिल्हा न्यायाधीशाच्या आदेशांवर अपिले.

३००. उच्च न्यायालयाची समवर्ती अधिकारिता.

३०१. मृत्युपत्रव्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला दूर करणे व उत्तराधिकाऱ्यासाठी उपबंध.

३०२. मृत्युपत्रव्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला निदेश.

प्रकरण पाच

**स्व-अपकृत्यजन्य मृत्युपत्रव्यवस्थापकांविषयी**

३०३. स्व-अपकृत्यजन्य मृत्युपत्रव्यवस्थापक.

३०४. मृत्युपत्रव्यवस्थापकाचे दायित्व.

कलमे.

## प्रकरण सहा

### मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या व प्रशासकाच्या अधिकारांविषयी


३०५. मृताच्या मागे राहिलेली वादकारणे व मृत्युसमयी येणे असलेली ऋणे यांबाबत.

३०६. मृताला असलेली देणी-घेणी अथवा त्याचे किंवा त्याच्या विरोधी कारवाई अधिकार त्याच्यामागे मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक यांच्या बाजूने किंवा विरुद्ध टिकून राहतात.

३०७. संपत्तीची विल्हेवाट करण्याचा मृत्युपत्रव्यवस्थापकाची किंवा प्रशासकाची शक्ती.

३०८. प्रशासनाच्या सर्वसाधारण शक्ती.

३०९. मुशाहिरा किंवा अभिकरण आकार.

३१०. मृताच्या संपत्तीची मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने केलेली खरेदी.

३११. अनेक मृत्युपत्रव्यवस्थापकांच्या किंवा प्रशासकांच्या शक्ती एकाने वापरण्याजोगे.

३१२. अनेक मृत्युपत्रव्यवस्थापकांपैकी किंवा प्रशासकांपैकी एकाच्या मृत्युनंतर शक्ती राहणे.

३१३. अप्रशासित चीजवस्तूंच्या प्रशासकाच्या शक्ती.

३१४. अज्ञानदशेपुरत्या प्रशासकाच्या शक्ती.

३१५. विवाहित मृत्युपत्रव्यवस्थापिकेच्या किंवा प्रशासिकेच्या शक्ती.


## प्रकरण सात

### मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकाच्या कर्तव्यांविषयी


३१६. मृताच्या उत्तरक्रियेबाबत.

३१७. जंत्री व हिशेब.

३१८. विवक्षित प्रकरणी जंत्रीमध्ये भारताच्या कोणत्याही भागातील संपत्तीचा समावेश करावयाचा.

३१९. मृताच्या संपत्तीबाबत व त्याला येणे असलेल्या ऋणांबाबत.

३२०. सर्व ऋणांआधी खर्च द्यावयाचे.

३२१. अशा खर्चानंतर द्यावयाचे खर्च.

३२२. त्यानंतर विवक्षित कामांबद्दलची मंजुरी द्यावयाची व नंतर अन्य ऋणे.

३२३. पूर्वोक्तावाचून सर्व ऋणे समसमान व हिस्सेरशीने द्यावयाची.

३२४. भारतात अधिवास नसेल त्या बाबतीतील जंगम संपत्तीचे ऋणांच्या फेडीकडे उपयोजन.

३२५. ऋणे उत्तरदानांपूर्वी फेडावयाची.

३२६. मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक हा निरीक्षणाशिवाय उत्तरदाने पावती करण्यास बांधलेला नसतो.

३२७. सर्वसाधारण उत्तरदाने घट पावणे.

३२८. ऋणे फेडण्यास मत्ता पुरेशी असते तेव्हा विनिर्दिष्ट उत्तरदान घट न पावणे.

३२९. ऋणे व जरूरीचे खर्च देण्यास मत्ता पुरेशी असते तेव्हा निदर्शक उत्तरदानाखाली हक्क.

३३०. विनिर्दिष्ट उत्तरदाने हिस्सेरशीने घट पावणे.

३३१. घट करण्याच्या प्रयोजनार्थ सर्वसाधारण म्हणून समजावयाची उत्तरदाने.


## प्रकरण आठ

### उत्तरदानाला मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने अनुमती देण्याविषयी


३३२. उत्तरदानग्राहीचा हक्क पूर्ण होण्याकरता अनुमती जरुरीची.

३३३. विनिर्दिष्ट उत्तरदानाला मृत्युपत्रव्यवस्थापकाने दिलेल्या अनुमतीचा परिणाम.

३३४. सशर्त अनुमती.

३३५. स्वतःच्या उत्तरदानाला मृत्युपत्रव्यवस्थापकाची अनुमती.

३३६. मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या अनुमतीचा परिणाम.

३३७. मृत्युपत्रव्यवस्थापकाने उत्तरदाने केव्हा सुपूर्द करावयाची.

कलमे.

प्रकरण नऊ

**वर्षासनाचे प्रदान व त्याचे संविभाजन यांविषयी**


३३८. मृत्युपत्राने कोणतीही वेळ निश्चित केली नसेल त्या बाबतीतील वर्षासनाची सुरूवात.

३३९. दर तिमाहीस किंवा दरमहा द्यावयाचे वर्षासन प्रथम केव्हा देय होते.

३४०. दिलेल्या अवधीच्या आत किंवा विवक्षित दिनांकास पहिले प्रदान करावयाचे असे निदेशित केले असेल त्या बाबतीतील क्रमवर्ती प्रदानांचे दिनांक ; प्रदानांच्या दिनांकापूर्वी वर्षासनधारकाचा मृत्यू.


प्रकरण दहा

**उत्तरदानासाठी तरतूद करण्याकरिता पैशांची गुंतवणूक करण्याविषयी**


३४१. जेथे विनिर्दिष्ट नसलेले उत्तरदान हयातीकरता दिले असले तेथे मृत्युपत्राने दिलेल्या रकमेची गुंतवणूक.

३४२. भविष्यकालीन वेळी द्यावयाच्या सर्वसाधारण उत्तरदानाची गुंतवणूक, मध्यंतरीच्या व्याजाची विल्हेवाट.

३४३. वर्षासनासाठी प्रभारित किंवा विनियोजित असा निधी नसेल त्या बाबतीतील प्रक्रिया.

३४४. समाश्रित मृत्युपत्रित दानाचे अवशिष्ट उत्तरदानग्राहीला हस्तांतरण.

३४५. विशिष्ट रोख्यात गुंतवण्याचा निदेश न देता मृत्युपत्राने हयातीकरता दिलेल्या अवशिष्टाची गुंतवणूक.

३४६. विनिर्दिष्ट रोख्यात गुंतवण्याचा निदेश देऊन मृत्युपत्राने हयातीकरता दिलेल्या अवशिष्टाची गुंतवणूक.

३४७. रुपांतरणाची व गुंतवणुकीची वेळ व रीत.

३४८. अज्ञान व्यक्तीला मृत्युपत्रित दानाच्या तात्काळ प्रदानाचा किंवा कब्जाचा हक्क असून तिच्यावतीने एखाद्या व्यक्तीस ते पावते करण्याचा निदेश नसेल त्या बाबतीतील प्रक्रिया.


प्रकरण अकरा

**उत्तरदानाचे उत्पन्न व व्याज यांविषयी**


३४९. विनिर्दिष्ट उत्तरदानाच्या उत्पन्नावर उत्तरदानग्राहीचा स्वत्वाधिकार.

३५०. अवशिष्ट उत्तरदानग्राहीचा अवशिष्ट निधीच्या उत्पन्नावर स्वत्वाधिकार.

३५१. सर्वसाधारण उत्तरदान देण्याची वेळ निश्चित केलेली नसते त्या बाबतीतील व्याज.

३५२. वेळ निश्चित असेल त्या बाबतीतील व्याज.

२५३. व्याजाचा दर.

३५४. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतरच्या एक वर्षात वर्षासनाच्या थकबाकीवर व्याज नाही.

३५५. वर्षासन निर्माण करण्याकरता गुंतवावयाच्या रकमेवर व्याज.


प्रकरण बारा

**उत्तरदान परत करण्याविषयी**


३५६. न्यायालयाच्या आदेशाखाली पावते केलेले उत्तरदान परत करणे.

३५७. स्वेच्छेने पावते केले असल्यास परतावा नाही.

३५८. कलम १३७ खाली दिलेल्या आणखी अवधीच्या आत शर्तीचे पालन झाल्यामुळे उत्तरदान देय झाले असेल त्या बाबतीतील परतावा.

३५९. यथाप्रमाणे परतावा करण्यासाठी प्रत्येक उत्तरदानग्राहीवर केव्हा सक्ती करता येईल.

३६०. मत्तेचे वितरण.

३६१. धनको उत्तरदानग्राहीकडे परतावा करण्याची मागणी करू शकेल.

३६२. उत्तरदानग्राहीला प्रदान मिळालेले नसताना किंवा कलम ३६१ खाली परतावा करण्याची त्याच्यावर सक्ती झालेली असताना तो ज्याला संपूर्णपणे प्रदान झाले आहे त्याला परतावा करण्यास केव्हा भाग पाडू शकत नाही.

कलमे.

३६३. ज्याला प्रदान झाले नाही अशा उत्तरदानग्राहीने मृत्युपत्रव्यवस्थापक पतदार असल्यास प्रथम त्याच्याविरुद्ध केव्हा कार्यवाही केली पाहिजे.

३६४. एका उत्तरदनग्राहीने दुसऱ्याला परतावा करण्याबाबत मर्यादा.

३६५. परतावा व्याजाशिवाय करावयाचा.

३६६. नेहमीची प्रदाने केल्यावर राहिलेला अवशिष्ट भाग अवशिष्ट उत्तरदानग्राहीलां द्यावयाचा.

३६७. वितरणासाठी मत्तेचे भारतातून अधिवासाच्या देशातील मृत्युपत्रव्यस्थापकाकडे किंवा प्रशासकाकडे हस्तांतरण.

## प्रकरण तेरा

### धूळधाणीबद्दलच्या, मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकाच्या दायित्वाविषयी

३६८. धूळधाणीबद्दल, मृत्युपत्रव्यवस्थापकाचे किंवा प्रशासकाचे दायित्व.

३६९. संपत्तीचा कोणताही भाग हस्तगत करण्याची उपेक्षा केल्याबद्दल मृत्युपत्रव्यवस्थापकाचे किंवा प्रशासकाचे दायित्व.

## भाग दहा

### उत्तराधिकार प्रमाणपत्रे

३७०. या भागाखाली प्रमाणपत्रे प्रदान करण्यावर निर्बंध.

३७१. प्रमाणपत्र प्रदान करण्याची अधिकारिता असलेले न्यायलय.

३७२. प्रमाणपत्रासाठी अर्ज.

३७३. अर्ज आल्यावरची प्रक्रिया.

३७४. प्रमाणपत्रातील मजकूर.

३७५. प्रमाणपत्राच्या प्रदानग्राहीकडे प्रतिभूतीची रीतसर मागणी.

३७६. प्रमाणपत्राचे विस्तारण.

३७७. प्रमाणपत्र व विस्तारित प्रमाणपत्र यांचे नमुने.

३७८. रोख्यांबाबतच्या अधिकारांबाबत प्रमाणपत्राचे विशोधन.

३७९. प्रमाणपत्रांवरील न्यायालय—फी वसूल करण्याची पद्धत.

३८०. प्रमाणपत्राचा स्थानिक विस्तार.

३८१. प्रमाणपत्राचा परिणाम.

३८२. विदेशी राज्यातील भारतीय प्रतिनिधीने प्रदान केलेल्या किंवा विस्तारित केलेल्या आणि अन्य विवक्षित बाबतीतील प्रमाणपत्राचा परिणाम.

३८३. प्रमाणपत्राचे प्रत्याहरण.

३८४. अपील.

३८५. प्रमाणपत्रावर पूर्वीच्या प्रमाणपत्राचा, संप्रमाणाचा किंवा प्रशासनपत्राचा परिणाम.

३८६. विधिबाह्य प्रमाणपत्राच्या धारकाकडे सद्भावपूर्वक केलेले विवक्षित भरणे विधिग्राह्य करणे.

३८७. या अधिनियमाखाली निर्णयांचा परिणाम आणि त्याखाली प्रमाणपत्रधारकाचे दायित्व.

३८८. या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता जिल्हा न्यायालयाची अधिकारिता कनिष्ठ न्यायालयांच्या ठायी विनिहित करणे.

३८९. निष्प्रभावी व विधिबाह्य प्रमाणपत्रे परत स्वाधीन करणे.

३९०. १८२७ चा मुंबई विनियम ८ याखालील प्रमाणपत्राबाबतचे उपबंध.

कलमे.

भाग अकरा

**संकीर्ण**

३९१. व्यावृत्ती.

३९२. [निरसित].

**पहिली अनुसूची**---रक्तसंबंधाचा तक्ता.

**दुसरी अनुसूची**---

**भाग एक.**---कलम ५४ मध्ये निर्देशिलेल्या विनामृत्युपत्र पारशी व्यक्तींच्या बाबतीतील अनंतर आप्तसंबंधीचा क्रम.

**भाग दोन.**---कलम ५५ मध्ये निर्देशिलेल्या विनामृत्युपत्र पारशी व्यक्तींच्या बाबतीतील अनंतर आप्तसंबंधीचा क्रम.

**तिसरी अनुसूची**---कलम ५७ मध्ये वर्णन केलेल्या विवक्षित मृत्युपत्रांचा व क्रोडपत्रांचा लागू असलेल्या भाग सहाचे उपबंध.

**चौथी अनुसूची**---प्रमाणपत्राचा नमुना.

**पाचवी अनुसूची**---सावधानपत्राचा नमुना.

**सहावी अनुसूची**---संप्रमाणपत्राचा नमुना.

**सातवी अनुसूची**---प्रशासनपत्राचा नमुना.

**आठवी अनुसूची**---प्रमाणपत्र व विस्तारित प्रमाणपत्र याचे नमुने.

**नववी अनुसूची**---[निरसित].

# भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५

**(सन १९२५ चा अधिनियम क्रमांक ३९)**[१]

(१ मार्च, १९९८ रोजी यथाविद्यमान)

[३० सप्टेंबर, १९२५]

[२] * * * **विनामृत्युपत्र व मृत्यपत्रीय उत्तराधिकारास लागू असणारा कायदा एकत्रित करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** [२] * * * विनामृत्युपत्र व मृत्यपत्रीय उत्तराधिकारास लागू असणारा कायदा एकत्रित करणे समयोचित आहे. **त्याअर्थी** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

## भाग एक

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव.** १. या अधिनियमास, भारतीय उत्तराधिकारी अधिनियम, १९२५ असे म्हणता येईल.

**व्याख्या.** २. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसल्यास,—

(क्) "प्रशासक" याचा अर्थ, कोणीही मृत्युपत्रव्यवस्थापक नसेल तेव्हा मृत व्यक्तीच्या संपदेचे प्रशासन करण्यासाठी सक्षम प्राधिकारणाने नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे ;

(ख्) "क्रोडपत्र" याचा अर्थ, मृत्युपत्राच्या संबंधात केलेला व त्यातील विल्हेवाटींचे स्पष्टीकरण करणारा त्यास फेरबदल करणारा किंवा भर टाकणारा संलेख, असा आहे व ते मृत्युपत्राचा भाग असल्याचे मानले जाईल ;

[३](खख्) "जिल्हा न्यायाधीश" याचा अर्थ, अव्वल अधिकारितेच्या प्रधान दिवाणी न्यायालयाचा न्यायाधीश असा आहे ; ]

(ग्) "मृत्युपत्रव्यवस्थापक" याचा अर्थ, मृत व्यक्तीच्या अखेरच्या मृत्युपत्राची अंमलबजावणी मृत्युपत्रकर्त्याने केलेल्या नियुक्तीद्वारे तिच्याकडे विश्वासपूर्वक सोपविली असेल, ती व्यक्ती, असा आहे :

[४][(गग्) "भारत" याचा अर्थ, जम्मू व काश्मीर राज्य वगळून भारताचे राज्यक्षेत्र, असा आहे ; ]

(घ्) "भारतीय ख्रिस्ती" याचा अर्थ, जी व्यक्ती मूळची अमिश्र आशियाई वंशातील आहे किंवा असल्याचा सद्भावपूर्वक दावा सांगते आणि कोणत्याही स्वरूपातील ख्रिस्ती धर्म प्रतिज्ञापित करते ती भारतदेशीय व्यक्ती, असा आहे ;

(ङ्) "अज्ञान व्यक्ती" याचा अर्थ, भारतीय सज्ञानता अधिनियम, १८७५ (१८७५ चा ९) यास अधीन असून जी त्या अधिनियमाच्या अर्थानुसार सज्ञान झालेली नाही अशी कोणतीही व्यक्ती, व जिच्या वयाला अठरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशी अन्य कोणतीही व्यक्ती, असा आहे आणि "अज्ञानता" याचा अर्थ अशा कोणत्याही व्यक्तीची स्थिती, असा आहे ;

(च्) "संप्रमाण" याचा अर्थ, मृत्युपत्रकर्त्यांच्या संपदेच्या प्रशासनाच्या प्रदानासह सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाच्या मोहोरेनिशी प्रमाणित केलेली मृत्युपत्राची प्रत, असा आहे ;

[५][(छ्) "राज्य" यात, अखेरीस ज्याचा अवलंब करावयाचा ते न्यायालय भारताच्या ज्या कोणत्याही विभागात असेल त्याचा समावेश आहे; ] आणि

(ज्) "मृत्युपत्र" याचा अर्थ, आपल्या संपत्तीबाबतचा आपला जो मनोदय आपल्या मृत्यूनंतर अंमलात आणला जावा अशी मृत्युपत्रकर्त्याची इच्छा असते त्याचे वैध अधिकथन, असा आहे.

---

१. उद्दिष्टे व कारणे यांच्या निवेदनाकरिता पहा, भारताचे राजपत्र, १९२३, भाग ५ वा, पृष्ठ ४०१ आणि संयुक्त समितीच्या अहवालाकरिता पहा, भारताचे राजपत्र, १९२५, भाग ५ वा, पृष्ठ १०३.

या अधिनियमाच्या, वऱ्हाड विधि अधिनियम, १९४१ (१९४१ चा ४) याद्वारे वऱ्हाडवर, संप राज्यक्षेत्रे (विधि) विशोधन अधिनियम, १९५६ (१९५६ चा ६८) याद्वारे मणिपूरवर आणि १९६३ चा विनियम ६ कलम २ व अनुसूची पहिली यांद्वारे दादरा व नगर हवेलीवर विस्तार केला आहे.

२. अनुकूलन आदेश १९५० द्वारे "भारतातील प्रांतामध्ये" हे शब्द गाळण्यात आले.

३. १९२९ चा अधिनियम १८, कलम ३ द्वारे घातले.

४. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे घातले.

५. वरील अधिनियमाच्या कलम ३ व अनुसूची यांद्वारे पूर्वीच्या खंडाऐवजी घातले.

राज्यातील कोणत्याही वंशास, पंथास किंवा जनजातीस अधिनियमाच्या प्रवर्तनातून सूट देण्याची राज्य शासनाची शक्ती.

३. (१) राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या पुढीलपैकी म्हणजे कलमे ५ ते ४९, ५८ ते १९१, २१२, २१३ आणि २१५ ते ३६९ यापैकी कोणत्याही कलमांच्या उपबंधाच्या प्रवर्तनातून राज्यातील ज्या कोणत्याही वंशाच्या, पंथाच्या किंवा जनजातीच्या अथवा अशा वंशाच्या, पंथाच्या किंवा जनजातीच्या कोणत्याही भागाच्या सदस्यांना असे किंवा त्यापैकी आदेशात उल्लेखिलेले कोणतेही उपबंध लागू करणे राज्य शासनाला अशक्य किंवा असमयोचित वाटेल त्यांना १६ मार्च १८६५ या दिवसापासून एकतर भूतलक्षी किंवा भविष्यलक्षी सूट देऊ शकेल.

(२) राज्य शासनाला तशाच अधिसूचनेद्वारे असा कोणताही आदेश प्रत्याहत करता येईल. पण जेणेकरून प्रत्याहरण भूतलक्षीरीत्या परिणामक होईल अशा प्रकारे नाही.

(३) या कलमाखाली सूट देण्यात आलेल्या किंवा [१]भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १८६५ (१८६५ चा १०) याच्या कलम ३३२ खाली त्या अधिनियमात असलेल्यांपैकी कोणत्याही उपबंधाच्या प्रवर्तनापासून सूट देण्यात आलेल्या व्यक्ती या अधिनियमात "सूट देण्यात आलेल्या व्यक्ती" म्हणून निर्दिष्ट केल्या आहेत.

## भाग दोन

### अधिवासविषयी

हा भाग लागू असणे.

४. मृत व्यक्ती ही जर हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन असेल तर, हा भाग लागू असणार नाही.

मूळ व्यक्तीच्या अनुक्रमे स्थावर व जंगम संपत्तीवरील उत्तराधिकाराचे विनियमन करणारा कायदा.

५. (१) मृत व्यक्तीच्या [२][भारतातील] स्थावर संपत्तीवरील उत्तराधिकार [२][भारतातील] कायद्याद्वारे विनियमित केला जाईल मग अशा व्यक्तीचा अधिवास तिच्या मृत्युसमयी कोठेही असो.

(२) मृत व्यक्तीच्या जंगम संपत्तीवरील उत्तराधिकार मृत्युसमयी तिचा अधिवास ज्या देशात होता त्याच्या कायद्याद्वारे विनियमित होतो.

**उदाहरणे**

(एक) 'क' चा अधिवास [२][भारतात] असून तो फ्रान्समध्ये काही जंगम संपत्ती, इंग्लंडमध्ये काही जंगम संपत्ती आणि [२][भारतात] जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची संपत्ती मागे ठेवून फ्रान्समध्ये मृत्यू पावतो. त्या संपूर्ण संपत्तीवरील उत्तराधिकार [२][भारताच्या] कायद्याद्वारे विनियमित होतो.

(दोन) 'क' या इंग्रज माणसाचा अधिवास फ्रान्समध्ये असून तो [२][भारतात] मृत्यू पावतो व [२][भारतात] तो जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची संपत्ती मागे ठेवतो. फ्रान्समध्ये अधिवास असताना मृत्यू पावणाऱ्या इंग्रज माणसाच्या जंगम संपत्तीवरील उत्तराधिकाराचे नियंत्रण फ्रान्समध्ये ज्या नियमांद्वारे होत त्यांद्वारे त्या जंगम संपत्तीचा उत्तराधिकार विनियमित होतो आणि त्या स्थावर संपत्तीवरील उत्तराधिकार [२][भारताच्या] कायद्याद्वारे विनियमित होतो.

जंगम संपत्तीवरील उत्तराधिकारावर एकच अधिवास परिणाम करतो.

६. व्यक्तीला आपल्या जंगम संपत्तीवरील उत्तराधिकाराच्या प्रयोजनार्थ एकच अधिवास असू शकतो.

जन्माने औरस असलेल्या व्यक्तीचा मूळचा अधिवास.

७. जन्माने औरस असलेल्या प्रत्येक व्यक्तीचा मूळचा अधिवास तिच्या जन्माच्या वेळी तिचा बाप जेथील अधिवासी होता त्या देशात, किंवा जर ते पितृमरणोत्तर जन्मलेले अपत्य असेल तर बापाच्या मृत्यूच्या वेळी बाप जेथील अधिवासी होता त्या देशात असतो.

**उदाहरण**

'क' च्या जन्माच्या वेळी त्याचा बाप इंग्लंडमध्ये अधिवासी होता. जेथे 'क' चा जन्म झाला तो देश कोणताही असला तरी 'क' चा मूळचा अधिवास इंग्लंडमध्ये आहे.

अनौरस अपत्याचा मूळचा अधिवास.

८. अनौरस अपत्याचा मूळचा अधिवास त्याच्या जन्माच्या वेळी त्याची आई ज्या देशात अधिवासी होती तेथे असतो.

मूळचा अधिवास चालू राहणे.

९. नवीन अधिवास प्राप्त झाला नाही तोपर्यंत मूळचा अधिवास प्रभावी असतो.

नवीन अधिवासाची प्राप्ती.

१०. ज्या देशात आपला मूळचा अधिवास नाही तेथे आपले स्थिर वसतिस्थान अंगीकारल्याने मनुष्याला नवीन अधिवास प्राप्त होतो.

---

१. या अधिनियमाद्वारे निरसित.

२. १९५१ या अधिनीयम ३, कलम ३ व अनुसूची यांमद्वारे 'राज्ये' याऐवजी 'भारत' हा शब्दोल्लेख घातला.

**स्पष्टीकरण.**—[१][शासनाच्या मुलकी, भूसैनिकी, नौसैनिकी किंवा वायुसैनिकी सेवेत] असल्यामुळे अथवा कोणताही पेशा किंवा आजोविका आचरत असल्यामुळे एखाद्या मनुष्य [२][भारतात] राहतो एवढ्याच कारणाने, त्याने तेथे वसतिस्थान अंगीकारले असल्याचे मानले जात नाही.

**उदाहरणे**

(एक) 'क' चा मूळचा अधिवास इंग्लंडमध्ये असून, तो [२][भारतात] येतो व आपल्या उर्वरित आयुष्यात [२][भारतात] राहण्याच्या उद्देशाने तो तेथे बॅरिस्टर म्हणून किंवा व्यापारी म्हणून स्थायिक होतो. आता त्याचा अधिवास [२][भारतात] आहे.

(दोन) 'क' चा अधिवास इंग्लंडमध्ये असून, तो ऑस्ट्रेलियाला जातो आणि ऑस्ट्रेलियाच्या सेवेत राहण्याच्या उद्देशाने तेथील सेवेत प्रवेश करतो, 'क' ला ऑस्ट्रेलियातील अधिवास प्राप्त झाला आहे.

(तीन) 'क' चा मूळचा अधिवास फ्रान्समध्ये असून, केंद्र शासनाशी झालेल्या अभिसंकेताअन्वये तो ठराविक वर्षाकरिता [२][भारतात] राहावयास येतो. त्या कालावधीच्या अखेरीस फ्रान्सला परत जाण्याचा त्याचा उद्देश आहे. त्याला [२][भारतात] अधिवास प्राप्त होत नाही.

(चार) 'क' चा अधिवास इंग्लंडमध्ये असून, विसर्जित झालेल्या भागीदारीच्या कारभाराचे परिसमापन करण्याच्या प्रयोजनार्थ आणि ते प्रयोजन सिद्धीस जाताच इंग्लंडला परतण्याच्या उद्देशान तो [२][भारतात] राहावयास जातो. रहिवास कितीही दीर्घ असला तरी अशा रहिवासामुळे त्याला [२][भारतात] अधिवास प्राप्त होत नाही.

(पाच) लगतपूर्व उदाहरणात उल्लेखिलेल्या परिस्थितीत 'क' [२][भारतात] राहावयास गेला असता नंतर आपला बेत बदलतो आणि [२][भारतात] आपले स्थिर वसतिस्थान अंगीकारतो 'क' ला [२][भारतात] अधिवास प्राप्त झाला आहे.

(सहा) 'क' चा अधिवास चंदनगर या फ्रेंच वसाहतीत असून, राजकीय घडामोडींमुळे त्याला कलकत्त्यात आश्रय घेणे भाग पडते. आणि ज्यायोगे आपणास चंदनगरला सुखरूप परतणे शक्य होईल असे राजकीय बदल घडतील या आशेवर तो बरीच वर्षे कलकत्त्यास राहतो. अशा रहिवासामुळे त्याला [२][भारतात] अधिवास प्राप्त होत नाही.

(सात) लगतपूर्व उदाहरणात उल्लेखिलेल्या परिस्थितीत 'क' कलकत्त्याला आला असता, ज्यायोग आपणास चंदनगरला सुखरूप परतणे शक्य होईल असे राजकीय बदल घडून आल्यावरही तो तेथेच रहिवास चालू ठेवतो आणि आपला कलकत्त्यातील रहिवास कायम व्हावा हा त्याचा उद्देश आहे. 'क' ला [२][भारतात] अधिवास प्राप्त झाला आहे.

**भारतात अधिवास प्राप्त करण्याची विशेष पद्धती.**

**११.** कोणत्याही व्यक्तीला [२][भारतात] अधिवास प्राप्त करण्याची आपली इच्छा असल्याविषयी, शासनाने यासंबंधात नियुक्त केलेल्या [२][भारतातील] एखाद्या कार्यालयात स्वाक्षरित लेखात अधिकथन करून व तेथे ते दाखल करून असा अधिवास प्राप्त करता येईल. परंतु असे अधिकथन करण्याच्या वेळेच्या निकटपूर्वी एक वर्षभर अशी व्यक्ती [२][भारतात] रहिवासी असावी.

**विदेशी शासनाचा प्रतिनिधी म्हणून किंवा त्याच्या कुटुंबाचा घटक म्हणून राहिल्याने अधिवास प्राप्त होत नाही.**

**१२.** ज्या व्यक्तीला एका देशाच्या शासनाने आपला राजदूत, वाणिज्यदूत किंवा अन्य प्रतिनिधी म्हणून दुसऱ्या देशात नियुक्त केले असेल तिला, आपल्या नियुक्तीस अनुसरून ती तेथे राहते एवढ्याच कारणाने त्या दुसऱ्या देशात अधिवास प्राप्त होत नाही, तसेच अन्य कोणतीही व्यक्ती अशा प्रथम उल्लेखिलेल्या व्यक्तीबरोबर तिच्या कुटुंबाचा घटक म्हणून किंवा तिचा नोकर म्हणून राहते एवढ्याच कारणाने तिला असा अधिवास प्राप्त होत नाही.

**नवीन अधिवास चालू राहणे.**

**१३.** पूर्वीचा अधिवास पुन्हा ग्रहण केला नाही किंवा अन्य अधिवास प्राप्त झाला नाही तोपर्यंत नवीन अधिवास चालू राहतो.

**अज्ञान व्यक्तीचा अधिवास.**

**१४.** अज्ञान व्यक्तीचा अधिवास, तिला आई वा बाप यापैकी ज्या कोणाकडून मूळचा अधिवास प्राप्त झाला त्याच्या अधिवासानुसार ठरतो.

**अपवाद.**—जर अज्ञान व्यक्ती विवाहित असेल अथवा शासनाच्या सेवेत कोणतेही पद धारण करत असेल, किंवा नोकरी करत असेल अथवा त्या आई वा बापाच्या संमतीने ती वेगळ्या धंद्यात स्थिरावली असेल तर, अज्ञान व्यक्तीचा अधिवास आई वा बापाच्या अधिवासाबरोबर बदलत नाही.

**विवाहामुळे स्त्रीला मिळणारा अधिवास.**

**१५.** विवाहामुळे स्त्रीला तिच्या पतीचा अधिवास प्राप्त होतो--तत्पूर्वी तोच तिचा अधिवास असेल तर गोष्ट अलाहिदा.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "हिज मॅजेस्टीच्या नागरी, भूसैनिकी, नौसैनिकी, किंवा वायुसैनिकी सेवेत" याऐवजी घातले.

२. १९५१ या अधिनीयम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'राज्ये' याऐवजी 'भारत' हा शब्दोल्लेख घातला.

विवाहकाळात पत्नीचा अधिवास.

१६. स्वतःच्या विवाहकाळात पत्नीचा अधिवास तिच्या पतीच्या अधिवासानुसार ठरतो.

**अपवाद.**—सक्षम न्यायालयाच्या निर्णयाने पतीपत्नीची फारकत झाली असल्यास, किंवा पती काळ्या पाण्याची शिक्षा भोगत असल्यास, त्यानंतर पत्नीचा अधिवास पतीच्या अधिवासानुसार ठरत नाही.

अज्ञान व्यक्तीला नवीन अधिवास प्राप्त होणे.

१७. या भागामध्ये यापूर्वी अन्यथा उपबंध केला असेल तो खेरीजकरून, व्यक्ती अज्ञानदशेत असताना तिला नवीन अधिवास प्राप्त होऊ शकत नाही.

वेड्या माणसाला नवीन अधिवास प्राप्त होणे.

१८. भ्रमिष्ट व्यक्तीला, तिचा अधिवास अन्य व्यक्तीच्या अधिवासानुसार ठरण्याहून अन्य कोणासही मार्गाने नवीन अधिवास प्राप्त होऊ शकत नाही.

अधिवास अन्यत्र असल्याच्या पुराव्याच्या अभावी भारतातील जंगम संपत्तीवरील उत्तराधिकार.

१९. जर एखादी व्यक्ती जंगम [1][भारतात] संपत्ती मागे ठेवून मृत्यू पावली तर, अन्यत्र कोठेही अधिवास असल्याच्या पुराव्याच्या अभावी, त्या संपत्तीवरील उत्तराधिकार [1][भारताच्या]कायद्याद्वारे विनियमित होतो.

## भाग तीन

## विवाह

विवाहामुळे हितसंबंध व अधिकार प्राप्त होत नाहीत किंवा गमावले जात नाहीत.

२०. (१) विवाहामुळे कोणत्याही व्यक्तीला तो किंवा ती ज्या व्यक्तीशी विवाह करील तिच्या संपत्तीत कोणताही हितसंबंध प्राप्त होणार नाही अथवा ती व्यक्ती अविवाहित असती तर त्याच्या किंवा तिच्या स्वतःच्या संपत्तीबाबत ती करू शकली असती अशी कोणतीही कृती करण्यास ती अक्षम होणार नाही.

(२) हे कलम—

(क) १ जानेवारी १८६६ या दिवसापूर्वी झालेल्या कोणत्याही विवाहास लागू असणार नाही.

(ख) ज्या विवाहातील एक किंवा उभय पक्ष विवाहाच्या वेळी हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन धर्म प्रतिज्ञापित करत होते असा कोणत्याही विवाहास लागू असणार नाही व केव्हाही लागू नव्हते असे मानले जाईल.

भारतात अधिवास असलेली व अधिवास नसलेली व्यक्ती यांच्यामधील विवाहाचा परिणाम.

२१. ज्या व्यक्तींचा अधिवास [1][भारतात] नाही तिने ज्या व्यक्तीचा अधिवास [1][भारतात] आहे तिच्याशी [1][भारतात] विवाह केला तर, कोणत्याही पक्षाला विवाहामुळे, विवाहापूर्वी केलेल्या संव्यवस्थेत अन्य पक्षाची जी संपत्ती समाविष्ट नसेल तिच्याबाबत, विवाहाच्या वेळी दोघेही [1][भारतात] आदिवासी असते तर त्याला किंवा तीला प्राप्त झाले नसते असे कोणतेही अधिकार प्राप्त होत नाहीत.

अज्ञान व्यक्तींच्या संपत्तीची विवाहलक्षी सव्यवस्था.

२२. (१) विवाहाच्या पूर्वकल्पनेने अज्ञान व्यक्तींच्या संपत्तीची संव्यवस्था करता येईल ; परंतु अज्ञान व्यक्तीने ती संव्यवस्था आपल्या बापाच्या पसंतीने अथवा बाप मृत्यू पावला असेल किंवा [1][भारतात] नसेल तर उच्च न्यायालयाच्या पसंतीने केली असली पाहिजे.

(२) या कलमातील किंवा कलम २१ मधील कोणतीही गोष्ट १ जानेवारी, १८६६ या दिवसापूर्वी केलेले कोणतेही मृत्यूपत्र किंवा निर्माण झालेली विनामृत्युपत्रात यांना अथवा कोणत्याही हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन व्यक्तींच्या संपत्तीवरील विनामृत्युपत्र किंवा मृत्युपत्रीय उत्तराधिकारास लागू असणार नाही.

## भाग चार

## रक्तसंबंधविषयी

भाग लागू असणे.

२३. या भागातील कोणतीही गोष्ट १ जानेवारी १८६६ या दिवसापूर्वी केलेले कोणतेही मृत्युपत्र किंवा निर्माण झालेली विनामृत्युपत्रात यांना अथवा कोणत्याही हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख, जैन किंवा पारशी व्यक्तीच्या संपतीवरील मृत्युपत्रीय किंवा विनामृत्युपत्र उत्तराधिकारास लागू असणार नाही.

आप्तसंबंध किंवा रक्तसंबंध.

२४. आप्तसंबंध किंवा रक्तसंबंध म्हणजे समान मूळ पुरुषापासून किंवा समान पूर्वजापासून वंशोद्भव झालेल्या व्यक्तीमधील संबंध किंवा नाते होय.

---

१. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे ‘ राज्ये ’ याऐवजी ‘ भारत ’ हा शब्दोल्लेख घातला.

२५. (१) रेषीय रक्तसंबंध म्हणजे ज्यांच्यापैकी एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीपासून सरळ वंशक्रमात उद्‌भव झालेला असतो त्या दोन व्यक्तींमध्ये विद्यमान असणारा संबंध होय---जसे,एखादा मनुष्य आणि त्याचा बाप, आजा व पणजा यांच्यामध्ये व याप्रमाणे सरळ आरोही वंशक्रमात वरच्या बाजूस, किंवा एखादा मनुष्य आणि त्याचा मुलगा, नातू, पणतू यांच्यामध्ये व याप्रमाणे सरळ अवरोही वंशक्रमात खालच्या बाजूस. **रेषीय रक्तसंबंध.**

(२) प्रत्येक पिढी ही आरोही वंशक्रमाची किंवा अवरोही वंशक्रमाची एक श्रेणी असते.

(३) व्यक्तीचा बाप तिच्याशी पहिल्या श्रेणीने संबंधित असतो व तिचा मुलगाही त्याचप्रमाणे संबंधित असतो, तिचा आजा व नातू हे दुसऱ्या श्रेणीने, तिचा पणजा व पणतू हे तिसऱ्या श्रेणीने व याप्रमाणे पुढे.

२६. (१) सांपार्श्विक रक्तसंबंध म्हणजे ज्यांचा एकाच मूळ पुरुषापासून किंवा पूर्वजापासून वंशोद्‌भव झालेला असतो पण ज्यांच्यापैकी कोणाचाही दुसऱ्यापासून सरळ वंशक्रमात उद्‌भव झालेला नसतो त्या दोन व्यक्तींमध्ये विद्यमान असणारा संबंध होय. **सांपार्श्विक रक्तसंबंध.**

(२) मृत व्यक्तीशी सांपार्श्विक नातलगाचे रक्तसंबंधाच्या कोणत्या श्रेणीने नाते लागते हे विनिश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ मृत व्यक्तीपासून समान मूळ पुरुषापर्यंत वरच्या बाजूस आणि त्यानंतर सांपार्श्विक नातलगापर्यंत खालच्या बाजूस गणना करणे जरुरीचे असते, आरोही व अवरोही अशा दोन्ही वंशक्रमातील प्रत्येक व्यक्तिगणिक एकेक श्रेणी धरावयाची.

२७. उत्तराधिकाराच्या प्रयोजनार्थ, पुढील व्यक्तींमध्ये कसलाही भेद नाही, -- **उत्तराधिकाराच्या प्रयोजनार्थ मूळ व्यक्तीशी सारख्याच संबंधित म्हणून मानलेल्या व्यक्ती.**

(क्) मृत व्यक्तीशी जे बापाकडून संबंधित आहेत ते आणि जे तिच्याशी तिच्या आईकडून संबंधित आहेत ते, यांच्यामध्ये; किंवा

(ख्) मृत व्यक्तीशी जे सख्ख्या नात्याने संबंधित आहेत ते आणि जे तिच्याशी सापत्न नात्याने संबंधित आहेत ते, यांच्यामध्ये; किंवा

(ग्) मृत व्यक्तीच्या हयातीत प्रत्यक्षात जे जन्मले होते ते आणि जे तिच्या मृत्यूच्या दिनांकापासून केवळ गर्भावस्थेत होते पण मागाहून जिवंत जन्मले ते, यांच्यामध्ये.

२८. आप्तसंबंधाच्या श्रेणींची संगणना पहिल्या अनुसूचीमधील आप्तसंबंधविषयक तक्त्यात दिलेल्या रीतीने केली जाते. **आप्तसंबंधाच्या श्रेणीची संगणना करण्याची पद्धत.**

**उदाहरणे**

(एक) ज्या व्यक्तीच्या नातलगांची श्रेणीगणना करावयाची आहे ती व्यक्ती व तिचे दूरभावंड किंवा प्रथम दूरभावंड हे तक्त्यात दाखविल्याप्रमाणे चौथ्या श्रेणीने संबंधित आहेत; बापापर्यंत आरोही वंशक्रमाची एक श्रेणी व समान पूर्वजापर्यंत म्हणजे आज्यापर्यंत दुसरी श्रेणी; आणि त्याच्यापासून चुलत्यापर्यंत अवरोही वंशक्रमाची एक श्रेणी व दूरभावंडापर्यंत दुसरी श्रेणी, सर्व मिळून एकूण चार श्रेणी.

(दोन) भावाचा नातू व चुलत्याचा मुलगा म्हणजे पुतण-नातू व चुलत भाऊ, यांच्यापैकी प्रत्येक जण चार श्रेणींच्या अंतरावर असल्यामुळे त्यांची श्रेणी समान आहे.

(तीन) दूरभावंडाचा नातू हा चुलत आजाच्या नातवाच्याच श्रेणीचा आहे, कारण दोघेही आप्तसंबंधाच्या सहाव्या श्रेणीत येतात.

## भाग पाच

## विनामृत्युपत्र उत्तराधिकार

### प्रकरण एक

### प्रारंभिक

२९. (१) हा भाग दिनांक १ जानेवारी १८६६ या दिवसापूर्वी निर्माण झालेल्या विनामृत्युपत्रतेस, अथवा कोणत्याही हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन व्यक्तीच्या संपत्तीस लागू असणार नाही. **भाग लागू असणे.**

(२) पोटकलम (१) यात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात उपबंधित केले असेल ते वगळून, इतर बाबतीत, या भागाचे उपबंध हे विनामृत्युपत्रतेच्या सर्व प्रकरणी [१][भारताचा] कायदा म्हणून ठरतील.

---

१. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'राज्ये' याऐवजी 'भारत' हा शब्दोल्लेख घातला.

मृत व्यक्ती कोणत्या संपत्तीबाबत विनामृत्युपत्र मृत्यू पावली असल्याचे मानले जाते.

**३०.** एखादी व्यक्ती, तिने जिची परिणामक होण्याजोगी मृत्युपत्रीय विल्हेवाट केलेली नाही त्या सर्व संपत्तीबाबत विनामृत्युपत्र मृत्यू पावते असे मानले जाते.

**उदाहरणे**

(एक) 'क' ने मृत्युपत्र करून ठेवलेले नाही. आपल्या सर्व संपत्तीबाबत तो विनामृत्युपत्र मृत्यू पावलेला आहे.

(दोन) 'क' ने मृत्युपत्र करून ठेवलेले आहे व त्याद्वारे त्याने 'ख' ला आपला मृत्युपत्र व्यवस्थापक म्हणून नियुक्त केलेले आहे; पण त्या मृत्युपत्रात अन्य कोणताही उपबंध नाही. आपल्या संपत्तीच्या वितरणाबाबत 'क' विनामृत्युपत्र मृत्यु पावला आहे.

(तीन) 'क' ने आपली सर्व संपत्ती मृत्यूपत्राने अवैध प्रयोजनाकरिता दिली आहे. आपल्या संपत्तीच्या वितरणाबाबत 'क' विनामृत्युपत्र मृत्यू पावला आहे.

(चार) 'क' ने १,००० रुपये 'ख' ला आणि १,००० 'ग'च्या सर्वात मोठ्या मुलाला मृत्युपत्राने दिले आहेत व अन्य कोणतीही मृत्युपत्रीय देणगी दिलेली नाही आणि तो मृत्यू पावला तेव्हा त्याने २,००० रुपयेची रक्कम मागे ठेवली--अन्य कोणतीही संपत्ती नाही. 'ग' हा 'क' च्या पूर्वी निपुत्रिक मृत्यू पावला. 'क' १,००० रुपयांच्या वितरणाबाबत विनामृत्युपत्र मृत्यू पावला आहे.

## प्रकरण दोन

### पारशांहून अन्य विनामृत्युपत्र व्यक्तींच्या बाबतीतील नियम

पारशांना प्रकरण लागू नाही.

**३१.** या प्रकरणातील कोणतीही गोष्ट पारशांना लागू असणार नाही.

अशा संपत्तीची प्रक्रांती.

**३२.** विनामृत्युपत्र व्यक्तीची संपत्ती, या प्रकरणात यापुढे अंतर्भूत केलेल्या क्रमाने व तशा नियमानुसार पत्नीकडे किंवा पतीकडे अथवा जे मृताचे अप्तसंबंधी त्यांच्याकडे प्रकांत होते.

**स्पष्टीकरण.—** जर एखादी विधवा, तिच्या विवाहापूर्वी केलेल्या विधिग्राह्य संविदेअनुसार तिच्या पतीच्या संपदेतून तिला वाटणीत मिळावयाच्या हिश्श्यापासून वगळण्यात आलेली असेल तर, ती तिच्याकरता याद्वारे केलेल्या तरतुदीला हक्कदार होत नाही.

विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा आणि रेषीय वंशज असतील अथवा विधवा आणि केवळ आप्तसंबंधीच असतील अथवा विधवा असून कोणीही आप्तसंबंधी नसतील त्या बाबतीत.

**३३.** विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा राहिली असेल त्या बाबतीत--

(क) जर तिच्यामागे तिचे कोणतेही रेषीय वंशजही असतील तर, त्या व्यक्तीच्या संपत्तीचा एक-तृतीयांश भाग त्या व्यक्तीच्या विधवेच्या मालकीचा होईल आणि उर्वरित दोन-तृतीयांश भाग हा, रेषीय वशजांना यात यापुढे अंतर्भूत असलेल्या नियमांनुसार जाईल ;

(ख) [1][कलम ३३ क द्वारे उपबंधित केलेले वगळता एरव्ही,] जर त्या व्यक्तीच्या मागे कोणीही रेषीय वंशज राहिला नसेल, पण तिच्या आप्तसंबंधी अशा व्यक्ती राहिल्या असतील तर, त्या व्यक्तीच्या संपत्तीचा अर्धा हिस्सा त्याच्या विधवेच्या मालकीचा होईल व दुसरा अर्धा हिस्सा जे त्यांचे आप्तसंबंधी आहेत त्यांना यात यापुढे दिलेल्या क्रमाने व तशा नियमांनुसार जाईल ;

(ग) जर त्याच्या मागे त्याचा आप्तसंबंधी असा कोणीही राहिला नसेल तर, त्याची संपूर्ण संपत्ती त्याच्या विधवेच्या मालकीची होईल.

विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा राहिली असेल पण कोणीही रेषीय वंशज नसतील त्याबाबतीत विशेष उपबंध.

[2]**[३३क.** (१) ज्याबाबतीत विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा राहिली असेल, पण कोणीही रेषीय वंशज राहिला नसेल आणि त्याच्या संपत्तीचे निव्वळ मूल्य पाच हजार रुपयांहून अधिक नसेल त्याबाबतीत, त्याची संपूर्ण संपत्ती विधवेच्या मालकीची होईल.

(२) त्या संपत्तीचे निव्वळ मूल्य पाच हजार रुपयांहून अधिक असेल त्याबाबतीत, विधवा त्यांपैकी पाच हजार रुपयांना हक्कदार असेल आणि अशी पाच हजार रुपयांची रक्कम व तिच्या जोडीला विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्यूच्या दिनांकापासून ती रक्कम मिळेपर्यंत दर साल दर शेकडा ४ दराने तीवरील व्याज यांच्याकरिता तिचा अशा संपूर्ण संपत्तीवर प्रभार असेल.

(३) या कलमाद्वारे विधवेकरता केलेली तरतूद ही पूर्वोक्तानुसार उक्त पाच हजार रुपयांची रक्कम सव्याज प्रदान केल्यावर अशा विनामृत्युपत्र व्यक्तीच्या संपत्तीच्या अवशिष्ट भागातील तिचा हितसंबंध व हिस्सा यांस बाधक नव्हे तर त्यांच्या व्यतिरिक्त असेल आणि असा अवशिष्ट भाग एवढीच जणू काही विनामृत्युपत्र व्यक्तीची संपूर्ण संपत्ती असावी त्याप्रमाणे कलम ३३ च्या उपबंधानुसार तो वितरित केला जाईल.

---

१. १९२६ चा अधिनियम ४०, कलम २ द्वारे घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे घातले.

(४) त्या संपत्तीचे निव्वळ मूल्य तिच्या ठोक मूल्यातून विनामृत्युपत्र व्यक्तीची सर्व ऋणे आणि तिच्या उत्तरक्रियेचा व प्रशासनाचा सर्व खर्च, आणि ज्यांस पात्र हाईल ती अन्य सर्व देणी व खर्च वजा करून विनिश्चित करण्यात येईल.

(५) हे कलम--

(क) (एक) कोणत्याही भारतीय ख्रिस्ती व्यक्तीच्या,—

(दोन) जी भारतीय ख्रिस्ती आहे किंवा आपल्या मृत्युसमयी होती अशा कोणत्याही पुरुष व्यक्तीच्या अपत्यांच्या किंवा नातवंडांच्या, अथवा

(तीन) जिच्या संपत्तीवरील उत्तराधिकाराचे विशेष विवाह अधिनियम, १८७२ (१८७२ चा ३) याच्या कलम २४ खाली या अधिनियमाच्या उपबंधांद्वारे विनियमन होते अशा कोणत्याही हिंदू, बौध्द, शीख किंवा जैन धर्म प्रतिज्ञापित करणाऱ्या व्यक्तीच्या संपत्तीस;

(ख) मृत व्यक्ती आपल्या सर्व संपत्तीबाबत विनामृत्युपत्र मृत्यू पावली असल्याशिवाय, लागू होणार नाही.]

**३४.** विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा राहिली नसेल त्याबाबतीत त्या व्यक्तीची संपत्ती, यात यापुढे अंतर्भूत असलेल्या नियमानुसार, तिच्या रेषीय वंशजांना किंवा जे तिचे रेषीय वंशज नाहीत असे आप्तसंबंधी असतील त्यांना जाईल; अणि तिच्यामागे तिचे आप्तसंबंधी असे कोणीही राहीले नसतील तर ती शासनाकडे जाईल. **विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा राहिली नसेल आणि त्या व्यक्तीच्या मागे कोणीही आप्तसंबंधी राहिला नसेल.**

**३५.** पती विनामृत्युपत्र मृत्यू पावला तर त्याच्या संपत्तीबाबत विधवेला असतात तेच हक्क पत्नी विनामृत्युपत्र मृत्यू पावली तर तिच्या संपत्तीबाबत तिच्यामागे हयात राहणाऱ्या पतीला असतात. **विधुराचे हक्क.**

### रेषीय वंशज असतील त्या बाबतीतील वितरण

**३६.** विनामृत्युपत्र व्यक्तीच्या संपत्तीचे (त्याच्यामागे विधवा राहिली असल्यास त्या विधवेचा हिस्सा वजा करून) त्याच्या रेषीय वंशजांमध्ये वितरण करण्याबाबतचे नियम म्हणजे कलमें ३७ ते ४० मध्ये अंतर्भूत असलेले नियम होत. **वितरणाचे नियम.**

**३७.** विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे एखादे अपत्य किंवा अपत्ये हयात राहिली असतील, पण मृत अपत्याच्या मार्फत संबंधित असा अधिक दूरचा कोणीही रेषीय वंशज नसेल त्या बाबतीत, ती संपत्ती तिचे एकच अपत्य हयात राहिले असल्यास त्याच्या मालकीची होईल. नाहीतर तिच्या सर्व उत्तरजीवी अपत्यांमध्ये ती सारखी विभागली जाईल. **विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे केवळ एखादे अपत्य किंवा अपत्ये राहिली असतील त्या बाबतीत.**

**३८.** विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे तिचे कोणीही अपत्य हयात राहिले नसेल, पण एखादे नातवंड किंवा नातवंडे राहिली असतील आणि मृत नातवंडाच्या मार्फत संबंधित असा अधिक दूरचा कोणीही वंशज नसेल त्याबाबतीत, ती संपत्ती, तिचे एकच नातवंड हयात राहिले असल्यास त्याच्या मालकीची होईल, नाहितर तिच्या सर्व उत्तरजीवी नातवंडांमध्ये सारखी विभागली जाईल. **विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे कोणीही अपत्य नव्हे तर नातवंड किंवा नातवंडे राहिली असतील त्या बाबतीत.**

#### उदाहरणे

(एक) 'क'ला फक्त तीनच अपत्ये आहेत, अधिक नाहीत—जॉन, मेरी आणि हेन्री. ती सर्व बापाच्या आधी मरण पावतात; जॉनच्या मागे दोन अपत्ये, मेरीच्या मागे तीन अपत्ये आणि हेन्रीच्या मागे चार अपत्ये हयात राहतात. नंतर 'क' नऊ नातवंडे मागे ठेवून पण मृत नातवंडाचा कोणीही वंशज मागे न ठेवता विनामृत्युपत्र मृत्यू पावतो. त्याच्या नातवंडांपैकी प्रत्येकाला एक-नवमांश मिळेल.

(दोन) पण हेन्री एकही अपत्य मागे न ठेवता मृत्यु पावला असेल तर ती सगळी संपत्ती विनामृत्युपत्र व्यक्तीच्या पाच नातवंडांमध्ये म्हणजे जॉन व मेरी यांच्या अपत्यांमध्ये सारखी विभागली जाते.

**३९.** विनामृत्युपत्र व्यक्तीला जे श्रेणीने निकटतम असतील ते सर्वच उत्तरजीवी रेषीय वंशज तिच्याशी पणतवंडांच्या श्रेणीने किंवा सर्वचजण त्याहून दूरच्या एखाद्या श्रेणीने संबंधित असतील त्या बाबतीत त्यांच्याकडे तशाच रीतीने संपत्ती जाईल. **विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे केवळ पणतवंडे किंवा अधिक दूरचे रेषीय वंशज राहिले असतील त्या बाबतीत.**

**ज्यांच्यापैकी सर्वच जण विनामृत्युपत्र व्यक्तीशी समान आप्तसंबंध श्रेणीने संबंधित नाहीत असे रेषीय वंशज तिने मागे ठेवले असून त्याच्याहून दूरचे रेषीय वंशज ज्यांच्यामार्फत संबंधित आहेत ते मृत असतील त्याबाबतीत.**

**४०.** (१) ज्यांच्यापैकी सर्वच जण विनामृत्युपत्र व्यक्तीशी समान आप्तसंबंध श्रेणीने संबंधित नाहीत असे रेषीय वंशज तिने मागे ठेवले असून, त्यांच्याहून दूरचे रेषीय वंशज तिच्याशी ज्यांच्यामार्फत वंशपरंपरेने संबंधित आहेत ते मृत असतील तर, विनामृत्युपत्र व्यक्तीचे जे रेषीय वंशज एकतर तिच्याशी निकटतम आप्तसंबंध श्रेणीने संबंधित होते अथवा तिच्याशी तशाच आप्तसंबंध श्रेणीने संबंधित असताना तिच्या आधी मृत्यू पावून त्याचे रेषीय वंशज हयात राहिले असतील त्यांच्या संख्येइतक्या हिश्श्यांत संपत्ती विभागली जाईल.

(२) विनामृत्युपत्र व्यक्तीशी जे रेषीय वंशज तिच्या मृत्युसमयी निकटतम आप्तसंबंध श्रेणीने संबंधित असतील त्यांच्यापैकी प्रत्येकाला अशा हिश्श्यांपैकी एकेक वाटून दिला जाईल; आणि अशा हिश्श्यांपैकी एकेक हिस्सा अशा मृत्यू पावलेल्या रेषीय वंशजांपैकी प्रत्येकाच्या बाबत वाटून दिला जाईल; आणि अशा मृत्यू पावलेल्या रेषीय वंशजांपैकी प्रत्येकाच्या बाबत वाटून दिलेला हिस्सा, प्रकरणपरत्वे, त्याच्या उत्तरजीवी अपत्याच्या किंवा अपत्यांच्या किंवा त्याहून दूरच्या रेषीय वंशजांच्या मालकीचा होईल; अशा उत्तरजीवी अपत्याला किंवा अपत्यांना किंवा त्याहून दूरच्या रेषीय वंशजांना त्यांचा/त्यांची आई वा बाप किंवा त्याचे/त्यांचे आईबाप विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे हयात राहिले असते तर अनुक्रमे अशी आई वा बाप किंवा असे आईबाप ज्यास हक्कदार झाले असते तो हिस्सा नेहमी मिळेल.

**उदाहरणे**

(एक) 'क' ला तीन अपत्ये होती--जॉन, मेरी आणि हेन्री. जॉन आपल्यामागे चार अपत्ये ठेवून मृत्यू पावला. मेरी आपल्यामागे एक अपत्य ठेवून मृत्यू पावली आणि एकटा हेन्री बापाच्या मागे हयात राहिला. 'क' विनामृत्युपत्र मृत्यू पावल्यावर एक-तृतीयांश हेन्रीला, एक-तृतीयांश जॉनच्या चार अपत्यांना आणि उरलेला एक-तृतीयांश मेरीच्या एका अपत्याला वाटून दिला जातो.

(दोन) 'क' च्या मागे एकही अपत्य राहिले नाही. पण आठ नातवंडे आणि एका मृत नातवंडाची दोन अपत्ये राहिली. संपत्ती नऊ भागांत विभागली जाते--प्रत्येक नातवंडाला त्यांपैकी एकेक हिस्सा वाटून देण्यात येतो आणि उरलेला एक-नवमांश दोन पणतवंडांमध्ये सारखा विभागला जातो.

(तीन) 'क' ला तीन अपत्ये आहेत--जॉन, मेरी आणि हेन्री. जॉन आपल्यामागे चार अपत्ये ठेवून मृत्यू पावतो, आणि जॉनच्या अपत्यापैकी एक अपत्य आपल्यामागे दोन अपत्ये ठेवून मृत्यू पावते; मेरी आपल्यामागे एक अपत्य ठेवून मृत्यू पावते. नंतर 'क' विनामृत्युपत्र मृत्यू पावतो. त्यांच्या संपत्तीच्या एक-तृतीयांश हेन्रीला, एक तृतीयांश मेरीच्या अपत्याला वाटून दिला जातो आणि एक-तृतीयांश चार हिश्श्यात विभागला जातो--त्यांपैकी एक जॉनच्या तीन उत्तरजीवी अपत्यांपैकी प्रत्येकास वाटून देण्यात येतो आणि उरलेला हिस्सा जॉनच्या दोन नातवंडांमध्ये सारखा विभागला जातो.

(चार) 'क' ला फक्त दोनच अपत्ये आहेत अधिक नाहीत--जॉन, मेरी. आपल्या गर्भवती पत्नीला मागे ठेवून जॉन आपल्या बापाच्या आधी मृत्यू पावतो.त्यानंतर 'क' मृत्यू पावतो व मेरी त्याच्यामागे हयात राहते आणि यथाकाल जॉनचे अपत्य जन्माला येते. 'क' ची संपत्ती मेरी व पितृमरणोत्तर जन्मलेले अपत्य यांच्यात सारखी विभागावयाची आहे.

**रेषीय वंशज नसतील त्या बाबतीतील वितरण**

**विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे कोणीही रेषीय वंशज राहिले नसतील त्या बाबतीतील वितरणाचे नियम.**

**४१.** विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे कोणीही रेषीय वंशज नसतील त्या बाबतीत (त्याच्यामागे विधवा राहिली असल्यास तिचा हिस्सा वजा केल्यानंतर तिच्या संपत्तीचे वितरण करण्याबाबतचे नियम म्हणजे कलमे ४२ ते ४८ यांमधील नियमांत अंतर्भूत असलेले नियम होत.

**विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप हयात असेल त्या बाबतीत.**

**४२.** जर विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप हयात असेल तर तो त्या संपत्तीचा उत्तराधिकारी होईल.

**विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप मृत्यू पावला असेल, पण त्या व्यक्तीची आई, भाऊ आणि बहिणी हयात असतील त्या बाबतीत.**

**४३.** जर विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप मृत्यू पावला असेल, पण विनामृत्युपत्र व्यक्तीची आई हयात असून त्याचे भाऊ किंवा बहिणीही हयात असतील आणि कोणाही मृत भावाचे किंवा मृत बहिणीचे कोणीही हयात अपत्य नसेल तर, आई आणि प्रत्येक हयात भाऊ किंवा बहीण संपत्तीच्या समसमान हिश्श्यांनी उत्तराधिकारी होतील.

**उदाहरण**

'क' विनामृत्युपत्र मृत्यू पावतो व त्याच्यामागे त्याची आई, त्याचे दोन सख्खे भाऊ, जॉन व हेन्री आणि जी त्याच्या आईची मुलगी आहे पण त्याच्या बापाची नाही अशी त्याची बहीण मेरी हे हयात राहतात. आईला एक-चतुर्थांश मिळेल. प्रत्येक भावाला एक चतुर्थांश मिळेल आणि सावत्र बहीण मेरी हिला एक चतुर्थांश मिळेल.

४४. जर विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप मृत्यू पावला असेल, पण विनामृत्युपत्र व्यक्तीची आई हयात असेल आणि जर कोणताही भाऊ किंवा बहीण व विनामृत्युपत्र व्यक्तीच्या हयातीत मृत्यू पावलेल्या कोणत्याही भावाचे किंवा बहिणीचे अपत्य किंवा अपत्येही हयात असतील तर, आई आणि प्रत्येक हयात भाऊ किंवा बहीण आणि प्रत्येक मृत भावाचे किंवा बहिणीचे अपत्य किंवा अपत्ये संपत्तीला समसमान हिश्श्यांनी हक्कदार असतील; अशा अपत्यांना (एकाहून अधिक असल्यास), त्यांचे आपापले आई-बाप विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्युसमयी हयात असते तर त्यांना जे हिस्से मिळाले असते तेच तेवढे समसमान हिश्श्यांनी मिळतील.

**विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप मृत्यू पावला असून त्या व्यक्तीची आई, भाऊ किंवा बहीण आणि कोणाही मृत भावाची अपत्ये हयात असतील त्याबाबतीत.**

**उदाहरण**

'क' विनामृत्युपत्र व्यक्तीच्यामागे त्याची आई, त्याचे भाऊ, जॉन व हेन्री आणि मृत बहीण मेरी हिचे एक अपत्य व जो त्याच्या बापाचा मुलगा होता पण आईचा नव्हता अशा जॉर्ज या मृत सावत्र भावाची दोन अपत्येही हयात राहतात. आईला एक-पंचमांश मिळतो, जॉन व हेन्री यांना प्रत्येकी एक-पंचमांश मिळतो. मेरीच्या आपत्याला एक-पंचमांश मिळतो आणि उर्वरित एक-पंचमांश जॉर्जच्या दोन अपत्यांना आपसात समसमान विभागून मिळतो.

४५. जर विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप मृत्यू पावला असेल, पण विनामृत्युपत्र व्यक्तीची आई हयात असेल आणि सर्व भाऊ व बहिणी मृत्यू पावले असतील पण त्यांपैकी सर्वांच्या किंवा कोणाच्यातरी मागे अपत्ये हयात असून ती विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागें हयात राहिली असतील तर, आई आणि प्रत्येक मृत भावाचे किंवा बहिणीचे अपत्य किंवा अपत्ये संपत्तीला समसमान हिश्श्यांनी हक्कदार असतील; अशी अपत्ये एकाहून अधिक असल्यास त्यांचे आपापले आई-बाप विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्युसमयी हयात असते तर त्यांना जे हिस्से मिळाले असते तेच तेवढे त्यांना समसमान हिश्श्यांनी मिळतील.

**विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप मृत्यू पावला असून त्या व्यक्तीची आई व कोणाही मृत भावाची किंवा बहिणीची अपत्ये हयात असतील त्याबाबतीत.**

**उदाहरण**

'क' या विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे कोणीही भाऊ किंवा बहीण हयात राहत नाही, पण त्याची आई आणि मृत बहीण मेरी हिचे एक अपत्य आणि जॉर्ज या मृत भावाची दोन अपत्ये हयात राहतात. आईला एक-तृतीयांश मिळतो. मेरीच्या अपत्याला एक-तृतीयांश मिळतो आणि उर्वरित एक-तृतीयांश जॉर्जच्या अपत्यांना आपसात समसमान विभागून मिळतो.

४६. जर, विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप मृत्यू पावला असेल, पण विनामृत्युपत्र व्यक्तीची आई हयात असून कोणीही भाऊ, बहीण किंवा विनामृत्युपत्र व्यक्तीच्या भावाचे किंवा बहिणीचे अपत्य नसेल तर, संपत्ती आईच्या मालकीची होईल.

**विनामृत्युपत्र व्यक्तीचा बाप मृत्यू पावला असेल पण त्या व्यक्तीची आई हयात असून कोणीही भाऊ बहीण, भाचा/पुतण्या किंवा भाची/पुतणी नसेल त्या बाबतीत.**

४७. विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे रेषीय वंशज, बाप किंवा आई हयात राहिली नसेल त्या बाबतीत, त्यांचे भाऊ, बहिणी व त्यांच्यापैकी जे त्याच्यापूर्वी मृत्यू पावले असतील त्यांचे अपत्य किंवा अपत्ये यांच्यात ती संपत्ती समसमान विभागली जाईल; अशी अपत्ये एकाहून अधिक असल्यास त्यांचे आपापले आईबाप विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्युसमयी हयात असते तर त्यांना जे हिस्से मिळाले असते तेच तेवढे त्यांना समसमान हिश्श्यांनी मिळतील.

**विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे कोणीही रेषीय वंशज, बाप किंवा आईही राहिली नसेल त्याबाबतीत.**

४८. विनामृत्युपत्र व्यक्तीचा मागे कोणीही रेषीय वंशज, आई वा बाप, भाऊ किंवा बहीण हयात राहिली नसेल त्याबाबतात त्यांच्या नातलगांपैकी जे त्याच्याशी निकटतम आप्तसंबंध श्रेणीने संबंधित असतील त्यांच्यात त्याची संपत्ती समसमान विभागली जाईल.

**विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे कोणीही रेषीय वंशज, आई व बाप किंवा भाऊ किंवा बहीणही नसेल त्याबाबतीत.**

**उदाहरणे**

(एक) 'क' या विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे त्याचा आजा किंवा आजी हयात राहिली असून त्याचा त्याच किंवा त्याहून निकटच्या आप्तसंबंध श्रेणीतील अन्य कोणीही नातलग हयात राहिलेला नाही. आजा-आजी दुसऱ्या श्रेणीतील असल्यामुळे ते विनामृत्युपत्र व्यक्तीच्या कोणाही चुलत्यास/मामास किंवा आत्यास/मावशीस वगळून संपत्तीला समसमान हिश्श्यांनी हक्कदार होतील ; कारण चुलते/मामा व आत्या/मावश्या हे केवळ तिसऱ्या श्रेणीतील आहेत.

(दोन) 'क' या विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे पणजा किंवा पणजी आणि चुलते/मामा व आत्या/ मावश्या हे हयात राहिले असून त्यांचा त्याच किंवा त्याहून निकटच्या आप्तसंबंध श्रेणीतील अन्य कोणीही नातलग हयात राहिलेले नाही. हे सर्व तिसऱ्या श्रेणीतील असल्यामुळे त्यांना समसमान हिस्से मिळतील.

(तीन) 'क' या विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे पणजा, चुलता व पुतण्या हयात राहिले आहेत, पण त्याचा त्याच किंवा त्याहून निकटच्या आप्तसंबंध श्रेणीतील कोणीही नातलग हयात राहिलेला नाही. हे सर्व तिसऱ्या श्रेणीतील असल्यामुळे त्यांना समसमान हिस्से मिळतील.

(चार) विनामृत्युपत्र व्यक्तीच्या एका भावाची किंवा बहीणीची दहा अपत्ये आणि त्याच्या दुसऱ्या भावाचे किंवा बहिणीचे एक अपत्य मिळून त्याच्या सर्वांत निकटच्या आप्तसंबंध श्रेणीतील नातलगांचा वर्ग बनतो. त्यांना प्रत्येकी संपत्तीचा एक-अकरांश मिळेल.

**अपत्याचे प्राग्दायांश एकराशीत आणावयाचे नाहीत.**

**४९.** जी व्यक्ती विनामृत्युपत्र मृत्यू पावली असेल अशा व्यक्तीच्या एखाद्या अपत्याने किंवा तिच्या अपत्याच्या वंशजाने त्या व्यक्तीच्या संपत्तीतील आपल्या वाटणीच्या हिश्श्यावर दावा सांगितला असेल त्याबाबतीत ज्याने किंवा ज्याच्या वंशजाने दावा सांगितला असेल त्या अपत्याप्रत किंवा त्याचा प्राग्दायांश म्हणून विनामृत्युपत्र व्यक्तीने आपल्या हयातीत प्रदान केलेला किंवा दिलेला किंवा संव्यवस्थेद्वारे नेमून दिलेला पैसा किंवा अन्य संपत्ती अशा वाटणीहिश्श्याची किंमत करताना हिशेबात घेतली जाणार नाही.

## प्रकरण तीन

### विनामृत्युपत्र पारशी व्यक्तींकरता विशेष नियम

**[1][विनामृत्युपत्र उत्तराधिकारासंबंधी सर्वसाधारण तत्त्वे.**

**५०.** पारशांमधील विनामृत्युपत्र उत्तराधिकाराच्या प्रयोजनार्थ,—

(क) जे मृत व्यक्तीच्या हयातीत प्रत्यक्षात जन्मले होते व जे तिच्या मृत्यूसमयी केवळ गर्भवासी होते पण मागाहून जिवंत जन्मले, त्यांच्यात काहीही भेद नाही ;

(ख) विनामृत्युपत्र व्यक्तीचा जो रेषीय वंशज, विधवा किंवा विधुर किंवा कोणताही रेषीय विधुर किंवा कोणताही रेषीय वंशज किंवा [2][कोणत्याही रेषीय वंशजाची विधवा किंवा विधुर] मागे न ठेवता विनामृत्युपत्र व्यक्तीच्या हयातीत मृत्यू पावला असेल तो वंशज विनामृत्युपत्र व्यक्ती ज्या संपत्तीबाबत विनामृत्युपत्र मृत्यू पावली असेल ती कोणत्या रीतीने विभागली जावी ते ठरविताना विचारात घेतला जाणार नाही ; आणि

(ग) विनामृत्युपत्र व्यक्तीच्या [3][कोणाही नातलगाच्या विधवेने किंवा विधुराने] विनामृत्युपत्र व्यक्तीच्या हयातीत पुन्हा विवाह केला असेल त्या बाबतीत विनामृत्युपत्र व्यक्ती ज्या संपत्तीबाबत विनामृत्युपत्र मृत्यू पावली असेल त्या संपत्तीचा कोणताही हिस्सा मिळण्यास [4][अशी विधवा किंवा विधुर] हक्कदार असणार नाही व विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्युसमयी [4][अशी विधवा किंवा विधुर] अस्तित्वात नसल्याचे मानले जाईल.]

**[5][विनामृत्युपत्र व्यक्तीच्या संपत्तीची विधवा, विधुर अपत्ये व आईबाप यांच्यात विभागणी.**

**५१.** (१) पोटकलम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने, एखादी पारशी व्यक्ती, ज्या संपत्तीबाबत विनामृत्युपत्र मृत्यू पावेल, ती संपत्ती पुढील रीतीने विभागली जाईल :—

(क) अशी पारशी व्यक्ती, आपल्यामागे विधवा किंवा विधुर, आणि अपत्ये ठेवून मृत्यू पावली असेल त्याबाबतीत, विधवा किंवा विधुर आणि अपत्ये यांच्यामध्ये, विधवेला किंवा विधुराला आणि प्रत्येक अपत्याला समसमान हिस्सा मिळेल अशा रीतीने विभागली जाईल ; किंवा

(ख) अशी पारशी व्यक्ती, आपल्यामागे अपत्ये ठेवून, परंतु विधवा किंवा विधुर ठेवून नव्हे, मृत्यू पावली असेल त्याबाबतीत, अपत्यांना समसमान हिस्सा मिळेल अशा रीतीने विभागली जाईल.

(२) एखादी पारशी व्यक्ती, आपल्यामागे अपत्ये किंवा विधवा किंवा विधुर व अपत्ये यांच्याव्यतिरिक्त आई-बापापैकी एकाला किंवा दोघांनाही मागे ठेवून मृत्यू पावेल त्याबाबतीत, ज्या संपत्तीबाबत ती विनामृत्युपत्र मृत्यू पावते ती संपत्ती, अशा रीतीने विभागली जाईल की, आई वडिलांस किंवा आईबापापैकी प्रत्येकास, अपत्याच्या हिश्श्याच्या निम्म्याइतका हिस्सा मिळेल.]

**५२.** [5][ * * * ]

**ज्या विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे रेषीय वंशज राहिला आहे तिच्या पूर्वमृत अपत्याच्या हिश्श्याची विभागणी.**

**५३.** एखादा पारशी कोणीही रेषीय वंशज मागे ठेवून मृत्यू पावेल त्या सर्व प्रकरणी जर अशा विनामृत्युपत्र व्यक्तीचे अपत्य त्या विनामृत्युपत्र व्यक्तीच्या हयातीत मृत्यू पावले असेल तर विनामृत्युपत्र व्यक्ती ज्या संपत्तीबाबत विनामृत्युपत्र मृत्यू पावली असेल त्या संपत्तीतील जो हिस्सा असे अपत्य विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्युसमयी हयात असते तर त्याला मिळाला असता त्याची विभागणी पुढील नियमानुसार होईल ; ते असे :—

(क) जर असे मृत अपत्य मुलगा असेल तर तो जणू काही विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्युनंतर तत्काळ मृत्यू पावला असावा त्याप्रमाणे त्याची विधवा व अपत्ये यांना या प्रकरणातील उपबंधानुसार हिस्से मिळतील :

---

१. १९३९ चा अधिनियम १७, कलम २ द्वारे मूळ कलमे ५० ऐवजी हे कलम घातले (१२ जून, १९३९ रोजी व तेव्हापासून).

२. १९९१ चा अधिनियम ५१, कलम २(क) द्वारे मूळ शब्दांऐवजी हे शब्द घातले (९ डिसेंबर, १९९१ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २(ख)(एक) द्वारे मूळ शब्दांऐवजी हे शब्द घातले (९ डिसेंबर, १९९१ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम २(ख)(दोन) द्वारे " ती " या शब्दांऐवजी हा मजकूर घातला (९ डिसेंबर, १९९१ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ कलमे ५१ व ५२ याऐवजी घातले व कलम ५२ वगळले (९ डिसेंबर, १९९१ रोजी व तेव्हापासून).

परंतु, अशा मृत मुलाच्या मागे विधवा किंवा रेषीय वंशजाची विधवा राहिली असेल पण कोणताही रेषीय वंशज नसेल त्या बाबतीत त्याच्या हिश्श्याचे असे वितरण करण्यात आल्यानंतरचा अवशिष्ट भाग विनामृत्युपत्र व्यक्ती जिच्याबाबत, विनामृत्युपत्र मृत्यू पावली अशी संपत्ती म्हणून या प्रकरणातील उपबंधानुसार विभागला जाईल आणि अशा अवशिष्टाची विभागणी करताना विनामृत्युपत्र व्यक्तीचा उक्त मृत मुलगा हिशेबात घेतला जाणार नाही.

(ख) जर असे मृत अपत्य मुलगी असेल तर तिचा हिस्सा तिच्या अपत्यामध्ये समसमान विभागला जाईल.

(ग) जर अशा मृत अपत्याचे एखादे अपत्यही विनामृत्युपत्र व्यक्तीच्या हयातीत मृत्यू पावले असेल तर विनामृत्युपत्र व्यक्तींच्या मृत्युसमयी ते हयात असते तर त्याला किंवा तिला जो हिस्सा मिळाला असता तो खंड (क) किंवा, प्रकरणपरत्वे, खंड (ख) अनुसार तशाच रीतीने विभागला जाईल.

(घ) विनामृत्युपत्र व्यक्तीचा याहून दूरचा रेषीय वंशज त्याच्या हयातीत मृत्यू पावला असेल त्या बाबतीत विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्युसमयी तो किंवा ती हयात असती तर विनामृत्युपत्र व्यक्तीपासून थेट तो किंवा ती रेषीय वंशज याच्यामधले विनामृत्युपत्र व्यक्तीचे सर्व रेषीय वंशज अगोदर मृत्यू पावल्याकारणाने तो किंवा ती रेषीय वंशज ज्यास हक्कदार झाली असती अशा कोणत्याही हिश्श्याच्या विभागणीस खंड (ग) चे उपबंध योग्य त्या फेरफारानिशी लागू होतील.

**जेथे विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे कोणत्याही रेषीय वंशज राहिला नसेल, पण विधवा किंवा विधुर किंवा कोणत्याही रेषीय वंशजाची विधवा किंवा विधुर राहिला असेल, त्या बाबतीतील संपत्तीची विभागणी.**

[१][**५४.** एखादी पारशी व्यक्ती कोणताही रेषीय वंशज मागे न ठेवता, पण विधवा किंवा विधुर किंवा रेषीय वंशजाची विधवा किंवा विधुर मागे ठेवून मृत्यू पावली तर त्याबाबतीत, विनामृत्युपत्र व्यक्ती ज्या संपत्तीबाबत विनामृत्युपत्र मृत्यू पावली असेल ती संपत्ती पुढील नियमानुसार विभागली जाईल, ते असे :---

(क) जर विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा किंवा विधुर राहिला असेल, पण रेषीय वंशजाची विधवा किंवा विधुर राहिला नसेल तर विधवेला किंवा विधुराला उक्त संपत्तीपैकी निम्मी संपत्ती मिळेल;

(ख) जर विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा किंवा विधुर आणि कोणत्याही रेषीय वंशजाची विधवा व विधुरही राहिला असेल तर, विनामृत्युपत्र विधवेस किंवा तिच्या विधुरास उक्त संपत्तीचा एक-तृतीयांश हिस्सा मिळेल, आणि कोणत्याही रेषीय वंशजाच्या विधवेला किंवा विधुराला दुसरा एक-तृतीयांश हिस्सा मिळेल किंवा जर रेषीय वंशजांच्या एकाहून अधिक अशा विधवा किंवा विधुर असतील तर, लगतपूर्वी उल्लेखिलेला एक तृतीयांश हिस्सा त्यांच्यात समसमान विभागला जाईल.

(ग) जर विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा किंवा विधुर राहिला नसेल पण रेषीय वंशजाची एक विधवा किंवा विधुर राहिला असेल तर, रेषीय वंशजाच्या अशा विधवेस किंवा विधुरास, उक्त संपत्तीचा एक-तृतीयांश हिस्सा मिळेल अथवा जर विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे विधवा किंवा विधुर राहिला नसेल पण रेषीय वंशजाच्या एकाहून अधिक विधवा राहिल्या असतील किंवा विधुर राहिले असतील तर उक्त संपत्तीचा दोन-तृतीयांश भाग रेषीय वंशजांच्या अशा विधवा किंवा विधुरामध्ये समसमान हिश्श्यात विभागला जाईल.

(घ) खंड (क), खंड (ख) किंवा खंड (ग) यात विनिर्दिष्ट केलेल्या विभागणीनंतर राहिलेला अवशिष्ट भाग, विनामृत्युपत्र व्यक्तीच्या नातलगांमध्ये, दुसऱ्या अनुसूचीच्या भाग एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्रमाने वितरित केला जाईल. त्या अनुसूचीच्या भाग एकमध्ये, पहिल्या क्रमांकास असलेल्या अनंतर आप्तसंबंधीना दुसऱ्या क्रमांकास असलेल्यापेक्षा दुसऱ्या क्रमांकास असलेल्यांना तिसऱ्या क्रमांकास असलेल्यांपेक्षा व याप्रमाणे पुढे अनुक्रमाने अधिमान दिला जाईल, परंतु, संपत्ती अशा रीतीने वितरित केली जाईल की, एकाच निकट श्रेणीत असलेल्या प्रत्येक पुरुषाला व स्त्रीला समसमान हिस्सा मिळेल.

(ङ) जर अवशिष्ट भागास खंड (घ) खाली हक्कदार असलेले कोणीही नातलग नसतील तर, संपूर्ण अवशिष्ट भाग, या कलमाखाली हिस्से मिळण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तींमध्ये विनिर्दिष्ट हिश्श्याच्या प्रमाणात वितरित केला जाईल.]

**जेथे विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मागे रेषीय वंशज किंवा विधवा किंवा विधुर किंवा [२][कोणत्याही रेषीय वंशजाची विधवा किंवा विधुर] राहिला नसेल, त्याबाबतीतील संपत्तीची विभागणी.**

**५५.** जेव्हा एखादा पारशी आपल्यामागे रेषीय वंशज किंवा विधवा किंवा विधुर किंवा [२][कोणत्याही रेषीय वंशजाची विधवा किंवा विधुर] न ठेवता मृत्यू पावेल तेव्हा दुसऱ्या अनुसूचीच्या भाग २ मध्ये दिलेल्या क्रमानुसार असलेला त्या पारशी पुरुषाचा किंवा स्त्रीचा अनंतर आप्तसंबंधी, ज्या संपत्तीबाबत तो किंवा ती विनामृत्युपत्र मृत्यू पावली असेल त्या संपूर्ण संपत्तीचा उत्तराधिकारी होण्यास हक्कदार असेल. त्या अनुसूचीच्या दुसऱ्या भागांमध्ये पहिल्या क्रमांकास असलेल्या अनंतर आप्तसंबंधींना दुसऱ्या क्रमांकास असलेल्यापेक्षा, दुसऱ्या क्रमांकास असलेल्यांना तिसऱ्या क्रमांकास असलेल्यापेक्षा व याप्रमाणे पुढे अनुक्रमाने अधिमान दिला जाईल. परंतु संपत्ती अशा रीतीने विभागली जाईल की [३][एकाच निकट श्रेणीत असलेल्या प्रत्येक पुरुषाला किंवा स्त्रीला समसमान हिस्सा मिळेल.]

**या प्रकरणाच्या उपबंधांखाली उत्तराधिकारी होण्यास हक्कदार असा कोणीही नातलग नसेल त्याबाबतीतील संपत्तीची विभागणी.**

[४][**५६.** एखादा पारशी ज्या संपत्तीबाबत विनामृत्युपत्र मृत्यू पावला असेल त्या संपत्तीबाबत या प्रकरणाच्या अन्य उपबंधाखाली उत्तराधिकारी होण्यास हक्कदार असा कोणीही नातलग नसेल त्या बाबतीत विनामृत्युपत्र व्यक्तीचे जे नातलग निकटतम आप्तसंबंध श्रेणीने संबंधित असतील त्यांच्यामध्ये ती समसमान विभागली जाईल.]

---

१. १९९१ चा अधिनियम ५१, कलम ४ द्वारे मूळ कलम ५४ ऐवजी घातले (९ डिसेंबर, १९९१ रोजी व तेव्हापासून).

२. वरीलअधिनियमाच्या कलम ५(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला. (९ डिसेंबर, १९९१ रोजी व तेव्हापासून)

३. वरील अधिनियमाच्या कलम ५(ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घालता. (९ डिसेंबर, १९९१ रोजी व तेव्हापासून).

४. १९३४ चा अधिनियम १७ कलम २ द्वारे मूळ कलम ५६ ऐवजी हे कलम घातले (१२ जून १९३९ रोजी व तेव्हापासून).

# भाग सहा

## मृत्युपत्रीय उत्तराधिकार

## प्रकरण एक

### प्रास्ताविक

या भागाचे विवक्षित उपबंध हिंदू, इत्यादींनी केलेल्या मृत्युपत्रांच्या एका वर्गास लागू असणे.

[१] ५७. या भागाचे जे उपबंध तिसऱ्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केले आहेत ते; तीत विनिर्दिष्ट केलेल्या निर्बंधाच्या व आपरिवर्तनाच्या अधीनतेने पुढील मृत्युपत्रांना व क्रोडपत्रांना लागू असतील :—

(क) दिनांक १ सप्टेंबर १८७० रोजी किंवा त्यानंतर कोणाही हिंदूने, बौद्धाने, शिखाने किंवा जैनाने उक्त दिनांकास जी बंगालच्या नायब राज्यपालांच्या अधीन होती त्या राज्यक्षेत्रांच्या आत किंवा मद्रास आणि मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या साधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत केलेल्या सर्व मृत्युपत्रांना व क्रोडपत्रांना ; आणि

(ख) ज्या राज्यक्षेत्रांच्या किंवा सीमांच्या बाहेर करण्यात आलेली जी अशी मृत्युपत्रे व क्रोडपत्रे त्या राज्यक्षेत्राच्या किंवा सीमांच्या आत स्थित असलेल्या स्थावर संपत्तीशी जेथवर संबंधित असतील तेथवर त्यांना, [२][आणि

(ग) कोणाही हिंदूने, बौद्धाने, शिखाने किंवा जैनाने जानेवारी १९२७ च्या पहिल्या दिवशी किंवा नंतर केलेल्या ज्या मृत्युपत्रांना व क्रोडपत्रांना ते उपबंध खंड (क) व (ख) यांद्वारे लागू केलेले नाहीत त्या सर्वांना :]

परंतु, विवाहाद्वारे असे कोणतेही मृत्युपत्र किंवा क्रोडपत्र प्रत्याहृत होणार नाही.

[३] [* * * * *]

भागाची सर्वसाधारण प्रयुक्ती.

५८. (१) या भागाचे उपबंध कोणत्याही मुस्लिमाच्या संपत्तीच्या मृत्युपत्रीय उत्तराधिकारास किंवा कलम ५७ द्वारे उपबंधित केले असेल ते वगळून इतर बाबतीत, कोणाही हिंदूच्या, बौद्धाच्या, शिखाच्या किंवा जैनाच्या संपत्तीच्या मृत्युपत्रीय उत्तराधिकारास लागू असणार नाहीत ; तसेच ते दिनांक १ जानेवारी, १८६६ या दिवसापूर्वी केलेल्या कोणत्याही मृत्युपत्रास लागू असणार नाहीत.

(२) पोटकलम (१) मध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याद्वारे अन्यथा उपबंधित केले असेल ते वगळून या भागाचे उपबंध म्हणजे मृत्युपत्रीय उत्तराधिकाराच्या सर्व प्रकरणांना लागू होणारा [४][भारताचा] कायदा असेल.

### मृत्युपत्रे व क्रोडपत्रे यांविषयी

मृत्युपत्रे करण्यास क्षम असणारी व्यक्ती.

५९. निकोप मनाच्या, अज्ञान नसलेल्या प्रत्येक व्यक्तीला आपल्या संपत्तीची मृत्युपत्राद्वारे विल्हेवाट करता येईल :—

**स्पष्टीकरण १.**—विवाहित स्त्री जी संपत्ती आपल्या हयातीत तिच्या स्वतःच्या कृतीद्वारे अन्यक्रामित करू शकेल अशा कोणत्याही संपत्तीची तिला मृत्युपत्राद्वारे विल्हेवाट करता येईल.

**स्पष्टीकरण २.**—बहिऱ्या किंवा मुक्या किंवा आंधळ्या असलेल्या व्यक्ती जर आपण काय करत आहोत हे जाणण्यास समर्थ असतील तर, तेवढ्या व्यंगामुळे मृत्युपत्र करण्यास त्या अक्षम होत नाहीत.

**स्पष्टीकरण ३.**—सामान्यतः भ्रमिष्ट असलेल्या व्यक्तीला, ज्यावेळी ती निकोप मनाची असेल त्या मध्यंतरीच्या काळात मृत्युपत्र करता येईल.

**स्पष्टीकरण ४.**—कोणतीही व्यक्ती जेव्हा अशा मनःस्थितीत असते की, आपण काय करत आहोत हे तिला समजत नाही, तेव्हा ती मृत्युपत्र करू शकत नाही--मग ती मनःस्थिती नशेमुळे किंवा आजारपणामुळे उद्‌भवलेली असो वा अन्य कारणाने उद्‌भवलेली असो.

---

१. १९२६ चा अधिनियम ३७, कलम २ द्वारे मूळ कलम ५७ ला त्याचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला आणि नंतर १९२९ चा अधिनियम १८, कलम ३ द्वारे पोटकलम (१) ला कलम ५७ असा नवीन क्रमांक दिला.

२. १९२९ चा अधिनियम १८, कलम ३ द्वारे घातले.

३. १९२६ चा अधिनियम ३७, कलम २ द्वारे घातलेले पोटकलम (२) हे १९२९ चा अधिनियम १८, कलम ३ द्वारे गाळले.

४. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ द्वारे 'राज्ये' याऐवजी 'भारत' हा शब्दोल्लेख घातला.

### उदाहरणे

(एक) ' क ' ला आपल्या अगदी जवळपास काय चालले आहे त्याचे आकलन होऊ शकते आणि नेहमीच्या परिचयाच्या प्रश्नांची तो उत्तरे देऊ शकतो, पण आपल्या संपत्तीचे स्वरूप किंवा त्याच्या आप्तसंबंधी असलेल्या व्यक्ती, किंवा आपण कोणाच्या प्रीत्यर्थ मृत्युपत्र करणे योग्य होईल याबाबत त्याला पुरेशी समज नाही, ' क ' विधिग्राह्य मृत्युपत्र करू शकत नाही.

(दोन) ' क ' आपले मृत्युपत्र म्हणून एक संलेख निष्पादित करतो, पण त्याला संलेखाचे स्वरूप व त्याचप्रमाणे त्याच्या तरतुदीचा परिणामही समजत नाही. हा संलेख विधिग्राह्य मृत्युपत्र नाही.

(तीन) ' क ' अतिशय दुबळा व कमजोर असला तरी आपल्या संपत्तीची विल्हेवाट करण्याची योग्य पद्धत कोणती याबाबत निर्णयशक्ती वापरण्यास क्षम असून तो मृत्युपत्र करतो. हे मृत्युपत्र विधिग्राह्य आहे.

**६०.** एखाद्या बापाला---त्याचे वय कितीही असो---आपल्या अपत्यासाठी त्याच्या अज्ञानदशेत मृत्युपत्राद्वारे पालक नियुक्त करता येईल किंवा येतील. **मृत्युपत्रीय पालक.**

**६१.** कपटामुळे किंवा जबरदस्तीमुळे अथवा ज्यामुळे मृत्युपत्रकर्त्याचे कृतिस्वातंत्र्य नाहीसे होते इतकी गळ घातल्यामुळे जे मृत्युपत्र करण्यात आले आहे असे मृत्युपत्र किंवा असा त्याचा कोणताही भाग शून्य असतो. **कपटाने, जबरदस्तीने किंवा गळ घालून मिळविलेले मृत्युपत्र.**

### उदाहरणे

(एक) मृत्युपत्रकर्त्याचे एकुलते एक अपत्य मृत आहे, किंवा त्याने कर्तव्यच्युतिकारक अशी एखादी कृती केली आहे असे ' क ' मृत्युपत्रकर्त्याला खोटेपणाने व समजून सवरून भासवतो आणि त्याद्वारे त्याच्या, म्हणजे ' क ' ज्या प्रीत्यर्थ मृत्युपत्र करण्यास मृत्युपत्रकर्त्याला प्रवृत्त करतो ; असे मृत्युपत्र कपटाने मिळविले आहे आणि ते विधिबाह्य आहे.

(दोन) आपणास मृत्युपत्राने उत्तरदान दिले जावे यासाठी ' क ' कपटाने आणि फसवणुकीने मृत्युपत्रकर्त्याचे मन वळवितो, मृत्युपत्रित दान शून्य आहे.

(तीन) ' क ' विधिसंमत प्राधिकारान्वये कैदी झाला असता मृत्युपत्र करतो. मृत्युपत्र कैदेच्या कारणामुळे विधिबाह्य होत नाही.

(चार) ' ख ' ने ' ग ' च्या प्रीत्यर्थ मृत्युपत्रित दान न केल्यास आपण त्याला गोळी घालू किंवा त्याचे घर जाळू किंवा फौजदारीपात्र दोषारोपाखाली त्याला अटक करवू अशी ' क ' धमकी देतो, परिणामी, ' ख ' हा ' ग ' च्या प्रीत्यर्थ मृत्युपत्रित दान करतो. मृत्युपत्रित दान जबरदस्तीने घडवून आणले असल्यामुळे ते शून्य आहे.

(पाच) इतरांच्या प्रभावामुळे विचलित न झाल्यास मृत्युपत्र करता येण्याइतपत ' क ' कडे पुरेशी बुद्धी असूनही त्यांच्यावर ' ख ' चा इतका पगडा आहे की त्याला कृतिस्वातंत्र्य राहिलेले नाही ; असे असता ' क ' ने सांगितल्याबरहुकूम तो मृत्युपत्र करतो. ' ख ' ची भीती नसती तर त्याने ते मृत्युपत्र निष्पादित केले नसते असे दिसते. मृत्युपत्र विधिबाह्य आहे.

(सहा) ' क ' प्रकृतीने इतक्या दुर्बल अवस्थेत आहे की त्याला गळ घालती असता त्याचा प्रतिकार करण्यास तो असमर्थ आहे ; असे असता विवक्षित आशयाचे मृत्युपत्र करण्यासाठी त्याच्यावर ' ख ' कडून दडपण येते आणि केवळ मन:शांती मिळण्यासाठी आणि ' ख ' पुढे मान तुकवून तो कसे करतो ते मृत्युपत्र विधिबाह्य आहे.

(सात) स्वत:च्या निर्णयशक्तीचा आणि इच्छाशक्तीचा वापर करण्याइतपत ' क ' चे प्रकृतिमान आहे; असे असता विवक्षित आशयाचे मृत्युपत्र करण्यास त्याला प्रवृत्त करण्यासाठी ' ख ' त्याच्यापाशी आग्रहपूर्वक रदबदली करतो व त्याचे मन वळवतो आणि दबदली व मनवळवणी यांचा परिणाम म्हणून, पण आपल्या निर्णयशक्तीचा आणि इच्छाशक्तीचा मुक्त वापर करून तो ' ख ' ने शिफारस केलेल्या रीतीने आपले मृत्युपत्र करतो ' ख ' ने केलेली रदबदली व मनवळवणी यांमुळे मृत्युपत्र विधिबाह्य होत नाही.

(आठ) ' ख ' कडून उत्तरदान मिळविण्याच्या हेतूने ' क ' त्याची सरबराई करतो व त्याची खुशामत करतो आणि त्यामुळे ' ख ' ची लहर फिरून त्याच्या मनात ' क ' विषयी अनुकूल ग्रह निर्माण होतो. अशी सरबराई आणि खुशामत यांचा परिणाम म्हणून ' ख ' मृत्युपत्र करून त्याद्वारे ' क ' करता उत्तरदान ठेवतो ' ख ' ने केलेल्या सरबराईमुळे आणि खुशामतीमुळे मृत्युपत्रित दान विधिबाह्य होत नाही.

मृत्युपत्र प्रत्याहृत करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल.

६२. मृत्युपत्र त्याच्या कर्त्याकडून, तो आपल्या संपत्तीची मृत्युपत्राद्वारे विल्हेवाट करण्यास सक्षम असेल अशा कोणत्याही वेळी प्रत्याहृत होण्यास किंवा त्यात फेरबदल केला जाण्यास पात्र असते.

## प्रकरण तीन

### विनाविशेषाधिकार मृत्युपत्रांच्या निष्पादनाविषयी

विनाविशेषाधिकार मृत्युपत्राचे निष्पादन.

६३. लष्करी मोहिमेवर गेलेला किंवा प्रत्यक्ष युद्धात गुंतलेला भूसैनिक [1][अथवा याप्रमाणे गेलेला किंवा गुंतलेला वायु सैनिक] अथवा सागरावरील नाविक सोडून अन्य प्रत्येक मृत्युपत्रकर्ता आपले मृत्युपत्र पुढील नियमानुसार करील :—

(क) मृत्युपत्रकर्ता मृत्युपत्रावर स्वाक्षरी करील किंवा आपली निशाणी लावील अथवा तो त्याच्या समक्ष व त्याच्या निदेशावरून अन्य एखाद्या व्यक्तीकडून स्वाक्षरित केले जाईल.

(ख) मृत्युपत्रकर्त्याची स्वाक्षरी किंवा निशाणी अथवा त्याच्याकरता स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी अशा जागी केली जाईल की, त्या लेखास मृत्युपत्र म्हणून परिणामक करण्याचा त्यामागे उद्देश होता असे दिसून येईल.

(ग) ज्यांच्यापैकी प्रत्येकाने मृत्युपत्रकर्त्याला मृत्युपत्रांवर स्वाक्षरी करताना किंवा आपली निशाणी लावताना पाहिले असेल अथवा कोणत्याही व्यक्तीस मृत्युपत्रकर्त्याच्या समक्ष व त्याच्या निदेशावरून त्या मृत्युपत्रावर स्वाक्षरी करताना पाहिले असेल अथवा खुद्द मृत्युपत्रकर्त्याकडून त्याच्या स्वाक्षरीची किंवा निशाणीची किंवा अशा अन्य व्यक्तीच्या स्वाक्षरीची अभिस्वीकृती त्यास मिळाली असेल अशा दोन किंवा अधिक साक्षीदारांकडून ते मृत्युपत्र साक्षांकित केले जाईल; आणि साक्षीदारांपैकी प्रत्येक जण मृत्युपत्रकर्त्यांच्या समक्ष मृत्युपत्रावर स्वाक्षरी करील; पण एकाहून अधिक साक्षीदारांनी एकाचवेळी उपस्थित राहण्याची जरूरी असणार नाही आणि साक्षांकन कोठल्याही विशिष्ट नमुन्यात असण्याची जरूरी असणार नाही.

निर्देशामुळे कागदपत्रांचे समाविष्ट होणे.

६४. जर रीतसर साक्षांकित मृत्युपत्रात किंवा क्रोडपत्रात, त्यावेळी प्रत्यक्ष लिखित अशा अन्य कोणत्याही दस्तऐवजाचा मृत्युपत्रकर्त्याने आपल्या उद्देशांचा कोणताही भाग व्यक्त करणारा दस्तऐवज म्हणून निर्देश केला तर, असा दस्तऐवज हा ज्या मृत्युपत्रात किंवा क्रोडपत्रात तो निर्दिष्ट केला असेल त्याचा भाग असल्याचे मानले जाईल.

## प्रकरण चार

### विशेषाधिकार मृत्युपत्रांविषयी

विशेषाधिकार मृत्युपत्रे.

६५. लष्करी मोहिमेवर गेलेल्या किंवा प्रत्यक्ष युद्धात गुंतलेल्या कोणत्याही भूसैनिकाला [1][अथवा याप्रमाणे गेलेल्या किंवा गुंतलेल्या कोणत्याही वायुसैनिकाला] अथवा सागरावरील कोणत्याही नाविकाला, जर त्याच्या वयाची अठरा वर्षे पूर्ण झाली असतील तर, कलम ६६ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने मृत्युपत्राद्वारे आपल्या संपत्तीची विल्हेवाट करता येईल. अशा मृत्युपत्रांना ‘ विशेषाधिकार मृत्युपत्रे ’ म्हणतात.

**उदाहरणे**

(एक) रेजिमेंटला संलग्न असलेला वैद्यकीय अधिकारी ‘ क ’ प्रत्यक्ष युद्ध मोहिमेवर नेमला गेला आहे. तो प्रत्यक्ष लष्करी मोहिमेवर नेमलेला भूसैनिक आहे आणि विशेषाधिकार मृत्युपत्र करू शकतो.

(दोन) ‘ क ’ हा सागरावरील व्यापारी जहाजात आहे व तो त्या जहाजाचा पोतनीस आहे. तो नाविक आहे व सागरावर असल्यामुळे विशेषाधिकार मृत्युपत्र करू शकतो.

(तीन) बंडखोरांविरुद्ध रणक्षेत्रात लढत असलेला ‘ क ’ प्रत्यक्ष युद्धात गुंतलेला भूसैनिक आहे आणि त्या नात्याने तो विशेषाधिकार मृत्युपत्र करू शकतो.

(चार) जहाजाचा नाविक ‘ क ’ जलप्रवासाच्या दरम्यान ते बंदरात असताना तात्पुरता किनाऱ्यावर आला आहे तो, या कलमाच्या प्रयोजनार्थ सागरावरील नाविक आहे आणि विशेषाधिकार मृत्युपत्र करू शकतो.

(पाच) नौसेनाधिपती ‘ क ’ याचे आरमारावर अधिपत्य आहे, पण तो किनाऱ्यावर राहतो आणि प्रसंगवशात् आपल्या जहाजावर जातो, तो सागरावर असल्याचे मानले जात नाही आणि तो विशेषाधिकार मृत्युपत्र करू शकत नाही.

(सहा) ‘ क ’ हा नाविक लष्करी मोहिमेवर आहे, पण सागरावर नसल्याने भूसैनिक म्हणून मानला जातो व तो विशेषाधिकार मृत्युपत्र करू शकतो.

---

१. १९२७ चा अधिनियम १०, कलम २ व पहिली अनुसूची यांद्वारे घातले.

६६. (१) विशेषाधिकार मृत्युपत्रे लेखी असू शकतील किंवा तोंडी उच्चारलेल्या शब्दांनी करता येतील. **विशेषाधिकार मृत्युपत्रे करण्याची पद्धत व ती निष्पादित करण्याचे नियम.**

(२) विशेषाधिकार मृत्युपत्रांचे निष्पादन पुढील नियमांनी नियंत्रित केले जाईल :—

(क) मृत्युपत्रकर्त्याला संपूर्णतः त्याच्या स्वतःच्या हाताने मृत्युपत्र लिहिता येईल. अशा बाबतीत ते स्वाक्षरित किंवा साक्षांकित करण्याची गरज नसते.

(ख) ते संपूर्णतः किंवा अंशतः अन्य व्यक्तीला लिहिता येईल आणि मृत्युपत्रकर्त्याला स्वाक्षरित करता येईल अशा बाबतीत ते साक्षांकित करण्याची गरज नसते.

(ग) जर मृत्युपत्र म्हणून केलेला संलेख संपूर्णतः किंवा अंशतः अन्य व्यक्तीने लिहिलेला असून मृत्युपत्रकर्त्याने स्वाक्षरित केलेला नसेल तर तो मृत्युपत्रकर्त्याच्या निदेशावरून लिहिला होता किंवा त्याने तो आपले मृत्युपत्र म्हणून मान्य केला असे दाखवून दिल्यास तो संलेख त्याचे मृत्युपत्र असल्याचे मानले जाईल.

(घ) जर मृत्युपत्रकर्त्याने उद्देशिलेल्या रीतीने संलेखाचे निष्पादन करण्यात आले नव्हते असे त्यावरून उघडउघड दिसून आले तर, त्या परिस्थिती विशेषाच्या कारणाने तो विधिग्राह्य होणार नाही, परंतु त्याने त्याचे निष्पादन केले नाही याचे कारण त्या संलेखात व्यक्त झालेले मृत्युपत्राचे उद्देश सोडून देण्यात आले होते हे नव्हे तर अन्य एखादे कारण होते असा त्याचा कारणसंबंध वाजवीपणे जोडता आला पाहिजे.

(ङ) जर भूसैनिकाने, [1][वायुसैनिकाने] किंवा नाविकाने आपले मृत्युपत्र तयार करण्यासाठी सूचना लिहून ठेवल्या असतील, पण ते तयार करून निष्पादन करू शकण्यापूर्वी तो मृत्यू पावला असेल तर अशा सूचना हेच त्याचे मृत्युपत्र बनले असल्याचे समजले जाईल.

(च) जर भूसैनिकाने, [1][वायुसैनिकाने] किंवा नाविकाने आपले मृत्युपत्र तयार करण्यासाठी दोन साक्षीदारांच्या समक्ष, तोंडी सूचना दिल्या असून त्या त्यांच्या हयातीत लेखनिविष्ट करण्यात आल्या असतील पण संलेख तयार करून निष्पादन करू शकण्यापूर्वी तो मृत्यू पावला असेल तर, अशा सूचना जरी त्याच्या समक्ष लेखनिविष्ट करण्यात आल्या नसल्या किंवा त्याला वाचून दाखवण्यात आल्या नसल्या तरी, त्या सूचनाच त्याचे मृत्युपत्र बनले असल्याचे समजले जाईल.

(छ) भूसैनिकाला, [1][वायुसैनिकाला] किंवा नाविकाला एकाच वेळी उपस्थित असलेल्या दोन साक्षीदारांच्या समोर आपले उद्देश जाहीर करून तोंडी उच्चारलेल्या शब्दांद्वारे मृत्युपत्र करता येईल.

(ज) तोंडी उच्चारलेल्या शब्दांद्वारे केलेले मृत्युपत्र हे मृत्युपत्रकर्ता विशेषाधिकार मृत्युपत्र करण्यास हक्कदार असण्याचे थांबल्यानंतर एक महिना संपताच तेव्हाही तो हयात असल्यास शून्य होईल.

## प्रकरण पाच

### मृत्युपत्राने साक्षांकन, प्रत्याहरण, फेरबदल आणि पुनरुज्जीवन यांविषयी

६७. मृत्युपत्र, ते साक्षांकित करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा त्याच्या पत्नीला वा तिच्या पतीला त्याद्वारे मृत्युपत्रित दानाच्या रूपाने किंवा विनियुक्तीच्या रूपाने कोणताही लाभ दिल्याकारणाने अपूर्णपणे साक्षांकित असल्याचे मानले जाणार नाही, पण मृत्युपत्रित दान किंवा विनियुक्ती यामध्ये जेथवर याप्रमाणे साक्षांकन करणारी व्यक्ती किंवा अशा व्यक्तीची पत्नी किंवा पती किंवा त्यापैकी कोणाच्याही पोटी दावा सांगणारी कोणतीही व्यक्ती यांच्याशी हितसंबंध असेल तेथवर शून्य असेल. **साक्षांकन करणाऱ्या साक्षीदाराला दिलेल्या दानाचा परिणाम.**

**स्पष्टीकरण.**---मृत्युपत्राखालील दानग्राही, मृत्युपत्रास पुष्टी देणारे क्रोडपत्र साक्षांकित करण्याने आपले मृत्युपत्रित दान गमावत नाही.

६८. एखाद्या मृत्युपत्रात स्वतःचा हितसंबंध आहे किंवा स्वतः त्याचा मृत्युपत्रव्यवस्थापक आहे या कारणाने कोणतीही व्यक्ती मृत्युपत्राचे निष्पादन सिद्ध करण्यास किंवा त्याची विधिग्राह्यता किंवा विधिबाह्यता सिद्ध करण्यास साक्षीदार म्हणून निरर्ह असणार नाही. **साक्षीदार हा हितसंबंधित असल्यामुळे किंवा मृत्युपत्रव्यवस्थापक असल्यामुळे निरर्ह नाही.**

६९. विनियुक्तीची मुखत्यारी वापरून मृत्युपत्र केले असता ज्या संपत्तीबाबत विनियुक्तीची मुखत्यारी वापरली जाते ती, विनियुक्तीच्या अभावी कर्त्याच्या--त्याच्या वा तिच्या मृत्युपत्रव्यवस्थापकाकडे अथवा विनामृत्युपत्रतेच्या बाबतीत हक्कदार असलेल्या व्यक्तीकडे जाणार नाही. असे मृत्युपत्र खेरीज करून प्रत्येक मृत्युपत्र हे कर्त्याच्या विवाहामुळे प्रत्याहृत होईल. **मृत्युपत्रकर्त्याच्या विवाहामुळे मृत्युपत्राचे प्रत्याहरण.**

**स्पष्टीकरण.**---जेव्हा एखाद्या मनुष्याच्या ठायी तो ज्या संपत्तीचा मालक नाही तिची विल्हेवाट निर्धारित करण्याचा अधिकार निहित केला जातो तेव्हा त्याला अशी संपत्ती विनियुक्त करण्याचा अधिकार असल्याचे म्हटले जाते.

१. १९२७ चा अधिनियम १०, कलम २ व पहिली अनुसूची यांद्वारे घातले.

**विनाविशेषाधिकार मृत्युपत्राचे किंवा क्रोडपत्राचे प्रत्याहरण.**

७०. कोणतेही विनाविशेषाधिकार मृत्युपत्र किंवा क्रोडपत्र किंवा त्याचा कोणताही भाग याचे प्रत्याहरण विवाहामुळे अथवा अन्य मृत्युपत्र किंवा क्रोडपत्र याद्वारे अथवा तो प्रत्याहत करण्याचा उद्देश जाहीर करणाऱ्या आणि विनाविशेषाधिकार मृत्युपत्र ज्या रीतीने निष्पादित करणे यात यापूर्वी आवश्यक केले आहे त्या रीतीने निष्पादित केलेल्या लेखाद्वारे अथवा तो प्रत्याहत करण्याच्या उद्देशाने मृत्युपत्रकर्त्याने किंवा त्याच्या समक्ष व त्याच्या निदेशावरून एखाद्या व्यक्तीने जाळल्यामुळे, फाडल्यामुळे किंवा अन्यप्रकारे नष्ट केल्यामुळे होईल, अन्यथा नाही.

**उदाहरणे**

(एक) ' क ' ने विनाविशेषाधिकार मृत्युपत्र केले आहे. नंतर ' क ' पहिले मृत्युपत्र प्रत्याहत केल्याचे दर्शवणारे दुसरे विनाविशेषाधिकार मृत्युपत्र करतो, हे प्रत्याहरण आहे.

(दोन) ' क ' ने विनाविशेषाधिकार मृत्युपत्र केले आहे. नंतर ' क ' ला विशेषाधिकार मृत्युपत्र करण्याचा हक्क असताना आपले विनाविशेषाधिकार मृत्युपत्र प्रत्याहत केल्याचे दर्शवणारे दुसरे विशेषाधिकार मृत्युपत्र करतो, हे प्रत्याहरण आहे.

**विनाविशेषाधिकार मृत्युपत्रातील मजकूर पुसून टाकणे, ओळींच्या मध्ये मजकूर घालणे किंवा मजकुरात फेरबदल करणे यांचा परिणाम.**

७१. कोणत्याही विशेषाधिकार मृत्युपत्रात त्याच्या निष्पादनानंतर मजकूर पुसून टाकला असता, ओळींच्या मध्ये मजकूर घातला किंवा मजकुरात अन्य फेरबदल केला असता, असा कोणताही फेरबदल मृत्युपत्राच्या निष्पादनासाठी यात यापूर्वी आवश्यक केलेल्या रीतीने निष्पादिला नसेल तर तो, त्यामुळे मृत्युपत्रातील शब्द दुर्वाच्य किंवा अर्थ अनाकलनीय झाला असेल तर तेवढे खेरीजकरून, परिणामक असणार नाही:

परंतु, असा फेरबदल केलेले मृत्युपत्र, मृत्युपत्रकर्त्यांची स्वाक्षरी आणि साक्षीदारांच्या सह्या मृत्युपत्राच्या समासात किंवा अन्य एखाद्या भागात अशा फेरबदलाच्या समोर किंवा जवळपास अथवा अशा फेरबदलाचा निर्देश करणाऱ्या व मृत्युपत्राच्या अखेरीस किंवा अन्य एखाद्या भागात लिहिलेल्या टिप्पणीच्या तळाशी किंवा अखेरीस किंवा समोर केल्या असतील तर रीतसर निष्पादित केले असल्याचे मानले जाईल.

**विशेषाधिकार मृत्युपत्राचे किंवा क्रोडपत्राचे प्रत्याहरण.**

७२. विनाविशेषाधिकार मृत्युपत्र किंवा क्रोडपत्र हे विनाविशेषाधिकार मृत्युपत्राद्वारे किंवा क्रोडपत्राद्वारे, अथवा ते प्रत्याहत करण्याचा उद्देश व्यक्त करणारी कोणतीही कृती करून व त्याचबरोबर एखाद्या विशेषाधिकार मृत्युपत्रास विधिग्राह्यता देण्यास पुरेसे होतील असे उपचार पाळून, अथवा ते प्रत्याहत करण्याच्या उद्देशाने मृत्युपत्रकर्त्याने किंवा त्याच्या समक्ष व त्याच्या निदेशावरून एखाद्या व्यक्तीने ते जाळणे, फाडणे किंवा अन्य प्रकारे नष्ट करणे याद्वारे मृत्युपत्रकर्त्याला प्रत्याहत करता येईल.

**स्पष्टीकरण.**—विशेषाधिकार मृत्युपत्रास विधिग्राह्यता प्राप्त होण्यासाठी पुरेसे होतील अशा उपचारांसह केलेल्या विशेषाधिकार मृत्युपत्राचे किंवा क्रोडपत्राचे प्रत्याहरण ती कृती करतेवेळी मृत्युपत्रकर्ता ज्यायोगे तो विशेषाधिकार मृत्युपत्र करण्यास हक्कदार होतो अशा स्थितीत असणे जरुरीचे नसते.

**विनाविशेषाधिकार मृत्युपत्राचे पुनरुज्जीवन.**

७३. (१) कोणत्याही रीतीने प्रत्याहत केलेले असे विनाविशेषाधिकार मृत्युपत्र किंवा क्रोडपत्र किंवा त्याचा कोणताही भाग त्याचे पुनर्निष्पादन करणे अथवा यात यापूर्वी आवश्यक केलेल्या रीतीने निष्पादिलेले व ते पुनरुज्जीवित करण्याचा उद्देश दर्शविणारे क्रोडपत्र करणे याहून अन्य रीतीने पुनरुज्जीवित होणार नाही.

(२) अंशतः प्रत्याहत केले जाऊन नंतर संपूर्णतः प्रत्याहत करण्यात आलेले कोणतेही मृत्युपत्र किंवा क्रोडपत्र जेव्हा पुनरुज्जीवित केलेले असेल तेव्हा, मृत्युपत्रावरून किंवा क्रोडपत्रावरून विरुद्ध उद्देश दर्शविला जात नसेल तर, ते संपूर्णतः प्रत्याहत केले जाण्यापूर्वी त्यापैकी जेवढे प्रत्याहत झाले होते तेवढ्यावर अशा पुनरुज्जीवनाची व्याप्ती असणार नाही.

## प्रकरण सहा

### मृत्युपत्रांचा अर्थ लावण्याविषयी

**मृत्युपत्राची शब्दयोजना.**

७४. मृत्युपत्रात कोणतेही पारिभाषिक शब्द किंवा कृत्रिम संज्ञा वापरण्याची जरूरी नाही. पण शब्दयोजना अशी असावी की, त्यातून मृत्युपत्रकर्त्याचा उद्देश कळणे शक्य व्हावे इतकेच.

**मृत्युपत्राचे उद्दिष्ट किंवा विषय याबाबतचे प्रश्न निर्णीत करण्यासाठी चौकशी.**

७५. मृत्युपत्रात वापरलेल्या कोणत्याही शब्दांनी कोणती व्यक्ती किंवा कोणती संपत्ती दर्शविली आहे याबाबतचे प्रश्न निर्णीत करण्याच्या प्रयोजनार्थ न्यायालय, कोणत्या व्यक्ती अशा मृत्युपत्राखाली हितसंबंधित असल्याचा दावा सांगत आहेत, कोणती संपत्ती विल्हेवाटीचा विषय असल्याचा दावा करण्यात आला आहे, याविषयी आणि मृत्युपत्रकर्त्याची व त्याच्या कुटुंबाची परिस्थिती यांविषयी प्रत्येक महत्त्वपूर्ण तथ्याची आणि मृत्युपत्रकर्त्याने वापरलेले शब्द योग्यप्रकारे लागू करण्याच्या दृष्टीने ज्याची माहिती उपयोगी होईल अशा प्रत्येक तथ्याची चौकशी करील.

**उदाहरणे**

(एक) ' क ' आपल्या मृत्युपत्राद्वारे १००० रुपये आपल्या सर्वात थोरल्या मुलाला किंवा आपल्या सर्वात धाकट्या नातवंडाला किंवा मेरी या आपल्या मावसबहिणीला देतो. मृत्युपत्रातील वर्णन कोणत्या व्यक्तीला लागू होते याची खातरजमा करण्यासाठी न्यायालयाला चौकशी करता येईल.

(दोन) ‘ क ’ आपल्या मृत्युपत्राद्वारे ‘ ख ’ ला “ ब्लॅक एकर नावाची माझी संपदा ” देतो. मृत्युपत्रित दानाची विषयवस्तू कोणती म्हणजेच मृत्युपत्रकर्त्याच्या कोणत्या संपदेला ब्लॅक एकर म्हणतात याची खातरजमा करण्यासाठी पुरावा घेण्याची जरूरी पडू शकेल.

(तीन) ‘ क ’ आपल्या मृत्युपत्राद्वारे “ मी ‘ ग ’ कडून जी संपदा खरेदी केली ” ती ‘ ख ’ ला देतो. मृत्युपत्रकर्त्याने ‘ ग ’ कडून कोणती संपदा केली याची खातरजमा करण्यासाठी पुरावा घेण्याची जरूरी पडू शकेल.

**उद्दिष्टाचे चुकीचे नाव किंवा चुकीचे वर्णन.**

**७६.** (१) जेथे मृत्युपत्रात उत्तरदानग्राही किंवा उत्तरदानग्राहीचा वर्ग निर्देशित करण्यासाठी किंवा त्यांचे वर्णन करण्यासाठी वापरलेले शब्द, त्यांना काय अभिप्रेत आहे हे पुरेसे दर्शवीत असतील तर, नावातील किंवा वर्णनातील चुकीमुळे उत्तरदान परिणामक होण्यास प्रतिबंध होणार नाही.

(२) उत्तरदानग्राहीच्या नावातील चूक त्यांच्या वर्णनाने दुरुस्त करता येईल, व उत्तरदानग्राहीच्या वर्णनातील चूक नावाने दुरुस्त करता येईल.

**उदाहरणे**

(एक) ‘ क ’ हा “ माझा भाऊ जॉन याचा दुसरा मुलगा थॉमस यास ” उत्तरदान देतो. मृत्युपत्रकर्त्यास जॉन नावाचा एकुलता एक भाऊ आहे व त्याला थॉमस नावाचा कोणीही मुलगा नाही. पण दुसरा मुलगा असून त्याचे नाव विल्यम आहे. उत्तरदान विल्यमला मिळेल.

(दोन) ‘ क ’ हा “ माझा भाऊ जॉन याचा दुसरा मुलगा थॉमस यास ” उत्तरदान देतो. मृत्युपत्रकर्त्यास जॉन नावाचा एकुलता एक भाऊ आहे व त्याच्या पहिल्या मुलाचे नाव थॉमस असून दुसऱ्या मुलाचे नाव ‘ विल्यम’ आहे. उत्तरदान थॉमसला मिळेल.

(तीन) मृत्युपत्रकर्ता “ ‘ ग ’ ची औरस अपत्ये ‘ क ’ व ‘ ख ’ यांना ” आपली संपत्ती मृत्युपत्राने देतो. ‘ ग ’ ला कोणतेही औरस अपत्य नाही. पण ‘ क ’ आणि ‘ ख ’ अशी दोन अनौरस अपत्ये आहेत ‘ क ’ हा आणि ‘ ख ’ अनौरस असले तरी त्यांना दिलेले मृत्युपत्रित दान परिणामक होते.

(चार) मृत्युपत्रकर्ता आपली अवशिष्ट संपदा “ माझ्या सात अपत्यांमध्ये ” विभागण्यासाठी देतो आणि त्यांची गणना करावयास लागून फक्त सहा नावांचा उल्लेख करतो, सातव्या अपत्याला त्याचे नाव याप्रमाणे गाळले गेल्यामुळे इतरांसह हिस्सा घेण्यास प्रतिबंध होणार नाही.

(पाच) मृत्युपत्रकर्त्यास सहा नातवंडे असून तो “ माझ्या सहा नातवंडांना ” मृत्युपत्रित दान देतो आणि त्यांच्या ख्रिस्ती स्वनामानिशी त्यांची गणना करावयास लागून एकाचा दोनदा उल्लेख करतो व दुसऱ्याचा उल्लेख साफ गाळतो ज्याच्या नावाचा उल्लेख केला नाही त्याला इतरांसह हिस्सा मिळेल.

(सहा) मृत्युपत्रकर्ता हा “ ‘ क ’ च्या तीन अपत्यांपैकी प्रत्येकाला १,००० रुपये ” मृत्युपत्रकाने देतो. मृत्युपत्राच्या दिनांकास ‘ क ’ ला चार अपत्ये आहेत. या चार अपत्यांपैकी प्रत्येकाला जर ते मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहिले तर १,००० रुपयांचे उत्तरदान मिळेल.

**शब्द केव्हा पुरवता येतील.**

**७७.** जेथे अर्थ पूर्णपणे व्यक्त होण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असा कोणताही शब्द वगळलेला असेल तेथे, तो संदर्भाने पुरवता येईल.

**उदाहरण**

मृत्युपत्रकर्ता आपली मुलगी ‘ क ’ हिला “ पाचशे ” उत्तरदान आणि आपली मुलगी ‘ ख ’ हिला “ पाचशे ” रुपयाचे उत्तरदान देतो. ‘ क ’ ला पाचशे रुपयांचे उत्तरदान मिळेल.

**विषयाच्या वर्णनातील चुकीचा तपशील सोडून देणे.**

**७८.** जी वस्तू मृत्युपत्राने देण्याचा मृत्युपत्रकर्त्याचा उद्देश होता तिचे मृत्युपत्रात जे दिले असेल त्या वर्णनावरून तिची पुरेशी ओळख पटू शकत असेल, पण वर्णनातील काही भाग लागू होत नसतील तर, वर्णनातील असे भाग चुकीचे म्हणून सोडून देता येतील आणि मृत्युपत्रित दान परिणामक होईल.

**उदाहरणे**

(एक) ‘ क ’ हा ‘ ख ’ ला “ ‘ ल ’ यथे असलेल्या व ‘ क्ष ’ च्या ताब्यातील माझ्या दलदलीच्या जमिनी ” मृत्युपत्राने देतो. ‘ ल ’ येथे मृत्युपत्रकर्त्याच्या दलदलीच्या जमिनी होत्या. पण त्याच्या कोणत्याही दलदलीच्या जमिनी ‘ क्ष ’ च्या ताब्यात नव्हत्या. “ ‘ क्ष ’ च्या ताब्यातील ” हे शब्द चुकीचे म्हणून सोडून दिले जातील आणि ‘ ल ’ येथे असलेल्या मृत्युपत्रकर्त्याच्या दलदलीच्या जमिनी मृत्युपत्रित दानाद्वारे जातील.

(दोन) मृत्युपत्रकर्ता ‘ क ’ ला “ माझी रामपूरची जमीनदारी ” मृत्युपत्राने देतो. रामपूर येथे त्याची संपदा होती. पण ती जमीनदारी नसून तालुकादारी होती, तालुकादारी या मृत्युपत्रित दानाद्वारे जाते.

**वर्णनाचा भाग चुकीचा म्हणून केव्हा सोडून देऊ नये.**

**७९.** जी गोष्ट मृत्युपत्राने द्यावयाची असा मृत्युपत्रकर्त्याचा उद्देश असेल तिला वर्णनपर अशा अनेक परिस्थितीविशेषांचा मृत्युपत्रात उल्लेख असून जिच्याबाबत ते सर्व परिस्थितीविशेष विद्यमान आहेत अशी त्याची कोणतीही संपत्ती असेल तर मृत्युपत्रित दान अशा संपत्तीपुरते मर्यादित असल्याचे समजले जाईल आणि वर्णनाचा कोणताही भाग जिला लागू होतो अशी अन्य संपत्ती मृत्युपत्रकर्त्याकडे होती या कारणाने वर्णनाचा असा भाग सोडून देणे विधिसंमत असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—एखादी बाब या कलमाच्या अर्थांतर्गत येते किंवा काय याचा निर्णय करताना कलम ७८ खाली सोडून दिले जाण्यास पात्र होतील असे कोणतेही शब्द मृत्युपत्रातून खोडून टाकले असल्याचे मानले जाईल.

**उदाहरणे**

(एक) ' क ' हा ' ख ' ला " ' ल ' येथे असलेल्या व ' क्ष ' च्या ताब्यातील माझ्या दलदलीच्या जमिनी " मृत्युपत्राने देतो. ' ल ' येथे मृत्युपत्रकर्त्याच्या दलदलीच्या जमिनी होत्या. त्यातील काही ' क्ष ' च्या ताब्यात होत्या व काही ' क्ष ' च्या ताब्यात नव्हत्या. मृत्युपत्रित दान मृत्युपत्रकर्त्याच्या ' ल ' येथील ज्या दलदलीच्या जमिनी ' क्ष ' च्या ताब्यात होत्या त्याच्यापुरते मर्यादित असल्याचे समजले जाईल.

(दोन) ' क ' हा ' ख ' ला " ' ल ' येथे ' क्ष ' च्या ताब्यात असलेल्या १,००० बिघे इतक्या माझ्या दलदलीच्या जमिनी " मृत्युपत्राने देतो. ' ल ' येथे मृत्युपत्रकर्त्याच्या दलदलीच्या जमिनी होत्या. त्यापैकी काही ' क्ष ' च्या ताब्यात होत्या आणि काही ' क्ष ' च्या ताब्यात नव्हत्या. कोणत्याही वर्गाच्या दलदलीच्या जमिनींना किंवा त्या मिळून सगळ्या जमिनीला ते मोजमाप मुळीच लागू होत नाही. मोजमाप मृत्युपत्रातून खोडले असल्याचे समजले जाईल, आणि मृत्युपत्रकर्त्याच्या ज्या दलदलीच्या जमिनी ' क्ष ' च्या ताब्यात होत्या त्याच तेवढ्या मृत्युपत्रित दानाद्वारे जातील.

प्रकट संदिग्धतेच्या बाबतीत बाह्य पुरावा ग्राह्य.

८०. जेथे मृत्युपत्राचे शब्द निःसंदिग्ध असतील, पण ते अनेकांना लागू पडण्यासारखे असून त्यापैकी एकच मृत्युपत्रकर्त्याला अभिप्रेत असू शकते असे ग्राह्य पुराव्यावरून आढळून येईल तेथे त्यापैकी कोणते अभिप्रेत होते हे दर्शविण्यासाठी बाह्य पुरावा घेता येईल.

**उदाहरणे**

(एक) एका मनुष्यास ' मेरी ' नावाच्या दोन मावस बहिणी असून तो " माझी मावस बहीण मेरी " हिला पैशाची रक्कम मृत्युपत्राने देतो. ज्यांच्यापैकी प्रत्येक व्यक्ती मृत्युपत्रातील वर्णनाशी जुळते अशा दोन व्यक्ती असल्याचे दिसून येते म्हणून ते वर्णन, दोघांस लागू पडण्यासारखे आहे व त्यापैकी केवळ एकच मृत्युपत्रकर्त्याला अभिप्रेत असू शकते. दोहोंपैकी कोणते अभिप्रेत होते हे दर्शवण्यासाठी पुरावा ग्राह्य आहे.

(दोन) ' क ' आपल्या मृत्युपत्राने ' ख ' साठी " सुलतानपूर खुर्द नावाची माझी संपदा " ठेवतो. सुलतानपूर खुर्द नावाच्या त्याच्या दोन संपदा होत्या असे आढळून येते. कोणती संपदा अभिप्रेत होती ते दर्शविण्यसाठी पुरावा ग्राह्य आहे.

प्रकट संदिग्धतेच्या किंवा न्यूनतेच्या बाबतीत बाह्य पुरावा अग्राह्य.

८१. जेथे मृत्युपत्रात उघडउघड संदिग्धता किंवा न्यूनता असेल तेथे, मृत्युपत्रकर्त्याच्या उद्देशाबाबत कोणताही ग्राह्य पुरावा दाखल करून घेतला जाणार नाही.

**उदाहरणे**

(एक) एका मनुष्याची ' कॅरोलिन ' ही मावशी आहे आणि ' मेरी ' ही चुलतबहीण आहे आणि मेरी नावाची कोणीही मावशी नाही. आपल्या मृत्युपत्राने तो " माझी मावशी कॅरोलिन " हिला १,००० रु. आणि " माझी चुलत बहीण मेरी " हिला १,००० रु. देतो आणि नंतर " माझी पूर्वोक्त मावशी मेरी " हिला २,००० रुपये मृत्युपत्राने देतो. जिला मृत्युपत्रात दिलेले वर्णन लागू शकते आशी कोणतीही व्यक्ती नाही, आणि " माझी पूर्वोक्त मावशी मेरी " म्हणजे कोण अभिप्रेत होते हे दर्शविण्यासाठी पुरावा ग्राह्य नाही, म्हणून कलम ८९ खाली मृत्युपत्रित दान अनिश्चिततेमुळे शून्य आहे.

(दोन) उत्तरदानग्राहीच्या नावासाठी कोरी जागा ठेवून ' क ' हा " .................. " ला, १,००० रु. मृत्युपत्राने देतो. कोणते नाव घालण्याचा मृत्युपत्रकर्त्याचा उद्देश होतो हे दर्शविण्यासाठी पुरावा ग्राह्य नाही.

(तीन) ' क ' हा ' ख ' ला ................ रुपये किंवा.................... " ची माझी संपदा " मृत्युपत्राने देतो कोणत्या रकमेचा किंवा कोणत्या संपदेचा उल्लेख करण्याचा मृत्युपत्रकर्त्याचा उद्देश होता ते दर्शवण्यासाठी पुरावा ग्राह्य नाही.

खंडाचा अर्थ संपूर्ण मृत्युपत्रावरून ग्रहण करावयाचा.

८२. मृत्युपत्रातील कोणत्याही खंडाचा अर्थ संपूर्ण संलेखावरून ग्रहण करावयाचा असतो आणि त्याच्या सर्व भागांचा अर्थ एकमेकांच्या संदर्भाने लावावयाचा असतो.

**उदाहरणे**

(एक) मृत्युपत्रकर्ता ' ख ' ला ' क ' चा मृत्यू होताच मिळावयाचा असा विनिर्दिष्ट निधी किंवा संपत्ती देतो आणि नंतरच्या खंडाने ' क ' ला आपली संपत्ती संपूर्णपणे देतो ' ख ' ला दिलेल्या मृत्युपत्रित दानावरून असे दिसते की मृत्युपत्रकर्ता ' क ' ला जे काही देतो त्याचे वर्णन ज्या शब्दांत करतो ते मर्यादित अर्थाने वापरावयाचे त्याला अभिप्रेत होते. त्यामुळे निरनिराळे खंड एकत्र विचारात घेतल्यास त्यांच्या परिणामी विनिर्दिष्ट निधी किंवा संपत्ती ' क ' च्या ठायी हयातीकरिता आणि त्यांच्या मृत्युनंतर ' ख ' च्या ठायी निहित होतात.

(दोन) जिच्या एका भागाला ' ब्लॅक एकर ' म्हणतात अशी संपदा मृत्युपत्रकर्त्याकडे असून जेथे तो ' क ' ला आपली संपूर्ण संपदा मृत्युपत्राने देतो, आणि आपल्या मृत्युपत्राच्या दुसऱ्या भागात ' ख ' ला ब्लॅक एकर मृत्युपत्राने देतो तेथे, जणू काही त्याने " मी ब्लॅक एकर ' ख ' ला आणि माझी बाकीची सर्व संपदा ' क ' ला देतो " असे म्हटले असल्याप्रमाणे नंतरचे मृत्युपत्रित दान पहिल्याला अपवाद म्हणून वाचले जावे.

८३. सर्वसाधारण शब्द, जेथे ते मर्यादित अर्थाने वापरावयाचे मृत्युपत्रकर्त्यास अभिप्रेत होते असे मृत्युपत्रावरून अनुमान करता येत असेल तेथे ते मर्यादित अर्थाने समजता येतील आणि जेथे मृत्युपत्रकर्त्याला ते शब्द, त्यांना नेहमी असतो त्याहून व्यापक अर्थाने वापरावयाचे अभिप्रेत होते असे मृत्युपत्रातील अन्य शब्दावरून अनुमान करता येत असेल तेथे ते अशा व्यापक अर्थाने समजता येतील.

**शब्द केव्हा मर्यादित अर्थाने आणि केव्हा नेहमीपेक्षा व्यापक अर्थाने समजता येतील.**

### उदाहरणे

(एक) मृत्युपत्रकर्ता ' क ' ला " ' ख ' च्या ताब्यातील माझे शेत " आणि ' ग ' ला " ' ल ' येथील माझ्या सर्व दलदलीच्या जमिनी " देतो. ' ख ' च्या ताब्यातील शेताचा काही भाग ' ल ' येथील दलदलीच्या जमिनीचा बनलेला आहे आणि ' ल ' येथे मृत्युपत्रकर्त्याच्या दुसऱ्याही दलदलीच्या जमिनी आहेत. " ' ल ' येथील माझ्या सर्व दलदलीच्या जमिनी " हे सर्वसाधारण शब्द ' क ' ला दिलेल्या दानाने मर्यादित झाले आहेत. शेताचा जो भाग ' ल ' येथील दलदलीच्या जमिनीचा बनलेला आहे त्यांच्यासकट ' ख ' च्या ताब्यातील संपूर्ण शेत ' क ' ला मिळते.

(दोन) मृत्युपत्रकर्त्याने (जहाजावरील खलाशाने) आपल्या आईला आपली सोन्याची आंगठी, बटणे, ' ब ' ला कपड्याची संदूक आणि ' क ' या आपल्या मित्राला (जहाजावरील सहकाऱ्याला) आपली लाल पेटी, चापाचा चाकू आणि मृत्युपत्राने आधी न दिलेल्या सर्व वस्तू मृत्युपत्राने दिल्या. या मृत्युपत्रित दानाखाली मृत्युपत्रकर्त्याचा घरातील हिस्सा ' क ' कडे जात नाही.

(तीन) ' क ' ने आपल्या मृत्युपत्राने ' ख ' ला आपले सर्व घरगुती फर्निचर, मौल्यवान भांडी, कपडा, चिनी मातीची भांडी, पुस्तके, चित्रे आणि हर प्रकारचा इतर सर्व माल मृत्युपत्राने दिला; आणि नंतर ' ख ' ला आपल्या संपत्तीचा विनिर्दिष्ट भाग दिला. पहिल्या मृत्युपत्रित दानाखाली , ' ख ' त्यात गणना केलेल्या वस्तूंच्याच स्वरूपाच्या असतील अशाच मृत्युपत्रकर्त्याच्या वस्तूंना हक्कदार आहे.

८४. जेथे एखादा खंड दोन अर्थ निघण्याजोगा असून त्यापैकी एका अर्थानुसार त्याचा काही तरी परिणाम होत असेल आणि दुसऱ्या अर्थानुसार त्या खंडाचा काहीच परिणाम होऊ शकत नसेल तर, आधीच्या अर्थाना अधिमान दिला जाईल.

**शक्य असलेल्या दोन अन्वयार्थांपैकी कशाला अधिमान द्यावयाचा.**

८५. मृत्युपत्राच्या कोणत्याही भागाचा जर तर्कशुद्ध अर्थ लावणे शक्य असेल तर तो अर्थहीन म्हणून सोडून दिला जाणार नाही.

**कोणत्याही भागाचा जर तर्कशुद्ध अर्थ लावता येत असेल तर तो सोडून द्यावयाचा नाही.**

८६. जर त्याच मृत्युपत्राच्या भिन्नभिन्न भागात तेच शब्द आले तर, विरुद्ध उद्देश दिसून न आल्यास, ते सर्वत्र त्याच अर्थाने वापरले असल्याचे समजले जाईल.

**मृत्युपत्राच्या भिन्नभिन्न भागात पुनरावृत्ती केलेल्या शब्दांचे निर्वचन.**

८७. मृत्युपत्रकर्त्याचा उद्देश पूर्ण व्याप्तीपर्यंत अंमलात येऊ शकत नाही म्हणून बाजूस न सारता शक्यतोवर तो अंमलात आणला जाईल.

**मृत्युपत्रकर्त्याचा उद्देश शक्य तेथवर अंमलात आणावयाचा.**

### उदाहरण

मृत्युपत्रकर्त्याने तो मृत्युशय्येवर असताना केलेल्या मृत्युपत्राने आपली सर्व संपत्ती ग, घ यास हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर विवक्षित रुग्णालयात दिली आहे. मृत्युपत्रकर्त्याचा उद्देश त्याच्या पूर्ण व्याप्तीपर्यंत अंमलात येऊ शकत नाही. कारण रुग्णालयाला केलेले दान कलम ११८ खाली शून्य आहे. पण ग, घ ला दिलेल्या दानाच्या संबंधापुरते ते अंमलात येईल.

८८. जेथे मृत्युपत्रातील दोन खंड किंवा दाने यांचा मेळ बसत नसल्याने ती एकत्र परिणामक होऊ शकत नाही तेथे त्यापैकी शेवटचे प्रभावी ठरेल.

**दोन विसंगत खंडापैकी शेवटचा प्रभावी ठरतो.**

### उदाहरणे

(एक) मृत्युपत्रकर्ता आपल्या मृत्युपत्रातील पहिल्या खंडाने आपली रामनगरची संपदा " ' क ' साठी " ठेवतो आणि आपल्या मृत्युपत्रातील शेवटच्या खंडाने " ' क ' साठी नव्हे तर ' ख ' साठी " ठेवतो ती ' ख ' ला मिळेल.

(दोन) जर एखाद्या मनुष्याने आपल्या मृत्युपत्राच्या प्रारंभी आपले घर ' क ' ला दिले त्याच्या अखेरीस आपले घर विकावे आणि विक्रीचे उत्पन्न ' ख ' च्या लाभार्थ गुंतवावे असा निदेश दिला तर, नंतरची व्यवस्था प्रभावी होईल.

अनिश्चिततेमुळे मृत्युपत्र किंवा मृत्युपत्रित दान शून्य.

८९. कोणताही निश्चित उद्देश व्यक्त न करणारे मृत्युपत्र किंवा मृत्युपत्रित दान अनिश्चिततेमुळे शून्य असते.

**उदाहरण**

जर मृत्युपत्रकर्ता असे म्हणाला की, " मी ' क ' ला मृत्युपत्राने माल देतो ", किंवा " मी ' क ' ला मृत्युपत्राने देतो, " किंवा " मी ' क ' ला अनुसूचीत उल्लेखिलेला सर्व माल देतो " आणि अनुसूची आढळली नाही तर अथवा " मी " ' पैसा ', ' गहू ', ' तेल ' किंवा ' तसे काही तरी ' मृत्युपत्राने देतो " असे तो म्हणाला पण ते किती हे त्याने सांगितले नाही, तर ते दान शून्य आहे.

विषयाचे वर्णन करणारे शब्द मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी ज्या वर्णनाशी जुळते त्या संपत्तीचा निर्देश करतात.

९०. दानाचा विषय असलेल्या संपत्तीचे मृत्युपत्रात अंतर्भूत असलेले वर्णन, मृत्युपत्रावरून विरुद्ध उद्देश दिसून न आल्यास, मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी त्या वर्णनाशी जुळणाऱ्या संपत्तीचा निर्देश करते व त्या वर्णनात ती बसते असे मानले जाईल.

सर्वसाधारण मृत्युपत्रित दानाने दिलेली विनियुक्तीची मुख्यत्यारी.

९१. मृत्युपत्रावरून विरुद्ध उद्देश दिसून न आल्यास, मृत्युपत्रकर्त्याच्या संपदेच्या मृत्युपत्रित दानात जी कोणतीही संपत्ती त्याला योग्य वाटेल अशा कोणत्याही उद्दिष्टासाठी मृत्युपत्राने विनियुक्त करण्याचा त्याला अधिकार असेल ती संपत्ती अशा दानात समाविष्ट आहे असा त्या दानाचा अर्थ लावला जाईल आणि अशा अधिकाराची अंमलबजावणी म्हणून ते प्रदर्शित होईल; आणि सर्वसाधारण रीतीने वर्णन केलेल्या संपत्तीच्या मृत्युपत्रित दानाचा, जिला असे वर्णन लागू होऊ शकेल अशी जी कोणतीही संपत्ती आपणास योग्य वाटेल अशा उद्दिष्टासाठी मृत्युपत्राने विनियुक्त करण्याचा त्याला अधिकार असेल ती समाविष्ट आहे असा त्या दानाचा अर्थ लावला जाईल आणि अशा अधिकाराची अंमलबजावणी म्हणून ते प्रदर्शित होईल.

विनियुक्तीच्या अभावी अधिकाराच्या उद्दिष्टांप्रत उपलक्षित दान.

९२. जेथे संपत्ती विनिर्दिष्ट व्यक्ती विनियुक्त करील अशा विवक्षित उद्दिष्टात किंवा त्यांच्या लाभार्थ अथवा विशिष्ट व्यक्ती विनियुक्त करील अशा प्रमाणात विवक्षित उद्दीष्टांच्या लाभार्थ मृत्युपत्राने दिलेली असून, विनियुक्त केली न गेल्यास उद्‌भवणाऱ्या प्रसंगासाठी मृत्युपत्राने तरतूद केलेली नसेल तेथे मृत्युपत्राने दिलेला अधिकार वापरला गेला नाही तर, संपत्ती समसमान हिश्श्यांनी अधिकाराच्या सर्व उद्दिष्टाप्रत जाते.

**उदाहरण**

' क ' आपल्या मृत्युपत्राने आपल्या पत्नीला हयातीकरता एक निधी देतो आणि ती विनियुक्त करील अशा प्रमाणात तो तिच्या मृत्युनंतर आपल्या अपत्यांमध्ये विभागला जावा असा निदेश देतो, ती विधवा कसलीही विनियुक्ती न करता मृत्यू पावते. निधी त्या अपत्यामध्ये समसमान विभागाला जाईल.

विशिष्ट व्यक्तीचे " वारस " इत्यादींना विशेषक शब्दांशिवाय मृत्युपत्रित दान.

९३. जेथे विशिष्ट व्यक्तीचे " वारस " किंवा " रीतसर वारस " किंवा " नातलग " किंवा " निकटतम नातलग" किंवा " कुटुंब " किंवा " आप्तसंबंधी " किंवा " निकटतम आप्तसंबंधी " किंवा " अनंतर आप्तसंबंधी " यांना कोणत्याही विशेष शब्दांशिवाय मृत्यूपत्रित दान केले असेल व याप्रमाणे निर्देशित केलेला वर्ग मृत्युपत्रित दानाचे प्रत्यक्ष आणि स्वतंत्र उद्दिष्ट झाला असेल तेथे, मृत्युपत्रात दिलेली संपत्ती जणू काही ती अशा व्यक्तींच्या मालकीची होती व आपल्या ऋणांच्या फेडीसाठी तिच्यापेक्षा वेगळी मत्ता ठेवून अशा संपत्तीबाबत ती विनामृत्युपत्र मृत्यू पावली असावी त्याप्रमाणे वितरित केली जाईल.

**उदाहरणे**

(एक) ' क ' आपली संपत्ती " माझ्या स्वतःच्या निकटतम नातलगांसाठी ठेवतो ". जर ' क ' आपल्या ऋणांच्या फेडीसाठी अशा संपत्तीतून वेगळी मत्ता ठेवून विनामृत्युपत्र मृत्यू पावला असता तर जे त्या संपत्तीला हक्कदार झाले असते त्यांच्याकडे ती जाते.

(दोन) ' क ' " ' ख ' ला त्याच्या हयातीकरिता आणि ' ख ' च्या मृत्यूनंतर माझ्या स्वतःच्या रीतसर वारसांना " रु. १०,००० मृत्युपत्राने देतो. ' ख ' च्या मृत्युनंतरचे उत्तरदान जर ' क ' च्या मृत्युपत्राने न दिलेल्या संपत्तीचा भाग असते तर जे त्याला हक्कदार झाले असते त्यांच्या ते मालकीचे बनते.

(तीन) ' क 'आपली संपत्ती ' ख ' साठी, पण जर ' ख ' त्याच्याआधी मृत्यू पावला तर ' ख ' च्या निकट आप्तसंबंधीसाठी ठेवतो. ' ख ' हा ' क ' च्या आधी मृत्यू पावतो; संपत्ती, जणू काही ' ख ' च्या मालकीची असावी आणि मत्ता आपल्या ऋणांच्या फेडीसाठी अशा संपत्तीहून वेगळी ठेवून तो विनामृत्युपत्र मृत्यू पावला असावा त्याप्रमाणे ती प्रक्रांत होते.

(चार) ' क ' " ' ख ' साठी त्याच्या हयातीपुरते आणि त्याच्या मृत्युनंतर ' ग ' च्या वारसांसाठी " १०,००० रु. ठेवतो उत्तरदान जणू काही ' ग ' च्या मालकीचे असावे आणि उत्तरदानाहून वेगळी मत्ता आपल्या ऋणांच्या फेडीसाठी ठेवून तो विनामृत्युपत्र मृत्यू पावला असावा त्याप्रमाणे ते जाते.

९४. जेथे विशिष्ट व्यक्तीचे " प्रतिनिधी " किंवा " वैध प्रतिनिधी " किंवा " वैयक्तिक प्रतिनिधी " किंवा " मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रसाशक " यांना मृत्युपत्रित दान देण्यात आले असेल व त्याप्रमाणे निर्देशित केलेला वर्ग हा मृत्युपत्रित दानाच्या प्रत्यक्ष व स्वतंत्र उद्दिष्ट ठरत असेल तेथे, मृत्यूपत्राने दिलेली संपत्ती, जणू काही ती अशा विशिष्ट व्यक्तीच्या मालकीची होती आणि तिच्याबाबत ती व्यक्ती विनामृत्यूपत्र मृत्यू पावली असल्याप्रमाणे वितिरित केली जाईल.

**विशिष्ट व्यक्तीचे " प्रतिनिधी " इत्यादींना मृत्युपत्रित दान.**

## उदाहरण

' क ' च्या " वैध प्रतिनिधींना " एक मृत्यूपत्रित दान दिलेले आहे. ' क ' विनामृत्यूपत्र आणि दिवाळखोर म्हणून मृत्यू पावला आहे. त्याचा प्रशासक आहे. ' ख ' उत्तरदान मिळण्यास हक्कदार आहे, आणि प्रथमत: ते ' क ' च्या ऋणांपैकी फेडावयाचा राहील तो भाग चुकता करण्याकडे लावील; आणि कोणताही अधिशेष असल्यास ' ख ' तो ' क ' ची ऋणे फेडल्यानंतर त्याची जी कोणतीही संपत्ती राहिली असती ती घेण्यास ज्या हक्कदार झाल्या असत्या त्या व्यक्तींना किंवा अशा व्यक्तींच्या प्रतिनिधींना देईल.

९५. जेथे संपत्ती कोणत्याही व्यक्तीला मृत्युपत्राने दिली जाते तेथे तिच्यासाठी केवळ मर्यादित हितसंबंध उद्देशित होता असे मृत्युपत्रावरून दिसून न आल्यास, तिला मृत्युपत्रकर्त्याचा त्यातील संपूर्ण हितसंबंधावर हक्क प्राप्त होतो.

**मर्यादावाचक शब्दाशिवाय मृत्युपत्रित दान.**

९६. जेथे मृत्युपत्राने एखाद्या व्यक्तीस संपत्ती दिली असून त्याबरोबरच पर्यायी मृत्युपत्रित दान दुसऱ्या व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला दिले असेल तेथे, मृत्युपत्रावरून विरुद्ध उद्देश दिसून न आल्यास, प्रथम नामित केलेला उत्तरदानग्राही जर ते परिणामक व्हावयाच्या वेळी तो हयात असेल तर उत्तरदानास हक्कदार असेल; पण जर तो त्यावेळी मृत असेल तर, दुसऱ्या पर्याय-शाखेत नामित केलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तिवर्गाला उत्तरदान मिळेल.

**पर्यायी मृत्युपत्रित दान.**

## उदाहरणे

(एक) ' क ' ला किंवा ' ख ' ला मृत्युपत्रित दान दिले आहे. ' क ' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहतो. ' ख ' ला काहीही मिळत नाही.

(दोन) ' क ' ला किंवा ' ख ' ला मृत्युपत्रित दान दिले आहे. ' क ' मृत्युपत्राच्या दिनांकानंतर आणि मृत्युपत्रकर्त्याच्या आधी मृत्यू पावतो,. उत्तरदान ' ख ' कडे जातो.

(तीन) ' क ' किंवा ' ख ' ला मृत्युपत्रित दान दिले आहे. मृत्युपत्राच्या दिनांकास ' क ' मृत आहे. उत्तरदान ' ख ' कडे जाते.

(चार) ' क ' ला किंवा त्याच्या वारसांना मृत्युपत्राने संपत्ती दिली आहे. ' क ' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहतो. ' क ' ला संपत्ती पूर्णपणे मिळते.

(पाच) ' क ' ला किंवा त्याच्या निकटतम आप्तसंबंधीला मृत्युपत्राने संपत्ती दिली आहे. ' क ' मृत्युपत्रकर्त्याच्या हयातीत मृत्यू पावतो. मृत्युपत्रकर्त्याचा मृत्यू होताच ' क ' च्या निकटतम आप्तसंबंधीला दिलेले मृत्युपत्रित दान परिणामक होते.

(सहा) ' क ' ला हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर ' ख ' ला किंवा त्याच्या वारसांना मृत्युपत्राने संपत्ती दिली आहे ' क ' आणि ' ख ' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहतात. ' ख ' ' क 'च्या हयातीत मृत्यु पावतो ' क ' चा मृत्यु होताच, ' ख ' च्या वारसांना दिलेले मृत्युपत्रित दान परिणामक होते.

(सात) ' क ' ला हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर ' ख ' ला किंवा त्याच्या वारसांना मृत्युपत्राने संपत्ती दिली आहे. ' ख ' मृत्युपत्रकर्त्याच्या हयातीत मृत्यु पावतो. ' क' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहतो. ' क ' चा मृत्यु होताच, ' ख ' च्या वारसांना दिलेले मृत्युपत्रित दान परिणामक होते.

९७. जेथे संपत्ती एखाद्या व्यक्तीला मृत्युपत्राने दिली असून एखाद्या व्यक्तिवर्गाचे वर्णन करणारे, पण तो वर्ग विभिन्न व स्वतंत्र दानाचे प्रत्यक्ष उद्दिष्ट असल्याचे न दर्शविणारे शब्द अधिक घातलेले असतात तेथे, मृत्युपत्रावरून विरुद्ध उद्देश दिसून न आल्यास, अशी व्यक्ती मृत्युपत्रकर्त्याच्या त्यातील संपूर्ण हितसंबंधास हक्कदार असते.

**व्यक्तीला मृत्युपत्रित दान देऊन त्यांत, एखाद्या वर्गाचे वर्णन करणारे शब्द अधिक घातले असता त्याचा परिणाम.**

## उदाहरणे

(एक) पुढीलप्रमाणे मृत्युपत्रित दान दिले आहे :—

' क ' आणि त्याची अपत्ये यांना, ' क ' आणि त्याच्या सध्याच्या पत्नीपासूनची अपत्ये यांना,
' क ' आणि त्याचे वारस यांना,
' क ' आणि त्याचे अंगज वारस यांना,
' क ' आणि त्याचे अंगज पुरुष-वारस यांना,
' क ' आणि त्याचे अंगज स्त्री-वारस यांना,
' क ' आणि त्याची संपत्ती यांना,
' क ' आणि त्याचे कुटुंब यांना,
' क ' आणि त्याचे वंशज यांना,
' क ' आणि त्याचे प्रतिनिधी यांना,
' क ' आणि त्याचे वैयक्तिक प्रतिनिधी यांना,
' क ' आणि त्याचे मृत्युपत्रव्यवस्थापक व प्रशासक यांना,

यापैकी प्रत्येक प्रकरणी ' क ' ला संपत्तीत मृत्युपत्रकर्त्याचा होता तेवढा संपूर्ण हितसंबंध मिळतो.

(दोन) ' क ' ला आणि त्याच्या भावांना मृत्युपत्रित दान दिले आहे. ' क ' आणि त्याचे भाऊ उत्तरदानास संयुक्तपणे हक्कदार आहेत.

(तीन) ' क ' ला हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर त्याच्या संततीस मृत्युपत्रित दान दिले आहे. ' क ' चा मृत्यु होताच संपत्ती समान हिश्श्यांनी त्यावेळी ' क 'च्या संततीच्या वर्णनाशी जुळणाऱ्या सर्व व्यक्तींच्या मालकीची होते.

**केवळ सर्वसाधारणपणे वर्णन केलेल्या व्यक्तिवर्गास मृत्युपत्रित दान.**

**९८.** जेथे केवळ सर्वसाधारणपणे वर्णन केलेल्या व्यक्तीवर्गाला मृत्यूपत्रित दान दिले असेल तेथे, ज्याला वर्णनातील शब्द सर्वसामान्य अर्थाने लागू होत नाहीत अशा कोणालाही उत्तरदान मिळणार नाही.

**संज्ञाचा अर्थ लावणे.**

**९९.** मृत्यूपत्रात.-

(क) " अपत्ये " हा शब्द, हा शब्द, ज्या व्यक्तीच्या अपत्यांविषयी म्हटले आहे तिचे पहिल्या श्रेणीतील रेषीय वंशज यांनाच केवळ लागू आहे ;

(ख) " नातवंडे " हा शब्द, ज्या व्यक्तीच्या नातवंडाविषयी म्हटले आहे तिचे दुसऱ्या श्रेणीतील रेषीय वंशज यांनाच केवळ लागू आहे ;

(ग) " पुतणे/भाचे " आणि " पुतण्या/भाच्या " हे शब्द, भाbeची आणि बहिणींची अपत्ये यांनाच केवळ लागू आहेते ;

(घ) " दूरभावंडे " किंवा " प्रथम दूरभावंडे " किंवा " प्रथम श्रेणीय दूरभावंडे " हे शब्द, ज्या व्यक्तीच्या " दूरभावंडा " विषयी किंवा " प्रथम दूरभावंडा " विषयी किंवा " प्रथम श्रेणीय दूरभावंडा " विषयी वापरले आहेत तिच्या बापाच्या किंवा आईच्या भावांची किंवा बहिणींची अपत्ये यांनाच केवळ लागू आहेत ;

(ङ) " एकश्रेणीदूर प्रथम दूरभावंडे " हे शब्द, ज्या व्यक्तीच्या " एकश्रेणीदूर प्रथम दूरभावंडा " विषयी वापरले आहेत तिच्या प्रथमश्रेणीय दूरभावंडांची अपत्ये किंवा तिच्या आई-वा-बापाची प्रथमश्रेणीय दूरभावंडे यांनाच केवळ लागू आहे ;

(च) " द्वितीय दूरभावंडे " हे शब्द, ज्या व्यक्तीच्या " द्वितीय दूरभावंडा " विषयी वापरले आहेत तिच्या आज्याच्या किंवा आजीच्या भावाची किंवा बहिणीची नातवंडे यांनाच केवळ लागू आहेत ;

(छ) " सतंती " आणि " वंशज " हे शब्द ज्या व्यक्तीच्या " संतती " विषयी किंवा " वंशजा " विषयी वापरले आहेत तिच्या सर्व रेषीय वंशजांना-मग ते कोणीही असोत-लागू आहेत ;

(ज) सांपाश्विक नातेसंबंध व्यक्त करणारे शब्द सख्ख्या आणि सापत्न नात्याच्या नातलगांना सारखेच लागू आहेत ;

(झ) नातेसबंध व्यक्त करणरे सर्व शब्द, गर्भात असलेले जे अपत्य नंतर जिवंत जन्माला येते त्याला लागू आहेत.

**नातेसंबंध व्यक्त करणारे शब्द केवळ औरस नातलग किंवा अंशाचा अभाव असल्यास औरस म्हणून लौकिक असलेले नातलग दर्शवतात.**

**१००.** मृत्यूपत्रात विरुद्ध सूचना नसेल तर, " अपत्य " हा शब्द, " मुलगा " हा शब्द, " मुलगी " हा शब्द, किंवा नातेसंबध व्यक्त करणारा कोणताही शब्द हा केवळ औरस नातलग आणि जेथे असा कोणताही औरस नातलग नसतो तेथे जिला मृत्यूपत्राच्या दिनांकास, ती अशी नातलग असल्याचा लौकिक प्राप्त झाला आहे अशी व्यक्ती दर्शवणारा असल्याचे समजले जाते.

**उदाहरणे**

(एक) ' क ' ला ' ख ', ' ग 'आणि ' घ ' ही तीन अपत्ये असून त्यांच्यापैकी ' ख ' व ' ग ' औरस आहेत आणि ' घ ' अनौरस आहे व ' क ' आपली संपत्ती ' माझ्या अपत्यांमध्ये ' समसमान विभागण्यासाठी ठेवतो. ' घ ' वगळला जाऊन, संपत्ती समसमान हिश्श्यांनी ' ख ' आणि ' ग ' यांच्या मालकीची होते.

(दोन) ' क ' ला जन्माने अनौरस अशी एक पुतणी असून तिला, ती त्याची पुतणी असल्याचा लौकिक प्राप्त झाला आहे आणि त्याला कोणतीही औरस पुतणी नसून तो काही पैशाची रक्कम आपल्या पुतणीला मृत्यूपत्राने देतो: अनौरस पुतणी उत्तरदानास हक्कदार आहे.

(तीन) ' क ' ने आपल्या मृत्यूपत्रात आपल्या अपत्यांची गणती केली असून आणि त्यांच्यापैकी एक म्हणून ' क ' चे नाव दिले असून ' ख ' अनौरस आहे व ' क ' हा " माझ्या उक्त अपत्यांसाठी " उत्तरदान ठेवतो. ' ख ' ला औरस अपत्यांसमवेत उत्तरदानांत हिस्सा मिळेल.

(चार) ' क ' हा " ख 'च्या अपत्यासाठी " उत्तरदान ठेवतो. ' ख ' मृत आहे आणि त्याच्या मागे औरस नव्हते पण अनौरस अपत्ये राहिली आहेत. ज्यांनी मृत्यूपत्राच्या दिनांकास ती ' ख ' अपत्ये असल्याचा लौकिक प्राप्त झाला होता ती सर्व दानाची उद्दिष्टे आहेत.

(पाच) ' क ' हा " ख 'च्या अपत्यांना " मृत्यूपत्राने उत्तरदान देतो. ' ख ' ला कधीच कोणतेही औरस अपत्ये नव्हते. ' ग ' आणि ' घ ' यांना मृत्यूपत्राच्या दिनांकास ती ' ख ' अपत्ये असल्याचा लौकिक प्राप्त झाला होता. मृत्यूपत्राच्या दिनांकानंतर आणि मृत्यूपत्रकर्त्याच्या मृत्यूपूर्वी ' ङ ' आणि ' च ' जन्मले आणि त्यांना ती ' ख ' ची अपत्ये असल्याचा लौकिक प्राप्त झाला. केवळ ' ग ' आणि ' घ ' हे मृत्यूपत्रित दानाची उद्दिष्टे आहेत.

(सहा) ' क ', त्याची पत्नी नसलेल्या विवक्षित स्त्रीपासून झालेल्या आपल्या अपत्याच्या प्रीत्यर्थ मृत्यूपत्रित दान देतो. ' ख ' ला मृत्यूपत्राच्या दिनांकास तो ' क ' चे निर्देशित स्त्रीपासून झालेले अपत्य असल्याचा लौकिक प्राप्त झाला होता. ' ख ' ला मृत्यूपत्रित दान मिळते.

(सात) ' क ' एका स्त्रीच्या पोटी पुढे जन्मास येणाऱ्या आपल्या अपत्याच्या प्रीत्यर्थ मृत्यूपत्रित दान देतो. ती स्त्री कधीच त्याची पत्नी होत नाही. मृत्यूपत्रित दान शुन्य आहे.

(आठ) ' क ' त्याच्याशी विवाह न झालेल्या विवक्षित स्त्रीच्या गर्भात असलेल्या अपत्याच्या प्रीत्यर्थ मृत्यूपत्रित दान देतो. मृत्यूपत्रित दान विधिग्राह्य आहे.

**जेथे मृत्युपत्र त्याच व्यक्तीला दोन मृत्युपत्रित दाने केल्याचे दर्शवते तेथे अर्थ लावण्याचे नियम.**

**१०१.** जेथे मृत्यूपत्र त्याच व्यक्तीला दोन मृत्यूपत्रित दाने केल्याचे दर्शवत असून मृत्यूपत्रकर्त्याचा दुसरे मृत्यूपत्रित दान पहिल्याच्या ऐवजी देण्याचा उद्देश होता की त्याच्या शिवाय अधिक देण्याचा होता असा प्रश्न उद्‌भवला असेल तेथे, जर त्याला काय अभिप्रेत होते हे दर्शवणारे मृत्यूपत्रात काही नसेल तर मृत्यूपत्राचा लावावयाचा अर्थ निर्धारित करताना पुढील नियम परिणामक असतील :—

(क्) जर त्याच मृत्यूपत्रात दोनदा किंवा मृत्यूपत्रात आणि पुन्हा क्रोडपत्रात तीच विनिर्दिष्ट परंतु त्याच उत्तरदानग्राहीला दिली असेल तर तो केवळ ती विनिर्दिष्ट वस्तू मिळण्याला हक्कदार असतो ;

(ख्) जेथे तेच मृत्यूपत्र किंवा तेच क्रोडपत्र दोन जागी त्याच त्या व्यक्तीला सारख्याच परिमाणात किंवा संख्येने कोणत्याही वस्तूचे मृत्यूपत्रित दान केल्याचे दर्शवत असेल तेथे ती व्यक्ती अशा केवळ एकाच उत्तरदानास हक्कदार असेल ;

(ग्) जेथे त्याच मृत्यूपत्रात किंवा त्याच क्रोडपत्रात त्याच व्यक्तीला असमान प्रमाणात दोन उत्तरदाने दिलेली असतात तेथे, उत्तरदानग्राही दोहोंस हक्कदार असतो ;

(घ्) जेथे त्याच उत्तरदानग्राहीला, एक मृत्यूपत्राने अणि दुसरे क्रोडपत्राने किंवा प्रत्येक वेगवेगळ्या क्रोडपत्राने एकेक अशी दोन उत्तरदाने दिलेली असतात---मग त्यांची रक्कम समान असो वा असमान असो---तेथे उत्तरदानग्राही दोन्ही उत्तरदानांना हक्कदार असतो ;

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या (क्) ते (घ्) या खंडात ' मृत्यूपत्र ' या शब्दात क्रोडपत्राचा समावेश नाही.

**उदाहरणे**

(एक) ' क ' चे इंपीरियल बँक ऑफ इंडियामध्ये दहाच---आणखी नाहीत---भाग असून त्याने मृत्यूपत्र केले आहे. त्यात त्याच्या जवळजवळ आरंभाला " मी ' ख ' ला ' इंपीरियल बँक ऑफ इंडिया ' मधील माझे दहा भाग मृत्यूपत्राने देतो " हे शब्द अंतर्भूत आहेत, अन्य मृत्यूपत्रित दानानंतर, " आणि मी ' ख ' ला ' इंपीरियल बँक ऑफ इंडिया ' मधील माझे दहा भाग मृत्यूपत्राने देतो. " या शब्दांनी मृत्यूपत्र समाप्त होते. ' क ' चे इंपीरियल बँक ऑफ इंडिया मधील केवळ दहा भाग मिळण्यास ' ख ' हक्कदार आहे.

(दोन) ' क ' जवळ ' ख ' ने त्याला दिलेली हिऱ्याची अंगठी असून तो ' ख ' ने दिलेली अंगठी ' ग ' ला मृत्यूपत्राने देतो नंतर ' क ' ने आपल्या मृत्यूपत्राला क्रोडपत्र केले आणि त्याद्वारे, अन्य उत्तरदाने दिल्यानंतर ' ग ' ला ' ख ' ने आपणास दिलेली हिऱ्याची अंगठी दिली, ' ख ' ने ' क ' ला जी हिऱ्याची अंगठी होती तिच्याखेरीज ' ग ' कशावरही दावा सांगू शकत नाही.

(तीन) ' क ' आपल्या मृत्यूपत्राने ' ख ' ला ५.००० रुपयांची रक्कम देतो आणि नंतर त्याच मृत्यूपत्रात त्याच मृत्यूपत्रित दानाची त्याच शब्दात पुनरुक्ती करतो. ' ख ' ५,००० रुपयांच्या एकाच उत्तरदानास हक्कदार आहे.

(चार) ' क ' आपल्या मृत्यूपत्राने ' ख ' ला ५,००० रुपये देतो आणि त्यानंतर त्याच मृत्यूपत्रात ' ख ' ला ६,००० रुपयांची रक्कम देतो. ' ख ' ११,००० रुपये मिळण्यास हक्कदार आहे.

(पाच) ' क ' आपल्या मृत्यूपत्राने ' ख ' ला ५,००० रुपये देतो आणि मृत्यूपत्राने केलेल्या क्रोडपत्राने तो त्याला ५,००० रुपये देतो. ' ख ' १०,००० रुपये मिळण्यास हक्कदार आहे.

(सहा) ' क ' आपल्या मृत्यूपत्राला केलेल्या क्रोडपत्राने ' ख ' ला ५,००० रुपये देतो आणि दुसऱ्या क्रोडपत्राने त्याला ६,००० रुपये देतो. ' ख ' ११,००० रुपये मिळण्यास हक्कदार आहे.

(सात) ' क ' आपल्या मृत्यूपत्राने " ' ख ' माझी परिचारिका होती म्हणून तिला ५०० रुपये " देतो आणि त्याच मृत्यूपत्राच्या दुसऱ्या भागात ' ख ' ला, " कारण ती माझ्या मुलाबरोबर इंग्लडला गेली " म्हणून मी ५०० रुपये देतो. ' ख ' १,००० रुपये मिळण्यास हक्कदार आहे.

(आठ) ' क ' आपल्या मृत्यूपत्राने ' ख ' ला ५,००० रुपयाची रक्कम आणि मृत्यूपत्राच्या दुसऱ्या भागात ४०० रुपयांचे वर्षासन देतो. ' ख ' दोन्ही उत्तरदानास हक्कदार आहे.

(नऊ) ' क ' आपल्या मृत्यूपत्राने ' ख ' ला ५,००० रुपयांची रक्कम देतो, व तो १८ वर्षे वयाचा झाल्यास त्याला ५,००० रुपयांची रक्कमही मृत्यूपत्राने देतो. ' ख ' हा ५,००० रुपयांच्या एका रकमेस अबाधितपणे हक्कदार आहे आणि ५,००० रुपयांच्या दुसऱ्या रकमेत त्याला समाश्रित हितसंबंध मिळतो.

**अवशिष्ट उत्तरदानग्राही बनवणे.**

**१०२.** आपल्या संपत्तीचा अधिशेष किंवा अवशिष्ट निर्देशित व्यक्तीने घ्यावा असा मृत्यूपत्रकर्त्याचा उद्देश आहे असे जे शब्द दर्शवतात अशा कोणत्याही शब्दांनी ती व्यक्ती अवशिष्ट उत्तरदानग्राही होऊ शकेल.

### उदाहरणे

(एक) ' क ' आपले मृत्यूपत्र करतो, ते अनेक मृत्यूपत्रीय कागदपत्रांचे बनलेले असून त्यापैकी एकात पुढील शब्द अंतर्भूत आहेत-" उत्तरक्रियेचा खर्च, इ. झाल्यावर, सध्या शाळेत जाणाऱ्या ' ख ' ला यापुढे त्याचा जो पेशा ठरेल त्याच्या दृष्टीने त्याची तयारी करण्यासाठी देण्यास काहीतरी उरेल असे मला वाटते ". ' ख ' हा अवशिष्ट उत्तरदानग्राही झाला आहे.

(दोन) ' क ' आपले मृत्यूपत्र करतो, त्याच्या अखेरीस पुढील मजकूर आहे :—" माझी ऋणे फेडण्यास आणि चुकती करण्यास पुरेशी रक्कम माझ्या बँकेच्या हाती मिळेल असा माझा समज आहे व मी ' ख ' ला, तिने तसे करावे आणि अवशिष्ट तिच्या स्वतःच्या उपयोगासाठी व सुखासाठी ठेवावा असे सांगतो. " ' ख ' अवशिष्ट उत्तरदानग्राही झाली आहे.

(तीन) ' क ' हा ' ग ' ला जे विवक्षित पुंजरोखे व निधी मृत्यूपत्राने देतो ते खेरीजकरून आपली सर्व संपत्ती ' ख ' ला देतो ' ख ' अवशिष्ट उत्तरदानग्राही आहे.

**अवशिष्ट उत्तरदानग्राही जिला हक्कदार असतो ती संपत्ती.**

**१०३.** अवशिष्ट मृत्यूपत्रित दानाखाली, मृत्यूपत्रकर्त्याने आपल्या मृत्यूसमयी आपल्या मालकीच्या ज्या संपत्तीची परिणामक्षम अशी अन्य कोणतीही मृत्यूपत्रीय विल्हेवाट केली नसेल त्या सर्व संपत्तीला उत्तरदानग्राही हक्कदार असतो.

### उदाहरण

' क ' आपल्या मृत्यूपत्राने विवक्षित उत्तरदाने देतो, त्यापैकी एक कलम ११८ खाली शून्य आहे, आणि दुसरे उत्तरदानग्राहीच्या मृत्युमुळे व्यपगत होते. तो आपल्या संपत्तीचा अवशिष्ट ' ख ' ला मृत्युपत्राने देतो. आपल्या मृत्युपत्राच्या दिनांकानंतर ' क ' एक जमीनदारी खरेदी करतो, त्याच्या मृत्युसमयी ती त्याच्या मालकीची होती. ' ख ' दोन उत्तरदानांना आणि अवशिष्टाचा भाग म्हणून जमीनदारीला हक्कदार आहे.

**सर्वसाधारण शब्दांतील उत्तरदान निहित होण्याची वेळ.**

**१०४.** जर एखादे उत्तरदान, ते केव्हा द्यावयाचे ती वेळ विनिर्दिष्ट केल्याशिवाय, सर्वसाधारण शब्दात दिले असेल तर , मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूच्या दिनांकापासून त्यात उत्तरदानग्राहीचा निहित हितसंबंध असतो आणि जर ते मिळाल्याशिवाय उत्तरदानग्राही मृत्यू पावला तर ते त्याच्या प्रतिनिधीकडे जाईल.

**कोणत्या प्रकरणी उत्तरदान व्यपगत होते.**

**१०५.** (१) जर उत्तरदानग्राही मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहिला नाही तर, उत्तरदान अन्य एखाद्या व्यक्तीकडे जावे असा मृत्युपत्रकर्त्याचा, उद्देश असल्याचे मृत्युपत्रावरून दिसून न आल्यास ते परिणामक होऊ शकणार नाही, तर ते व्यपगत होईल आणि मृत्युपत्रकर्त्याच्या संपत्तीच्या अवशिष्टाचा भाग होईल.

(२) उत्तरदान मिळण्यास उत्तरदानग्राहीचे प्रतिनिधी हक्कदार व्हायला पाहिजे असतील तर, उत्तरदानाग्राही मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहिला असे सिध्द झाले पाहिजे.

### उदाहरण

(एक) मृत्यूपत्रकर्ता ' ख ' ला " ' ख ' मला देणे लागतो ते ५०० रुपये " मृत्यूपत्राने देतो. ' ख ' मृत्युपत्रकर्त्याच्या आधी मृत्यू पावतो. उत्तरदान नष्टप्राय होते.

(दोन) ' क ' आणि त्याचे अपत्ये यांना मृत्यूपत्रित दान दिलेले आहे. ' क ' मृत्युपत्रकर्त्याआधी मृत्यू पावतो किंवा मृत्यूपत्र केले तेव्हा मृत असतो. ' क ' आणि त्याची अपत्ये यांना दिलेले उत्तरदान नष्टप्राय होते.

(तीन) ' क ' ला आणि तो मृत्युपत्रकर्त्याच्या पूर्वी मृत्यू पावल्यास ' ख ' ला उत्तरदान दिलेले आहे. ' क ' मृत्युपत्रकर्त्याच्या आधी मृत्यू पावतो. उत्तरदान ' ख ' कडे जाते.

(चार) ' क ' ला हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर ' ख ' ला पैशाची रक्कम मृत्युपत्राने दिलेली आहे. ' क ' मृत्युपत्रकर्त्याच्या हयातीत मृत्यू पावतो ; ' ख ' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहतो ' ख ' ला दिलेले मृत्यूपत्रित दान परिणामक होते.

(पाच) ' क ' ला त्याला अठरावे वर्षे पूर्ण होताच आणि त्याला अठरावे वर्ष पूर्ण होण्यापूर्वी तो मृत्यू पावल्यास ' ख ' ला पैशाची रक्कम मृत्युपत्राने दिलेली आहे. ' क ' ला अठरावे वर्ष पूर्ण होते आणि तो मृत्युपत्रकर्त्याच्या हयातीत मृत्यू पावतो. ' क ' ला दिलेले उत्तरदान नष्टप्राय होते आणि ' ख ' ला दिलेले मृत्यूपत्रित दान परिणामक होत नाही.

(सहा) मृत्युपत्रकर्ता आणि उत्तरदानग्राही त्याच नौभंगामध्ये नष्ट होतात. कोण आधी मृत्यू पावला हे दर्शवणारा पुरावा नाही. उत्तरदान नष्टप्राय होते.

**१०६.** एखादे उत्तरदान दोन व्यक्तींना संयुक्तपणे दिले असून जर मृत्युपत्रकर्त्याच्या आधी त्यांच्यापैकी एक मृत्यू पावला तर अन्य उत्तरदानग्राहीला ते संपूर्णपणे मिळते. **जर दोन संयुक्त उत्तरदानग्राही पैकी एक मृत्युपत्रकर्त्याच्या आधी मृत्यू पावला तर उत्तरदान व्यपगत होत नाही.**

**उदाहरण**

उत्तरदान ' क ' व ' ख ' यांना नुसते दिले आहे. ' क ' मृत्युपत्रकर्त्याच्या आधी मृत्यू पावतो. ' ख ' ला उत्तरदान मिळते.

**१०७.** जर उत्तरदानग्राहीना उत्तरदानाचे भिन्न हिस्से देण्याचा मृत्यूपत्रकर्त्याचा उद्देश होता हे दर्शवणाऱ्या शब्दांत ते त्यांना दिले असेल तर, कोणताही उत्तरदानग्राही मृत्यूपत्रकर्त्याआधी मृत्यू पावल्यास उत्तरदानापैकी त्याच्यासाठी अभिप्रेत होते तेवढे मृत्यूपत्रकर्त्याच्या संपत्तीच्या अवशिष्टात सामील होईल. **विभिन्न हिस्से देण्याचा मृत्युपत्रकर्त्याचा उद्देश दर्शविणाऱ्या शब्दांचा परिणाम.**

**उदाहरण**

' क ', ' ख ' आणि ' ग ' यांना त्यांच्यामध्ये समसमान विभागावयाची अशी पैशाची रक्कम मृत्युपत्राने दिली गेली आहे. ' क ' मृत्युपत्रकर्त्याआधी मृत्यू पावतो. ' ख ' आणि ' ग ' यांना, ' क ' मृत्युकर्त्याच्या मागे हयात राहिला असता तर जेवढे मिळाले असते तेवढेच मिळेल.

**१०८.** जेथे व्यपगत होणारा हिस्सा मृत्युपत्राने दिलेल्या सर्वसाधारण अवशिष्टाचा भाग असतो तेथे तो हिस्सा त्याचा विनियोग केला नसल्याप्रमाणे जाईल. **व्यपगत हिस्सा, हा त्याचा विनियोग केला नसल्याप्रमाणे केव्हा जातो.**

**उदाहरण**

मृत्युपत्रकर्ता आपल्या संपदेचा अवशिष्ट ' क ', ' ख ' आणि ' ग ' यांना त्यांच्यामध्ये समसमान विभागून मृत्युपत्राने देतो. ' क ' मृत्युपत्रकर्त्याआधी मृत्यू पावतो. अवशिष्टापैकी त्याच्या वाट्याचा जो एक-तृतीयांश आहे त्याची जणू काही विल्हेवाट झालेली नसावी त्याप्रमाणे तो प्रक्रांत होतो.

**१०९.** जेथे मृत्युपत्रकर्त्याच्या कोणत्याही अपत्याला किंवा अन्य रेषीय वंशजाला मृत्युपत्रित दान दिलेले असून उत्तरदानग्राही मृत्युपत्रकर्त्याच्या हयातीत मृत्यू पावला असेल, पण त्याचा कोणताही रेषीय वंशज मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहिला असेल तेथे, मृत्युपत्रावरून विरुद्ध उद्देश दिसून न आल्यास मृत्युपत्रित दान व्यपगत होणार नाही ; तर ते जणू काही उत्तरदानग्राहीचा मृत्यू मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युच्या निकटनंतर घडून आला असल्याप्रमाणे परिणामक होईल. **मृत्युपत्रकर्त्याच्या अपत्याला किंवा रेषीय वंशजाला दिलेले मृत्युपत्रित दान त्याचा मृत्युपत्रकर्त्याच्या हयातीत मृत्यू झाल्याने केव्हा व्यपगत होते.**

**उदाहरण**

' क ' आपले मृत्युपत्र करून त्याद्वारे आपला मुलगा ' ख ' यास सर्वथा त्याच्या स्वतःच्या वापरासाठी व लाभासाठी पैशाची रक्कम देतो ' ख ' हा आपला मुलगा ' ग ' यास मागे ठेवून ' क ' च्या आधी मृत्यू पावतो, ' ग ' हा ' क ' च्या मागे हयात राहतो व मृत्युपत्र करून त्याद्वारे आपली सर्व संपत्ती आपली विधवा ' घ ' हिला देतो. पैसे ' घ ' कडे जातात.

**११०.** जेथे एका व्यक्तीला दुसऱ्याच्या लाभार्थ मृत्युपत्रित दान दिलेले असते, तेथे ज्या व्यक्तीला ते मृत्युपत्रित दान दिले असेल तिचा मृत्युपत्रकर्त्याच्या हयातील मृत्यू झाल्याने उत्तरदान व्यपगत होत नाही. **' ख ' च्या लाभार्थ ' क ' ला दिलेले मृत्युपत्रित दान ' क ' च्या मृत्युने व्यपगत होत नाही.**

**१११.** जेथे वर्णिलेल्या व्यक्तिवर्गाला मृत्युपत्रित दान नुसते दिलेले असेल तेथे मृत्युपत्राने दिलेली वस्तू मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी जे हयात असतील अशांकडेच जाईल. **वर्णिलेल्या व्यक्तिवर्गाला दिलेल्या मृत्युपत्रित दानाच्या बाबतीत उत्तरजीविता.**

**अपवाद.**---जर विनिर्दिष्ट व्यक्तीशी विशिष्ट आप्तसंबंध श्रेणीने संबंधित म्हणून वर्णिलेल्या व्यक्तीच्या वर्गाला संपत्ती मृत्युपत्राने दिलेली असेल, पण त्यांना मिळावयाच्या तिच्या कब्जा मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर काही वेळेपर्यंत पूर्व मृत्युपत्रित दानाच्या किंवा अन्य कारणाने स्थगित केला असेल तेथे, त्यावेळी संपत्ती त्यांच्यापैकी जे तेव्हा हयात असतील अशांकडे आणि मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर त्यांच्यापैकी जे मृत्यू पावले असतील अशांकडे त्या सर्वांच्या प्रतिनिधींकडे जाईल.

**उदाहरणे**

(एक) ' क ' हा १,००० रुपये " ' ख ' च्या अपत्यांना " ते त्यांच्यात केव्हा वितरित करावयाचे ते न सांगता मृत्युपत्राने देतो. मृत्युपत्राच्या दिनांकापूर्वी ' ख ' हा ' ग ', ' घ ' व ' ङ ' ही तीन अपत्ये मागे ठेवून मृत्यू पावला होता. ' ङ ' मृत्युपत्राच्या दिनांकानंतर पण ' क ' च्या मृत्युपूर्वी मृत्यु पावला. ' ग ', व ' घ ' हे ' क ' च्या मागे हयात राहतात उत्तरदान ' ङ ' च्या प्रतिनिधींना वर्जून ' ग ' व ' घ ' यांच्या मालकीचे होईल.

(दोन) एका घराचा काही वर्षाचा पट्टा ‘ क ’ ला हयातीकरता व त्याच्या मृतुनंतर ‘ ख ’ च्या अपत्यांना मृत्युपत्राने दिलेला होता. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी, ‘ ख ’ ला ‘ ग ’ व ‘ घ ’ ही दोन हयात अपत्ये होती व त्याला कधीही अन्य कोणतेही अपत्य नव्हते नंतर ‘ क ’ च्या हयातीत ‘ ग ’ आपला मृत्युपत्रव्यवस्थापक ‘ ङ ’ यास मागे ठेवून मृत्यु पावला ‘ क ’ च्या मागे ‘ घ ’ हयात राहिला आहे. पट्ट्याची जेवढी मुदत पुरी व्हावयाची राहिली आहे तेवढ्यास ‘ घ ’ व ‘ ङ ’ संयुक्तपणे हक्कदार आहेत.

(तीन) ‘ क ’ ला तिच्या हयातीकरता व तिच्या मृत्युनंतर ‘ ख ’ च्या अपत्यांना पैशाची रक्कम मृत्युपत्राने दिली होती. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी, ‘ ख ’ ला ‘ ग ’ व ‘ घ ’ ही दोन हयात अपत्ये होती व त्या घटनेनंतर ‘ ख ’ च्या पोटी ‘ ङ ’ व ‘ च ’ ही दोन अपत्ये जन्माला आली. ‘ ग ’ मृत्युपत्र करून व ‘ ङ ’ मृत्युपत्र न करता ‘ क ’ च्या हयातीत मृत्यू पवाले. ‘ क ’ मृत्यू पावली असून ‘ घ ’ व ‘ च ’ तिच्या मागे हयात राहिले आहेत. उत्तरदान चार समसमान हिश्श्यांत विभागावयाचे असून, त्यापैकी एक ‘ ग ’ च्या मृत्युपत्रव्यवस्थापकाला, एक ‘ घ ’ ला, एक ‘ ङ ’ च्या प्रशासकाला व एक ‘ च ’ ला द्यावयाचा.

(चार) ‘ क ’ आपल्या जमिनीचा एक-तृतीयांश ‘ ख ’ ला त्याच्या हयातीकरिता व त्याच्या मृत्युनंतर ‘ ख ’ च्या बहिणींना मृत्युपत्राने देतो. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी, ‘ ख ’ ला ‘ ग ’ व ‘ घ ’ ह्या दोन हयात बहिणी होत्या व त्या घटनेनंतर ‘ ङ ’ ही दुसरी एक बहीण जन्माला आली ‘ ग ’ ही ‘ ख ’ च्या हयातीत मृत्यु पावली ‘ घ ’ व ‘ ङ ’ या ‘ ख ’ च्या मागे हयात राहिल्या आहेत. ‘ क ’ च्या जमिनीचा एक-तृतीयांश समसमान हिश्श्यांनी ‘ घ ’ व ‘ ङ ’ यांच्या आणि ‘ ग ’ चे प्रतिनिधी यांच्या मालकीचा आहे.

(पाच) ‘ क ’ मृत्युपत्राने १,००० रुपये ‘ ख ’ ला हयातीकरिता आणि त्याच्या मृत्युनंतरच्या ‘ ग ’ च्या अपत्यांना समसमान विभागून देतो ‘ ख ’ च्या मृत्युपर्यंत ‘ ग ’ ला कोणीही अपत्य नव्हते ‘ ख ’ च्या मृत्युनंतरचे मृत्युपत्रित दान शून्य आहे.

(सहा) ‘ क ’ मृत्युपत्राने १००० रुपये ‘ ख ’ च्या पोटी “ जन्मलेल्या किंवा जन्मास येणाऱ्या सर्व अपत्यांना ” ‘ ग ’ चा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्यामध्ये विभागावयाचे म्हणून देतो. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी, ‘ ख ’ ला ‘ घ ’ व ‘ ङ ’ ही दोन हयात अपत्ये होती. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर पण ‘ ग ’ च्या हयातील ‘ ख ’ च्या पोटी ‘ च ’ व ‘ छ ’ ही अन्य दोन अपत्ये जन्माला आली ‘ ग ’ च्या मृत्युनंतर ‘ ख ’ च्या पोटी दुसरे अपत्य जन्मास आले. ‘ ख ’ चे जे अपत्य मागाहून जन्मले त्यास वर्जून, उत्तरदान ‘ घ ’, ‘ ङ ’, ‘ च ’, व ‘ छ ’ यांच्या मालकीचे होते.

(सात) ‘ क ’, ‘ ख ’ च्या अपत्यांना, त्यांच्यापैकी ज्येष्ठ अपत्य सज्ञान होईल तेव्हा त्यांच्या मध्ये विभागावयाचा असा एक निधी मृत्युपत्राने देतो. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी ‘ ख ’ ला ‘ ग ’ नावाचे एक हयात अपत्य होते. नंतर त्याला ‘ घ ’ व ‘ ङ ’ नावाची दोन अपत्ये झाली. ‘ ग ’ सज्ञान झाला तेव्हा ‘ ङ ’ मृत्यू पावला होता, पण ‘ ग ’ व ‘ घ ’ हयात होते. तो निधी ‘ ग ’ सज्ञान झाल्यानंतर ‘ ख ’ च्या पोटी जन्मास येईल त्या कोणत्याही अपत्यास वर्जून, ‘ ग ’ व ‘ घ ’ यांच्या आणि ‘ ङ ’ चे प्रतिनिधी यांच्या मालकीचा होतो.

## प्रकरण सात

## शून्य मृत्युपत्रित दानांविषयी

**मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नसलेल्या, विशिष्ट वर्णनाने निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला मृत्युपत्रित दान.**

**११२.** एखाद्या व्यक्तीचे विशिष्ट वर्णन करून तिला मृत्युपत्रित दान दिलेले असते व त्या वर्णनाशी जुळणारी कोणतीही व्यक्ती मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नसते त्या बाबतीत मृत्युपत्रित दान शुन्य असते.

**अपवाद.**— जर विनिर्दिष्ट व्यक्तीशी विशिष्ट आप्तसंबध श्रेणीने संबंधित म्हणून वर्णिलेल्या व्यक्तीला संपत्ती मृत्युपत्राने दिली असेल, पण तिला मिळणारा त्या संपत्तीचा कब्जा मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर काही वेळेपर्यंत पूर्व मृत्युपत्रित दानामुळे किंवा अन्य कारणाने आस्थगित झाला असेल, आणि जर त्या वर्णनाशी जुळणारी व्यक्ती मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी हयात असेल किंवा ती मृत्युची घटना व अशी नंतरची वेळ यांच्या दरम्यान ती अस्तित्वात आली तर संपत्ती अशा नंतरच्या वेळी त्या व्यक्तीकडे किंवा ती मृत असल्यास तिच्या प्रतिनिधीकडे जाईल.

### उदाहरणे

(एक) ‘ क ’ मृत्युपत्राने ‘ ख ’ च्या ज्येष्ठ मुलाला १,००० रुपये देतो. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी ‘ ख ’ ला मुलगा नाही. मृत्युपत्रित दान शुन्य आहे.

(दोन) 'क' मृत्युपत्राने 'ख' ला हयातीकरिता आणि त्याच्या मृत्युनंतर 'ग' च्या ज्येष्ठ मुलाला १,००० रुपये देतो, मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी 'ग' ला मुलगा नव्हता, नंतर 'ख' च्या हयातीत 'ग' च्या पोटी मुलगा जन्माला येतो. 'ख' चा मृत्यू होताच उत्तरदान 'ग' च्या मुलाकडे जाते.

(तीन) 'क' मृत्युपत्राने 'ख' ला हयातीकरिता आणि त्याच्या मृत्युनंतर 'ग' च्या ज्येष्ठ मुलाला १,००० रुपये देतो. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी 'ग' ला मुलगा नव्हता, नंतर 'ख' च्या हयातीत 'ग' ला 'घ' नावाचा मुलगा होतो. 'घ' मृत्यू पावतो, नंतर 'ख' मृत्यू पावतो, उत्तरदान 'घ' च्या प्रतिनिधीकडे जाते.

(चार) 'क' मृत्युपत्राने 'ख' ला त्याच्या हयातीकरिता आणि त्याचा मृत्यू होताच 'ग' च्या ज्येष्ठ मुलाला आपली ग्रीन एकरची संपदा देतो. 'ख' च्या मृत्युपर्यंत 'ग' ला मुलगा नव्हता. 'ग' च्या ज्येष्ठ मुलाला दिलेले मृत्युपत्रित दान शून्य आहे.

(पाच) 'क' मृत्युपत्राने 'ग' च्या ज्येष्ठ मुलाला 'ख' च्या मृत्युनंतर त्याला मिळावयाचे असे १,००० रुपये देतो. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी 'ग' ला मुलगा नाही, पण नंतर 'ख' च्या हयातीत त्याच्या पोटी एक मुलगा जन्माला येतो आणि 'ख' च्या मृत्युसमयी तो जिवंत आहे. 'ग' चा मुलगा १,००० रुपयांना हक्कदार आहे.

**मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नसलेल्या व्यक्तीला पूर्व-मृत्युपत्रित दानाच्या अधीनतेने केलेले मृत्युपत्रित दान.**

**११३.** जेथे मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नसलेल्या व्यक्तीला मृत्युपत्रात अंतर्भूत असलेल्या पूर्वमृत्युपत्रित दानांच्या अधीनतेने मृत्युपत्रित दान केले असेल तेथे, नंतरचे मृत्युपत्रित दान, मृत्युपत्राने दिलेल्या वस्तूत असलेला मृत्युपत्रकर्त्याचा संपूर्ण उर्वरित हितसंबंध त्यात समाविष्ट नसेल तर शून्य होईल.

**उदाहरणे**

(एक) 'क' ला त्याच्या हयातीकरता, आणि त्याच्या मृत्युनंतर त्याच्या ज्येष्ठ मुलाला हयातीकरता आणि त्या मुलाच्या मृत्युनंतर त्याच्या ज्येष्ठ मुलाला मृत्युपत्राने संपत्ती दिली आहे. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी 'क' ला मुलगा नाही. येथे 'क' च्या ज्येष्ठ मुलाला दिलेले मृत्युपत्रित दान हे मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नसलेल्या व्यक्तीला दिलेले मृत्युपत्रित दान आहे. ते मृत्युपत्रकर्त्याच्या संपूर्ण उर्वरित हितसंबंधाचे मृत्युपत्रित दान नाही. 'क' च्या ज्येष्ठ मुलाला त्याच्या हयातीकरता दिलेले मृत्युपत्रित दान शून्य आहे.

(दोन) 'क' ला त्याच्या हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर त्याच्या मुलींना मृत्युपत्राने एक निधी दिलेला आहे. 'क' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहतो. 'क' ला मुली असून त्यांच्यापैकी काही मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नव्हत्या. 'क' च्या मुलींना दिलेल्या मृत्युपत्रित दानात, मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युपत्राने दिलेल्या वस्तुतील संपूर्ण उर्वरित हितसंबंध समाविष्ट आहे. 'क' च्या मुलींना दिलेले मृत्युपत्रित दान विधिग्राह्य आहे.

(तीन) 'क' ला त्याच्या हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर त्याच्या मुलींना एक निधी मृत्युपत्राने दिलेला असून, त्या मुलींपैकी कोणीही वयाच्या अठराव्या वर्षापूर्वी विवाह केला तर जेणेकरून तिचा वाटा तिच्या हयातीपर्यंत तिच्या स्वतःच्या मालकीचा राहील, आणि तिच्या मृत्युनंतर तिच्या अपत्यांमध्ये विभागता येईल अशा प्रकारे तो संव्यवस्थेद्वारे नेमून दिला जावा असा निर्देश दिलेला आहे. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी 'क' ला हयात मुली नाहीत, पण नंतर त्याच्यापोटी मुली जन्माला येतात व त्या त्याच्या मागे हयात राहतात. येथे संव्यवस्थेच्या निर्देशाचा परिणाम असा होतो की, अठराव्या वर्षापूर्वी विवाह करणाऱ्या प्रत्येक मुलीच्या बाबतीत, तिला मिळालेल्या अबाधित मृत्युपत्रित दानाऐवजी तिला फक्त तिच्या हयातीपुरते मृत्युपत्रित दान मिळते. म्हणजेच, ते मृत्युपत्राने दिलेल्या वस्तूत मृत्युपत्रकर्त्याचा जो संपूर्ण उर्वरित हितसंबंध आहे त्याहून जी कमी आहे अशा कोणत्याही वस्तूचे मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नसलेल्या व्यक्तीला दिलेले मृत्युपत्रित दान आहे. निधी नेमून देण्याचा निदेश शून्य आहे.

(चार) 'क' हा 'ख' ला हयातीकरता पैशाची रक्कम मृत्युपत्राने देतो, आणि 'ख' च्या मृत्युनंतर त्याच्या मुलींच्याकडे जेणेकरून प्रत्येक मुलीचा वाटा हयातभर तिच्या स्वतःच्या मालकीचा राहिल आणि तिच्या मृत्युनंतर तिच्या अपत्यांमध्ये विभागता येईल, अशा प्रकारे तो निधी संव्यवस्थेद्वारे नेमून दिला जावा असा तो निदेश देतो. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी 'ख' ला हयात मुलगी नाही. या प्रकरणी निधी नेमून देण्याच्या निदेशात अंतर्भूत असलेले तेच तेवढे 'ख' च्या मुलींना दिलेले मृत्युपत्रित दान आहे ; आणि म्हणून तो निदेश म्हणजे अजून जन्माला न आलेल्या व्यक्तींना दिलेले, निधीतील आजीव हितसंबंधाचे म्हणजेच मृत्युपत्राने दिलेल्या वस्तुत मृत्युपत्रकर्त्याचा जो संपूर्ण उर्वरित हितसंबंध आहे त्याहून जो कमी आहे अशा कोणत्याही वस्तूचे कमी असलेल्या कशाचे तरी मृत्युपत्रित दान असल्यासारखेच आहे. 'ख' च्या मुलींच्याकडे निधी नेमून देण्याचा निदेश शून्य आहे.

शाश्वतता विरोधी नियम.

**११४.** मृत्युपत्राने दिलेली वस्तू निहित होणे हे मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी हयात असलेल्या एका किंवा अधिक व्यक्तींच्या हयातींचा कालावधी आणि तो कालावधी संपण्याच्या वेळेस जी व्यक्ती अस्तित्वात असून ती सज्ञान झाल्यास मृत्युपत्राने दिलेली वस्तू तिच्या मालकीची व्हावयाची असेल अशा एखाद्या व्यक्तीची अज्ञानदशा यांच्या पलिकडे लांबेल असे कोणतेही मृत्युपत्रित दान विधिग्राह्य नसते.

**उदाहरणे**

(एक) ' क ' ला त्याच्या हयातीकरता, आणि त्याच्या मृत्युनंतर ' ख ' ला त्याच्या हयातीकरता आणि ' ख ' च्या मृत्युनंतर ' ख ' च्या मुलांपैकी जो प्रथम २५ वर्षे वयाचा होईल अशाला एक निधी मृत्युपत्राने दिलेला आहे. ' क ' आणि ' ख ' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहतात. येथे ' ख ' चा मुलगा प्रथम २५ वर्षे वयाचा होईल तो म्हणजे मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर जन्मलेला मुलगा असू शकेल. असा मुलगा ' क ' आणि ' ख ' यांच्यापैकी जो अधिक काळ जगणारा असेल त्याच्या मृत्युपासून अठरा वर्षांहून अधिक काळ लोटेपर्यंत कदाचित पंचवीस वर्षांचा होणारही नाही. आणि निधी निहित होणे हे अशा प्रकारे ' क ' आणि ' ख ' यांच्या हयातीचा काळ आणि ' ख ' च्या मुलाची अज्ञानदशा यांच्या पलिकडे लांबण्याची शक्यता आहे. ' ख ' च्या मृत्युनंतरचे मृत्युपत्रित दान शून्य आहे.

(दोन) ' क ' ला त्याच्या हयातीकरता, आणि त्याच्या मृत्युनंतर ' ख ' ला त्याच्या हयातीकरिता आणि ' ख ' च्या मृत्युनंतर ' ख ' च्या मुलांपैकी जो प्रथम २५ वर्षे वयाचा होईल अशाला एक निधी मृत्युपत्राने दिलेला आहे. मत्युपत्रकर्त्याच्या हयातील ' ख ' एक किंवा अधिक मुलगे मागे ठेवून मृत्यू पावतो. या प्रकरणात ' ख ' चे मुलगे म्हणजे मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी हयात असलेल्या व्यक्ती असून त्यांच्यापैकी कोणीही २५ वर्षांचा होणार ती वेळ नक्कीच त्याच्या स्वतःच्या हयातीच्या आत येते. मृत्युपत्रित दान विधिग्राह्य आहे.

(तीन) ' क ' ला त्याच्या हयातीकरता, आणि त्याच्या मृत्युनंतर ' ख ' ला त्याच्या हयातीकरता एक निधी मृत्युपत्राने दिलेला असून ' ख ' च्या मृत्युनंर तो ' ख ' च्या अपत्यांपैकी जी अठरा वर्षे वयाची होतील अशांमध्ये विभागला जावा. पण ' ख ' चे कोणतेही अपत्य तेवढ्या वयाचे झाले नाही तर निधी ' ग ' कडे जावा असा त्यात निदेश दिला आहे. येथे निधीच्या विभागणीची वेळ उशिरात उशिरा म्हणजे मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी हयात असलेली व्यक्ती ' ख ' यांच्या मृत्युपासून अठरा वर्षे संपताच आली पाहिजे. सर्व मृत्युपत्रित दाने विधिग्राह्य आहेत.

(चार) मृत्युपत्रकर्त्याच्या मुलींच्या लाभार्थ विश्वस्तांना एक निधी मृत्युपत्राने दिलेला असून, जर त्यांच्यापैकी कोणीही योग्य वयापूर्वी विवाह केला तर, जेणेकरून निधीतील तिचा हिस्सा तिच्या अपत्यांपैकी जी अठरा वर्षे वयाची होतील अशाकडे तिच्या मृत्युनंतर प्रक्रांत होईल अशा प्रकारे तो निधी नेमून दिला जावा असा त्यात निदेश दिला आहे. मृत्युपत्रकर्त्याच्या ज्या कोणत्याही मुलीला निदेश लागू होतो ती त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात असली पाहिजे आणि निधीतील ज्या कोणत्याही अशांची निदेशित केल्यानुसार परिणामी नेमणूक करून दिली जाईल तो ज्यांचा हिस्सा होता त्या मुलींच्या मृत्युपासून अठरा वर्षांनंतरची नव्हे अशा वेळी निहित झाला पाहिजे. हे सर्व उपबंध विधिग्राह्य आहेत.

**ज्यापैकी काही जण कलमे ११३ आणि ११४ मधील नियमांखाली येऊ शकतील त्या वर्गाला मृत्युपत्रित दान.**

**११५.** जर व्यक्तिवर्गाला मृत्युपत्रित दान केलेले असून त्यापैकी काहींच्या बाबत कलम ११३ किंवा कलम ११४ च्या उपबंधांच्या कारणाने ते गैरलागू असेल तर, असे मृत्युपत्रित दान [१][संपूर्ण वर्गाच्या बाबत नव्हे तर केवळ त्याच व्यक्तींच्या बाबत शून्य] असेल.

**उदाहरणे**

(एक) ' क ' ला त्याच्या हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर त्याची जी अपत्ये पंचवीस वर्षे वयाची होतील त्या सर्वांना एक निधी मृत्युपत्राने दिला आहे. ' क ' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहतो आणि त्याला मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी हयात असलेली काही अपत्ये आहेत. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी हयात असलेले ' क ' चे प्रत्येक अपत्य मृत्युपत्रित दानास दिलेल्या अवधीच्या आत पंचवीस वर्षे वयाचे (झालेच तर) झालेच पाहिजे. पण ' क ' ला मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर अपत्ये होऊ शकतील व त्यांच्यापैकी काही ' क ' च्या मृत्युनंतर अठरा वर्षांहून अधिक काळ लोटेपर्यंत कदाचित पंचवीस वर्षे वायेची होणारही नाहीत. म्हणून ' क ' च्या अपत्यांना दिलेले मृत्युपत्रित दान मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर जन्मलेल्या कोणत्याही अपत्याबाबत [२][आणि ' क ' च्या मृत्युनंतर अठरा वर्षांच्या आत जी पंचवीस वर्षे वयाची होत नाहीत त्यांच्या बाबत गैरलागू आहे. पण ' क ' च्या अन्य अपत्यांच्या बाबत ते लागू आहे.]

---

१. १९२९ चा अधिनियम २१, कलम १४ द्वारे " संपूर्णतः शून्य " याऐवजी घातले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे विवक्षित शब्दाऐवजी घातले.

(दोन) ‘ क ’ ला त्याच्या हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर ‘ ख ’, ‘ ग ’, ‘ घ ’ यांना आणि जी पंचवीस वर्षे वयाची होतील त्या ‘ क ’ च्या अन्य सर्व अपत्यांना एक निधी मृत्युपत्राने दिला आहे. ‘ ख ’, ‘ ग ’, ‘ घ ’ ही ‘ क ’ ची मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी हयात असलेली अपत्ये आहेत. अन्य सर्व बाबतीत, हे प्रकरण उदाहरण (एक) मध्ये कल्पिल्याप्रमाणे आहे. [1][जरी ‘ ख ’, ‘ ग ’, व ‘ घ ’ यांच्या उल्लेख असल्याने मृत्युपत्रित दान हे वर्गाला दिलेले मृत्युपत्रित दान म्हणून मानले जाण्यास प्रतिबंध नसला तरी ते संपूर्णपणे शून्य नाही. ‘ ख ’, ‘ ग ’, किंवा ‘ घ ’ या अपत्यांपैकी जे ‘ क ’ च्या मृत्युनंतर अठरा वर्षांच्या आत पंचवीस वर्षे वयाचे होईल त्या कोणाहीबाबत ते लागू आहे.]

[2][पूर्वमृत्युपत्रित दान निष्फळ झाल्यावर परिणामक व्हावयाचे मृत्युपत्रित दान.

**११६.** जेथे एखाद्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तिवर्गाच्या प्रीत्यर्थ केलेले मृत्युपत्रित दान कलमे ११३ आणि ११४ मध्ये अंतर्भूत असलेल्यांपैकी कोणत्याही नियमाच्या कारणाने, अशा व्यक्तीच्या किंवा अशा संपूर्ण वर्गाच्या बाबत शून्य असेल तेथे त्याच मृत्युपत्रात अंतर्भूत असलेले आणि असे पूर्वमृत्युपत्रित दान निष्फळ झाल्यानंतर किंवा होताच परिणामक व्हावयाचे म्हणून अभिप्रेत असलेले कोणतेही मृत्युपत्रित दानही शून्य असते.]

**उदाहरणे**

(एक) ‘ क ’ ला त्याच्या हयातीकरता, आणि त्याच्या मृत्युनंतर, त्याच्या मुलांपैकी जो प्रथम २५ वर्षे वयाचा होईल अशा मुलाला त्याच्या हयातीकरता आणि अशा मुलाच्या मृत्युनंतर ‘ ख ’ ला एक निधी मृत्युपत्राने दिला आहे. ‘ क ’ आणि ‘ ख ’ मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहतात. ‘ ख ’ ला दिलेले मृत्युपत्रित दान ‘ क ’ च्या मुलांपैकी जी प्रथम २५ वर्षे वयांची होतील अशांना दिलेल्या मृत्युपत्रित दानानंतर परिणामक व्हावयाचे अभिप्रेत असून, ते मृत्युपत्रित दान कलम ११४ खाली शून्य आहे. ‘ ख ’ ला दिलेले मृत्युपत्रित दान शून्य आहे.

(दोन) ‘ क ’ ला त्याच्या हयातीकरता, आणि त्याच्या मृत्युनंतर, त्याच्या मुलांपैकी जो प्रथम २५ वर्षे वयाचा होईल अशाला आणि जर ‘ क ’ चा कोणताही मुलगा तितक्या वयाचा झाला नाही तर ‘ ख ’ ला एक निधी मृत्युपत्राने दिला आहे. ‘ क ’ आणि ‘ ख ’ मृत्युपत्रकर्त्यांच्या मागे हयात राहतात. ‘ ख ’ ला दिलेले मृत्युपत्रित दान ‘ क ’ च्या मुलांपैकी जो प्रथम २५ वर्षे वयाचा होईल अशा मुलाला दिलेले मृत्युपत्रित दान निष्फळ झाल्यावर परिणामक व्हावे असे अभिप्रेत असून, ते मृत्युपत्रित दान कलम ११४ खाली शून्य आहे. ‘ ख ’ ला दिलेले मृत्युपत्रित दान शून्य आहे.

संचयाकरता दिलेल्या निदेशाचा परिणाम.

[3][**११७.** (१) जेथे मृत्युपत्राच्या अटींनी असे निर्देशित केले असेल की, कोणत्याही संपत्तीपासून येणारे उत्पन्न संपूर्णतः किंवा अंशतः मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युपासून अठरा वर्षाच्या कालावधीहून दीर्घतर अशा कोणत्याही कालावधीत संचित केले जावे तेथे ज्या कालावधीत संचय करण्यासाठी निदेश देण्यात आला असेल तो कालावधी पूर्वोक्त कालावधीपेक्षा जेवढा अधिक असेल तेवढ्या व्याप्तीपुरता असा निदेश, यात यापुढे उपबंधित केले आहे ते वगळता शून्य असेल, आणि अशा अठरा वर्षाच्या कालावधीच्या अखेरीस, संचय करण्यासाठी निर्दिष्ट केलेला कालावधी जणू काही लोटलेला असावा त्याप्रमाणे संपत्ती व तिचे उत्पन्न यांची विल्हेवाट करण्यात येईल.

(२) पुढील प्रयोजनार्थ संचय करण्याच्या कोणत्याही निदेशावर या कलमामुळे परिणाम होणार नाही आणि तद्नुसार असा निदेश देता येईल.

**उदाहरणे**

(एक) मृत्युपत्रकर्त्यांची किंवा मृत्युपत्राखाली हितसंबंध मिळणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीची ऋणे फेडणे ; अथवा

(दोन) मृत्युपत्रकर्त्याची किंवा मृत्युपत्राखाली हितसंबंध मिळणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तींची अपत्ये किंवा अधिक दूरची संतती यांच्याकरता अंशांची तरतूद करणे ; अथवा

(तीन) मृत्युपत्राने दिलेल्या कोणत्याही संपत्तीचे जतन किंवा देखभाल करणे.]

धार्मिक किंवा धर्मादायी उपयोगांसाठी मृत्युपत्रित दान.

**११८.** जिला एखादा भाचा/पुतण्या किंवा भाची/पुतणी किंवा अधिक निकटचा कोणीही नातलग आहे अशा कोणत्याही व्यक्तीला, तिने आपल्या मृत्युपूर्वीच्या बारा महिन्यांच्या आतील नाही अशा दिनांकास मृत्युपत्र निष्पादित करून आणि हयात व्यक्तीच्या मृत्युपत्राच्या सुरक्षित ताब्यासाठी कायद्याद्वारे तरतूद केलेल्या एखाद्या स्थळी त्याच्या निष्पादनापासून सहा महिन्यांच्या आत ते निक्षिप्त केल्याखेरीज कोणतीही संपत्ती धार्मिक किंवा धर्मादायी उपयोगासाठी मृत्युपत्राने देण्याचा अधिकार असाणार नाही ;

[4][परंतु या कलमातील कोणतीही गोष्ट पारशी व्यक्तीला लागू होणार नाही.]

---

१. १९२९ चा अधिनियम २१, कलम १४ द्वारे विवक्षित शब्दा ऐवजी घातले.
२. १९२९ चा अधिनियम २१, कलम १४ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.
३. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.
४. १९९१ चा अधिनियम ५१, कलम ६ द्वारे हे परंतुक घातले (९ डिसेंबर, १९९१ रोजी व तेव्हापासून).

**उदाहरणे**

'क' ला एक भाचा असून, 'क' आवश्यक केल्याप्रमाणे निष्पादित व निक्षिप्त न केलेल्या मृत्युपत्राने पुढीलप्रमाणे मृत्युपत्रित दान देतो :—

गरीब लोकांच्या सहाय्यासाठी ;

रुग्ण सैनिकांच्या निर्वाहासाठी ;

रुग्णालयाची उभारणी किंवा त्याचा खर्च चालवण्यासाठी ;

अनाथ बालकांच्या शिक्षणासाठी व त्यांच्या उन्नतीसाठी ;

विद्याभ्यासींच्या निर्वाहासाठी ;

शाळेची उभारणी किंवा तिचा खर्च चालवण्यासाठी ;

पुलाचे बांधकाम आणि दुरुस्ती यांसाठी ;

रस्ते तयार करण्यासाठी ;

चर्चची उभारणी किंवा त्याचा खर्च चालवण्यासाठी ;

चर्चच्या दुरुस्तीसाठी ;

धर्म पुरोहितांच्या लाभासाठी ;

सार्वजनिक उद्यानाची बांधणी किंवा त्याच्या देखभालीसाठी ;

ही सर्व मृत्युपत्रित दाने शून्य आहेत.

## प्रकरण आठ

### मृत्युपत्रित दाने निहित होण्याविषयी

**जेव्हा प्रदान किंवा कब्जा लांबणीवर टाकलेला असेल तेव्हा उत्तरदान निहित होण्याचा दिनांक.**

**११९.** मृत्युपत्रित दानाच्या शब्दयोजनेनुसार उत्तरदानग्राही हा मृत्युपत्राने दिलेल्या वस्तूचा तात्काळ कब्जा मिळण्यास हक्कदार नसेल तेथे, ती योग्य वेळी मिळण्याचा हक्क, मृत्युपत्रावरून विरुद्ध उद्देश दिसून न आल्यास, मृत्युपत्रकर्त्याचा मृत्यू होताच उत्तरदानग्राहीच्या ठायी निहित होईल आणि उत्तरदानग्राही त्या वेळेपूर्वी आणि उत्तरदान मिळाल्याशिवाय मृत्यू पावला तर त्याच्या प्रतिनिधीकडे जाईल आणि अशा प्रकरणी, उत्तरदान मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युपासून हितसंबंधापुरते निहित झाल्याचे म्हटले जाते.

**स्पष्टीकरण.**—मृत्युपत्रित दानाच्या एखाद्या उपबंधानुसार मृत्युपत्राने दिलेल्या गोष्टीचे प्रदान किंवा कब्जा लांबणीवर टाकण्यात आला असेल, किंवा अशा गोष्टीमधील पूर्वहितसंबंध अन्य कोणत्याही व्यक्तीस मृत्युपत्रान्वये दिला असेल, किंवा मृत्युपत्राने दिलेल्या निधीपासून येणारे उत्पन्न प्रदानाची वेळ येईपर्यंत संचित करून, ठेवण्याविषयी निदेश देण्यात आला असेल, किंवा एखादी विशिष्ट घटना घडली तर उत्तरदान दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रमित होईल अशी तरतूद तेथे केली असेल, तर अशा प्रसंगी, केवळ अशा प्रकारे उपबंध किंवा तरतूद करण्यात आली आहे म्हणून कोणत्याही व्यक्तीला दिलेले उत्तरदान हे त्या व्यक्तीच्या ठायी हितसंबंधापुरते निहित होणार नाही असा तेथे उद्देश असल्याचे अनुमान काढता येणार नाही.

**उदाहरणे**

(एक) 'क', 'ख', ला 'ग' चा मृत्यू होताच त्याला द्यावयाचे असे १०० रुपये मृत्युपत्राने देतो. 'क' चा मृत्यू होताच उत्तरदान 'ख' च्या ठायी हितसंबंधापुरते निहित होते आणि जर तो 'ग' च्या आधी मृत्यू पावला तर त्याचे प्रतिनिधी उत्तरदानाला हक्कदार होतात.

(दोन) 'क', 'ख' ला १०० रुपये मृत्युपत्राने देतो. तो अठरा वर्षे वयाचा होताच ते त्याला द्यावयाचे आहेत. 'क' चा मृत्यू होताच उत्तरदान 'ख' च्या ठायी हितसंबंधापुरते निहित होते.

(तीन) 'क' ला त्याच्या हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर 'ख' ला एक निधी मृत्युपत्राने दिला आहे. 'ख' ला दिलेले उत्तरदान मृत्युपत्रकर्त्याचा मृत्यू होताच 'ख' च्या ठायी हितसंबंधापुरते निहित होते.

(चार) 'ख' अठरा वर्षे वयाचा होईपर्यंत 'क' ला आणि त्यानंतर 'ख' ला एक निधी मृत्युपत्राने [illegible] आहे. 'ख' ला दिलेले उत्तरदान मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युपासून हितसंबंधापुरते निहित होते.

(पाच) 'क' आपली संपूर्ण संपत्ती तिच्या उत्पन्नातून विवक्षित ऋणे फेडण्यासाठी व [illegible] निधी 'क' कड हस्तांतरित करावा यासाठी न्यास म्हणून 'ख' ला मृत्युपत्राने देतो. 'ग' ला दि[illegible]तरदान त्याच्या ठायी 'क' च्या मृत्युपासून हितसंबंधापुरते निहित होते.

(सहा) ' क ', ' ख ' आणि ' ग ' यांना समसमान हिश्श्यांनी एक निधी दिलेला आहे. ते प्रत्येकी अठरा वर्षे वयाचे होताच तो त्यांना मिळावयाचा आहे. त्यात असे परंतुक घातलेले आहे की, ते सर्वच वयाच्या अठराव्या वर्षापूर्वी मृत्यू पावले तर उत्तरदान ' घ ' कडे प्रक्रांत होईल. मृत्युपत्रकर्त्याचा मृत्यू होताच ते हिस्से ' क ', ' ख ' आणि ' ग ' यांच्या ठायी हितसंबंधापुरते निहित होतात. पण क ', ' ख ' आणि ' ग ' हे सर्व अठराव्या वर्षापूर्वी मृत्यू पावल्यास ते निर्निहित होण्यास पात्र आहेत आणि त्यांच्यापैकी (शेवटचा उत्तरजीवी खेरीजकरून) कोणाचाही वयाच्या अठराव्या वर्षापूर्वी मृत्यू झाल्यास त्याचा निहित हितसंबंध त्याच्या प्रतिनिधीकडे जाईल, मात्र ते पूर्वोक्तप्रमाणे निर्निहित होण्यास पात्र राहील.

**जेव्हा उत्तरदान विनिर्दिष्ट घटनेवर समाश्रित असेल तेव्हा ते निहित होण्याचा दिनांक.**

**१२०.** (१) विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडल्यास द्यावयाचे असे मृत्युपत्राने दिलेले उत्तरदान ती घटना घडली नाही तोपर्यंत निहित होत नाही.

(२) विनिर्दिष्ट अनिश्चित घटना न घडल्यास द्यावयाचे असे मृत्युपत्राने दिलेले उत्तरदान ती घटना घडणे अशक्य झाले नाही तोपर्यंत निहित होत नाही.

(३) दोन्ही बाबतीत, शर्त पुरी होईपर्यंत उत्तरदानग्राहीचा हितसंबंध समाश्रित आहे असे म्हणतात.

**अपवाद.**—जेथे कोणत्याही व्यक्तीला ती विशिष्ट वयाची झाल्यास मिळावयाचा असा एक निधी मृत्युपत्राने दिला असून, मृत्युपत्राने तिला, ती त्या वयाची होण्यापूर्वी निधीतून येणारे उत्पन्नही संपूर्णपणे दिलेले असेल, अथवा उत्पन्न किंवा त्यापैकी जेवढे जरूर असेल तेवढे तिच्या लाभार्थ उपयोजित करण्याचा निदेश दिलेला असतो तेथे, निधीचे मृत्युपत्रित दान समाश्रित नसते.

**उदाहरणे**

(एक) ' घ ' ला ' क ', ' ख ' आणि ' ग ' हे सर्व वयाच्या अठराव्या वर्षापूर्वी मृत्यू पावल्यास मिळावयाचे असे उत्तरदान देण्यात आले आहे. ' क ', ' ख ' आणि ' ग ' हे सर्व अठराव्या वर्षापूर्वी मृत्यू पावलेले नाहीत किंवा त्यांच्यापैकी एकजण त्या वयाचा झालेला नाही तोपर्यंत ' घ ' चा उत्तरदानात समश्रित हितसंबंध आहे.

(दोन) ' क ' ला " तो अठरा वर्षे वयाचा झाल्यास " किंवा " तो अठरा वर्षे वयाचा होईल तेव्हा " पैशांची रक्कम मृत्यपत्राने दिली आहे. ' क ' चा उत्तरदानातील हितसंबंध, तो त्या वयाचा होऊन शर्त पुरी होईतोपर्यंत समाश्रित आहे.

(तीन) ' क ' ला त्याच्या हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर ' ख ' त्या वेळी हयात असेल तर त्याला पण जर ' ख ' त्या वेळी हयात नसेल तर ' ग ' ला एक संपदा मृत्युपत्राने दिलेली आहे. ' क ', ' ख ' व ' ग ' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहतात. ज्या घटनेमुळे हितसंबंध एकाच्या किंवा दुसऱ्याच्या ठायी निहित व्हावयाचा आहे ती घडली नाही तोपर्यंत ' ख ' व ' ग ' यांना प्रत्येकी संपदेत समाश्रित हितसंबंध मिळतो.

(चार) लगतपूर्वी घेतलेल्या उदाहणात सांगितल्याप्रमाणे एक संपदा मृत्युपत्राने दिली आहे ' ख ' हा ' क ' च्या आणि ' ग ' च्या हयातीत मृत्यू पावतो. ' क ' चा मृत्यू होताच संपदेचा कब्जा मिळविण्याचा निहित अधिकार ' ग ' ला ' ख ' चा मृत्यू होताच प्राप्त होतो.

(पाच) ' क ' ला ती अठरा वर्षे वयाची होईल तेव्हा किंवा ' ख ' च्या संमतीने तेवढ्या वयापूर्वी विवाह करील तेव्हा मिळावयाचे उत्तरदान मृत्युपत्राने असे परंतुक घालून दिले आहे की, जर ती अठरा वर्षे वयाची झाली नाही किंवा तिने तेवढ्या वयापूर्वी ' ख ' च्या संमतीने विवाह केला नाही तर उत्तरदान ' ग ' कडे जाईल. ' क ' आणि ' ग ' यांना उत्तरदानात प्रत्येकी समाश्रित हितसंबंध मिळतो. ' क ' अठरा वर्षे वयाची होते. जरी ' क ' ने अठराव्या वर्षापूर्वी ' ख ' च्या संमतीशिवाय विवाह केला असला तरी ती उत्तरदानास संपूर्णपणे हक्कदार होते.

(सहा) ' क ' ला, तो विवाह करीपर्यंत आणि त्या घटनेनंतर ' ख ' ला एक संपदा मृत्युपत्राने दिली गेली आहे. ' क ' चा विवाह होऊन शर्त पुरी होईपर्यंत ' ख ' चा मृत्युपत्रित दानातील हितसंबंध समाश्रित आहे.

(सात) ' क ' ला त्याने दिवाळखोर ऋणकोच्या ऋणमुक्तीसाठी असलेल्या कोणत्याही कायद्याचा फायदा घेतला नाही तोपर्यंत आणि त्या घटनेनंतर ' ख ' ला एक संपदा मृत्युपत्राने दिली आहे. ' क ' अंशा कायद्याचा फायदा घेईपर्यंत ' ख ' चा मृत्युपत्रित दानातील हितसंबंध समाश्रित आहे.

(आठ) ' क ' ला एक संपदा जर त्याने ' ख ' ला ५०० रुपये दिले तर ती मिळेल या शर्तीवर मृत्युपत्राने दिली गेली आहे ' क ' चा मृत्युपत्रित दानातील हितसंबंध तो ' ख ' ला ५०० रुपये देईपर्यंत समाश्रित आहे.

(नऊ) ' क ' आपले सुलतानपूर खुर्दचे शेत हे, जर ' ख ' ने आपले स्वतःचे सुलतानपूर बुद्रुकचे शेत ' ग ' ला अभिहस्तांतरित केले तर ' ख ' ला मिळेल या शर्तीवर ते त्यांच्यासाठी मागे ठेवतो. ' ख ' ते पहिले शेत ' ग ' ला अभिहस्तांतरित करीपर्यंत ' ख ' चा मृत्युपत्रित दानातील हितसंबंध समाश्रित राहील.

(दहा) ' क ' ला एक निधी, जर ' ख ' ने मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर पाच वर्षांच्या आत ' ग ' शी विवाह केला नाही तर ' क ' ला मिळेल या शर्तीवर मृत्युपत्राने दिला आहे. ' क ' ने ' ग ' शी विवाह न करताच पाच वर्षे संपून अथवा जिच्यामुळे शर्त पुरी होणे अशक्य होते अशी एखादी घटना त्या कालावधीत घडून शर्त पुरी होईपर्यंत ' क ' चा मृत्युपत्रित दानातील हितसंबंध समाश्रित आहे.

(अकरा) ' क ' ला एक निधी, ' ख ' ने त्याच्यासाठी मृत्युपत्राने काहीही तरतूद केली नाही तर मिळेल या शर्तीवर मृत्युपत्राने देण्यात आलेला आहे. ' ख ' चा मृत्यू होईपर्यंत उत्तरदान समाश्रित आहे.

(बारा) ' क ' हा ' ख ' ला, तो अठरा वर्षे वयाचा झाल्यावर द्यावयाचे असे दर वर्षाला ५०० रुपये मृत्युपत्राने देतो आणि तो त्या वयाचा होईपर्यंत व्याज किंवा पुरेसा भाग त्याच्या लाभार्थ उपयोजित करावा असे निदेशित करतो. उत्तरदान निहित आहे.

(तेरा) ' क ' हा ' ख ' ला ५०० रुपये तो अठरा वर्षे वयाचा होईल तेव्हा ते द्यावयाचे या शर्तीवर मृत्युपत्राने देतो आणि तो त्या वयाचा होईपर्यंत दुसऱ्या निधीतून विवक्षित रक्कम त्याच्या निर्वाहासाठी उपयोजित केली जावी असे निदेशित करतो. उत्तदान समाश्रित आहे.

**एखाद्या वर्गातील जे सदस्य विशिष्ट वयाचे होतील अशांना दिलेल्या मृत्युपत्रित दानातील हितसंबंध निहित होणे.**

**१२१.** जेथे एखाद्या वर्गातील जे सदस्य विशिष्ट वयाचे झालेले असतील अशांनाच केवळ मृत्युपत्रित दान दिले असेल तेथे, जी व्यक्ती त्या वयाची झालेली नसेल तिचा उत्तरदानात निहित हितसंबंध असू शकत नाही.

**उदाहरण**

' क ' च्या अपत्यांपैकी जी अपत्ये अठरा वर्षे वयाची होतील अशांना एक निधी मृत्युपत्राने दिला असून ' क ' चे कोणतेही अपत्य अठरा वर्षे वयाखालील असेल त्यावेळी ज्या हिश्श्याला ते परिणामी हक्कदार होईल असे गृहीत धरता येईल त्या हिश्श्याचे उत्पन्न त्याच्या निर्वाहासाठी आणि शिक्षणासाठी उपयोजित करावे असा आदेश दिला आहे. ' क ' चे कोणतेही अपत्य अठरा वर्षे वयाखालील असेल त्याच्या मृत्युपत्रित दानात निहित हितसंबंध नाही.

## प्रकरण नऊ

### भारयुक्त मृत्युपत्रित दानांविषयी

**भारयुक्त मृत्युपत्रित दाने.**

**१२२.** जेथे मृत्युपत्रित दानामुळे उत्तरदानग्राहीवर एखादे आबंधन येऊन पडते तेथे त्याने ते दान पूर्णपणे स्वीकारल्याशिवाय त्याला त्याद्वारे काहीही मिळू शकत नाही.

**उदाहरणे**

भरभराटीत असलेल्या (क्ष) या संयुक्त भांडवल कंपनीत ' क ' चे भाग आहेत व अडचणीत असलेल्या (य) या संयुक्त भांडवल कंपनीतही, त्याचे भाग असून त्यातील भागावर मोठ्या प्रमाणात तूटभरपाईच्या मागण्या येणे अपेक्षित आहे. संयुक्त भांडवल कंपन्यांतील आपले सर्व भाग ' क ' हा ' ख ' ला मृत्युपत्राने देतो ; ' क ' (य) मधील भाग घेण्यास नकार देतो, तो (क्ष) मधील भाग गमावतो.

**त्याच व्यक्तीला दिलेल्या दोन अलग आणि स्वतंत्र मृत्युपत्रित दानांपैकी एक स्वीकारता येईल आणि दुसरे नाकारता येईल.**

**१२३.** जेथे मृत्युपत्रात त्याच व्यक्तीला दिलेले दोन अलग व स्वतंत्र मृत्युपत्रित दाने अंतर्भूत असतात तेथे जरी त्यापैकी एक लाभप्रद असून दुसरे भारयुक्त असले तरी, उत्तरदानग्राहीला पहिले स्वीकारण्याचे आणि दुसरे नाकारण्याचे स्वातंत्र्य असते.

**उदाहरण**

' क ' कडे एका घराचा काही वर्षांच्या मुदतीचा भाडेपट्टा असून, ते भाडे तो आणि त्याचे प्रतिनिधी त्या मुदतीत भरण्यास बांधलेले आहेत आणि जितक्या भाड्याने घर देता येईल त्याहून ते जास्त आहे ; तो ' ख ' ला भाडेपट्टा आणि पैशाची रक्कम मृत्युपत्राने देतो. ' ख ' भाडेपट्टा स्वीकारण्यास नकार देतो. तो या नकाराने पैसे गमावणार नाही.

## प्रकरण दहा

### समाश्रित मृत्युपत्रित दानांविषयी

**१२४.** जेथे एखादे उत्तदान विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडल्यास मिळावयाचे म्हणून दिलेले असून ती घटना घडण्यासाठी कोणतीही वेळ मृत्युपत्रात उल्लेखिलेली नसते तेथे, मृत्युपत्राने दिलेला निधी ज्याकाळी प्रदेय किंवा वितरणीय असतो त्यापूर्वी अशी घटना घडल्याशिवाय उत्तरदान परिणामक होऊ शकत नाही. **विनिर्दिष्ट अनिश्चित घटनेवर समाश्रित मृत्युपत्रित दान, ती घडण्यासाठी कोणतीही वेळ उल्लेखिलेली नसताना.**

**उदाहरणे**

(एक) 'क' ला आणि त्याचा मृत्यू झाल्यास 'ख' ला मृत्युपत्राने, उत्तरदान दिले गेले आहे. जर 'क' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहिला तर 'ख' ला दिलेले उत्तरदान परिणामक होत नाही.

(दोन) 'क' ला आणि तो विनापत्य मृत्यू पावल्यास 'ख' ला मृत्युपत्राने उत्तरदान दिले गेले आहे. जर 'क' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहिला किंवा त्याच्या हयातीत एखादे अपत्य मागे ठेवून मृत्यू पावला तर, 'ख' ला दिलेले उत्तरदान परिणामक होत नाही.

(तीन) 'क' ला तो अठरा वर्षे वयाचा होईल तर व होईल तेव्हा मिळावे आणि त्याचा मृत्यू झाल्यास 'ख' ला मिळावे असे एक उत्तरदान मृत्युपत्राने दिले गेले आहे. 'क' अठरा वर्षे वयाचा होतो 'ख' ला दिलेले उत्तरदान परिणामक होत नाही.

(चार) 'क' ला हयातीकरिता आणि त्याच्या मृत्युनंतर 'ख' ला आणि 'ख' विनापत्य मृत्यू पावल्यास 'ग' ला मृत्युपत्राने उत्तरदान दिले गेले आहे. "ख विनापत्य मृत्यू पावल्यास" या शब्दाचा अर्थ "'ख' हा 'क' च्या हयातीत मृत्यू पावल्यास" असा समजावयाचा आहे.

(पाच) 'क' ला हयातीकरिता आणि त्याच्या मृत्युनंतर 'ख' ला आणि "ख मृत्यू पावल्यास" 'ग' ला मृत्युपत्राने उत्तरदान दिले गेले आहे. "ख मृत्यू पावल्यास" या शब्दांचा अर्थ "'ख' हा 'क' च्या हयातील मृत्यू पावल्यास" असा मानावयाचा आहे.

**१२५.** जेथे विवक्षित व्यक्तींपैकी ज्या कोणी एखाद्या काळी हयात राहिल्या असतील अशांना मृत्युपत्रित दान दिलेले असेल, पण नेमका काळ विनिर्दिष्ट केला नसेल तेथे, मृत्युपत्रावरून विरुद्ध उद्देश दिसून येत नसल्यास प्रदानाच्या किंवा वितरणाच्या वेळी त्यांच्यापैकी ज्या व्यक्ती हयात असतील अशांकडे ते उत्तरदान जाईल. **विनिर्दिष्ट नसेल अशा एखाद्या काळी विवक्षित व्यक्तींपैकी हयात राहतील अशांना मृत्युपत्रित दान.**

**उदाहरणे**

(एक) एक संपत्ती 'क' आणि 'ख' यांना, त्यांच्यात समसमान विभागून किंवा त्यांच्यापैकी जो उत्तरजीवी असेल त्याला मृत्युपत्राने दिली आहे. जर 'क' आणि 'ख' दोघेही मृत्युपत्रकर्त्याच्यामागे हयात राहिले तर उत्तरदान त्यांच्यात समसमान विभागले जाते. जर 'क' मृत्युपत्रकर्त्याच्या आधी मृत्यू पावला आणि 'ख' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहिला तर ती 'ख' कडे जाते.

(दोन) एक संपत्ती 'क' ला हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर 'ख' आणि 'ग' यांना त्यांच्यात समसमान विभागून किंवा त्यांच्यापैकी जो उत्तरजीवी असेल त्याला मृत्युपत्राने दिली आहे. 'ख' हा 'क' च्या हयातीत मृत्यू पावतो ; 'ग' हा 'क' च्या मागे हयात राहतो. 'क' चा मृत्यू होताच उत्तरदान 'ग' कडे जाते.

(तीन) 'क' ला हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर 'ख' व 'ग' यांना किंवा त्यांच्यापैकी उत्तरजीवी असेल त्याला मृत्युपत्राने संपत्ती दिली गेली असून जर 'ख' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहिला नाही तर त्याच्या अपत्यांनी त्याची जागा घ्यावी असा निदेश दिलेला आहे. 'ग' हा मृत्युपत्रकर्त्याच्या हयातीत मृत्यु पावतो ; 'ख' मृत्युपत्रकर्त्याच्या मागे हयात राहतो ; पण 'क' च्या हयातीत मृत्यू पावतो. उत्तरदान 'ख' च्या प्रतिनिधीकडे जाते.

(चार) 'क' ला हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर 'ख' व 'ग' यांना मृत्युपत्राने संपत्ती दिली गेली आहे व त्यांच्यापैकी कोणीही 'क' च्या हयातीत मृत्यु पावल्यास ती संपूर्णपणे उत्तरजीवीकडे जावी असा निदेश दिलेला आहे. 'ख' हा 'क' च्या हयातीत मृत्यू पावतो. नंतर 'क' च्या हयातीत 'ग' मृत्यू पावतो, उत्तरदान 'ग' च्या प्रतिनिधीकडे जाते.

## प्रकरण अकरा

### सशर्त मृत्युपत्रित दानांविषयी

**१२६.** अशक्य शर्तीवर दिलेले मृत्युपत्रित दान शून्य असते. **अशक्य शर्तीवर दिलेले मृत्युपत्रित दान.**

**उदाहरणे**

(एक) 'क' ने एका तासात १०० मैल चालले पाहिजे या शर्तीवर त्याला संपदा मृत्युपत्राने दिली आहे. मृत्युपत्रित दान शून्य आहे.

(दोन) ‘ ख ’ ने ‘ क ’ च्या मुलीशी विवाह केला पाहिजे या शर्तीवर ‘ क ’ त्याला मृत्युपत्राने ५०० रुपये देतो मृत्युपत्राच्या वेळी ‘ क ’ ची मुलगी मृत होती. मृत्युपत्रित दान शून्य आहे.

**अवैध किंवा अनैतिक शर्तीवर मृत्युपत्रित दान.**

**१२७.** ज्या शर्तीची पूर्तता कायद्याच्या किंवा नीतिमत्तेच्या विरुद्ध होईल अशा शर्तीवर दिलेले मृत्युपत्रित दान शून्य असते.

**उदाहरणे**

(एक) ‘ ख ’ ने ‘ ग ’ चा खून केला पाहिजे या शर्तीवर ‘ क ’ त्याला मृत्युपत्राने ५०० रुपये देतो. मृत्युपत्रित दान शून्य आहे.

(दोन) ‘ क ’ आपल्या पुतणीला, तिने स्वतःच्या पतीच्या अभित्याग केला तर तिला ५०० रुपये मिळावेत असे मृत्युपत्रित दान करतो. मृत्युपत्रित दान शून्य आहे.

**उत्तरदान निहित होण्यास पूर्ववर्ती असलेल्या शर्तीची पूर्तता.**

**१२८.** जेथे मृत्युपत्राने दिलेल्या वस्तूत उत्तरदानग्राही निहित हितसंबंध घेऊ शकण्यापूर्वी पुरी करावयाची अशी शर्त मृत्युपत्राद्वारे लादली जाते तेथे, शर्तीचे सारतः अनुपालन करण्यात आले असल्यास ती पुरी झाल्याचे समजले जाईल.

**उदाहरणे**

(एक) ‘ क ’ ने ‘ ख ’, ‘ ग ’, ‘ घ ’ आणि ‘ ङ ’ यांचा संमतीने विवाह केला पाहिजे या शर्तीवर त्याला मृत्युपत्राने उत्तरदान दिले गेले आहे. ‘ क ’ हा ‘ ख ’ च्या लेखी संमतीने विवाह करतो. ‘ ग ’ विवाहाच्या वेळी उपस्थित आहे. ‘ घ ’ ‘ क ’ ला विवाहापूर्वी अहेर पाठवितो. ‘ क ’ ने ‘ ङ ’ ला व्यक्तिशः आपला उद्देश कळवला असून त्याने त्यास आक्षेप घेतलेला नाही. ‘ क ’ ने शर्त पुरी केली आहे.

(दोन) ‘ क ’ ने ‘ ख ’, ‘ ग ’ आणि ‘ घ ’ यांच्या संमतीने विवाह केला पाहिजे या शर्तीवर त्याला मृत्युपत्राने उत्तरदान दिले गेले आहे. ‘ घ ’ मृत्यू पावतो. ‘ क ’ हा ‘ ख ’ आणि ‘ ग ’ यांच्या संमतीने विवाह करतो. ‘ क ’ ने शर्त पुरी केली आहे.

(तीन) ‘ क ’ ने ‘ ख ’, ‘ ग ’ आणि ‘ घ ’ यांचा संमतीने विवाह केला पाहिजे या शर्तीवर त्याला मृत्युपत्राने उत्तरदान दिले गेले आहे. ‘ क ’ हा ‘ ख ’, ‘ ग ’ व ‘ घ ’ यांच्या हयातीत केवळ ‘ ख ’ व ‘ ग ’ यांच्या संमतीने विवाह करतो. ‘ क ’ ने शर्त पुरी केलेली नाही.

(चार) ‘ क ’ ने ‘ ख ’, ‘ ग ’ आणि ‘ घ ’ यांचा संमतीने विवाह केला पाहिजे या शर्तीवर त्याला मृत्युपत्राने उत्तरदान दिले गेले आहे. ‘ क ’ ‘ ङ ’ शी व्हावयाच्या आपल्या विवाहास ‘ ख ’, ‘ ग ’ आणि ‘ घ ’ यांची बिनशर्त अनुमती मिळवतो. नंतर ‘ ख ’, ‘ ग ’ आणि ‘ घ ’ लहरीखातर आपली संमती मागे घेतात. ‘ क ’ ‘ ङ ’ शी विवाह करतो. ‘ क ’ ने शर्त पुरी केली आहे.

(पाच) ‘ क ’ ने ‘ ख ’, ‘ ग ’ आणि ‘ घ ’ यांचा संमतीने विवाह केला पाहिजे या शर्तीवर त्याला मृत्युपत्राने उत्तरदान दिले गेले आहे. ‘ क ’ हा ‘ ख ’, ‘ ग ’ व ‘ घ ’ यांच्या संमतीशिवाय विवाह करतो, पण विवाहानंतर त्यांची संमती मिळवतो. ‘ क ’ ने शर्त पुरी केलेली नाही.

(सहा) ‘ क ’ आपले मृत्युपत्र करून त्याद्वारे ‘ ख ’ ला, जर त्याने ‘ क ’ च्या मृत्युपत्रव्यवस्थापकांच्या संमतीने विवाह केला तर द्यावयाची म्हणून पैशाची रक्कम मृत्युपत्राने देतो. ‘ ख ’ हा ‘ क ’ च्या हयातीत विवाह करतो आणि ‘ क ’ नंतर विवाहास आपली पसंती दर्शवतो. ‘ क ’ मृत्यू पावतो. ‘ ख ’ ला मृत्युपत्रित दान परिणामक होते.

(सात) ‘ क ’ ला मृत्युपत्राने एक उत्तरदान, जर मृत्युपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अवधीत त्याने विवक्षित दस्तऐवज निष्पादित केला तर ते मिळेल अशा शर्तीवर दिले गेले आहे. ‘ क ’ ने वाजवी अवधीत दस्तऐवज निष्पादित केला आहे, पण मृत्युपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या अवधीच्या आत नाही. ‘ क ’ ने शर्तीचे पालन केलेले नाही आणि उत्तरदान मिळण्यास तो हक्कदार नाही.

**‘ ख ’ ला दिलेले पूर्वमृत्युपत्रित दान निष्फळ झाल्यास ‘ क ’ ला मृत्युपत्रित दान.**

**१२९.** जेथे एका व्यक्तीला मृत्युपत्रित दान दिलेले असून त्याच वस्तूचे मृत्युपत्रित दान दुसरीला दिलेले असेल तेथे, पूर्वमृत्युपत्रित दान निष्फळ झाल्यास---मग ती निष्फळता मृत्युपत्रकर्त्याने पूर्वी कल्पिलेल्या रीतीने घडून आलेली नसली तरीही---दुसरे मृत्युपत्रित दान परिणामक होईल.

### उदाहरणे

(एक) ' क ' हा आपल्यामागे हयात राहणाऱ्या आपल्या स्वतःच्या अपत्यांना आणि ती सर्व अठराव्या वर्षापूर्वी मृत्यू पावल्यास ' ख ' ला पैशाची रक्कम मृत्युपत्राने देतो. ' क ' केव्हाही अपत्य न होता मृत्यू पावतो. ' ख ' ला दिलेले मृत्युपत्रित दान परिणामक होते.

(दोन) ' क ' ' ख ' ला, त्याने ' क ' च्या मृत्युनंतर तीन महिन्यांच्या आत विवक्षित दस्तऐवज निष्पादित केला पाहिजे या शर्तीवर, आणि त्याने तसे करण्याकडे दुर्लक्ष केले तर, ' ग ' ला पैशाची रक्कम मृत्युपत्राने देतो. ' ख ' मृत्युपत्रकर्त्याच्या हयातीत मृत्यू पावतो. ' ग ' ला दिलेले मृत्युपत्रित दान परिणामक होते.

**पहिले मृत्युपत्रित दान निष्फळ झाल्यावर दुसरे केव्हा परिणामक व्हावयाचे नाही.**

**१३०.** जेथे पहिले मृत्युपत्रित दान विशिष्ट रीतीने निष्फळ झाले तरच दुसरे मृत्युपत्रित दान परिणामक व्हावे असा उद्देश मृत्युपत्रात दर्शविला असेल तेथे, पूर्व मृत्युपत्रित दान त्या विशिष्ट रीतीने निष्फळ झाल्याशिवाय दुसरे मृत्युपत्रित दान परिणामक होणार नाही.

### उदाहरण

' क ' आपल्या पत्नीला मृत्युपत्रित दान देतो, पण ती त्याच्या हयातीत मृत्यू पावल्यास, त्याने तिला मृत्युपत्राने जे दिले होते ते तो ' ख ' ला मृत्युपत्राने देतो. ' क ' व त्याची पत्नी अशा परिस्थितीत एकत्र मृत्यू पावतात की त्यामुळे ती त्याच्या आधी मृत्यू पावली हे सिद्ध करणे अशक्य होते ; ' ख ' ला दिलेले मृत्युपत्रित दान परिणामक होत नाही.

**विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडण्याच्या किंवा न घडण्याच्या शर्तीवर आपरिवर्ती मृत्युपत्रित दान.**

**१३१.** (१) कोणत्याही व्यक्तीला मृत्युपत्रित दान देताना अशी आणखी शर्त घालता येईल की, विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडल्यास मृत्युपत्राने दिलेली वस्तू दुसऱ्या व्यक्तीकडे जाईल किंवा विनिर्दिष्ट अनिश्चित घटना न घडल्यास मृत्युपत्राने दिलेली वस्तू दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रामित होईल.

(२) प्रत्येक प्रकरणी आपरिवर्ती मृत्युपत्रित दान कलमे १२०, १२१, १२२, १२३, १२४, १२५, १२६, १२७, १२९ आणि १३० यांत अंतर्भूत असलेल्या नियमांच्या अधीन असते.

### उदाहरणे

(एक) मृत्युपत्राने ' क ' ला काही पैशांची रक्कम, ती त्याला अठराव्या वर्षी द्यावयाची म्हणून, आणि तो तेवढ्या वयाचा होण्यापूर्वी मृत्यू पावला तर ' ख ' ला दिलेली आहे. ' क ' ला उत्तरदानात निहित हितसंबंध मिळाला असून ' क ' अठराव्या वर्षापूर्वी मृत्यू पावल्यास तो हितसंबंध निर्निहित होऊन ' ख ' कडे जाण्यास पात्र आहे.

(दोन) ' क ' ला मृत्युपत्राने एक संपदा असे परंतुक घालून दिलेली आहे की, जर ' क ' ने मृत्युपत्र करण्याच्या मृत्युपत्रकर्त्याच्या सक्षमतेला हरकत घेतली तर संपदा ' ख ' कडे जाईल. ' क ' मृत्युपत्र करण्याच्या मृत्युपत्रकर्त्याच्या सक्षमतेला हरकत घेतो. संपदा ' ख ' कडे जाते.

(तीन) मृत्युपत्राने ' क ' ला त्याच्या हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर ' ख ' ला काही पैशाची रक्कम दिली आहे ; पण जर ' ख ' ' क ' च्या मृत्युच्या वेळी एखादा मुलगा मागे ठेवून मृत्यू पावला तर असा मुलगा ' ख ' ची जागा घेईल, असे म्हटले आहे. ' ख ' ला उत्तरदानात निहित हितसंबंध मिळाला असून, तो ' क ' च्या हयातीत मुलगा मागे ठेवून मृत्यू पावला तर तो हितसंबंध निर्निहित होण्यास पात्र आहे.

(चार) मृत्युपत्राने ' क ' व ' ख ' यांना आणि त्यांच्यापैकी कोणीही ' ग ' च्या हयातीत मृत्यू पावला तर ' ग ' च्या मृत्युसमयी त्यांच्यापैकी हयात राहील त्याला काही पैशाची रक्कम दिली आहे. ' क ' व ' ख ' हे ' ग ' च्या आधी मृत्यू पावतात. आपरिवर्ती दान परिणामक होत नाही. पण ' क ' च्या प्रतिनिधीला निम्मे पैसे आणि निम्मे पैसे ' ख ' च्या प्रतिनिधीला मिळतात.

(पाच) ' क ' हा ' ख ' ला हयातीकरता एका निधीवरील व्याज मृत्युपत्राने देतो आणि तिचा मृत्यू होताच तो निधी तिच्या तीन अपत्यांमध्ये किंवा तिच्या मृत्युसमयी त्यांच्यापैकी हयात असतील त्यांच्यामध्ये समसमान विभागला जावा असा निदेश देतो. ' ख ' ची सर्व अपत्ये ' ख ' च्या हयातीत मृत्यू पावतात. आपरिवर्ती मृत्युपत्रित दान परिणामक होत नाही, पण अपत्यांचे हितसंबंध त्यांच्या प्रतिनिधीकडे जातात.

**शर्त काटेकोरपणे पुरी झाली पाहिजे.**

**१३२.** कलम १३१ खाली कल्पिलेल्या प्रकाराचे आपरिवर्ती मृत्युपत्रित दान शर्त काटेकोरपणे पुरी झाल्याशिवाय परिणामक होऊ शकत नाही.

**उदाहरणे**

(एक) ‘ क ’ ला मृत्युपत्राने उत्तरदान करताना असे परंतुक घातलेले आहे की, जर त्याने ‘ ख ’, ‘ ग ’ आणि ‘ घ ’ यांच्या संमतीशिवाय विवाह केला तर उत्तरदान ‘ ङ ’ ला मिळेल. ‘ घ ’ मृत्यू पावतो. जरी ‘ क ’ ने फक्त ‘ ख ’ आणि ‘ ग ’ यांच्या संमतीशिवाय विवाह केला तरी ‘ ङ ’ ला दिलेले दान परिणामक होत नाही.

(दोन) ‘ क ’ ला मृत्युपत्राने उत्तरदान करताना असे परंतुक घातलेले आहे की, जर त्याने ‘ ख ’ च्या संमतीशिवाय विवाह केला तर उत्तरदान ‘ ग ’ ला मिळेल. ‘ क ’ ‘ ख ’ च्या संमतीने विवाह करतो. नंतर तो विधुर होतो आणि ‘ ख ’ च्या संमतीशिवाय पुन्हा विवाह करतो. ‘ ग ’ ला दिलेले मृत्युपत्रित दान परिणामक होत नाही.

(तीन) ‘ क ’ ला मृत्युपत्राने उत्तरदान करताना असे परंतुक घातलेले आहे की, जर ‘ क ’ अठराव्या वर्षापूर्वी मृत्यू पावला किंवा त्याने ‘ ख ’ च्या संमतीशिवाय विवाह केला तर उत्तरदान ‘ ग ’ ला मिळेल. ‘ क ’ हा ‘ ख ’ च्या संमतीशिवाय अठराव्या वर्षापूर्वी विवाह करतो. ‘ ग ’ ला दिलेले मृत्युपत्रित दान परिणामक होते.

**मूळच्या मृत्युपत्रित दानावर दुसऱ्या मृत्युपत्रित दानाच्या विधिबाह्यतेचा परिणाम होत नाही.**

**१३३.** जर आपरिवर्ती मृत्युपत्रित दान विधिग्राह्य नसेल तर त्याचा मूळच्या मृत्युपत्रित दानावर परिणाम होत नाही.

**उदाहरणे**

(एक) मृत्युपत्राने ‘ क ’ ला त्याच्या हयातीकरता एक संपदा देताना आणखी अशी शर्त घातलेली आहे की, जर तो सांगितलेल्या दिवशी एका तासात १०० मैल चालला नाही तर संपदा ‘ ख ’ कडे जाईल. शर्त शून्य असल्यामुळे जणू काही मृत्युपत्रात कोणतीही शर्त घातलेली नसावी त्याप्रमाणे ‘ क ’ कडे संपदा राहते.

(दोन) मृत्युपत्राने ‘ क ’ ला तिच्या हयातीकरता आणि जर तिने आपल्या पतीचा अभित्याग केला नाही तर ‘ ख ’ ला एक संपदा दिली आहे. मृत्युपत्रात जणू काही कोणतीही शर्त घातलेली नसावी त्याचप्रमाणे ‘ क ’ आपल्या हयातीत संपदेला हक्कदार होते.

(तीन) मृत्युपत्राने ‘ क ’ ला हयातीकरता आणि जर त्याने विवाह केला तर ‘ ख ’ च्या ज्येष्ठ मुलाला हयातीकरता एक संपदा दिली आहे. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी ‘ ख ’ ला मुलगा नव्हता. आपरिवर्ती मृत्युपत्रित दान कलम १०५ खाली शून्य आहे, आणि ‘ क ’ आपल्या हयातीत संपदेस हक्कदार होतो.

**विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडल्यास किंवा न घडल्यास मृत्युपत्रित दान परिणामक असण्याचे बंद होईल अशा शर्तीवर मृत्युपत्रित दान.**

**१३४.** मृत्युपत्रित दान देताना, विनिर्दिष्ट अनिश्चित घटना घडल्यास किंवा विनिर्दिष्ट अनिश्चित घटना न घडल्यास मृत्युपत्रित दान परिणामक असण्याचे बंद होईल अशी आणखी शर्त घालता येईल.

**उदाहरणे**

(एक) मृत्युपत्राने ‘ क ’ ला त्याच्या हयातीकरता एक संपदा देऊन असे परंतुक घातले आहे की, त्याने विवक्षित जंगल तोडल्यास मृत्युपत्रित दान कोणत्याही प्रकारे परिणामक राहणार नाही. ‘ क ’ जंगल तोडतो. तो संपदेतील आपला आजीव हितसंबंध गमावतो.

(दोन) ‘ क ’ ला मृत्युपत्राने संपदा दिली आहे, परंतु मृत्युपत्रात नामनिर्दिष्ट केलेल्या मृत्युपत्रव्यवस्थापकांच्या संमतीशिवाय त्याने २५ व्या वर्षापूर्वी विवाह केल्यास संपदा त्याच्या मालकीची राहणार नाही असे परंतुक घातले आहे. ‘ क ’ मृत्युपत्रव्यवस्थापकांच्या संमतीशिवाय २५ व्या वर्षापूर्वी विवाह करतो. सपंदा त्याच्या मालकीची राहत नाही.

(तीन) ‘ क ’ ला मृत्युपत्राने संपदा दिली आहे, परंतु मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यनंतर तीन वर्षांच्या आत तो इंग्लंडला न गेल्यास संपदेत त्याचा हितसंबंध असण्याचे बंद होईल असे परंतुक घातले आहे. ‘ क ’ विहित मुदतीत इंग्लंडला जात नाही. त्याचा संपदेत हितसंबंध राहत नाही.

(चार) ‘ क ’ ला मृत्युपत्राने संपदा दिलेली असून असे परंतुक घातले आहे की, ती जोगीण झाल्यास संपदेत तिचा कोणताही हितसंबंध राहणार नाही. ‘ क ’ जोगीण होते. ती मृत्युपत्राखालील आपला हितसंबंध गमावते.

(पाच) ‘ क ’ ला हयातीकरता आणि मृत्यूनंतर ‘ ख ’ त्यावेळी हयात असला तर ‘ ख ’ ला मृत्युपत्राने एक निधी दिलेला असून, असे परंतुक घातले आहे की, ‘ ख ’ जोगीण झाली तर तिला दिलेले मृत्युपत्रित दान कोणत्याही प्रकारे परिणामक राहणार नाही. ‘ ख ’ ही ‘ क ’ च्या हयातीत जोगीण होते. ती त्यामुळे निधीतील आपला समाश्रित हितसंबंध गमावते.

१३५. मृत्युपत्रित दान परिणामक असण्याचे थांबेल अशी शर्त विधिग्राह्य व्हायला पाहिजे असेल तर ती शर्त ज्या घटनेसंबंधी असेल ती घटना कलम १२० ने कल्पिल्यानुसार एखाद्या मृत्युपत्रित दानाची विधितः शर्त होऊ शकेल अशी असणे जरुरीचे आहे. अशी शर्त कलम १२० खाली विधिबाह्य असता कामा नये.

१३६. मृत्युपत्रित दान दिलेले असून जर आणखी अशी शर्त घातलेली असेल की, उत्तरदानग्राहीने विवक्षित कृती केली नाही तर मृत्युपत्रित दानाची विषयवस्तू दुसऱ्या व्यक्तीकडे जाईल किंवा मृत्युपत्रित दान परिणामक राहणार नाही. पण कृतीच्या पालनसाठी कोणताही अवधी विनिर्दिष्ट केलेला नसेल तेथे, आवश्यक कृतीचे पालन ज्यामुळे अशक्य होईल किंवा अनिश्चित काळ लांबणीवर पडेल असे कोणतेही पाऊल, उत्तरदानग्राहीने टाकल्यास उत्तरदानग्राही जणू काही अशा कृतीचे पालन केल्याशिवाय मृत्यू पावला असल्याप्रमाणे उत्तरदान, केले जाईल. ज्या कृतीसाठी अवधी विनिर्दिष्ट केलेला नाही आणि जिचे पालन न झाल्यास विषयवस्तू दुसऱ्याकडे संक्रामित व्हावयाची आहे, ती कृती उत्तरदानग्राहीने अशक्य केल्याची किंवा अनिश्चित काळ लांबणीवर टकल्याची परिणती.

### उदाहरणे

(एक) 'क' ला मृत्युपत्रित दान दिलेले असून असे परंतुक घातलेले आहे की, तो सैन्यात भरती झाला नाही तर उत्तरदान 'ख' कडे संक्रामित होईल. 'क' रोमन कॅथॉलिक धर्मसेवेची दीक्षा घेतो आणि त्यामुळे त्याला शर्त पुरी करणे अशक्य होते. 'ख' उत्तरदान मिळण्यास हक्कदार आहे.

(दोन) 'क' ला मृत्युपत्रित दान दिलेले असून असे परंतुक घातलेले आहे की, जर त्याने 'ख' च्या मुलीशी विवाह केला नाही तर ते कोणत्याही प्रकारे परिणामक राहणार नाही. 'क' दुसरीशी विवाह करतो आणि त्यामुळे शर्तीची पूर्तता अनिश्चित काळ लांबणीवर पडते. मृत्युपत्रित दान परिणामक राहत नाही.

१३७. एकतर उत्तरदान उपभोगले जाण्यापूर्वी पुरी करावयाची शर्त म्हणून अथवा जिची पूर्तता न केल्यास मृत्युपत्रित दानाची विषयवस्तू दुसऱ्या व्यक्तीकडे जावयाची आहे किंवा मृत्युपत्रित दान परिणामक असण्याचे थांबणार आहे अशी शर्त म्हणून विनिर्दिष्ट अवधीत उत्तरदानग्राहीने एखादी कृती करणे हे मृत्युपत्राने आवश्यक केले असेल तेथे, कपट नसेल तर, त्या कृतीचे विनिर्दिष्ट अवधीच्या आत पालन केले पाहिजे ; अन्यथा अशा कृतीच्या पालनास कपटामुळे प्रतिबंध झाल्यास त्याबाबतीत अशा कपटामुळे झालेला विलंब भरून काढण्यासाठी आवश्यक होईल तितका आणखी अवधी दिला जाईल. विनिर्दिष्ट पूर्ववर्ती किंवा उत्तरवर्ती शर्तीचे पालन, कपट प्रकरणी आणखी अवधी.

## प्रकरण बारा

### उपयोजन किंवा उपभोग यांबाबतच्या निदेशांसह केलेल्या मृत्युपत्रित दानांविषयी

१३८. जेथे कोणत्याही व्यक्तीला किंवा तिच्या लाभार्थ एखादा निधी अबाधितपणे मृत्युपत्राने दिला असेल, पण तो विशिष्ट रीतीने उपयोजिला किंवा उपभोगला जावा असा निदेश मृत्युपत्रात अंतर्भूत नसावा त्याप्रमाणे उत्तरदानग्राही असा निधी मिळण्यास हक्कदार असतो. कोणत्याही व्यक्तीला किंवा तिच्या लाभार्थ अबाधित मृत्युपत्रित दान देऊन तो निधी विशिष्ट रीताने वापरावयाचा असा निदेश देणे.

### उदाहरण

'क' साठी ग्रामीण भागात घर खरेदी करण्यासाठी किंवा 'क' साठी वर्षासन खरेदी करण्यासाठी किंवा 'क' ला कोणत्याही धंद्यात प्रस्थापित करण्यासाठी पैशाची रक्कम मृत्युपत्राने दिलेली आहे. 'क' ते उत्तरदान पैशाच्या रूपात घेण्याचे पसंत करतो. तो तसे करण्यास हक्कदार आहे.

१३९. जेथे मृत्युपत्रकर्ता मृत्युपत्राने एक निधी त्याच्या स्वतःच्या संपदेतून वेगळा काढला जाईल अशा प्रकारे अबाधितपणे देतो, पण जेणेकरून उत्तरदानग्राहीने त्याच्या उपभोगाची पद्धती उत्तरदानग्राहीला विनिर्दिष्ट लाभ प्राप्त करून दिला जाईल अशा प्रकारे निर्बंधित करावी असा निदेश देतो तेथे, तो लाभ उत्तरदानग्राहीसाठी मिळवून देणे शक्य नसेल तर जणू काही त्या मृत्युपत्रात असा कोणताही निदेश दिलेला नसावा त्याप्रमाणे तो निधी त्याच्या मालकीचा होतो. उत्तरदानग्राहीला विनिर्दिष्ट लाभ प्राप्त करून देण्यासाठी अबाधित मृत्युपत्रित दानाच्या उपभोगाच्या पद्धतीवर निर्बंध घालावयाचा असा निदेश.

### उदाहरणे

(एक) 'क' मृत्युपत्राने आपल्या संपत्तीचा अवशिष्ट आपल्या मुलींमध्ये समसमान विभागून देतो, आणि मुलींच्या हिश्श्याची त्यांच्या हयातीकरता त्यांच्या प्रीत्यर्थ नेमणूक करून दिली जावी आणि त्यांच्या मृत्युनंतर ते त्यांच्या अपत्यांना दिले जावेत असा निदेश देतो, त्या सर्व मुली विवाह न होताच मृत्यू पावतात. प्रत्येक मुलीचे प्रतिनिधी अवशिष्टातील तिच्या हिश्श्याला हक्कदार आहेत.

(दोन) 'क' आपल्या मुलींसाठी पैशाची रक्कम उभारण्याचा आपल्या विश्वस्तांना निदेश देतो आणि नंतर, त्यांनी त्या निधीची गुंतवणूक करावी आणि त्यातून येणारे उत्पन्न तिच्या हयातीत तिला द्यावे, आणि तिच्या मृत्युनंतर मूलधन तिच्या अपत्यांमध्ये विभागून द्यावे असा निदेश देतो. मुलगी एकही अपत्य न होता मृत्यु पावते. तिचे प्रतिनिधी त्या निधीस हक्कदार आहेत.

विवक्षित प्रयोजनांसाठी निधीचे मृत्युपत्रित दान केले असून त्यापैकी काही पुरी होऊ शकत नसतील तर.

**१४०.** जेथे मृत्युपत्रकर्ता मृत्युपत्राने एक निधी जेणेकरून तो त्याच्या स्वतःच्या संपदेतून वेगळा काढला जाईल अशा प्रकारे अबाधितपणे देत नाही, पण तो विवक्षित प्रयोजनांसाठी देतो आणि त्या प्रयोजनांचा काही भाग पुरा केला जाऊ शकत नाही तेथे, निधी किंवा मृत्युपत्राने कल्पिलेल्या उद्दिष्टांसाठी त्यापैकी जितका संपला नसेल तितका अंश मृत्युपत्रकर्त्याच्या संपदेचा भाग म्हणून राहतो.

**उदाहरणे**

(एक) ' क ' हा आपल्या विश्‍वस्तांनी पैशाची रक्कम विशिष्ट प्रकारे गुंतवावी आणि आपल्या मुलाच्या हयातीकरता व्याज द्यावे व त्याचा मृत्यु होताच मूलधन त्याच्या अपत्यांमध्ये विभागून द्यावे, असा त्यांना निदेश देतो, तो मुलगा एकही अपत्य न होता मृत्यू पावतो. मुलाच्या मृत्युनंतर निधी मृत्युपत्रकर्त्याच्या संपदेचा भाग होतो.

(दोन) ' क ' तो मृत्युपत्राने संपदेचा अवशिष्ट आपल्या मुलींमध्ये समसमान विभागून दिला असून, त्यांना त्यांच्या हयातीत फक्त व्याज मिळावे आणि त्यांच्या मृत्युनंतर निधी त्यांच्या अपत्यांकडे जावा असा निदेश दिला आहे. मुलींना अपत्ये नाहीत. निधी मृत्युपत्रकर्त्याच्या संपदेचा भाग होतो.

## प्रकरण तेरा

## मृत्युपत्रव्यवस्थापकाला दिलेल्या मृत्युपत्रित दानांविषयी

मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून नामनिर्दिष्ट केलेल्या उत्तरदानग्राहीने मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून कार्य करण्याचा उद्देश दर्शविल्याशिवाय त्याला काही मिळू शकत नाही.

**१४१.** ज्या व्यक्तीला मृत्युपत्राचा व्यवस्थापक म्हणून नामनिर्दिष्ट केले आहे तिला जर मृत्युपत्राने उत्तरदान दिले तर तिने मृत्युपत्र सिद्ध केल्याशिवाय किंवा मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून कार्य करण्याचा उद्देश अन्यथा अभिव्यक्त केल्याशिवाय तिला ते उत्तरदान मिळणार नाही.

**उदाहरण**

' क ' ला उत्तरदान दिलेले असून त्यास मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून नामनिर्दिष्ट केलेले आहे. ' क ' मृत्युपत्रात अंतर्भूत असलेल्या निर्देशांनुसार उत्तरक्रिया करण्याचा आदेश देतो आणि मृत्युपत्रकर्त्यानंतर काही दिवसांनी मृत्युपत्र सिद्ध केल्याशिवाय मृत्यू पावतो. ' क ' ने मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून कार्य करण्याचा उद्देश अभिव्यक्त केला आहे.

## प्रकरण चौदा

## विनिर्दिष्ट उत्तरदानांविषयी

' विनिर्दिष्ट उत्तरदान ' याची व्याख्या.

**१४२.** जेथे मृत्युपत्रकर्ता आपल्या संपत्तीचा जो भाग आपल्या संपत्तीच्या अन्य सर्व भागांहून वेगळा आहे असा विनिर्दिष्ट भाग कोणत्याही व्यक्तीला मृत्युपत्राने देतो तेथे, उत्तरदान विनिर्दिष्ट असल्याचे म्हटले जाते.

**उदाहरणे**

(एक) ' क ' ' ख ' ला पुढील मृत्युपत्रित दाने देतो :---

" ' ख ' ने मला भेट दिलेली हिऱ्याची अंगठी " :

" माझी सोन्याची अंगठी " :

" लोकरीची विवक्षित गासडी " :

" कापडाचा विवक्षित तागा " :

" माझ्या मृत्युसमयी, कलकत्ता येथील ' एम ' रस्त्यावरील माझ्या राहत्या घरात किंवा आसपास असेल ती माझी सर्व घरगुती चीजवस्तू " :

" विवक्षित संदुकीतील १,००० रुपयांची रक्कम " :

" ' ख ' मला देणे लागतो ते ऋण " :

" कलकत्त्यातील माझ्या बिऱ्हाडातील माझी सर्व विपत्रे, बंधरोखे आणि रोखे " :

" माझ्या कलकत्त्याच्या घरातील माझे सर्व फर्निचर " :

" सध्या हुगळी नदीत असलेल्या विवक्षित जहाजावरील माझा सर्व माल " :

" माझ्या जवळचे जे २,००० रुपये ' ग ' च्या हाती आहेत ते " :

" ' घ ' च्या बंधपत्रावरून मला देय असलेले पैसे " :

" रामपूर कारखान्यातील माझे गहाण " :

"रामपूर कारखान्यावरील माझ्या गहाणावरून मला येणे असलेल्या रकमेच्या निम्मे पैसे":

"'ग' कडून मला देय असलेल्या ऋणाचा भाग म्हणून १,००० रुपये":

"'ईस्ट इंडिया स्टॉक' मधील माझा १,००० पौंडांचा भांडवली पुंजरोखा":

"केंद्र शासनाने काढलेल्या आपल्या ४ टक्के कर्जामधील १०,००० रुपयांच्या माझ्या वचनचिठ्ठ्या":

"'घ आणि कंपनी' या दिवाळखोर पेढीकडून मला देय असलेल्या ऋणाच्याबाबत माझ्या मृत्युनंतर माझ्या मृत्युपत्रव्यवस्थापकांना मिळतील अशा सर्व पैशाच्या रकमा":

"माझ्या मृत्युसमयी माझ्याकडे माझ्या तळघरात असेल ती सर्व दारू":

"माझ्या घोड्यांपैकी 'ख' निवडील ते घोडे":

"'इंपीरिअल बँक ऑफ इंडिया' मधील माझे सर्व शेअर्स":

"माझ्या मृत्युसमयी माझ्या कब्जात असतील ते 'इंपीरिअल बँक ऑफ इंडिया' मधील माझे सर्व शेअर्स":

"केंद्र शासनाच्या ५ $\frac{१}{२}$ टक्के कर्जाचे माझ्याकडे असलेले सर्व पैसे":

"माझ्या मृत्युसमयी मी ज्यांना हक्कदार असेन ते सर्व सरकारी रोखे":

यांपैकी प्रत्येक उत्तरदान विनिर्दिष्ट आहे.

(दोन) 'क' कडे १०,००० रुपयांच्या सरकारी वचनचिठ्ठ्या असून, तो 'ख' च्या लाभार्थ "विकण्यासाठी न्यास म्हणून १०,००० रुपयांच्या सरकारी वचनचिठ्ठ्या" आपल्या मृत्युपत्रव्यवस्थापकांना मृत्युपत्राने देतो. उत्तरदान विनिर्दिष्ट आहे.

(तीन) 'क' ची बनारस येथे आणि इतरत्रही संपत्ती असून, तो 'ख' ला आपली बनारसची सर्व संपत्ती मृत्युपत्राने देतो. उत्तरदान विनिर्दिष्ट आहे.

(चार) 'क' 'ख' ला पुढील मृत्युपत्रित दाने देतो :—

त्याचे कलकत्त्यामधील घर :

त्याची रामपूरची जमीनदारी :

त्याची रामपूरची तालुकादारी :

सालक्या येथील त्याच्या निळीच्या कारखान्याचा भाडेपट्टा :

'ब' येथील आपल्या जमीनदारीच्या भाड्यातून ५०० रुपयांचे वर्षासन.

आपली 'क्ष' ही जमीनदारी विकून 'ख' साठी त्या उत्पन्नाची गुंतवणूक करावी असा 'क' निदेश देतो.

यांपैकी प्रत्येक मृत्युपत्रितदान विनिर्दिष्ट आहे.

(पाच) 'क' आपल्या मृत्युपत्राने आपल्या 'य' येथील जमीनदारीवर 'ग' ला त्याच्या हयातीत द्यावयाच्या १,००० रुपये वर्षासनाचा प्रभार ठेवतो, आणि या प्रभाराच्या अधीनतेने तो ती जमीनदारी 'घ' ला मृत्युपत्राने देतो. यांपैकी प्रत्येक मृत्युपत्रित दान विविर्दिष्ट आहे.

(सहा) 'क' पुढील गोष्टी करण्यासाठी मृत्युपत्राने पैशाची रक्कम देतो :—

'ख' साठी कलकत्ता येथे घर विकत घेणे :

'ख' साठी फरीदपूर जिल्ह्यात संपदा विकत घेणे :

'ख' साठी हिऱ्याची अंगठी विकत घेणे :

'ख' साठी घोडा विकत घेणे :

'ख' साठी 'इंपीरिअल बँक ऑफ इंडिया' मधील भागांत गुंतवणूक करणे :

'ख' साठी सरकारी रोख्यात गुंतवणूक करणे :

'क' 'ख' ला पुढील मृत्युपत्रित दान देतो :—

"हिऱ्यांची अंगठी":

"घोडा":

"१०,००० रुपये किंमतीचे सरकारी रोखे":

" ५०० रुपयांचे वर्षाषन ":

" रोख द्यावयाचे २,००० रुपये ":

" जेवढ्या पैशात ४ टक्के दराचे ५,००० रुपयांचे सरकारी रोखे येतील तेवढे पैसे ":

ही मृत्युपत्रित दाने विनिर्दिष्ट नाहीत.

(सात) ' क ' ची इंग्लंडमध्ये आणि भारतात संपत्ती असून तो ' ख ' ला हे मृत्युपत्राने उत्तरदान देतो आणि आपण भारतात जी संपत्ती मागे ठेवू तिच्यातून ते दिले जावे असा निदेश देतो. तो ' ग ' लाही मृत्युपत्राने उत्तरदान देतो, आणि आपण इंग्लंडमध्ये जी संपत्ती मागे ठेवू तिच्यातून ते दिले जावे असा निदेश देतो. यांपैकी कोणतेही उत्तरदान विनिर्दिष्ट नाही.

**विवक्षित रक्कम ज्यात गुंतवलेली आहे ते पुंजरोखे, इत्यादी यांचे वर्णन केले असेल त्याबाबतीततील तिचे मृत्युपत्रित दान.**

**१४३.** जेथे विवक्षित रक्कम मृत्युपत्राने दिलेली असते, तेथे ती ज्यात गुंतवली तो पुंजरोखा, निधी किंवा रोखे यांचे मृत्युपत्रात वर्णन केले आहे. एवढ्यानेच केवळ ते उत्तरदान विनिर्दिष्ट होत नाही.

**उदाहरण**

' क ' हा ' ख ' ला पुढील मृत्युपत्रित दाने देतो :---

" माझ्या निधीभूत संपत्तीपैकी १०,००० रुपये ":

" सध्या ' ईस्ट इंडियन रेल्वे कंपनी ' तील भागांमध्यें गुंतवलेल्या माझ्या संपत्तीपैकी १०,००० रुपये ":

" रामपूर कारखान्यातील गहाणाद्वारे सध्या प्रतिभूत केलेले १०,००० रुपये " यांपैकी कोणतेही उत्तरदान विनिर्दिष्ट नाही.

**पुंजरोख्याचे मृत्युपत्रित दान जेथे मृत्युपत्राच्या दिनांकास मृत्युपत्रकर्त्याकडे त्याच प्रकारच्या पुंजरोख्यांची तितकीच किंवा त्याहून अधिक रक्कम असेल तेथे.**

**१४४.** जेथे कोणत्याही प्रकारच्या पुंजरोख्याच्या विवक्षित रकमेचे सर्वसाधारण शब्दांत मृत्युपत्रित दान दिले असेल तेथे, आपल्या मृत्युपत्राच्या दिनांकास मृत्युपत्रकर्त्याकडे मृत्युपत्राने दिलेल्या रकमेइतक्या किंवा तीहून अधिक रकमेचा विनिर्दिष्ट प्रकारचा पुंजरोखा होता एवढ्यानेच केवळ उत्तरदान विनिर्दिष्ट होत नाही.

**उदाहरण**

' क ' हा ' ख ' ला ५,००० रुपयांचे पाच टक्के दराचे सरकारी रोखे मृत्युपत्राने देतो. मृत्युपत्राच्या दिनांकास ' क ' कडे ५,००० रुपयांचे पाच टक्के दराचे सरकारी रोखे होते. उत्तरदान विनिर्दिष्ट नाही.

**मृत्युपत्रकर्त्याच्या संपत्तीच्या काही भागाची विवक्षित मार्गाने विल्हेवाट होईपर्यंत जेथे पैशाचे मृत्युपत्रित दान प्रदेय नसते तेथे.**

**१४५.** पैशाचे उत्तरदान हे, मृत्युपत्रकर्त्याच्या संपत्तीचा काही भाग विवक्षित रूपात बदलला जाईपर्यंत किंवा विवक्षित स्थळी पाठवला जाईपर्यंत त्याचे प्रदान लांबणीवर टाकण्याचा निदेश मृत्युपत्राने दिला आहे, एवढ्यानेच केवळ विनिर्दिष्ट होत नाही.

**उदाहरण**

' क ' ' ख ' ला १०,००० रुपये मृत्युपत्राने देतो व ' क ' ची भारतातील संपत्ती इंग्लंडमध्ये वसूल होताच हे उत्तरदान प्रदान केले जावे असा निर्देश देतो, उत्तरदान विनिर्दिष्ट नाही.

**प्रमाणित वस्तूंचे मृत्युपत्रित दान विनिर्दिष्टपणे केव्हा दिल्याचे मानावयाचे नाही.**

**१४६.** जेथे मृत्युपत्रात मृत्युपत्रकर्त्याच्या संपत्तीत अवशिष्टांचे मृत्युपत्रित दान अंतर्भूत असून त्यासोबत, संपत्तीपैकी पूर्वी मृत्युपत्राने न दिलेल्या काही बाबी नमूद केलेल्या असतील तेथे, नमूद केलेल्या वस्तूंचे मृत्युपत्रित दान विनिर्दिष्टपणे दिले असल्याचे मानले जाणार नाही.

**क्रमाक्रमाने अनेक व्यक्तींना दिलेले विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दान त्याच रूपात राखणे.**

**१४७.** जेथे क्रमाक्रमाने दोन किंवा अधिक व्यक्तींना संपत्तीचे विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दान केलेले असेल तेथे, जरी ती संपत्ती तिचे मूल्य सतत कमी होत रहाते अशा स्वरूपाची असली तरीही, मृत्युपत्रकर्त्याने ती ज्या रूपात मागे ठेवली त्याच रूपात राखली जाईल.

**उदाहरणे**

(एक) ' क ' कडे एका घराचा जो काही वर्षांचा पट्टा आहे त्याची पंधरा वर्षे त्याच्या मृत्युसमयी संपावयाची असून, त्याने तो पट्टा ' ख ' ला त्याच्या हयातीकरता आणि ' ख ' च्या मृत्यूनंतर ' ग ' ला मृत्युपत्रानें दिला आहे ' ख ' १५ वर्षे हयात राहिल्यास, त्या मृत्युपत्रित दानाखाली ' ग ' ला काहीही मिळू शकणार नाही असे असले तरी, ' क ' ने जशा स्वरूपात संपत्ती मागे ठेवली तशाच स्वरूपात ' ख ' ने ती उपभोगावयाची आहे.

(दोन) ' क ' कडे ' ख ' च्या हयातीपुरते एक वर्षासन असून ते तो ' ग ' ला त्याच्या हयातीकरता आणि ' ग ' च्या मृत्युनंतर ' घ ' ला मृत्युपत्राने देतो. ' ख ' ' घ ' च्या पूर्वी मृत्यू पावल्यास ' घ ' ला मृत्युपत्रित दानाखाली काहीही मिळू शकत नसले तरी, ' क ' ने ते वर्षासन जशा स्वरूपात मागे ठेवले तशाच स्वरूपात ' ग ' ने ते उपभोगावयाचे आहे.

१४८. जेथे क्रमाक्रमाने दोन किंवा अधिक व्यक्तींना दिलेल्या मृत्युपत्रित दानात समाविष्ट असलेली संपत्ती मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेली नसेल, तेथे ती संपत्ती कोणत्याही विरूद्ध निदेशाच्या अभावी, विकली जाईल आणि विक्रीचे उत्पन्न उच्च न्यायालय सर्वसाधारण नियमाने प्राधिकृत किंवा निदेशित करील अशा रोख्यांमध्ये गुंतवले जाईल, आणि अशाप्रकारे बनलेल्या निधीचा मृत्युपत्राच्या अटींनुसार उत्तरदानग्राही क्रमाक्रमाने उपभोग घेतील.

क्रमाक्रमाने दोन किंवा अधिक व्यक्तींना मृत्युपत्राने दिलेल्या संपत्तीचा विक्रय व विक्रीच्या उत्पन्नाची गुंतवणूक.

उदाहरण

'क' कडे काही वर्षांचा पट्टा असून तो आपली सर्व संपत्ती 'ख' ला त्याच्या हयातीकरता व 'ख' च्या मृत्युनंतर 'ग' ला मृत्युपत्राने देतो. पट्टा विकला पाहिजे, व कलमात सांगितल्याप्रमाणे विक्रीचे उत्पन्न गुंतवले पाहिजे आणि निधीतून येणारे वार्षिक उत्पन्न 'ख' ला हयातीकरीता दिले पाहिजे. 'ख' चा मृत्यू होताच निधीचे मूलधन 'ग' ला द्यावयाचे आहे.

१४९. जर मृत्युपत्रित दाने देताना मत्ता अपुरी पडली तर, विनिर्दिष्ट उत्तरदान सर्वसाधारण उत्तरदानांबरोबर घट पावण्यास पात्र नसते.

जेथे उत्तरदाने देताना मत्ता अपुरी पडत असेल तेथे, विनिर्दिष्ट उत्तरदान सर्वसाधारण उत्तरदानाबरोबर घट पावावयाचे नाही.

## प्रकरण पंधरा

## निदर्शक उत्तरदानांविषयी

१५०. जेथे मृत्युपत्रकर्ता विवक्षित रक्कम किंवा विवक्षित परिमाणांची अन्य कोणतीही वस्तू मृत्यूपत्राने देतो आणि विशिष्ट निधीचा किंवा पुंजीचा अशा रीतीने निर्देश करतो की, तो निधी किंवा पुंजी म्हणजे ज्यातून ते प्रदान करावयाचे तो मुख्य निधी किंवा पुंजी बनेल तेथे, उत्तरदान निदर्शक असल्याचे म्हटले जाते.

'निदर्शक उत्तरदान' याची व्याख्या.

**स्पष्टीकरण.**--- विनिर्दिष्ट उत्तरदान व निदर्शक उत्तरदान यांमधील भेद असा आहे की,—जेथे उत्तरदानग्राहीला विनिर्दिष्ट संपत्ती देण्यात येते, तेथे उत्तरदान विनिर्दिष्ट असते ; जेथे उत्तरदान विनिर्दिष्ट संपत्तीतून देण्याचे निदेशित केलेले असते तेथे ते निदर्शक असते.

उदाहरणे

(एक) 'क' हा 'ख' ला 'व' कडून आपणास येणे असलेल्या ऋणांचा भाग म्हणून १,००० रुपये मृत्युपत्राने देतो. तो 'ग' लाही 'व' कडून आपणास येणे असलेल्या ऋणातून द्यावयाचे असे १,००० रुपये मृत्युपत्राने देतो. 'ख' ला दिलेले उत्तरदान विनिर्दिष्ट आहे आणि 'ग' ला दिलेले उत्तरदान निदर्शक आहे.

(दोन) 'क' हा 'ख' ला पुढील मृत्युपत्रित दाने देतो :---

"माझ्या ग्रीन एकर या शेतात पिकेल ते १० बुशेल धान्य" :

"रामपूर येथील माझ्या निळीच्या कारखान्यात जी तयार केली जाईल त्या निळीच्या ८० पेट्या" :

"केंद्र शासनाच्या ५ टक्के दराच्या माझ्या वचनचिठ्ठ्यांपैकी १०,००० रुपये" :

"माझ्या निधीभूत संपत्तीतून ५०० रुपयांचे वर्षासन" :

"'ग' कडून मला देय असलेल्या २,००० रुपयांच्या रकमेतून १,००० रुपये" :

एक वर्षासन आणि "माझ्या रामनगर तालुकादारीतून येणाऱ्या भाड्यातून" ते द्यावयाचे असा निदेश.

(तीन) 'क' हा 'ख' ला पुढील मृत्युपत्रित दाने देतो :---

"रामनगरच्या माझ्या संपदेतून १०,००० रुपये" किंवा "रामनगर येथील आपल्या संपदेवर, ती रक्कम प्रभारित करून" :

"विवक्षित धंद्यात घातलेल्या भांडवलापैकी माझ्या" हिश्श्याचे १०,००० रुपये :

यांपैकी प्रत्येक मृत्युपत्रित दान निदर्शक आहे.

विनिर्दिष्ट उत्तरदानाचा विषय असलेल्या निधीतून उत्तरदान देण्याचा निदेश असतो तेव्हा प्रदानाचा क्रम.

**१५१.** जेथे मृत्युपत्राने एखाद्या निधीचा अंश विनिर्दिष्टपणे दिलेला असून त्याच निधीतून एखादे उत्तरदान देण्याचा निदेश दिला असेल तेथे, प्रथम उत्तरदानग्राहीला मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला अंश प्रदान करण्यात येऊन निधीच्या अवशिष्टातून आणि अवशिष्ट कमी पडत असेल तेथवर मृत्युपत्रकर्त्याच्या सर्वसाधारण मत्तेतून निदर्शक उत्तरदान दिले जाईल.

**उदाहरण**

'क' हा 'ख' ला 'व' कडून आपणास येणे असलेल्या ऋणाचा भाग म्हणून १,००० रुपये मृत्युपत्राने देतो. तो 'ग' लाही 'व' कडून आपणास देय असलेल्या ऋणातून द्यावयाचे असे १,००० रुपये मृत्युपत्राने देतो. 'क' ला 'व' कडून येणे असलेले ऋण फक्त १,५०० रुपये आहे ; या १,५०० रुपयांपैकी १,००० रुपये 'ख' च्या मालकीचे असून ५०० रुपये 'ग' ला द्यावयाचे आहेत. 'ग' ला मृत्युपत्रकर्त्याच्या सर्वसाधारण मत्तेतूनही ५०० रुपये मिळावयाचे आहेत.

## प्रकरण सोळा

### उत्तरदानांच्या लोपनाविषयी

'लोपन' याचे स्पष्टीकरण.

**१५२.** विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दानाने दिलेली आहे अशी कोणतीही वस्तू मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी त्याच्या मालकीची नसल्यास अथवा तिचे वेगळ्या प्रकारच्या संपत्तीत रूपांतर केले गेले असल्यास, उत्तरदान लोप पावते ; म्हणजेच मृत्युपत्राच्या कक्षेतून विषयवस्तू काढून घेतली गेल्याकारणाने ते परिणामकारक होऊ शकत नाही.

**उदाहरणे**

(एक) 'क' हा 'ख' ला पुढील मृत्युपत्रित दाने देतो :---

"'ग' ने मला भेट दिलेली हिऱ्याची अंगठी" :

"माझी सोन्याची साखळी" :

"लोकरीची विवक्षित गासडी" :

"कापडाचा विवक्षित तागा" :

"माझी मृत्युसमयी कलकत्ता येथील 'एम' रस्त्यावरील माझ्या घरात किंवा आसपास असलेल्या माझ्या सर्व घरगुती चीजवस्तू" :

'क' आपल्या हयातीत---

अंगठी विकतो किंवा देऊन टाकतो :

साखळीचे फुलपात्रात रुपांतर करतो :

लोकरीचे कापडात रूपांतर करतो :

कापडाचा कपडा बनवतो :

दुसरे घर घेऊन त्यात आपली सर्व चीजवस्तू हलवतो :

यापैकी प्रत्येक मृत्युपत्रातील दान लोप पावते.

(दोन) 'क' हा 'ख' ला पुढील मृत्युपत्रित दाने देतो :---

"विवक्षित संदुकीतील १,००० रुपयांची रक्कम" :

"माझ्या तबेल्यातील सर्व घोडे" :

'क' चा मृत्यु झाल्यावर संदुकीत पैसे आणि तबेल्यात घोडे आढळत नाहीत.

उत्तरदाने लोप पावतात.

(तीन) 'क' हा 'ख' ला मृत्युपत्राने मालाच्या विवक्षित गासड्या देतो. 'क' जलप्रवासात आपल्याबरोबर तो माल घेतो. जहाज व माल समुद्रात नष्ट होते आणि 'क' बुडतो. उत्तरदान लोप पावते.

निदर्शक उत्तरदान लोप न पावणे.

**१५३.** निदर्शक उत्तरदान, मृत्युपत्राने ते ज्या संपत्तीवर प्रभारित केले असेल ती मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नाही, किंवा वेगळ्या प्रकारच्या संपत्तीत तिचे रूपांतर झाले आहे या कारणाने लोप पावत नाही, पण अशा प्रकरणी ते मृत्युपत्रकर्त्याच्या सर्वसाधारण मत्तेतून प्रदान केले जाईल.

१५४. जेथे मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेली वस्तू म्हणजे त्रयस्थ पक्षाकडून एखादी मूल्यवान वस्तू घेण्याचा अधिकार असून मृत्युपत्राकर्ता स्वतःच ती घेतो तेथे, ते उत्तरदान लोप पावते. त्रयस्थ पक्षाकडून एखादी वस्तू घेण्याच्या अधिकाराच्या विनिर्दिष्ट उत्तरदानाचे लोपन.

**उदाहरणे**

(एक) 'क' हा 'ख' ला पुढील मृत्युपत्रित दाने देतो :---

"'ग' मला देणे लागतो ते ऋण":

"'घ' च्या हाती असलेले माझे २,००० रुपये":

"'ङ' च्या बंधपत्रावरून मला येणे असलेला पैसा":

"माझे रामपूर येथील कारखान्यावरील गहाण":

'क' च्या हयातीत ही सर्व ऋणे काही त्याच्या संमतीने व काही त्याच्या संमतीशिवाय नष्ट होतात. सर्व उत्तरदाने लोप पावतात.

(दोन) 'क' हा 'ख' ला आपल्या विवक्षित आयुर्विमापत्रांमधील हितसंबंध मृत्युपत्राने देतो. 'क' ला आपल्या हयातीत विमापत्रांची रक्कम मिळते. उत्तरदान लोप पावते.

१५५. मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेल्या संपूर्ण वस्तूचा एखादा भाग मृत्युपत्रकर्त्याला मिळाल्यास, ते, याप्रमाणे मिळालेल्या रकमेच्या व्याप्तीपुरते उत्तरदानाचे लोपन म्हणून प्रवर्तित होईल. मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेल्या संपूर्ण वस्तूचा एखादा भाग मृत्युपत्रकर्त्याला मिळण्याचे यथाप्रमाण लोपन.

**उदाहरण**

'क' हा 'ख' ला, "'ग' कडून मला येणे असलेले ऋण" मृत्युपत्राने देतो. ऋण १०,००० रुपये इतके आहे. 'ग' हा 'क' चे निम्मे ऋण म्हणजे ५,००० रुपये फेडतो. 'क' ला मिळालेल्या ५,००० रुपयांच्या संबंधापुरते उत्तरदान लोपनाद्वारे प्रत्याहृत होते.

१५६. जर संपूर्ण निधीचा किंवा पुंजीचा एखादा अंश मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला असेल आणि मृत्युपत्रकर्त्याला या निधीचा किंवा पुंजीचा एखादा अंश मिळाला तर, ते याप्रमाणे मिळालेल्या रकमेच्या व्याप्तीपुरतेच लोपन म्हणून प्रवर्तित होईल; आणि निधीचा किंवा पुंजीचा अवशिष्ट हा विनिर्दिष्ट उत्तरदान भागविण्यासाठी उपयोजित करता येईल. ज्याचा एखादा अंश मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला असेल त्या संपूर्ण निधीचा एखादा अंश मृत्युपत्रकर्त्याला मिळण्याने यथाप्रमाण लोपन.

**उदाहरण**

'क' हा 'ख' ला आपणास 'व' कडून येणे असलेल्या १०,००० रुपयांपैकी निम्मी रक्कम मृत्युपत्राने देतो. 'क' ला आपल्या हयातीत १०,००० रुपयांचा एक भाग म्हणून ६,००० रुपये मिळतात. 'व' कडून 'क' ला त्याच्या मृत्युसमयी येणे असलेले ४,००० रुपये विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दानाखाली 'ख' चे होतात.

१५७. जेव्हा निधीचा एखादा अंश मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे एका उत्तरदानग्राहीला दिलेला असून त्याच निधीवर प्रभारित केलेल एक उत्तरदान अन्य उत्तरदानग्राहीला मृत्युपत्राने दिलेले असेल तेव्हा, जर मृत्युपत्रकर्त्याला त्या निधीचा एखादा अंश मिळाला असून उर्वरित निधी विनिर्दिष्ट व निदर्शक अशी दोन्ही उत्तरदाने देण्यास अपुरा असेल तर, विनिर्दिष्ट उत्तरदान प्रथम दिले जाईल आणि काही अवशिष्ट राहिल्यास तो असेल तितका, निदर्शक उत्तरदान देण्यासाठी उपयोजिला जाईल आणि बाकीचे निदर्शक उत्तरदान मृत्युपत्रकर्त्याच्या सर्वसाधारण मत्तेतून दिले जाईल. जेथे निधीचा एखादा अंश मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे एका उत्तरदानग्राहीला दिला असून त्याच निधीवर प्रभारित असे उत्तरदान दुसऱ्यास दिलेले असेल आणि मृत्युपत्रकर्त्याला निधीचा एखादा अंश मिळालेला असून उर्वरित अंश दोन्ही उत्तरदाने देण्यास अपुरा असेल तेथे प्रदानाचा क्रम.

**उदाहरण**

'क' हा 'ख' ला आपणास 'व' कडून येणे असलेल्या २,००० रुपयांचा भाग म्हणून १,००० रुपये मृत्युपत्राने देतो. तो 'ग' लाही १,००० रुपये आपणास 'व' कडून येणे असलेल्या ऋणातून द्यावयाचे म्हणून मृत्युपत्राने देतो. नंतर 'क' ला त्या ऋणाचा भाग म्हणून [1][५०० रुपये] मिळतात, आणि 'व' कडून त्यास फक्त १,५०० रुपये येणे असताना तो मृत्यु पावतो. या १,५०० रुपयांपैकी १,००० रुपये 'ख' चे आहेत आणि ५०० रुपये 'ग' ला द्यावयाचे आहेत. 'ग' ला मृत्युपत्रकर्त्याच्या सर्वसाधारण मत्तेतून ५०० रुपयेही मिळवावयाचे आहेत.

१५८. जो पुंजरोखा मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला असेल तो मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नसेल तर उत्तरदान लोप पावते. मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला पुंजरोखा मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अस्तित्वात नसेल तर लोपन.

**उदाहरण**

'क' हा 'ख' ला पुढील मृत्युपत्रित दाने देतो :---

"ईस्ट इंडिया स्टॉकमधील माझा १,००० पौंडांचा भांडवली पुंजरोखा"

---

१. १९२७ चा अधिनियम १०, कलम २ व अनुसूची पहिली यांद्वारे "५,०००" याऐवजी घातले.

"केंद्र शासनाच्या ४ टक्के दराच्या कर्जाच्या १०,००० रुपयांच्या माझ्या वचनचिठ्ठ्या".

'क' हा पुंजरोखा व वचनचिठ्ठ्या विकतो. उत्तरदाने लोप पावतात.

मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला पुंजरोखा अंशतः अस्तित्वात असेल तर यथाप्रमाण लोपन.

**१५९.** जो पुंजरोखा मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला असेल तो मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अंशतः अस्तित्वात असेल तर पुंजरोख्याचा जो भाग अस्तित्वात राहिलेला नाही त्या भागाच्या संबंधापुरते उत्तरदान लोप पावते.

**उदाहरण**

'क' हा 'ख' ला केंद्र शासनाच्या $5\frac{1}{2}$ टक्के दराच्या कर्जापैकी आपले १०,००० रुपये मृत्युपत्राने देतो. 'क' च्या प्रस्तुत कर्जातील आपल्या १०,००० रुपयांपैकी निम्मे उत्तरदान लोप पावते.

विवक्षित जागेशी संबद्ध म्हणून वर्णिलेल्या वस्तूचे विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दान त्या हलवल्याकारणाने लोप पावत नाही.

**१६०.** वस्तूंचे विवक्षित जागी असणाऱ्या वस्तू म्हणून वर्णन करून केलेले विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दान कोणत्याही तात्पुरत्या कारणाने, किंवा कपटाने किंवा मृत्युपत्रकर्त्याच्या नकळत किंवा त्याच्या संमतीशिवाय त्या वस्तू त्या जागेतून हलवण्यात आल्या आहेत, या कारणाने लोप पावत नाही.

**उदाहरणे**

(एक) 'क' हा 'ख' ला "कलकत्ता येथील माझ्या राहत्या घरात किंवा आसपास माझ्या मृत्युसमयी असतील त्या माझ्या सर्व घरगुती चीजवस्तू" मृत्युपत्राने देतो. आगीपासून बचाव व्हावा म्हणून त्या घरापासून दूर हलवल्या जातात. त्या परत आणल्या जाण्यापूर्वी 'क' मृत्यू पावतो.

(दोन) 'क' हा 'ख' ला "कलकत्ता येथील माझ्या राहत्या घरात किंवा आसपास माझ्या मृत्युसमयी असतील त्या माझ्या सर्व घरगुती चीजवस्तू" मृत्युपत्राने देतो. 'क' प्रवासात असताना त्याच्या अनुपस्थितीत सर्व चीजवस्तू घरापासून दूर हलवल्या जातात. त्या हलवण्यास संमती दिल्याशिवाय 'क' मृत्यू पावतो. यांपैकी कोणतेही उत्तरदान लोप पावत नाही.

मृत्युपत्राने दिलेल्या वस्तू हलवणे म्हणजे लोपन असे केव्हा होत नाही.

**१६१.** मृत्युपत्राने दिलेली वस्तू ज्या स्थळी स्थित असल्याचे मृत्युपत्रात निवेदिले असेल त्या स्थळाचा, मृत्युपत्राने देणे मृत्युपत्रकर्त्याला अभिप्रेत होते त्याचे वर्णन पूर्ण करण्यासाठीच केवळ निर्देश केलेला असतो त्याबाबतीत, ती वस्तू त्या स्थाळापासून हलवणे म्हणजे लोपन असे होत नाही.

**उदाहरणे**

(एक) 'क' हा 'ख' ला माझ्या "कलकत्त्यातील निवासस्थान, सध्या असलेली माझी सर्व विपत्रे, कर्जरोखे व इतर पैशाचे रोखे" मृत्युपत्राने देतो. त्याच्या मृत्युसमयी त्या चीजवस्तू त्याच्या कलकत्त्यातील निवासस्थानातून हलवण्यात आल्या होत्या.

(दोन) 'क' हा 'ख' ला त्यावेळी "कलकत्ता येथील आपल्या घरात असलेले सर्व फर्निचर मृत्युपत्राने देतो. मृत्युपत्रकर्त्याचे एक घर कलकत्याला व दुसरे चिनसुरा येथे असून तो त्या ठिकाणी आलटून-पालटून राहतो. त्याच्याकडे फर्निचरचा एकच संच असल्याने तो संच तो आपल्याबरोबर प्रत्येक घरी हलवतो. त्याच्या मृत्युसमयी फर्निचर चिनसुरा येथील घरात आहे.

(तीन) 'क' हा 'ख' ला त्यावेळी हुगळी नदीवर असलेल्या विवक्षित जाहाजावरील आपला सर्व माल मृत्युपत्राने देतो. 'क' च्या निदेशांनुसार माल वखारीत हलवला जातो व त्याच्या मृत्युसमयी तो तेथेच राहिलेला असतो.

यांपैकी कणतेही उत्तरदान-लोपनाद्वारे प्रत्याहृत होत नाही.

जेव्हा मृत्युपत्राने दिलेली वस्तू म्हणजे मृत्युपत्रकर्त्याला त्रयस्थ व्यक्तीकडून मिळावयाची मूल्यवान वस्तू असून खुद्द मृत्युपत्रकर्त्याला किंवा त्याच्या प्रतिनिधीला ती मिळते तेव्हा.

**१६२.** जेव्हा मृत्युपत्राने दिलेली वस्तू म्हणजे त्रयस्थ व्यक्तीकडून एखादी मूल्य असलेली वस्तू मिळण्याचा अधिकार नव्हे तर खुद्द मृत्युपत्रकर्त्याला किंवा त्याच्या प्रतिनिधींना किंवा त्याच्या प्रतिनिधीला त्रयस्थ व्यक्तीकडून मिळू शकेल असा पैसा किंवा अन्य विक्रेय वस्तू असेल तेथे मृत्युपत्रकर्त्याला तशी पैशाची रक्कम किंवा अन्य विक्रेय वस्तू मिळणे म्हणजे लोपन नव्हे, पण जर त्याने ती आपल्या सर्वसाधारण संपत्तीत मिसळली तर उत्तरदान लोप पावते.

**उदाहरण**

'ग' विरुद्ध आपण केलेल्या मागणीनुसार जी काही रक्कम मिळेल ती 'क' हा 'ख' ला मृत्युपत्राने देतो. 'क' ला 'ग' विरुद्ध त्याने केलेल्या मागणीची संपूर्ण रक्कम मिळते आणि ती तो आपल्या इतर सर्वसाधारण संपत्तीपासून वेगळी काढून ठेवतो. उत्तरदान लोप पावत नाही.

१६३. जेथे मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेली वस्तू मृत्युपत्रांचा दिनांक व मृत्यूपत्रकर्त्याचा मृत्यु यांच्या दरम्यान बदल पावते आणि तो बदल कायद्याच्या प्रवर्तनामुळे किंवा विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दानाने दिलेली वस्तू ज्या वैध संलेखाखाली धारण केली असेल त्याच्या उपबंधाच्या अंमलबजावणीच्या ओघात घडून येतो त्याबाबतीत, उत्तरदान अशा बदलाच्या कारणाने लोप पावत नाही. मृत्युपत्राचा दिनांक व मृत्युपत्रकर्त्याचा मृत्यू यांच्या दरम्यान विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दानाच्या विषयात कायद्याच्या प्रवर्तनामुळे बदल.

**उदाहरणे**

(एक) 'क' हा 'ख' "ला केंद्र शासनाच्या ५$^1/_2$ टक्के दाराच्या कर्जापैकी माझे असलेले सर्व पैसे" मृत्युपत्राने देतो. ५$^1/_2$ टक्के दाराच्या कर्जाचे रोख्यांचे 'क' च्या हयातीत ५ टक्के दराच्या पुंजरोख्यात रूपांतर केले जाते.

(दोन) 'क' हा 'ख' ला 'क' च्या विश्वस्तांच्या नावे कन्सोल्समध्ये (संवार्षिकींमध्ये), गुंतवलेली २,००० पौंडाची रक्कम मृत्युपत्राने देतो. विश्वस्त २,००० पौंडांची रक्कम खुद्द 'ख' च्या नावावर हस्तांतरित करतात.

(तीन) केंद्र शासनाने काढलेल्या ज्या वचनचिठ्ठ्यांची मृत्युपत्राने विल्हेवाट करण्याची आपल्या विवाहलक्षी संव्यवस्थेखाली स्वतःस शक्ती आहे. त्यांपैकी १०,००० रुपयांची रक्कम 'क' हा 'ख' ला मृत्युपत्राने देतो. नंतर 'क' च्या हयातीत संव्यवस्थेत अंतर्भूत असलेल्या प्राधिकाराच्या आधारे त्या निधीचे कन्सोल्समध्ये (संवार्षिकीमध्ये) रुपांतर केले जाते.

यांपैकी कोणतेही उत्तरदान लोप पावत नाही.

१६४. जेथे मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेली वस्तू मृत्युपत्राचा दिनांक व मृत्यूपत्रकर्त्याचा मृत्यू यांच्या दरम्यान बदल पावते आणि तो बदल मृत्युपत्रकर्त्याच्या नकळत किंवा त्याच्या संमतीशिवाय घडून येतो, तेथे उत्तरदान लोप पावत नाही. मृत्युपत्रकर्त्याच्या नकळत विषयात बदल.

**उदाहरणे**

(एक) 'क' हा 'ख' ला "३ टक्के दराचे माझे सर्व कन्सोल्स (संवार्षिक)" मृत्युपत्राने देतो. 'क' च्या नकळत त्याचा अभिकर्ता कन्सोल्स (संवार्षिकी) विकतो आणि मिळालेले उत्पन्न ईस्ट इंडिया पुंजरोख्यात रूपांतरित केले जाते. हे उत्तरदान लोप पावत नाही.

१६५. मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला पुंजरोखा तिने पूर्ववत परत केला पाहिजे या शर्तीवर त्रयस्थ व्यक्तीला उसनवार दिला जाऊन त्यानुसार तो पूर्ववत परत केला जातो त्याबाबतीत, उत्तरदान लोप पावत नाही. मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला पुंजरोखा त्रयस्थ व्यक्तीला तो पूर्ववत परत केला पाहिजे या शर्तीवर उसनवार दिल्यास.

१६६. जेथे मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला पुंजरोखा विकला जाऊन तितक्याच परिणामाचा तसाच पुंजरोखा नंतर खरेदी करण्यात येतो आणि तो मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी त्याच्या मालकीचा असतो तेथे, उत्तरदान लोप पावत नाही. मृत्युपत्राने विनिर्दिष्टपणे दिलेला पुंजरोखा विकला तरी पुनःस्थापित करण्यात आल्यास आणि मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी तो त्याच्या मालकीचा असल्यास.

## प्रकरण सतरा

### मृत्युपत्रित दानाविषयीच्या बाबतीतील देणे रकमांच्या प्रदानाविषयी

१६७. (१) विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दानाने दिलेली संपत्ती, मृत्युपत्रकर्त्यांच्या मृत्युसमयी, खुद्द मृत्युपत्रकर्त्याने किंवा जिच्या पोटी तो दावा सांगतो अशा कोणत्याही व्यक्तीने निर्माण केलेल्या कोणत्याही तारणास, धारणाधिकारस किंवा बोजास अधीन असेल त्याबाबतीत, मृत्युपत्रावरून विरूद्ध उद्देश दिसून येत नसेल तेव्हा, उत्तरदानग्राहीने मृत्युपत्रित दान स्वीकारले तर त्याला अशा तारणाच्या किंवा बीजाच्या अधीनतेने ते दान स्वीकारावे लागेल आणि (तो स्वतः व मृत्युपत्रकर्त्याची संपदा यांच्यापैकी) तो स्वतः अशा तारणाची किंवा बोजाची रक्कम भरून देण्यास दायी असेल. विनिर्दिष्ट उत्तरदानग्राहीना भारमुक्त करण्याचे दायित्व मृत्युपत्र व्यवस्थापकावर नसणे.

(२) मृत्युपत्रकर्त्याची ऋणे सरसकट फेडण्याबाबत मृत्युपत्रात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही निदेशावरून विरुद्ध उद्देशाचे अनुमान काढले जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**--- जमीन महसुलाच्या स्वरूपातील किंवा भाड्याच्या स्वरूपातील नियतकालिक भरणा हा या कलमात कल्पिलेला असा बोजा नव्हे.

**उदाहरणे**

(एक) आपणास ' ग ' ने दिलेली हिऱ्याची अंगठी ' क ' हा ' ख ' ला मृत्युपत्राने देतो. ' क ' ने ' घ ' कडे ती तारण ठेवली असून ' क ' च्या मृत्युसमयी ' घ ' ने ती तारण म्हणून धारण केली आहे. मृत्युपत्रकर्त्याच्या मत्तेची स्थिती पाहता शक्य असल्यास ' ख ' ला ती सोडवून देणे हे ' क ' च्या मृत्युपत्रव्यवस्थापकांचे कर्तव्य आहे.

(दोन) ' क ' हा ' ख ' ला एक जमीनदारी मृत्युपत्राने देतो व ' क ' च्या मृत्युसमयी ती जमीनदारी १०,००० रुपयांच्या गहाणास अधीन आहे ; आणि संपूर्ण मुद्दल रक्कम व त्याचबरोबर १,००० रुपये इतके व्याज ' क ' च्या मृत्युसमयी देय आहे. ' ख ' ने मृत्युपत्रित दान स्वीकारले तर, त्याला त्याच्या प्रभाराच्या अधीनतेने ते स्वीकारावे लागेल आणि तो स्वत: व ' क ' ची संपदा यांच्या दरम्यान, ती अशाप्रकारे देय असलेली ११,००० रुपयांची रक्कम देण्यास दायी असेल.

**मृत्युपत्राने दिलेल्या वस्तूंवरील मृत्युपत्रकर्त्याचा स्वत्वाधिकार त्याच्या संपदेच्या खर्चाने पूर्ण करावयाचा.**

**१६८.** मृत्युपत्राने दिलेल्या वस्तूमधील मृत्युपत्रकर्त्याचा स्वत्वाधिकार पूर्ण करण्याकरिता काही करावयाचे असेल तर, ते मृत्युपत्रकर्त्याच्या संपदेच्या खर्चाने करावयाचे असते.

**उदाहरणे**

(एक) ' क ' ने जमिनीचा एक तुकडा विवक्षित किंमतीला खरेदी करण्याची सर्वसाधारण शब्दांत संविदा केली असून ती जमीन तो ' ख ' ला मृत्युपत्राने देतो आणि खरेदी-रक्कम देण्याआधी तो मृत्यू पावतो. ' क ' च्या मत्तेतून खरेदी-रक्कम भरून दिली पाहिजे.

(दोन) ' क ' ने जमिनीचा एक तुकडा पैशाच्या विवक्षित रकमेला खरेदी करण्याची संविदा केली असून, त्यापैकी निम्मी रक्कम रोख देऊन टाकावयाची आहे व निम्मी जमिनीच्या गहाणाद्वारे प्रतिभूत करावयाची आहे असे असता तो ' ख ' ला ती मृत्युपत्राने देतो व खरेदी रकमेचा कोणताही भाग प्रदान किंवा प्रतिभूत करण्यापूर्वी तो मृत्यू पावतो, खरेदी रकमेपैकी निम्मी रक्कम ' क ' च्या मत्तेतून दिली पाहिजे.

**जिच्यासाठी नियतकालागणिक जमीन महसूल किंवा भाडे प्रदेय आहे अशा उत्तरदानग्राहीच्या स्थावर संपत्तीची भारमुक्ती.**

**१६९.** ज्या स्थावर संपत्तीच्याबाबत जमीन महसुलाच्या स्वरूपात किंवा भाड्याच्या स्वरूपात नियतकालागणिक भरणा करावयाचा आहे तिच्यातील कोणत्याही हितसंबंधाचे मृत्युपत्रित दान दिलेले असेल, त्याबाबतीत, मृत्युपत्रकर्त्याची संपदा व उत्तरदानग्राही यांच्यापैकी अशा संपदेतून त्याच्या मृत्युच्या दिवसापर्यंत, प्रकरणपरत्वे, अशा रकमा किंवा त्यांचा प्रमाणांश भरला जाईल.

**उदाहरण**

ज्याच्याबाबत भाडे म्हणून वर्षाला ३६५ रुपये प्रदेय आहेत असे एक घर ' क ' हा ' ख ' ला मृत्युपत्राने देतो. ' क ' त्याचे भाडे नेहमीच्या वेळी भरतो आणि नंतर पंचवीस दिवसांनी मृत्यू पावतो. ' क ' च्या संपदेतून भाड्यापोटी पंचवीस रुपये भरले जातील.

**संयुक्त भांडवल कंपनीत विनिर्दिष्ट उत्तरदानग्राहीचा जो पुंजरोखा असेल त्याची भारमुक्ती.**

**१७०.** एखाद्या संयुक्त भांडवल कंपनीतील रोख्यांचे विनिर्दिष्टपणे मृत्युपत्रित दान देण्यात आले असेल आणि मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी अशा रोख्यांच्या संबंधात त्याच्याकडून कोणतीही मागणीची किंवा अन्य स्वरुपाची प्रदेय रक्कम देणे झाली असेल तर, अशा बाबतीत, " मृत्युपत्रात कोणताही निदेश दिला नसल्यास, अशा मागणीची किंवा अन्य स्वरुपाची प्रदेय रक्कम ही, " मृत्युपत्रकर्त्याची संपदा आणि उत्तरदानग्राही यांच्यापैकी, त्या संपदेतून भागवण्यात येईल ; परंतु मृत्युपत्रकर्त्यांच्या मृत्युनंतर अशा रोख्यांच्या संबंधात कोणतीही मागणीची किंवा अन्य स्वरुपाची प्रदेय रक्कम देणे झाली असेल आणि उत्तरदानग्राहीने असे मृत्युपत्रित दान स्वीकारले असेल, तर त्याबाबतीत अशी रक्कम ही मृत्युपत्रकर्त्याची संपदा व उत्तरदानग्राही यांच्यापैकी, उत्तरदानग्राहीकडून भरण्यात येईल.

**उदाहरणे**

(एक) ' क ' हा ' ख ' ला विवक्षित रेल्वेतील आपले शेअर्स मृत्युपत्राने देतो. ' क ' च्या मृत्युसमयी, रीतसर झालेल्या तूट भरपाईच्या मागणीची रक्कम म्हणून प्रत्येक शेअरमागे १०० रुपयांची रक्कम आणि मागणीबाबत देय म्हणून प्रोद्भूत झालेल्या व्याजाची रक्कम म्हणून प्रत्येक शेअरमागे ५ रुपयांची रक्कम त्याच्याकडून देय होती. या रकमांची जबाबदारी ' क ' च्या संपदेला सोसली पाहिजे.

(दोन) ' क ' ने एका नियोजित संयुक्त भांडवल कंपनीत ५० शेअर्स घ्यावयाचा करार केला असून प्रत्येक शेअरमागे १०० रुपये देण्याची संविदा केली आहे व त्याचा शेअरवरील हक्क पूर्ण होऊ शकण्यापूर्वी ती रक्कम भरली पाहिजे. ' क ' हा ' ख ' ला हे शेअर्स मृत्युपत्राने देतो. ' क ' चा हक्क पूर्ण करण्यासाठी जरूर असलेल्या रकमा ' क ' च्या संपदेतून भरल्या गेल्या पाहिजेत.

(तीन) ' क ' हा ' ख ' ला विवक्षित रेल्वेतील आपले शेअर्स मृत्युपत्राने देतो, ' ख ' उत्तरदान स्वीकारतो. ' क ' च्या मृत्युनंतर शेअर्सबाबत तूटभरपाईची मागणी केली जाते. ' ख ' ने त्या मागणीचे पैसे दिले पाहिजेत.

(चार) ' क ' हा ' ख ' ला संयुक्त भांडवल कंपनीतील आपले शेअर्स मृत्युपत्राने देतो. ' ख ' मृत्युपत्रित दान स्वीकारतो. नंतर कंपनीचा कारभार गुंडाळला जातो आणि प्रत्येक शेअर्सधारकाकडे अंशदानाची मागणी केली जाते. अंशदानाच्या रकमेची जबाबदारी उत्तरदानग्राहीने सोसली पाहिजे.

(पाच) ' क ' रेल्वे कंपनीतील १० शेअर्सचा मालक आहे, त्याच्या हयातीत भरलेल्या एका सभेत, प्रत्येक शेअर्सवर तीन हप्त्यांत भरावयाच्या ५० रुपयांची मागणी करण्यात येते. ' क ' हा ' ख ' ला आपले शेअर्स मृत्युपत्राने देतो आणि पहिला हप्ता भरण्यासाठी ठरलेला दिवस व दुसरा हप्ता भरण्यासाठी ठरलेला दिवस याच्या दरम्यान, पहिला हप्ता भरल्याशिवाय तो मृत्यू पावतो. ' क ' च्या संपदेतून पहिला हप्ता भरला पाहिजे आणि ' ख ' उत्तरदानाचा स्वीकार केल्यास त्याने उरलेले हप्ते भरले पाहिजेत.

## प्रकरण अठरा

### सर्वसाधारण शब्दांत वर्णिलेल्या वस्तूंच्या मृत्युपत्रित दानांविषयी

**सर्वसाधारण शब्दांत वर्णिलेल्या वस्तूंचे मृत्युपत्रित दान.**

**१७१.** जर सर्वसाधारण शब्दांत वर्णिलेल्या कशाचेही मृत्युपत्रित दान दिलेले असेल तर, त्या वर्णनाशी जे जुळते असे वाजवीरीत्या मानता येईल ते मृत्युपत्र व्यवस्थापकाने उत्तरदानग्राहीसाठी खरेदी केले पाहिजे.

**उदाहरणे**

(एक) ' क ' हा ' ख ' ला गाडीच्या घोड्यांची जोडी किंवा हिऱ्याची अंगठी मृत्युपत्राने देतो. मत्तेची स्थिती पाहता शक्य असल्यास, मृत्युपत्रव्यवस्थापकाने उत्तरदानग्राहीला अशा वस्तू पुरवल्या पाहिजेत.

(दोन) ' क ' हा ' ख ' ला माझ्या गाडीच्या घोड्यांची जोडी मृत्युपत्राने देतो. ' क ' च्या मृत्युसमयी त्याच्याजवळ गाडीचे घोडे नव्हते. उत्तरदान निष्फळ होते.

## प्रकरण एकोणीस

### निधीच्या व्याजाच्या किंवा उत्पन्नाच्या मृत्युपत्रित दानांविषयी

**निधीच्या व्याजाचे किंवा उत्पन्नाचे मृत्युपत्रित दान.**

**१७२.** जेथे कोणत्याही व्यक्तीला निधीचे व्याज किंवा उत्पन्न मृत्युपत्राने दिलेले असेल व मृत्युपत्रित दानाचा उपभोग मर्यादित कालापुरताच असावा असा उद्देश असल्याचे मृत्युपत्रावरून सूचित होत नसेल तेथे व्याज व त्याचप्रमाणे मुद्दल उत्तरदानग्राहीच्या मालकीचे होईल.

**उदाहरणे**

(एक) ' क ' हा ' ख ' ला केंद्र शासनाच्या ५ टक्के दराच्या आपल्या वचनचिठ्ठ्यांवरील व्याज मृत्युपत्राने देतो. त्या रोख्यांसंबंधी अन्य कोणताही खंड मृत्युपत्रात नाही. केंद्र शासनाच्या ५ टक्के दराच्या ' क ' च्या वचनचिठ्ठ्यांस ' ख ' हक्कदार आहे.

(दोन) केंद्र शासनाच्या ५.१/२ टक्के दराच्या आपल्या वचनचिठ्ठ्यांवरील व्याज ' क ' हा ' ख ' ला त्याच्या हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर ' ग ' ला मृत्युपत्राने देतो. ' ख ' त्याच्या हयातीत वचनचिठ्ठ्यांवरील व्याजास हक्कदार आहे आणि ' ख ' च्या मृत्युनंतर ' ग ' च्या वचनचिठ्ठ्यांस हक्कदार आहे.

(तीन) ' क्ष ' येथील आपल्या जमिनीचे भाडे ' क ' हा ' ख ' ला मृत्युपत्राने देतो. ' ख ' जमिनींना हक्कदार आहे.

## प्रकरण वीस

### वर्षासनाच्या मृत्युपत्रित दानांविषयी

**मृत्युपत्राने निर्मिलेले वर्षासन, मृत्युपत्रावरून विरुद्ध उद्देश दिसून न आल्यास, केवळ हयातीपुरतेच प्रदेय.**

**१७३.** जेव्हा मृत्युपत्राने वर्षासन निर्माण केलेले असते तेव्हा, सर्वसाधारण संपत्तीतून वर्षासन देण्याचा निदेश दिला असला किंवा त्याच्या खरेदीत गुंतवण्यासाठी एखादी पैशाची रक्कम मृत्युपत्राने दिली असली तरीही, मृत्युपत्रावरून विरुद्ध उद्देश दिसून न आल्यास, उत्तरदानग्राही केवळ आपल्या हयातीकरताच ते मिळण्यास हक्कदार असतो.

**उदाहरणे**

(एक) ' क ' हा ' ख ' ला वर्षाकाठी ५०० रुपये मृत्युपत्राने देतो. ' ख ' ५०० रुपयांची वार्षिक रक्कम आपल्या हयातीत मिळण्यास हक्कदार आहे.

(दोन) ' क ' हा ' ख ' ला दरमहा ५०० रुपयांची रक्कम मृत्युपत्राने देतो. ' ख ' आपल्या हयातीत दरमहा ५०० रुपयांची रक्कम मिळण्यास हक्कदार आहे.

(तीन) 'क' हा 'ख' ला त्याच्या हयातीकरता आणि 'ख' चा मृत्यू होताच 'ग' ला ५०० रुपयांचे वर्षासन मृत्युपत्राने देतो. 'ख' आपल्या हयातीत ५०० रुपयांच्या वर्षासनास हक्कदार आहे. 'ग' हा 'ख' च्या मागे हयात राहिला तर, 'ख' च्या मृत्युपासून स्वतःच्या मृत्युपर्यंत ५०० रुपयांच्या वर्षासनास हक्कदार आहे.

**जेव्हा संपत्तीच्या उत्पन्नातून किंवा सर्वसाधारण संपत्तीतून वर्षासन पुरवावे असा मृत्युपत्राने निर्देश दिलेला असतो अथवा मृत्युपत्राने दिलेला पैसा वर्षासनाच्या खरेदीत गुंतवावयाचा असतो तेव्हा निहित होण्याचा कालावधी.**

**१७४.** जेव्हा संपत्तीच्या उत्पन्नातून किंवा सर्वसाधारण संपत्तीतून कोणत्याही व्यक्तिकरता वर्षासन दिले जावे असा मृत्युपत्राने निदेश दिलेला असतो अथवा कोणत्याही व्यक्तिला द्यावयाच्या वर्षासनाच्या खरेदीत गुंतवण्यासाठी मृत्युपत्राने पैसा दिलेला असतो तेव्हा, मृत्युपत्रकर्त्याचा मृत्यू होताच उत्तरदान उत्तरदानग्राहीच्या ठायी हितसंबंधापुरते निहित होते आणि तो स्वतःच्या विकल्पानुसार, स्वतःसाठी वर्षासन खरेदी करवून घेण्यास किंवा मृत्युपत्राने त्या प्रयोजनार्थ विनियोजित केलेला पैसा मिळण्यास हक्कदार असतो.

**उदाहरणे**

(एक) आपल्या मृत्युपत्रव्यवस्थापकांनी आपल्या संपत्तीतून 'ख' साठी १,००० रुपयांचे वर्षासन खरेदी करावे असे 'क' आपल्या मृत्युपत्राने निर्देशित करतो. 'ख' स्वतःच्या विकल्पानुसार, आपल्या हयातीसाठी दिलेले १,००० रुपयांचे वर्षासन आपल्यासाठी खरेदी करवून घेण्यास अथवा अशा वर्षासनाच्या खरेदीस पुरेशी होतील इतकी रक्कम मिळण्यास हक्कदार आहे.

(दोन) 'क' हा 'ख' ला त्याच्या हयातीकरता एक निधी मृत्युपत्राने देतो आणि ख' च्या मृत्युनंतर 'ग' साठी वर्षासनाच्या खरेदीत तो खर्च करावा असे निर्देशित करतो. 'ख' व 'ग' मृत्युपत्रकर्त्यांच्या मागे हयात राहतात. 'ग' हा 'ख' च्या हयातीत मृत्यू पावतो. 'ख' चा मृत्यू होताच निधी 'ग' च्या प्रतिनिधीच्या मालकीचा होतो.

**वर्षासनात घट.**

**१७५.** जेव्हा मृत्युपत्राने वर्षासन दिलेले असेल पण मृत्युपत्रकर्त्याची मत्ता मृत्यूपत्राने दिलेली सर्व उत्तरदाने भागण्यास पुरेशी नसेल तेव्हा, मृत्युपत्राने दिलेली अन्य द्रव्यरूप उत्तरदाने ज्या प्रमाणात घट पावतील त्याच प्रमाणात वर्षासन घट पावेल.

**जेथे वर्षासनाचे दान व अवशिष्टाचे दान केलेले असेल तेथे संपूर्ण वर्षासन प्रथम भागवावयाचे.**

**१७६.** जेव्हा वर्षासनाचे दान व अवशिष्टाचे दान केलेले असेल तेव्हा, अवशिष्टांचा, कोणताही भाग अवशिष्ट उत्तरदानग्राहीला देण्याआधी संपूर्ण वर्षासन भागवावयाचे असते आणि जरूर असल्यास, मृत्युपत्रकर्त्याच्या संपदेचे मूलधन त्या प्रयोजनार्थ उपयोजिले जाईल.

## प्रकरण एकवीस

## धनकोंना व अंशाधिकाऱ्यांना द्यावयाच्या उत्तरदानांविषयी

**धनको प्रथमदर्शनी उत्तरदानास व त्याचप्रमाणे अंशास हक्कदार.**

**१७७.** जेव्हा ऋणकोने आपल्या धनकोला मृत्युपत्राने उत्तरदान दिलेले असेल आणि उत्तरदान ऋणाची पूर्ती म्हणून अभिप्रेत आहे असे मृत्युपत्रावरून दिसून येत नसेल तेव्हा, धनको उत्तरदानास व त्याचप्रमाणे ऋणाच्या रकमेस हक्कदार असेल.

**अपत्य प्रथमदर्शनी उत्तरदानाला व त्याचप्रमाणे अंशास हक्कदार.**

**१७८.** संविदेनुसार अपत्यासाठी अंशाची तरतूद करण्याचे आबंधन ज्याच्यावर आहे अशी आई-वा-बाप तसे करण्यास चुकला असून त्याने अपत्याला मृत्युपत्राने उत्तरदान दिले असेल आणि उत्तरदान अंशाची पूर्ती म्हणून अभिप्रेत आहे असे आपल्या मृत्युपत्राने दर्शविले नसेल तेथे, अपत्य उत्तरदान व त्याचप्रमाणे अंश मिळण्यास हक्कदार असेल.

**उदाहरण**

'क' ने 'ख' शी व्हावयाच्या आपल्या विवाहाच्या पूर्वकल्पनेने केलेल्या करारान्वये असे कबूल केले आहे की, आपल्या नियोजित विवाहसंबंधातून जन्माला येणाऱ्या मुलीपैकी प्रत्येकीला तिचा विवाह होताच तो २०,००० रुपये इतका अंश देईल. या कराराचा भंग झाला असल्यामुळे 'क' तो स्वतः व 'ख' यांच्या विवाहित मुलींपैकी प्रत्येकीला २०,००० रुपये मृत्युपत्राने देतो. उत्तरदानग्राही आपल्या अंशाशिवाय आणखी या मृत्युपत्रितदानाच्या लाभास हक्कदार आहेत.

**उत्तरदानग्राहीसाठी मागाहून केलेल्या तरतुदीमुळे लोपन नाही.**

**१७९.** कोणतेही मृत्युपत्रित दान उत्तरदानग्राहीसाठी मागाहून करून दिलेल्या संव्यवस्थेमुळे किंवा अन्यथा केलेल्या तरतुदीमुळे संपूर्णतः किंवा अंशतः लोप पावणार नाही.

**उदाहरणे**

(एक) 'क' हा आपला मुलगा 'ख' याला २०,००० रुपयांची रक्कम मृत्यूपत्रात देतो. नंतर तो 'ख' ला २०,००० रुपयांची रक्कम देतो. त्यामुळे उत्तरदान लोप पावत नाही.

(दोन) 'क' ने जिला तिच्या लहानपणापासून वाढवले आहे ती आपली पोरकी पुतणी 'ख' हिला तो ४०,००० रुपये मृत्यूपत्राने देतो. नंतर 'ख' च्या विवाहप्रसंगी 'क' तिच्या प्रीत्यर्थ ३०,००० रुपयांची रक्कम नेमून देतो. उत्तरदान त्यामुळे कमी होत नाही.

## प्रकरण बावीस

### निवडीविषयी

**ज्या परिस्थितीत निवड होते ती परिस्थिती.**

**१८०.** एखादी व्यक्ती जी वस्तू संक्रामित करण्याचा स्वतःला अधिकार नाही अशी एखादी वस्तू तसा अधिकार दर्शवून आपल्या मृत्युपत्राद्वारे संक्रामित करील तेव्हा, ती वस्तू जिच्या मालकीची असेल ती व्यक्ती असे संक्रमण कायम करणे किंवा असंमत करणे यांपैकी एका पर्यायाची निवड करील आणि दुसऱ्या पर्यायाच्या बाबतीत तिला मृत्युपत्राने तिच्याकरता तरतूद केलेले कोणतेही लाभ सोडून द्यावे लागतील.

**मालकाने सोडून दिलेल्या हितसंबंधाची प्रक्रांती.**

**१८१.** कलम १८० मध्ये नमूद केलेल्या परिस्थितीत सोडून दिलेला हितसंबंध जणू काही तो मृत्युपत्राने उत्तरदानग्राहीच्या प्रीत्यर्थ संक्रामित केलेला नसावा त्याप्रमाणे, प्रक्रांत होईल ; तथापि, असंतुष्ट उत्तरदानग्राहीला मृत्युपत्राद्वारे जे दान देण्याचा प्रयत्न झाला होता त्याची रक्कम किंवा मूल्य त्यास भरून देण्याच्या प्रभारास तो हितसंबंध अधीन असेल.

**मृत्युपत्रकर्त्याचा आपल्या मालकीबद्दलचा समज महत्त्वाचा नाही.**

**१८२.** आपल्या मृत्युपत्राद्वारे मृत्युपत्रकर्ता मालकी दर्शवून जे संक्रामित करतो ते आपल्या मालकीचे आहे असा त्याचा समज असो वा नसो,—कलमे १८० व १८१ याचे उपबंध लागू होतात.

#### उदाहरणे

(एक) सुलतानपूरचे शेत ही 'ग' ची संपत्ती होती. 'ग' ला १,००० रुपयांचे उत्तरदान देऊन 'क' ने ते शेत 'ख' ला मृत्युपत्राने दिले आहे. 'ग' ने आपले सुलतानपूरचे शेत घेण्याचा पर्याय निवडला असून त्याची किंमत ८०० रुपये आहे. 'ग' आपले १,००० रुपयांचे उत्तरदान गमावतो, त्यापैकी ८०० रुपये 'ख' कडे जातात, आणि उरलेले २०० रुपये प्रकरणपरत्वे, अवशिष्ट मृत्युपत्रित दानात सामील होतात किंवा विनामृत्युपत्र उत्तराधिकाराच्या नियमांनुसार प्रक्रांत होतात.

(दोन) 'ख' च्या थोरल्या भावाची (तो विवाहित असून त्याला अपत्ये आहेत) त्याच्या मृत्युसमयी हयात संतती राहिली नाही तर 'ख' ला एक संपदा देण्यात यावी अशा आशयाचे 'क' मृत्युपत्रित दान करतो. 'क' हा 'ग' लाही 'ख' च्या मालकीचे रत्न मृत्युपत्राने देतो. 'ख' ने रत्न सोडून देणे किंवा संपदा गमावणे यांपैकी कशाची तरी निवड केली पाहिजे.

(तीन) 'ख' ला १,००० रुपये आणि 'ख' च्या थोरल्या भावाची (तो विवाहित असून त्याला अपत्ये आहेत) त्याच्या मृत्युसमयी हयात संतती राहिली नाही तर जी एका संव्यवस्थेअन्वये 'ख' च्या मालकीची होईल. अशी संपदा 'क' हा 'ग' ला मृत्युपत्राने देतो. 'ख' ने संपदा सोडून देणे किंवा उत्तरदान गमावणे यांपैकी कशाचीतरी निवड केली पाहिजे.

(चार) 'क' ही अठरा वर्षे वयाची व्यक्ती [1][भारतात] अधिवासी आहे. पण इंग्लंडमध्ये तिची स्थावर संपत्ती असून 'ग' हा त्या संपत्तीचा विधितः वारस आहे ; 'क' हा 'ग' ला मृत्युपत्राने उत्तरदान देतो आणि त्याच्या अधीनतेने, 'ख' ला "माझी जी काही असेल व जेथे कोठे असेल ती सर्व संपत्ती-स्थावर व जंगम" मृत्युपत्राने देतो आणि २१ व्या वर्षापूर्वी मृत्यू पावतो. इंग्लंडमधील स्थावर संपत्ती मृत्युपत्राने संक्रामित होत नाही. 'ग' ला इंग्लंडमधील संपत्ती सोडून न देता आपल्या उत्तरदानावर दावा सांगता येईल.

**एखाद्या माणसाच्या लाभार्थ केलेले मृत्युपत्रित दान निवडीच्या प्रयोजनार्थ काय म्हणून मानावयाचे.**

**१८३.** व्यक्तीच्या लाभार्थ केलेले मृत्युपत्रित दान हे, निवडीच्या प्रयोजनार्थ, तिला स्वतःला दिलेल्या मृत्युपत्रित दानासारखेच असते.

#### उदाहरण

सुलतानपूर खुर्दचे शेत ही 'ख' ची संपत्ती असून ते 'क' ने 'ग' ला मृत्युपत्राने दिले आहे आणि सुलतानपूर बुद्रुक नावाचे दुसरे शेत आपल्या स्वतःच्या मृत्युपत्र व्यवस्थापकांना मृत्युपत्राने देऊन ते विकावे व विक्रीचे उत्पन्न 'ख' ची ऋणे फेडण्यासाठी उपयोजावे असा त्याने निदेश दिला आहे. 'ख' ने आपण मृत्युपत्रानुसार वागणार की त्याला विरोधून आपले सुलतानपूर खुर्द येथील शेत ठेवून घेणार यांपैकी कशाचीतरी निवड केली पाहिजे.

---

१. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'राज्य' याऐवजी 'भारत' हा शब्दोल्लेख घातला.

अप्रत्यक्षपणे लाभ घेणाऱ्या व्यक्तीला निवड करावी लागत नाही.

**१८४.** मृत्युपत्राखाली प्रत्यक्षपणे कोणताही लाभ न घेणाऱ्या पण त्याखाली अप्रत्यक्षपणे लाभ प्राप्त करणाऱ्या व्यक्तीला आपली निवड करावी लागत नाही.

**उदाहरण**

'ग' च्या प्रीत्यर्थ हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर त्याचे एकुलते एक अपत्य 'घ' याच्या प्रीत्यर्थ सुलतानपूरच्या जमिनी नेमून दिल्या गेल्या आहेत. 'क' हा 'ख' ला सुलतानपूरच्या जमिनी आणि 'ग' ला १,००० रुपये मृत्युपत्राने देतो. 'ग' मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर लवकरच व कोणतीही निवड केल्याशिवाय विनामृत्युपत्र मृत्यू पावतो. 'घ' हा 'ग' च्या संपदेचे प्रशासनपत्र मिळवतो आणि प्रशासक म्हणून 'ग' च्या संपदेच्या वतीने मृत्युपत्रित लाभ घेण्याचा पर्याय निवडतो. त्या भूमिकेत तो १,००० रुपयांचे उत्तरदान घेतो आणि मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर व 'ग' च्या मृत्युपूर्वी सुलतानपूरच्या जमिनीचे जे भाडे उपार्जित झाले त्यांचा हिशेब तो 'ख' ला देतो. व्यक्ती या भूमिकेत तो मृत्युपत्राला विरोधून स्वतःकडे सुलतानपूरच्या जमिनी ठेवून घेतो.

व्यक्ती या भूमिकेत मृत्युपत्रित लाभ घेणाऱ्या व्यक्तीला अन्य भूमिकेत त्यास विरोधून लाभ घेण्याची निवड करता येईल.

**१८५.** व्यक्ती या भूमिकेत जी मृत्युपत्राखाली लाभ घेईल त्या व्यक्तीला, अन्य भूमिकेत मृत्यूपत्रास विरोधून लाभ घेण्याचा पर्याय निवडता येईल.

**उदाहरण**

'क' प्रीत्यर्थ हयातीकरता आणि त्याच्या मृत्युनंतर 'ख' प्रीत्यर्थ सुलतानपूरची संपदा नेमून दिलेली आहे. 'क' सुलतानपूरची संपदा 'घ' साठी, आणि २,००० रुपये 'ख' साठी आणि १,००० रुपये 'ख' चा एकुलता एक मुलगा 'ग' याच्यासाठी ठेवतो. मृत्युपत्रकर्त्यानंतर लवकरच 'ख' निवड केल्याशिवाय विनामृत्युपत्र मृत्यू पावतो. 'ग' हा 'ख' च्या संपदेचे प्रशासनपत्र मिळवतो आणि प्रशासक म्हणून मृत्युपत्राला विरोधून सुलतानपूरची संपदा ठेवण्याची व २,००० रुपयांचे उत्तरदान सोडून देण्याची निवड करतो. 'ग' ला असे करता येईल, आणि तरीही मृत्युपत्राखालील आपल्या १,००० रुपयांच्या उत्तरदानावर दावा सांगता येईल.

लगतपूर्वीच्या सहा कलमांच्या उपबंधांना अपवाद.

**१८६.** कलमे १८० ते १८५ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा उत्तरदानग्राहीच्या मालकीच्या एखाद्या वस्तुऐवजी त्यास एखादे विशिष्ट दान देण्यात आल्याचे मृत्युपत्रात दर्शविले असेल, आणि त्या वस्तुची देखील अशा मृत्युपत्रात स्पष्ट शब्दात व्यवस्था करण्यात आली असेल तेव्हा, उत्तरदानग्राहीने त्या वस्तुवर दावा सांगितल्यास, त्याने असे विशिष्ट दान सोडून दिले पाहिजे. परंतु अशा मृत्युपत्राद्वारे त्यास देण्यात आलेला कोणताही अन्य स्वरूपाचा लाभ त्याने सोडून देण्याचे त्याच्यावर बंधन असणार नाही.

**उदाहरण**

'क' च्या विवाहलक्षी संव्यवस्थेखाली त्याची पत्नी, जर ती त्याच्या मागे हयात राहिली तर, स्वतःच्या हयातीत सुलतानपूरच्या संपदेच्या उपभोगास हक्कदार आहे. 'क' आपल्या मृत्युपत्राने आपल्या पत्नीला सुलतानपूरच्या संपदेतील तिच्या हितसंबंधाऐवजी २०० रुपयांचे वर्षासन तिच्या हयातीकरता देतो व ती संपदा आपल्या मुलाला मृत्युपत्राने देतो. तो आपल्या पत्नीला १,००० रुपयांचे उत्तरदानही देतो. ती विधवा संव्यवस्थेखाली ज्यास हक्कदार आहे ते घेण्याचा पर्याय ती निवडते. ती वर्षासन सोडून देण्यास बांधलेली आहे, पण १,००० रुपयांचे उत्तरदान सोडून देण्यास बांधलेली नाही.

मृत्युपत्राने दिलेल्या लाभाचा स्वीकार म्हणजे मृत्युपत्राखाली लाभ घेण्याच्या पर्यायाची निवड असे केव्हा होते.

**१८७.** जर उत्तरदानग्राहीला निवड करण्याच्या आपल्या हक्काची आणि निवड करताना समंजस माणसाच्या निर्णयशक्तीवर जिचा प्रभाव पडेल त्या परिस्थितीची जाणीव असेल त्याने परिस्थिसंबंधीची चौकशी करण्याचा हक्क वर्जिला तर, मृत्युपत्राने दिलेल्या लाभाचा स्वीकार म्हणजे मृत्युपत्राखाली लाभ घेण्याच्या पर्यायाची उत्तरदानग्राहीने केलेली निवड होते.

**उदाहरणे**

(एक) 'क' सुलतानपूर खुर्द नावाच्या संपदेचा मालक असून सुलतानपूर बुद्रुक नावाच्या दुसऱ्या संपदेत त्याचा आजीव हितसंबंध आहे व त्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा 'ख' त्या संपदेस अबाधितपणे हक्कदार होणार आहे. 'क' च्या मृत्युपत्राने सुलतानपूर खुर्दची संपदा 'ख' ला आणि सुलतानपूर बुद्रुकची संपदा 'ग' ला दिली आहे. सुलतानपूर बुद्रुकच्या संपदेवरील आपल्या हक्काबद्दलच्या अज्ञानामुळे 'ख' हा 'ग' ला तिचा कब्जा घेऊ देतो आणि सुलतानपूर खुर्दच्या संपदेचा कब्जा घेतो. 'ग' ला दिलेले सुलतानपूर बुद्रुकचे मृत्युपत्रित दान 'ख' ने कायम केलेले नाही.

(दोन) ' क ' चा ज्येष्ठ मुलगा ' ख ' सुलतानपूर नावाच्या संपदेचा कब्जाधारक आहे. ' क ' हा ' ग ' ला सुलतानपूर आणि ' ख ' ला ' क ' च्या संपत्तीचा अवशिष्ट मृत्युपत्राने देतो. अवशिष्ट संपत्ती ५,००० रुपये इतकी असेल अशी माहिती ' क ' च्या मृत्युपत्र व्यवस्थापकांनी ' ख ' ला दिल्यावरून तो ' ग ' ला सुलतानपूरचा कब्जा घेऊ देतो. नंतर अवशिष्ट संपत्ती ५०० रुपयांहून अधिक होत नाही असे त्याच्या नजरेस येते. ' ग ' ला दिलेले सुलतानपूरच्या संपदेचे मृत्युपत्रित दान ' ख ' ने कायम केलेले नाही.

**जेव्हा जाणीव किंवा हक्कवर्जन गृहीत धरले जाते किंवा त्याचे अनुमान केले जाते ती परिस्थिती.**

**१८८.** (१) जर उत्तरदानग्राहीने अमान्यता व्यक्त करण्यासाठी कोणतीही कृती न करता, मृत्युपत्राने त्याच्यासाठी तरतूद केलेल्या लाभांचा दोन वर्षांपर्यंत उपभोग घेतला तर, विरुद्ध पुराव्याच्या अभावी, अशी जाणीव किंवा चौकशी करण्याच्या हक्काचे वजन गृहीत धरले जाईल.

(२) मृत्युपत्रित दानाच्या विषयवस्तूत हितसंबंधित असलेल्या व्यक्तींना उत्तरदानग्राहीच्या ज्या कोणत्याही कृतीमुळे, जणू काही अशी कृती केली नसल्याप्रमाणे त्याच स्थितीत ठेवणे अशक्य होते त्या कृतीवरून अशी जाणीव असल्याचे किंवा चौकशी करण्याच्या हक्काचे वर्जन केल्याचे अनुमान करता येईल.

### उदाहरण

' ग ' ज्या संपदेला हक्कदार आहे ती संपदा ' क ' हा ' ख ' ला आणि एक कोळशाची खाण ' ग ' ला मृत्युपत्राने देतो. ' ग ' खाणीचा कब्जा घेतो आणि ती रिक्त करतो. ' ख ' ला दिलेले संपदेचे मृत्युपत्रित दान त्याने त्याद्वारे कायम केले आहे.

**मृत्युपत्रकर्त्याच्या प्रतिनिधींना उत्तरदानग्राहीकडे निवड करण्याची मागणी केव्हा करता येईल.**

**१८९.** जर मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर एक वर्षाच्या आत उत्तरदानग्राहीने मृत्युपत्र कायम करण्याचा किंवा ते अमान्य करण्याचा आपला उद्देश मृत्युपत्रकर्त्याच्या प्रतिनिधींना दर्शवला नाही तर, तो अवधी संपल्यानंतर प्रतिनिधी त्याच्याकडे आपला पर्याय निवडण्याची रीतसर मागणी करतील; आणि अशी रीतसर मागणी पोचल्यानंतर वाजवी अवधीत त्याने ती पुरी केली नाही तर त्याने मृत्युपत्र कायम करण्याचा पर्याय निवडला असल्याचे मानले जाईल.

**निःसमर्थतेच्या बाबतीत निवड लांबणीवर टाकणे.**

**१९०.** निःसमर्थतेच्या बाबतीत, निःसमर्थता संपेपर्यंत किंवा एखादी सक्षम प्राधिकारी व्यक्ती निवड करीपर्यंत निवड लांबणीवर टाकली जाईल.

## प्रकरण तेवीस

## मृत्युच्या पूर्वकल्पनेने केलेल्या दानांविषयी

**मृत्युच्या पूर्वकल्पनेने केलेल्या दानाद्वारे हस्तांतरणीय संपत्ती.**

**१९१.** (१) एखादा मनुष्य जी कोणतीही जंगम संपत्ती मृत्युपत्राने संक्रामित करू शकेल ती तो मृत्युच्या पूर्वकल्पनेने केलेल्या दानाद्वारे संक्रामित करू शकेल.

(२) जेव्हा एखादा मनुष्य आजारी असून आपल्या आजारात लवकरच आपण मृत्यु पावणार हे त्याला अपेक्षित असेल तेव्हा, कोणत्याही जंगम संपत्तीचा कब्जा दुसऱ्याकडे सुपूर्द करून, दाता त्या आजारात मृत्यू पावल्यास त्या दुसऱ्या व्यक्तीने ती संपत्ती दान म्हणून ठेऊन घ्यावी असे सांगितले तर, दान मृत्युच्या पूर्वकल्पनेने केले असल्याचे म्हटले जाते.

(३) दात्याला असे दान परत घेता येईल; आणि ज्या आजारात ते दान दिले असेल त्यातून तो बरा झाल्यास, किंवा ज्याला ते दिले त्याच्यामागे दाता हयात राहिल्यास ते परिणामक असणार नाही.

### उदाहरणे

(एक) ' क ' आजारी असून मृत्यू अपेक्षित असताना तो ' ख ' कडे ' क ' चा मृत्यू झाल्यास त्याने ठेवून घ्यावयाच्या म्हणून पुढील वस्तू सुपूर्द करतो :—

घड्याळ :

' ग ' ने ' क ' ला दिलेले बंधपत्र :

बँकनोट :

कोरे पृष्ठांकन केलेली केंद्र शासनाची वचनचिठ्ठी :

कोरे पृष्ठांकन केलेले विनिमयपत्र :

काही गहाणखते.

ज्या आजारात ' क ' ने या वस्तू सुपूर्द केल्या त्यात तो मृत्यू पावतो.

' ख ' पुढील वस्तूंस हक्कदार आहे :—

घड्याळ :

' ग ' च्या बंधपत्राद्वारे प्रतिभूत केलेले ऋण :

बँकनोट :

केंद्र शासनाची वचनचिठ्ठी :

विनिमयपत्र :

गहाणखताने प्रतिभूत केलेला पैसा.

(दोन) ' क ' आजारी असून त्या आजारात मृत्यू अपेक्षित असताना तो ' ख ' ला ट्रंकेची चावी किंवा ज्यामध्ये ' क ' च्या मालकीचा माल रास करून ठेवलेला आहे अशा वखारीची चावी, ट्रंकेतील वस्तूंवर किंवा ठेवलेल्या मालावर त्याचे नियंत्रण असावे अशा उद्देशाने सुपूर्द करतो आणि ' क ' चा मृत्यु झाल्यास त्याने त्या ठेवाव्यात, असे त्यास सांगतो, ज्या आजारात ' क ' ने या वस्तू सुपूर्द केल्या त्यात तो मृत्यू पावतो. ' ख ' ट्रंकेला व तिच्यातील वस्तुंना किंवा वखारीत रास करून ठेवलेल्या ' क ' च्या मालाला हक्कदार आहे.

(तीन) ' क ' आजारी असून त्या आजारात मृत्यू अपेक्षित असताना तो काही वस्तू वेगवेगळ्या पुडक्यात बांधून बाजूला ठेवतो आणि वेगवेगळ्या पुडक्यांवर ' ख ' व ' ग ' यांची नावे लिहितो. ' क ' च्या हयातीत ही पुडकी सुपूर्द करण्यात आलेली नाहीत. ज्या आजारात ' क ' ने पुडकी बाजूला काढून ठेवली त्यात तो मृत्यू पावतो. ' ख ' व ' ग ' हे पुडक्यांतील वस्तूंना हक्कदार नाहीत.

## भाग सात

### मृत्युच्या संपत्तीचे संरक्षण

**मृताच्या संपत्तीवर उत्तराधिकारान्वये हक्क सांगणाऱ्या व्यक्तीला गैर कब्जाविरुद्ध दाद मिळण्यासाठी अर्ज करता येईल.**

**१९२.** (१) जर कोणतीही व्यक्ती जंगम किंवा स्थावर संपत्ती मागे ठेवून मृत्यू पावली तर त्या संपत्तीवर किंवा तिच्या कोणत्याही अंशावर उत्तराधिकाराने हक्क असल्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्तीला, एकतर अन्य व्यक्तीने प्रत्यक्ष कब्जा घेतल्यानंतर, किंवा बळजबरीच्या मार्गाने कब्जा हिरावून घेतला जाण्याची धास्ती वाटत असेल तेव्हा, संपत्तीचा कोणताही भाग जेथे आढळेल किंवा स्थित असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा न्यायाधीशाकडे दाद मिळण्यासाठी अर्ज करता येईल.

(२) कोणतीही अज्ञान, निरर्ह किंवा अनुपस्थित व्यक्ती पूर्वोक्तानुसार अशा संपत्तीस उत्तराधिकाराने हक्कदार असेल तर, त्या बाबतीत कोणत्याही अभिकर्त्याला, नातलगाला, किंवा निकटच्या मित्राला किंवा आपल्या दखलगिरीत येणाऱ्या प्रकरणी पाल्याधिकरणाला अनुमतीसाठी तसाच अर्ज करता येईल.

**न्यायाधीशाने करावयाची चौकशी.**

**१९३.** (१) ज्यांच्याकडे असा अर्ज करण्यात आला असेल तो जिल्हा न्यायधीश प्रथमतः अर्जदाराची शपथेवर तपासणी करील आणि कब्जा असलेल्या किंवा कब्जा हिरावून घेण्यासाठी बळजबरीचा मार्ग अवलंबणाऱ्या पक्षाला कायदेशीर हक्क नाही आणि अर्जदार किंवा जिच्या वतीने तो अर्ज करतो ती व्यक्ती खरोखरी हक्कदार असून दावा करण्याच्या सर्वसामान्य उपायाचाच मार्ग मोकळा ठेवल्यास ते तिला बरेच बाधक होण्याचा संभव आहे, आणि अर्ज सद्‌भावपूर्वक करण्यात आला आहे असे समजण्यात पुरेसे कारण आहे किंवा काय याबाबत त्याला जर काही अधिक चौकशीची जरूरी वाटली तर ती त्याला करता येईल.

**प्रक्रिया.** **१९४.** पूर्वोक्तानुसार समजण्यास पुरेसे कारण आहे, अशी जिल्हा न्यायधीशाची खात्री झाल्यास—पण अन्यथा नाही.— तो ज्याच्याविरुद्ध तक्रार आली त्या पक्षाला समन्स पाठवील आणि कब्जा खुला करण्याबाबत किंवा तो निर्वेध ठेवण्याबाबत जाहीर नोटीस देईल आणि वाजवी अवधी संपल्यानंतर (यात यापुढे उपबंधित केल्याप्रमाणे वादाच्या अधीनतेने) कब्जाचा अधिकार संक्षेपतः निर्धारित करील आणि तदनुसार कब्जा सुपूर्द करील :

परंतु, न्यायधीशाला एक अधिकारी नियुक्त करण्याची शक्ती असेल आणि तो अधिकारी चीजवस्तूंची जंत्री करील आणि, त्या प्रयोजनार्थ अर्ज आल्यास तो विनाविलंब मोहोरबंद करील किंवा अन्यथा सुरक्षित करील——मग ज्या पक्षाविरुद्ध तक्रार करण्यात आली असेल त्याला समन्स पाठविण्यासाठी जरूर असलेली चौकशी त्याने संपवलेली असो वा नसो.

**१९५.** जर संक्षिप्त कार्यवाहीचा निर्णय होऊ शकण्यापूर्वी संपत्तीचे दुर्विनियोजन किंवा अपव्यय होण्याच्या संकटाची धास्ती असेल आणि कब्जा असलेल्या पक्षाकडून प्रतिभूती मिळवण्यास विलंब झाल्यामुळे किंवा तिच्या अपुरेपणामुळे कब्जाहीन पक्ष कायदेशीर मालक असल्यास त्याला बऱ्याच मोठ्या धोक्याला तोंड द्यावे लागण्याचा संभव आहे, असे पूर्वोक्तानुसार केलेल्या चौकशीवरून आणखी दिसून आले तर, जिल्हा न्यायधीशाला एक किंवा अधिक अभिरक्षक नियुक्त करता येतील व त्यांचा प्राधिकार त्याच्या किंवा त्यांच्या नियुक्तींच्या अटीनुसार चालू राहील आणि काही झाले तरी, संक्षिप्त कार्यवाहीचा निर्णय होऊन तिच्या परिणामी कब्जा कायम झाल्यानंतर किंवा सुपूर्द झाल्यानंतर मात्र नाही : **कार्यवाहीचा निर्णय होईतोवर अभिरक्षकाची नियुक्ती.**

परंतु, जमिनीच्या बाबतीत, न्यायधीशाला अभिरक्षकाचे अधिकार जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा जिल्हाधिकाऱ्यास, दुय्यम असणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवता येतील :

परंतु, आणखी असे की, कोणत्याही संपत्तीबाबतची अभिरक्षकाची प्रत्येक नियुक्ती रीतसर प्रसिद्ध केली जाईल.

**१९६.** जिल्हा न्यायाधीश अभिरक्षकाला सर्वसाधारणपणे अथवा कब्जा असलेला पक्ष प्रतिभूती देईपर्यंत अथवा संपत्तीच्या जंत्र्या केल्या जाईपर्यंत अथवा कब्जा असलेला पक्षाकडून दुर्विनियोजनापासून किंवा अपव्ययापासून संपत्ती सुरक्षित ठेवण्यास जरूर असलेल्या अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी संपत्तीचा कब्जा घेण्यास प्राधिकृत करू शकेल :. **अभिरक्षकास प्रदान केल्या जाऊ शकतील अशा शक्ती.**

परंतु, कब्जा असलेल्या पक्षाला, त्याने प्रतिभूती दिल्यावर किंवा दिली नसता असा कब्जा चालू ठेवल्यास मुभा देणे किंवा न देणे हे न्यायाधीशाच्या विवेकाधीन असेल आणि कोणत्याही प्रकारे कब्जा चालू राहणे हे जंत्र्यांशी अथवा विलेख किंवा अन्य चीजवस्तू सुरक्षित ठेवण्याशी संबंधित असे जे आदेश न्यायाधीश काढील त्यांना अधीन असेल.

**१९७.** (१) जेथे दहाव्या भागाखाली किंवा, [१]उत्तराधिकार प्रमाणपत्र अधिनियम, १८८९ (१८८९ चा ७) खाली प्रमाणपत्र दिले असेल अथवा संप्रमाणाचे किंवा प्रशासनपत्राचे प्रदान करण्यात आले असेल तेथे, या भागाखाली नियुक्त केलेले अभिरक्षक, विधितः प्रमाणपत्रधारकाचा किंवा मृत्युपत्र व्यवस्थापकाचा किंवा प्रशासकाचा असलेला कोणताही प्राधिकार वापरणार नाही. **अभिरक्षकांनी विवक्षित शक्ती वापरण्यास मनाई.**

(२) ज्यांनी ऋणे किंवा भाटके यांचा ती स्वीकारण्यास न्यायालयाने प्राधिकृत केलेल्या अभिरक्षकाकडे भरणा केला असेल त्या सर्व व्यक्तींचे हानीरक्षण केले जाईल, आणि ज्या व्यक्तीने, प्रकरणपरत्वे ते प्रमाणपत्र, सप्रमाण किंवा प्रशासनपत्र मिळविले असेल तिच्याकडे त्यांचा भरणा करण्यास अभिरक्षक जबाबदार असेल. **अभिरक्षकाकडे ऋणे, इत्यादींचा भरणा.**

**१९८.** (१) जिल्हा न्यायाधीश अभिरक्षकाकडून, तो आपला न्यास इमानदारीने पार पाडील आणि यात यापुढे उपबंधित केल्यानुसार त्याचे समाधानकारक हिशेब देईल याकरता प्रतिभूती घेईल आणि जिल्हा न्यायाधीशास वाजवी वाटेल असे, जंगम संपत्तीवर आणि स्थावर संपत्तीपासूनच्या वार्षिक फायद्यावर काही झाले तरी ५ टक्क्यांहून अधिक नाही इतके पारिश्रमिक संपत्तीतून मिळविण्यास त्याला प्राधिकृत करू शकेल. **अभिरक्षकाने प्रतिभूती द्यावयाची आणि त्याला पारिश्रमिक मिळू शकेल.**

(२) संक्षिप्त कार्यवाहीचा अभिनिर्णय होताच, अभिरक्षकाने वसूल केलेल्या सर्व अभिशेष पैशाचा न्यायलयात भरणा केला जाईल आणि त्या पैशास हक्कदार असलेल्या व्यक्तींच्या लाभार्थ तो सार्वजनिक रोख्यांत गुंतवला जाईल.

(३) शक्य तितक्या वाजवी त्वरेने अभिरक्षकाकडून प्रतिभूती मागवण्यात येईल, आणि व्यवहार्य असेल तेथे, ज्या प्रकरणांकरिता त्या व्यक्तीला नंतर अभिरक्षक म्हणून नेमता येईल त्या सर्वांना सर्वसाधारणपणे ती पुरेशी होईल अशाप्रकारे घेतली जाईल; पण प्रतिभूती घेण्यास विलंब झाला म्हणून न्यायाधीशाला अभिरक्षाच्या ठायी याच्या पदाचे अधिकार तात्काळ विनिहित करण्यास प्रतिबंध होणार नाही.

**१९९.** (१) जेथे मृत व्यक्तीच्या संपदेत शासनाला महसूल देणारी जमीन संपूर्णतः किंवा अंशतः किंवा अंशतः समाविष्ट असेल तेथे कब्जा असलेल्या पक्षाला समन्स पाठवणे, अभिरक्षकाची नियुक्ती करणे किंवा त्या नियुक्तीसाठी व्यक्ती नामनियुक्त करणे यांच्या औचित्याविषयीच्या सर्व बाबींमध्ये जिल्हा न्यायाधीश जिल्हाधिकाऱ्याकडून अहवाल मागवील आणि जिल्हाधिकारी त्यावरून तो सादर करील : **संपदेत महसूल देणारी जमीन अंतर्भूत असेल तेथे जिल्हाधिकाऱ्याकडून अहवाल.**

परंतु, तातडीच्या प्रकरणी, न्यायाधीशास प्रथमतः अशा अहवालाशिवाय पुढील कार्यवाही करता येईल.

---

१. १९९५ चा अधिनियम ३९, कलम ३९२ व अनुसूची नववी यांद्वारे अंशतः व १९३८ चा अधिनियम १ याद्वारे अंतिमरीत्या निरसन.

(२) न्यायाधीश अशा कोणत्याही अहवालानुसार कृती करण्यास बांधलेला असणार नाही, पण त्याने अशा अहवालास न अनुसरता अन्यथा कृती केल्यास तो तात्काळ उच्च न्यायालयाकडे आपल्या कारणांचे निवेदन पाठवील, आणि अशा कारणांनी उच्च न्यायालयाचे समाधान न झाल्यास ते न्यायाधीशाला जिल्हाधिकाऱ्याच्या अहवालानुरूप पुढील कार्यवाही करण्याचा निदेश देईल.

**दावा मांडणे व त्यात बचाव देणे.**

**२००.** दावा मांडण्याविषयी किंवा त्यात बचाव देण्याविषयी जिल्हा न्यायाधीशाने दिलेल्या सर्व आदेशांस अभिरक्षक अधीन असेल, आणि संपदेच्या वतीने अभिरक्षकाच्या नावे सर्व दावे मांडता येतील किंवा त्यात बचाव देता येईल :

परंतु, ऋणांच्या किंवा भाटकांच्या वसुलीसाठी अभिरक्षकाच्या नियुक्ती-आदेशात व्यक्त प्राधिकार असणे आवश्यक असेल, पण असा व्यक्त प्राधिकार त्याच्या सामर्थ्याने मिळालेल्या कोणत्याही पैशाच्या रकमेबद्दल संपूर्ण ऋणमुक्ती देण्यास अभिरक्षकाला समर्थ करील.

**अभिरक्षकाकडे अभिरक्षा असेतोवर दृश्यमान मालकांना भत्ते.**

**२०१.** अभिरक्षकाच्या अभिरक्षेत संपत्ती असेतोवर हितसंबंधित पक्षांच्या हक्कांची व परिस्थितीची संक्षिप्त चौकशी केल्यावर जिल्हा न्यायाधीश त्याला जरुरीचे वाटतील असे भत्ते तिच्यावर सकृतदर्शनी अधिकार असलेल्या पक्षांना देऊ शकेल आणि संक्षिप्त कार्यवाहीच्या अभिनिर्णयावरून तो पक्ष तिला हक्कदार नाही असे आढळून आले तर त्यांची सव्याज परतफेड व्हावी यासाठी, स्वविवेकानुसार प्रतिभूती घेऊ शकेल.

**अभिरक्षकाने हिशेब दाखल करावयाचे.**

**२०२.** अभिरक्षक गोषवाऱ्याच्या स्वरूपात मासिक हिशेब दाखल करील आणि तीन महिन्यांचा प्रत्येक कालावधी संपताच,—त्याचे प्रशासन तितका काळ टिकले तर आणि संपत्तीचा कब्जा सोडताच आपल्या प्रशासनाच्या जिल्हा न्यायाधीशाचे समाधान होईल असा तपशीलवार वृत्तांत दाखल करील.

**हिशेबांचे निरीक्षण आणि हितसंबंधित पक्षाचा प्रतिरूप हिशेब ठेवण्याचा हक्क.**

**२०३.** (१) अभिरक्षकाचे हिशेब सर्व हितसंबंधित पक्षांना निरीक्षणार्थ खुले असतील आणि अशा कोणत्याही हितसंबंधित पक्षाने अभिरक्षकाकडे येणाऱ्या व त्याने दिलेल्या रकमांचा प्रतिरूप हिशेब ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यक्ती नियुक्त करणे हे कायदेशीर होईल.

(२) जर अभिरक्षकाचे हिशेब थकित आहेत किंवा ते चुकीचे अगर अपूर्ण आहेत असे आढळून आले तर, अथवा जेव्हा केव्हा जिल्हा न्यायाधीश ते हजर करण्याचा आदेश देईल तेव्हा त्याने तसे केले नाही तर, तो अशा प्रत्येक कसुरीबद्दल एक हजार रुपयांहून अधिक नाही इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

**त्याच संपत्तीसाठी दुसरा अभिरक्षक नियुक्त करण्यास आडकाठी.**

**२०४.** जर कोणत्याही जिल्ह्याच्या न्यायाधीशाने मृत व्यक्तीच्या संपूर्ण संपत्तीबाबत अभिरक्षक नियुक्त केलेला असेल तर अशा नियुक्तीमुळे त्याच राज्यातील अन्य कोणत्याही जिल्ह्याच्या न्यायाधीशास अन्य कोणत्याही अभिरक्षकाची नियुक्ती करण्यास प्रतिबंध होईल, पण मृताच्या संपत्तीच्या एक अंशाबाबत केलेल्या अभिरक्षकाच्या नियुक्तीमुळे त्याच राज्यात संपत्तीच्या अवशिष्टाबाबत किंवा त्याच्या कोणत्याही अंशाबाबत अन्य अभिरक्षकाची नियुक्ती करण्यास प्रतिबंध होणार नाही :

परंतु, या भागाखाली अन्य न्यायाधीशासमोर पूर्वी मांडलेल्या संक्षिप्त कार्यवाहीचा विषय असलेल्या संपत्तीबाबत कोणताही न्यायाधीश, अभिरक्षकाची नियुक्ती करणार नाही किंवा संक्षिप्त कार्यवाही विचारार्थ स्वीकारणार नाही :

परंतु आणखी असे की, जर संपदेच्या निरनिराळ्या भागांसाठी निरनिराळ्या न्यायाधीशांनी दोन किंवा अधिक अभिरक्षक नियुक्त केले असतील तर संपूर्ण संपत्तीसाठी एक अभिरक्षक नियुक्त करण्यासाठी आपणास योग्य वाटेल असा आदेश उच्च न्यायालयाला करता येईल.

**अभिरक्षकाकरता अर्ज करण्याची कालमर्यादा.**

**२०५.** या भागाखाली जिल्हा न्यायाधीशाकडे करावयाचा अर्ज, ज्याच्या संपत्तीवर उत्तराधिकारान्वये अधिकार सांगितला गेला असेल त्या मालकाच्या मृत्यूपासून सहा महिन्यांच्या आत केला पाहिजे.

**लोकहितार्थ संव्यवस्था किंवा मृताने दिलेले वैध निदेश यांच्याविरुद्ध या भागाची बजावणी करण्यास आडकाठी.**

**२०६.** कोणतेही लोकहितार्थ केलेले संव्यवस्थापत्र किंवा कोणत्याही संपत्तीच्या मृत मालकाने आपल्या मृत्यूनंतर अज्ञानत्वाच्या किंवा अन्य बाबतीत आपल्या संपत्तीच्या कब्जाकरता दिलेले कोणतेही वैध निदेश यांचे व्यतिक्रमण करण्याचा प्राधिकार या भागातील कोणत्याही गोष्टीमुळे मिळतो असे मानले जाणार नाही, आणि अशा प्रत्येक बाबतीत, मृत व्यक्तीच्या संपत्तीवर अधिकारिता असलेला न्यायाधीश अशा निदेशांच्या अस्तित्वाबाबत आपली खात्री होताच ते अंमलात आणील.

२०७. या भागातील कशानेही कोणत्याही संपत्तीच्या पाल्याधिकरणाकडे असलेल्या कब्जास कोणत्याही प्रकारे व्यत्यय आणणे प्राधिकृत केल्याचे मानले जाणार नाही ; आणि जिची संपत्ती पाल्याधिकरणाच्या अधीन आहे अशी अज्ञान व्यक्ती किंवा अन्य निरर्ह व्यक्ती म्हणजे या भागाखाली ज्याच्या वतीने अर्ज करण्यात आला आहे असा पक्ष असेल तर जिल्हा न्यायाधीश त्याने कब्जा असलेल्या पक्षास समन्स पाठवण्याचे व अभिरक्षक नियुक्त करण्याचे ठरवल्यास कार्यवाही प्रलंबित असेतोवर पूर्वोक्तांनुसार प्रतिभूती न घेता पाल्याधिकरणाच्या ठायी संपदेचे अभिरक्षकत्व विनिहित करील ; आणि संक्षिप्त कार्यवाहीच्या अभिनिर्णयान्ती, अज्ञान किंवा अन्य निरर्ह व्यक्ती संपत्तीस हक्कदार असल्याचे दिसून आले तर पाल्याधिकरणाकडे कब्जा सुपूर्द करण्यात येईल. **अज्ञानाची संपत्ती पाल्याधिकरणाच्या अधिकारितेस अधीन असेल त्याबाबतीत पाल्याधिकरणास अभिरक्षक करावयाचे.**

२०८. ज्याचा अर्ज कब्जा असलेल्या पक्षाला समन्स पाठवल्याच्या पूर्वी किंवा नंतर फेटाळण्यात आला असेल त्या पक्षाने, किंवा ज्याला या भागाखाली कब्जातून निष्कासित करण्यात आले असेल त्या पक्षाने दावा आणण्यास या भागात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा प्रत्यवाय असणार नाही. **वाद आणण्याच्या हक्काची व्यावृती.**

२०९. जिल्हा न्यायाधीशाने या भागाखाली संक्षिप्त कार्यवाहीत दिलेल्या निर्णयाचा प्रत्यक्ष कब्जा निश्चित करण्याहून अन्य कोणताही परिणाम असणार नाही ; पण या प्रयोजनापुरता तो अंतिम असेल आणि कोणत्याही अपिलास किंवा पुर्नविलोकनास तो पात्र असणार नाही. **संक्षिप्त कार्यवाहीच्या निर्णयाचा परिणाम.**

२१०. राज्य शासनाला कोणत्याही जिल्ह्याकरता किंवा अनेक जिल्ह्यांकरता लोक अभिरक्षकांची नियुक्ती करता येईल ; आणि अधिकारिता असलेला जिल्हा न्यायाधीश, जेथे अभिरक्षक पसंत करणे हे या भागाखाली त्याच्या विवेकाधीन ठेवलेले असेल त्या सर्व बाबतीत, असे लोक अभिरक्षक नामनिर्देशित करील. **लोक अभिरक्षकांची नियुक्ती.**

## भाग आठ

### उत्तराधिकारामुळे मृताच्या संपत्तीवरील प्रातिनिधिक स्वत्वाधिकार

२११. (१) मृत व्यक्तीचा, प्रकरणपरत्वे, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक हा, सर्व प्रयोजनाकरता तिचा वैध प्रतिनिधी असतो आणि मृतांची सर्व संपत्ती त्याच्या ठायी त्या नात्याने निहित होते. **मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक याची त्या नात्याने भूमिका व संपत्ती.**

(२) मृत व्यक्ती जेव्हा हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख [1][जैन किंवा पारशी] किंवा सूट देलेली व्यक्ती असेल तेव्हा, मृताची जी कोणतीही संपत्ती अन्यथा उत्तरजीवित्वाने अन्य व्यक्तीकडे गेली असती, ती यात अंतर्भूत असलेल्या कशामुळेही मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकांच्या ठायी निहित होणार नाही.

२१२. (१) जी व्यक्ती विनामृत्युपत्र मृत्यू पावली असेल तिच्या संपत्तीच्या कोणत्याही भागावरील हक्क, सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाने प्रथम प्रशासनपत्र प्रदान केल्याशिवाय कोणत्याही न्यायालयात प्रस्थापित होऊ शकत नाही. **विनामृत्युपत्र व्यक्तीच्या संपत्तीवर हक्क.**

(२) हे कलम हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख जैन [2][भारतीय ख्रिस्ती किंवा पारशी] यांच्या विनामृत्युपत्रतेच्या बाबतीत लागू असणार नाही.

२१३. (१) मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा उत्तरदानग्राही म्हणून असलेला हक्क [3][भारतातील] सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाने ज्या मृत्युपत्राखाली त्याबद्दल दावा सांगण्यात आला असेल त्याचे संप्रमाण दिल्याशिवाय अथवा मृत्युपत्राने किंवा मृत्युपत्राच्या अधिप्रमाणित प्रतीने युक्त असे प्रशासनपत्र दिल्याशिवाय, कोणत्याही न्यायालयात प्रस्थापित होणार नाही. **मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा उत्तरदानासाठी म्हणून हक्क केव्हा प्रस्थापित होतो.**

[4][(२) हे कलम मुस्लिमांनी केलेल्या मृत्युपत्रांच्या बाबतीत लागू असणार नाही आणि केवळ—

(एक) कोणत्याही हिंदूने, बौद्धाने, शिखाने किंवा जैनाने केलेली मृत्युपत्रे जेथे कलम ५७ च्या खंड (क) व (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वर्गात मोडत असतील तेथे अशा मृत्युपत्रांच्या बाबतीत ; आणि

(दोन) भारतीय उत्तराधिकार (विशोधन) अधिनियम, १९६२ (१९६२ चा १६) याच्या प्रारंभानंतर मृत्यू पावणाऱ्या कोणत्याही पारशाने केलेली मृत्यूपत्रे जेथे कलकत्ता, मद्रास आणि मुंबई येथील उच्च न्यायालयांच्या, [5][साधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या] स्थानिक सीमेच्या आत केलेली असतील तेथे अशा मृत्युपत्रांच्या आणि जेथे अशी मृत्यूपत्रे त्या सीमांच्या बाहेर केलेली असतील तेथे ती त्या सीमांच्या आत स्थित असलेल्या स्थावर संपत्तीशी संबंधित असतील तेथवर अशा मृत्युपत्रांच्या बाबतीत, लागू असेल.]

---

१. १९६२ चा अधिनियम १६ कलम २ द्वारे "किंवा जैन" याऐवजी घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे "किंवा भारतीय ख्रिस्ती" याऐवजी घातले.
३. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे "राज्य" याऐवजी "भारत" हा शब्दोल्लेख घातला.
४. १९६२ चा अधिनियम १६, कलम ४ द्वारे पोट-कलम (२) ऐवजी घातले.
५. १९६४ चा अधिनियम ५२, कलम ३ व अनुसूची दुसरी यांद्वारे "सर्वसाधारण दिवाणी अधिकारितेच्या" याऐवजी घातले.

**प्रातिनिधिक स्वत्वाधिकार सिद्ध करणे ही मृत व्यक्तीच्या ऋणकोंकडून न्यायालयांमार्फत ऋणे वसूल करण्याची पूर्ववर्ती शर्त.**

**२१४.** (१) मृत व्यक्तीची चीजवस्तू किंवा तिचा कोणताही भाग यास आपण उत्तराधिकारी म्हणून हक्कदार असल्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्तीने---

(एक) मृताच्या संपदेचे प्रशासन तिला प्रदान केल्याचा पुरावा असलेले संप्रमाण किंवा प्रशासनपत्र, अथवा

(दोन) महाप्रशासकाचा अधिनियम, १९१३ (१९१३ चा ३) याच्या कलम ३१ व कलम ३२ खाली प्रदान करण्यात आले असून ज्यात मृत व्यक्तीच्या ऋणकोच्या ऋणाचा उल्लेख आहे ते प्रमाणपत्र, अथवा

(तीन) दहाव्या भागाखाली प्रदान करण्यात आले असून ज्यात ते ऋण विनिर्दिष्ट केले आहे ते उत्तराधिकार प्रमाणपत्र, अथवा

(चार) [1]उत्तराधिकार प्रमाणपत्र अधिनियम, १८८९ (१८८९ चा ७) याखाली देण्यात आलेले प्रमाणपत्र, अथवा.

(पाच) १८२७ चा मुंबई विनियम क्रमांक आठ खाली देण्यात आलेले आणि मे १८८९ च्या पहिल्या दिवसानंतर देण्यात आले असल्यास ज्यात ते ऋण विनिर्दिष्ट केले आहे ते प्रमाणपत्र, हजर केल्याशिवाय कोणतेही न्यायालय---

(क) याप्रमाणे दावा सांगणाऱ्या व्यक्तीला मृत व्यक्तीच्या ऋणकोने ते ऋण फेडावे असा त्याच्याविरुद्ध हुकूमनामा देणार नाही ; किंवा

(ख) याप्रमाणे दावा सांगणाऱ्या व्यक्तीच्या अर्जावरून अशा ऋणकोविरुद्ध त्याच्या ऋणाच्या फेडीसाठी दिलेल्या हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करणार नाही.

(२) पोटकलम (१) मधील ऋण या शब्दात, कृषि प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनीबाबत प्रदेय असलेले भाटक, महसूल किंवा फायदा खेरीजकरून कोणत्याही ऋणाचा समावेश आहे.

**मागाहून दिलेल्या संप्रमाणाचा किंवा प्रशासनपत्राचा प्रमाणपत्रावर परिणाम.**

**२१५.** (१) संपदेबाबत संप्रमाणाचे किंवा प्रशासनपत्राचे प्रदान केल्यामुळे, संपदेत समाविष्ट असलेल्या कोणत्याही ऋणांच्या किंवा रोख्यांच्याबाबत पूर्वी दहाव्या भागाखाली अथवा [1]उत्तराधिकारी प्रमाणपत्र अधिनियम, १८८९ (१८८९ चा ७) किंवा १८२७ चा मुंबई विनियम क्रमांक आठ याखाली प्रदान केलेले कोणतेही प्रमाणपत्र निष्प्रभावी झाले असे मानले जाईल.

(२) जेव्हा संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान करण्याच्या वेळी, अशा कोणत्याही ऋणाविषयी किंवा रोख्यांविषयी अशा कोणत्याही प्रमाणपत्राच्या धारकाने मांडलेला कोणताही दावा किंवा अन्य कार्यवाही प्रलंबित असेल तेव्हा, जिला असे प्रदान केले आहे ती व्यक्ती, ज्या न्यायालयात तो वाद किंवा कार्यवाही प्रलंबित असेल त्याच्याकडे अर्ज केल्यावर, वादात किंवा कार्यवाहीत प्रमाणपत्रधारकाची जागा घेण्यास हक्कदार असेल :

परंतु, जेव्हा असे कोणतेही प्रमाणपत्र या कलमाखाली निष्प्रभावी होईल तेव्हा, ते निष्प्रभावी झाल्याचे माहीत नसताना अशा प्रमाणपत्राच्या धारकास केलेली सर्व प्रदाने संप्रमाणाखाली किंवा प्रशासनपत्राखाली सांगितलेल्या दाव्यांच्या तुलनेने सुयोग्य ठरवली जातील.

**संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रत्याहृत होईपर्यंत केवळ त्याच्या प्रदानग्राहीने दावा लावणे, इत्यादी करावयाचे.**

**२१६.** संप्रमाणाच्या किंवा प्रशासनाच्या कोणत्याही प्रदानानंतर, जिला ते प्रदान केलेले असेल त्या व्यक्तीहून अन्य कोणालाही असे संप्रमाण किंवा प्रशासनपत्र मागे घेतले किंवा प्रत्याहृत केले जाईपर्यंत जेथे ते देण्यात आले असेल त्या राज्यात कोठेही मृत व्यक्तीचा प्रतिनिधी म्हणून दावा आणण्याचा किंवा कोणताही दावा चालवण्याचा किंवा अन्यथा कृती करण्याचा अधिकार असणार नाही.

## भाग नऊ

## संप्रमाण, प्रशासनपत्र आणि मृताच्या संपदेचे प्रशासन

भाग लागू असणे.

**२१७.** या अधिनियमाने किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याने अन्यथा उपबंधित केले असेल त्यावाचून, संप्रमाण व मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र यांचे प्रदान आणि विनामृत्युपत्र उत्तराधिकाराच्या प्रकरणी मृत व्यक्तीच्या संपदेचे प्रशासन या भागाच्या उपबंधानुसार, प्रकरणपरत्वे, करण्यात येईल किंवा अंमलात आणले जाईल.

---

१. १९२५ चा अधिनियम ३९, कलम ३९२ व अनुसूची नववी याद्वारे अंशतः आणि १९३८ चा अधिनियम १ याद्वारे अंतिमरीत्या निरसित.

## प्रकरण एक

### संप्रमाण व प्रशासनपत्र यांच्या प्रदानाविषयी

**२१८.** (१) जर मृत व्यक्ती विनामृत्युपत्र मृत्यू पावली असून ती हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती असेल तर, अशा मृताच्या बाबतीत लागू असलेल्या संपदा-वितरणाच्या नियमानुसार जी व्यक्ती अशा मृताच्या संपूर्ण संपदेस किंवा तिच्या कोणत्याही भागास हक्कदार होईल अशा कोणत्याही व्यक्तीला मृताच्या संपदेचे प्रशासन प्रदान केले जाऊ शकेल.

**मृत व्यक्ती जेथे हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख, जैन किंवा सूट दिलेला व्यक्ती असेल तेथे प्रशासन कोणाला प्रदान केले जाऊ शकेल.**

(२) जेव्हा अशा अनेक व्यक्ती अशा प्रशासनासाठी अर्ज करतील तेव्हा, ते त्यापैकी कोणाही एकीला किंवा अधिकांना प्रदान करणे हे न्यायालयाच्या विवेकाधीन असेल.

(३) जेव्हा अशी कोणतीही व्यक्ती अर्ज करणार नाही तेव्हा ते मृताच्या धनकोला प्रदान केले जाऊ शकेल.

**२१९.** जर मृत व्यक्ती विनामृत्युपत्र मृत्यू पावली असून ती कलम २१८ मध्ये निर्देशिलेल्या पैकी कोणत्याही वर्गातील व्यक्ती नसेल तर, जे तिच्याशी एक तर विवाहसंबंधाने किंवा रक्तसंबंधाने संबंधित असतील ते तिची संपदा व चीजवस्तू यांचे प्रशासनपत्र मिळवण्यास, यात यापुढे दिलेल्या क्रमाने व नियमानुसार हक्कदार असतील, ते असे—

**मृत व्यक्ती जेथे हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख, जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती नसेल तेथे.**

(क) जर मृताच्या मागे त्याची विधवा राहिली असेल तर, एकतर व्यक्तिगत निरर्हतेच्या कारणावरून किंवा मृताच्या संपदेत तिचा हितसंबंध नसल्यामुळे तिला वगळण्यास कारण आहे असे न्यायालयाला दिसले नाही तर, प्रशासन विधवेला प्रदान केले जाईल.

**उदाहरणे**

(एक) विधवा वेडी आहे किंवा तिने परगमन केले आहे किंवा तिच्या विवाहलक्षी संव्यवस्थेमुळे आपल्या पतीच्या संपदेत कोणताही हितसंबंध मिळण्यास तिला आडकाठी झालेली आहे. तिला प्रशासनापासून वगळण्यास कारण आहे.

(दोन) आपल्या पतीच्या मृत्यूनंतर विधवेने पुन्हा विवाह केला आहे. तिला वगळण्यास हे सबळ कारण नाही.

(ख) जर न्यायाधिशाला योग्य वाटले तर, विधवा नसती तर जी प्रशासनास, एकटीच हक्कदार झाली असती अशा कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना तो प्रशासनात विधवेचे सहयोगी करू शकेल.

(ग) जर विधवा नसेल, किंवा तिला वगळण्यास न्यायालयाला कारण दिसले तर ते विनामृत्युपत्र व्यक्तीच्या संपदेच्या वितरणाच्या नियमांनुसार जी संपदेला लाभदृष्ट्या हक्कदार असेल त्या व्यक्तीकडे किंवा व्यक्तींकडे प्रशासन सोपवील :

परंतु, जेव्हा मृताची आई ही याप्रमाणे हक्कदार असलेल्या व्यक्तींच्या वर्गापैकी एक असेल तेव्हा ती एकटीच प्रशासनास हक्कदार असेल.

(घ) मृताशी जे समान आप्तसंबंधश्रेणीने संबंधित असतील ते प्रशासनास सारखेच हक्कदार असतील.

(ङ) आपल्या पत्नीमागे हयात असणाऱ्या पतीला तिच्या संपदेवर, विधवेला आपल्या पतीच्या संपदेबाबत असतो तसाच प्रशासनाधिकार असतो.

(च) जेव्हा मृताशी विवाहसंबंधाने किंवा रक्तसंबंधाने संबंधित असून जी प्रशासनपत्रास हक्कदार आहे व ते कार्य करण्यास राजी आहे अशी कोणीही व्यक्ती नसेल तेव्हा ते एखाद्या धनकोला प्रदान केले जाऊ शकेल.

(छ) जेथे मृताने आपल्यामागे [१][भारतात] संपत्ती ठेवली असेल तेथे, जेथील मृत्युपत्रीय व विनामृत्युपत्र उत्तराधिकारासंबंधीचा कायदा [१][भारताच्या] कायद्याहून भिन्न आहे अशा देशात त्याचा अधिवास होता असे असले तरीही, पूर्वगामी नियमांनुसार प्रशासनपत्र प्रदान केले जाईल.

**२२०.** प्रशासनपत्रामुळे प्रशासकास विनामृत्युपत्र व्यक्तीच्या सर्व हक्कांवर, जणू काही ते प्रशासन तिच्या मृत्युनंतरच्याच क्षणी प्रदान केलेले असावे त्याप्रमाणे तितक्याच परिणामकपणे हक्क प्राप्त होतो.

**प्रशासनपत्राचा परिणाम.**

---

१. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे ' राज्ये '. याऐवजी ' भारत ' हा शब्दोल्लेख घातला.

प्रशासनामुळे कृती विधिग्राह्य न होणे.

**२२१.** ज्यामुळे विनामृत्युपत्र व्यक्तीच्या संपदेची घट किंवा नुकसान होण्याची शक्यता आहे अशा, प्रशासकाच्या मध्यंतरीच्या कृती, प्रशासनपत्रामुळे विधिग्राह्य केल्या जात नाही.

केवळ नियुक्त केलेल्या मृत्युपत्र-व्यवस्थापकालाच संप्रमाण.

**२२२.** (१) मृत्युपत्राने नियुक्त केलेल्या मृत्युपत्रव्यवस्थापकालाच संप्रमाण प्रदान केले जाईल.

(२) नियुक्ती व्यक्त किंवा अपरिहार्य उपलक्षणेने होऊ शकेल.

**उदाहरणे**

(एक) 'ख' आपला मृत्युपत्रव्यवस्थापक न झाल्यास 'ग' मृत्युपत्रव्यवस्थापक व्हावा असे 'क' मृत्युपत्रात लिहितो, 'ख' उपलक्षणेने मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून नियुक्त झाला आहे.

(दोन) 'क' एक उत्तरदान 'ख' ला व वेगवेगळी उत्तरदाने अन्य व्यक्तींना देतो, त्या बाकीच्यांमध्ये 'ग' ही त्याची सून आहे आणि तो असे आणखी लिहितो की, "पण यात नामोल्लेख केलेली 'ग' हयात नसल्यास 'ख' ला मी आपली एकमेव मृत्युपत्रव्यवस्थापिका करतो व नियुक्त करतो." 'ग' उपलक्षणेने मृत्युपत्रव्यवस्थापिका म्हणून नियुक्त करण्यात आली आहे.

(तीन) 'क' अनेक व्यक्तींना आपल्या मृत्युपत्राचे व क्रोडपत्राचे व्यवस्थापक म्हणून आणि आपल्या पुतण्यास अवशिष्ट उत्तरदानग्राही म्हणून नियुक्त करतो; आणि दुसऱ्या क्रोडपत्रात असे शब्द आहेत की, "निरनिराळ्या दिनांकांस स्वाक्षरित केलेल्या माझ्या मृत्युपत्रावरील व क्रोडपत्रांवरील सर्व विधिसंमत मागण्या पूर्ण करण्यासाठी मी माझा अवशिष्ट उत्तरदानग्राही असलेल्या माझ्या पुतण्यास नियुक्त करत आहे." पुतण्या उपलक्षणेने मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून नियुक्त झाला आहे.

ज्यांना संप्रमाण प्रदान केले जाऊ शकत नाही त्या व्यक्ती.

* **२२३.** जी अज्ञान आहे किंवा विकल मनाची आहे अशा कोणत्याही व्यक्तीला [1][तसेच, व्यक्तींचा कोणताही अधिसंघ हा [2][राज्य शासनाने] [3][**शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे] त्या संबंधात करावयाच्या नियमांनी विहित केलेल्या शर्ती पूर्ण करणारी कंपनी नसेल तर त्याला] संप्रमाण प्रदान केले जाऊ शकत नाही.

अनेक मृत्युपत्र-व्यवस्थापकांना एकाचवेळी किंवा निरनिराळ्या वेळी संप्रमाण प्रदान करणे.

**२२४.** जेव्हा अनेक मृत्युपत्रव्यवस्थापक नियुक्त केलेले असतील तेव्हा संप्रमाण त्या सर्वांना एकाच वेळी किंवा निरनिराळ्या वेळी प्रदान केले जाईल.

**उदाहरण**

'क' हा 'ख' च्या मृत्युपत्राचा व्यक्त नियुक्तीद्वारे मृत्युपत्रव्यवस्थापक असून 'ग' हा उपलक्षणेने त्याचा मृत्युपत्रव्यवस्थापक आहे. 'क' ला व 'ग' ला एकाच वेळी किंवा 'क' ला आधी व 'ग' ला नंतर किंवा 'ग' ला आधी व 'क' ला नंतर संप्रमाण प्रदान केले जाऊ शकेल.

संप्रमाण प्रदान केल्यानंतर आढळून आलेल्या क्रोडपत्रास वेगळे संप्रमाण.

**२२५.** (१) जर संप्रमाण प्रदान केल्यानंतर एखादे क्रोडपत्र आढळले तर, मृत्युपत्राने केलेली मृत्युपत्रव्यवस्थापकांची नियुक्ती त्या क्रोडपत्रामुळे कोणत्याही प्रकारे रद्द होत नसल्यास मृत्युपत्रव्यवस्थापकाला त्याचे वेगळे संप्रमाण प्रदान केले जाऊ शकेल.

(२) जर क्रोडपत्राने निराळे मृत्युपत्रव्यवस्थापक नियुक्त केलेले असतील तर मृत्युपत्राचे संप्रमाण प्रत्याहृत केले जाईल आणि मृत्युपत्र व क्रोडपत्र यांचे मिळून नवीन संप्रमाण प्रदान केले जाईल.

मागे हयात राहणाऱ्या मृत्युपत्र व्यवस्थापकांकडे प्रतिनिधित्व येणे.

**२२६.** जेव्हा अनेक मृत्युपत्रव्यवस्थापकांना संप्रमाण दिले असून त्यांच्यापैकी एक मृत्यु पावतो तेव्हा, मृत्युपत्रकर्त्याचे संपूर्ण प्रतिनिधित्व हयात राहिलेल्या मृत्युपत्रव्यवस्थापकाकडे किंवा मृत्युपत्रव्यवस्थापकांकडे येते.

संप्रमाणाचा परिणाम.

**२२७.** मृत्युपत्राचे संप्रमाण प्रदान केले असता, त्यामुळे मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युपासून मृत्युपत्र प्रस्थापित होते आणि मृत्युपत्रव्यवस्थापकाने त्या नात्याने केलेल्या सर्व मध्यंतरीच्या कृती विधिग्राह्य होतात.

---

* प्रत्यायोजित विधिविधान उपबंध (विशोधन) अधिनियम, १९८३, कलम २ व अनुसूची अंमलात आल्यानंतर हे कलम **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून दिलेल्या दिनांकापासून विशोधित होईल (जोडपत्र पहावे).

१. १९३१ चा अधिनियम १७, कलम २ द्वारे जादा दाखल केले. त्या जागी पूर्वी असलेला "तसेच, मृत व्यक्ती हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख, किंवा जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती नसेल तर कोणत्याही विवाहित स्त्रीला तिच्या पतीच्या पूर्वसंमतीशिवाय" हा मजकूर १९२७ चा अधिनियम १८, कलम २ द्वारे गाळला होता.

२. अनुक्रमे, अनुकूलन आदेश, १९३७ व अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलने" या शब्दाऐवजी घातले.

३. १९८३ चा अधिनियम २०, कलम १७ (१) द्वारे जादा दाखल केले (३० ऑगस्ट, १९८३ रोजी व तेव्हापासून).

२२८. जेव्हा राज्याच्या सीमाबाहेर मग ते [1][भारताच्या] सीमांच्या आत असो वा पलीकडे असो, स्थित असलेल्या सक्षम अधिकारितेच्या न्यायालयात मृत्युपत्र सिद्ध केले जाऊन निक्षिप्त केले गेले असेल आणि योग्य रीत्या अधिप्रमाणित केलेली मृत्युपत्राची प्रत हजर करण्यात आली असेल तेव्हा, अशा प्रतीच्या प्रतीने युक्त असे प्रशासनपत्र प्रदान करता येईल.

**देशाबाहेर सिद्ध केलेल्या मृत्युपत्राच्या अधिप्रमाणित प्रतीच्या प्रतीने युक्त प्रशासन पत्र.**

२२९. जेव्हा मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तीने मृत्युपत्रव्यवस्थापक पदाचा त्याग केला नसेल तेव्हा, त्याने आपल्या मृत्युपत्रव्यवस्थापक पदाचा स्वीकार करावा किंवा त्याग करावा अशी त्याला विनंती करणारे प्रावाहनपत्र त्यास उद्देशून काढण्यात येईपर्यंत, अन्य कोणत्याही व्यक्तीला प्रशासनपत्र प्रदान केले जाणार नाही :

**मृत्युपत्रव्यवस्थापकाने पदत्याग केला नसेल त्या बाबतीतील प्रशासन प्रदान.**

परंतु, जेव्हा अनेक मृत्युपत्रव्यवस्थापकांपैकी एकाने किंवा अधिकांनी मृत्युपत्र सिद्ध केले असेल तेव्हा, ज्यांनी ते सिद्ध केले त्यांच्यापैकी उत्तरजीवीचा मृत्यू झाल्यावर न्यायालय, ज्यांनी ते सिद्ध केलेले नाही त्यांना प्रावाहन काढल्याशिवाय, प्रशासनपत्र प्रदान करू शकेल.

२३०. पदत्याग करणाऱ्या व्यक्तीला न्यायाधीशाच्या समक्ष मौखिकरीत्या किंवा आपण स्वाक्षरित केलेल्या लेखाद्वारे पदत्याग करता येईल आणि तो केला असता त्यामुळे तिला, त्यानंतर आपणांस मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून नियुक्त करणाऱ्या मृत्युपत्राच्या संप्रमाणासाठी अर्ज करण्यापासून कायमचा प्रतिबंध होईल.

**मृत्युपत्र-व्यवस्थापकत्वाचा त्याग करण्याची पद्धत व परिणाम.**

२३१. जर मृत्युपत्रव्यवस्थापकाने आपल्या मृत्युपत्रव्यवस्थापक पदाचा त्याग केला किंवा असे पद स्वीकारण्यासाठी किंवा नाकारण्यासाठी दिलेल्या कालमर्यादेत त्याचा स्वीकार करण्यास तो चुकला तर, मृत्युपत्र सिद्ध करता येईल आणि विनामृत्युपत्रतेच्या बाबतीत जी प्रशासनास हक्कदार असेल त्या व्यक्तीला मृत्युपत्राच्या प्रतीने युक्त असे प्रशासनपत्र प्रदान केले जाऊ शकेल.

**जेव्हा मृत्युपत्र व्यवस्थापक कालमर्यादेच्या आत पदाचा त्याग करतो किंवा स्वीकार करण्यास चुकतो त्या बाबतीतील प्रक्रिया.**

२३२. जेव्हा---

**सर्वस्व किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राहीला प्रशासन प्रदान करणे.**

(क) मृताने मृत्युपत्र केले असेल पण मृत्युपत्रव्यवस्थापक नियुक्त केला नसेल, अथवा

(ख) मृताने मृत्युपत्रव्यवस्थापक नियुक्त केला असेल, पण तो ते कार्य करण्यास विधितः अक्षम असेल किंवा ते करण्यास त्याने नकार दिला असेल किंवा मृत्युपत्रकर्त्यापूर्वी अगर मृत्युपत्र सिद्ध करण्यापूर्वी तो मृत्यू पावला असेल, अथवा

(ग) मृत्युपत्रव्यवस्थापक मृत्युपत्र सिद्ध केल्यानंतर पण मृताच्या सर्व संपदेचे प्रशासन करण्यापूर्वी मृत्यू पावला असेल,

तेव्हा सर्वस्वाचा किंवा अवशिष्टाचा उत्तरदानग्राहीला मृत्युपत्र सिद्ध करू देता येईल, आणि संपूर्ण संपदेचे किंवा त्याच्यापैकी जितकी अप्रशासित राहिली असेल तितक्या संपदेचे त्यास मृत्युपत्राच्या प्रतीने युक्त असे प्रशासनपत्र प्रदान केले जाऊ शकेल.

२३३. लाभप्रद हितसंबंध असणारा अवशिष्ट उत्तरदानग्राही जेव्हा मृत्युपत्रकर्त्यामागे हयात राहतो, पण संपदा संपूर्णतः प्रशासित होण्यापूर्वी मृत्यू पावतो तेव्हां, अशा अवशिष्ट उत्तरदानग्राहीला असतो तसाच त्याच्या प्रतिनिधीला मृत्युपत्रयुक्त प्रशासन मिळण्याचा अधिकार असतो.

**मृत अवशिष्ट उत्तरदानग्राहीच्या प्रतिनिधीचा प्रशासनावर अधिकार.**

२३४. जेव्हा मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राही किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राहीचा प्रतिनिधीही नसेल अथवा ती ते कार्य करण्यास नकार देईल किंवा अक्षम असेल किंवा तो सापडत नसेल तेव्हा, मृताच्या संपदेच्या प्रशासनात तो विनामृत्युपत्र मृत्यू पावला असता तर जी हक्कदार झाली असती अशा व्यक्तीला किंवा व्यक्तींना, अथवा लाभप्रद हितसंबंध असलेल्या अन्य कोणत्याही उत्तरदानग्राहीला, अथवा धनकोला मृत्युपत्र सिद्ध करू देता येईल आणि तदनुसार त्याला किंवा त्यांना प्रशासनपत्र प्रदान केले जाऊ शकेल.

**जेथे मृत्युपत्र-व्यवस्थापक किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राही किंवा अशा उत्तरदानग्राहीच्या प्रतिनिधीही नसेल त्या बाबतीतील प्रशासन प्रदान.**

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "हिज मॅजेस्टीच्या डोमिनिअन्सच्या" याऐवजी घातले.

सर्वस्व किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राहीहून अन्य उत्तरदानग्राहीला प्रशासन प्रदान करण्यापूर्वी प्रावाहन.

**२३५.** यानंतर आप्तसंबंधीकडे प्रशासनपत्र स्वीकारण्याची किंवा नाकारण्याची मागणी करणारे प्रावाहन यात यापुढे उल्लेखिलेल्या रीतीने काढून प्रकाशित केले जाईपर्यंत, सर्वस्व किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राहीहून अन्य कोणत्याही उत्तरदानग्राहीला मृत्युपत्रयुक्त प्रशासन प्रदान केले जाणार नाही.

प्रशासन कोणाला प्रदान केले जाऊ शकत नाही.

* **२३६.** जी अज्ञान आहे किंवा विकल मनाची आहे अशा कोणत्याही व्यक्तीला [१][तसेच, व्यक्तींचा कोणताही अधिसंघ म्हणजे [२][राज्य शासनाने] [३][**शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे] यासंबंधात करावयाच्या नियमांद्वारे विहित केलेल्या शर्ती पूर्ण करणारी कंपनी असल्याशिवाय त्याला] प्रशासन प्रदान केले जाऊ शकत नाही.

[४][नियम विधानमंडळासमोर ठेवणे.

**२३६क.** कलम २२३ व कलम २३६ अन्वये राज्य शासनाने करावयाचा प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यात येईल.]

## प्रकरण दोन

### मर्यादित प्रदानांविषयी

### मर्यादित अवधीची प्रदाने

गहाळ झालेल्या मृत्युपत्राच्या प्रतीचे किंवा खर्ड्याचे संप्रमाण.

**२३७.** जेव्हा मृत्युपत्र, मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युनंतर गहाळ झालेले किंवा चुकून कोठेतरी ठेवले गेलेले अथवा मृत्युपत्रकर्त्याच्या कोणत्याही कृतीमुळे नव्हे तर चुकीचे किंवा अपघाताने नष्ट झालेले असून मृत्युपत्राची प्रत किंवा खर्डा जतन करण्यात आला असेल तेव्हा त्याची अस्सल प्रत किंवा यथोचित अधिप्रमाणित केलेली प्रत हजर केली जाईपर्यंतच्या काळापुरते मर्यादित असे अशा प्रतीचे किंवा खर्ड्याचे संप्रमाण प्रदान करता येईल.

गहाळ झालेल्या किंवा नष्ट झालेल्या मृत्युपत्राच्या मजकुराचे संप्रमाण.

**२३८.** जेव्हा मृत्युपत्र गहाळ झालेले किंवा नष्ट झालेले असून त्याची कोणतीही प्रत केलेली नसेल किंवा खर्डाही जतन केलेला नसेल तेव्हा, त्यातील मजकूर पुराव्याने सिद्ध होऊ शकत असेल तर त्याचे संप्रमाण प्रदान करता येईल.

मूळ प्रत विद्यमान असताना प्रतीचे संप्रमाण.

**२३९.** जेव्हा मृत्युपत्र ज्या राज्यात संप्रमाणासाठी अर्ज करण्यात आला त्याच्या बाहेर राहणाऱ्या व्यक्तीच्या कब्जात असून तिने ते परत स्वाधीन करण्यास नकार दिला असेल किंवा त्याबाबत उपेक्षा केली असली तरी मृत्युपत्रव्यवस्थापकाकडे एक प्रत प्रेषित केली असेल, आणि अस्सल प्रत येण्याची वाट न पहाता संप्रमाण प्रदान करावे हे संपदेच्या हितार्थ जरूरीचे असेल तेव्हा, मृत्युपत्र किंवा त्याची अधिप्रमाणित प्रत हजर केली जाईपर्यंतच्या काळापुरते मर्यादित असे, याप्रमाणे प्रेषित केलेल्या प्रतीचे संप्रमाण प्रदान करता येईल.

मृत्युपत्र हजर केले जाईपर्यंत प्रशासनपत्र.

**२४०.** जेथे मृताचे कोणतेच मृत्युपत्र पुढे येत नसेल, पण मृत्युपत्र अस्तित्वात आहे असे समजण्यास कारण असेल तेथे, मृत्युपत्र किंवा त्याची अधिप्रमाणित प्रत हजर केली जाईपर्यंतच्या काळापुरते मर्यादित असे प्रशासनपत्र प्रदान करता येईल.

### हक्क असलेल्या अन्य व्यक्तींच्या उपयोगाकरता व लाभाकरता प्रदाने

अनुपस्थित मृत्युपत्र व्यवस्थापकाच्या मुखत्याराला मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र.

**२४१.** ज्या राज्यात अर्ज करण्यात आला आहे तेथे कोणताही मृत्युपत्रव्यवस्थापक अनुपस्थित असून, ते कार्य करण्यास राजी असलेला कोणीही मृत्युपत्रव्यवस्थापक त्या राज्यात नसेल तेव्हा, अनुपस्थित मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या मुखत्याराला किंवा अभिकर्त्याला त्याच्या प्रकर्त्याच्या उपयोगाकरता व लाभाकरता, तो स्वतःला प्रदान करण्यात आलेले संप्रमाण किंवा प्रशासनपत्र मिळवीपर्यंतच्या काळापुरते मर्यादित असे, मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र प्रदान केले जाऊ शकेल.

---

* प्रत्यायोजित विधिविधान उपबंध (विशोधन) अधिनियम, १९८३, कलम २ व अनुसूची अंमलात आल्यानंतर हे कलम **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून दिलेल्या दिनांकापासून विशोधित होईल व त्याच दिनांकापासून २३६क हे कलम जादा दाखल करण्यात येईल. (जोडपत्र पहावे).

१. १९३१ चा अधिनियम १७, कलम २ द्वारे जादा दाखल केले. त्या जागी पूर्वी असलेला, " तसेच, मृत व्यक्ती हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख, किंवा जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती नसेल तर, कोणत्याही विवाहित स्त्रीला तिच्या पतीच्या पूर्वसंमतीशिवाय " हा मजकूर १९२७ चा अधिनियम १८, कलम २ द्वारे गाळला होता.

२. अनुक्रमे, अनुकूलन आदेश, १९३७ व अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे " गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलने " या शब्दाऐवजी घातले.

३. १९८३ चा अधिनियम २०, कलम १७ (२) द्वारे समाविष्ट केले.

४. वरील अधिनियमाच्या कलम १७(३) द्वारे हे कलम जादा दाखल केले.

**२४२.** ज्या व्यक्तीला, ती उपस्थित असती तर मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र प्रदान करण्यात आले असते अशी कोणतीही व्यक्ती जेव्हा त्या राज्यात अनुपस्थित असेल तेव्हा, तिच्या मुखत्याराला किंवा अभिकर्त्याला कलम २४१ मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे मर्यादित असे, मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र प्रदान केले जाऊ शकेल. **जी अनुपस्थित व्यक्ती उपस्थित असती तर प्रशासन करण्यास हक्कदार झाली असती तिच्या मुखत्यारास मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र.**

**२४३.** जेव्हा विनामृत्युपत्रतेच्या बाबतीत प्रशासनास हक्कदार असलेली व्यक्ती राज्यात अनुपस्थित असून तितकीच हक्कदार असलेली कोणीही व्यक्ती ते कार्य करण्यास राजी नसेल तेव्हा, अनुपस्थित व्यक्तीच्या मुखत्याराला किंवा अभिकर्त्याला कलम २४१ मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे मर्यादित असे, मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र प्रदान केले जाऊ शकेल. **विनामृत्युपत्रतेच्या बाबतीत प्रशासन करण्यास हक्कदार असलेल्या अनुपस्थित व्यक्तीच्या मुखत्याराला प्रशासनपत्र.**

**२४४.** जेव्हा एखादी अज्ञान व्यक्ती एकमेव मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा एकमेव अवशिष्ट उत्तरदानग्राही असेल तेव्हा, अशा अज्ञानाच्या कायदेशीर पालकाला किंवा न्यायालयास योग्य वाटेल अशा अन्य व्यक्तीला ती अज्ञान व्यक्ती सज्ञान होईपर्यंत, मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र प्रदान केले जाऊ शकेल आणि त्याचवेळी त्याला मृत्युपत्राचे संप्रमाण प्रदान केले जाईल, तत्पूर्वी नाही. **एकमेव मृत्युपत्र व्यवस्थापकाच्या किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राहीच्या अज्ञानदशेच्या काळातील प्रशासनपत्र.**

**२४५.** जेव्हा दोन किंवा अधिक अज्ञान मृत्युपत्रव्यवस्थापक असून जो सज्ञान झाला आहे असा एकही मृत्युपत्रव्यवस्थापक नसेल, अथवा दोन किंवा अधिक अवशिष्ट उत्तरदानग्राही असून जो सज्ञान झाला आहे असा एकही अवशिष्ट उत्तरदानग्राही नसेल तेव्हा, ते प्रदान त्यांच्यापैकी एकजण सज्ञान होईपर्यंतच्या काळापुरते मर्यादित असेल. **अनेक मृत्युपत्र व्यवस्थापकांच्या किंवा अवशिष्ट उत्तरदानग्राहीच्या अज्ञानदशेच्या काळातील प्रशासनपत्र.**

**२४६.** जर एकमेव मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा एकमेव सर्वस्व अगर अवशिष्ट उत्तरदानग्राही किंवा मृताच्या बाबतीत लागू असलेल्या, विनामृत्युपत्र व्यक्तीच्या संपदेच्या वितरणाच्या नियमानुसार जी विनामृत्युपत्र व्यक्तीच्या संपदेस एकटीच हक्कदार होऊ शकेल अशी व्यक्ती अज्ञान किंवा वेडी असेल तर, सक्षम प्राधिकरणाने तिच्या संपदेची देखभाल जिच्यावर सोपवली असेल त्या व्यक्तीला किंवा अशी कोणीही व्यक्ती नसल्यास, जिची नियुक्ती करणे न्यायालयास योग्य वाटेल अशा अन्य व्यक्तीला, अज्ञानाच्या किंवा वेड्याच्या उपयोगाकरता व लाभाकरता, प्रकरणपरत्वे, तो सज्ञान होईपर्यंत किंवा निकोप मनाचा होईपर्यंत, प्रकरणपरत्वे, मृत्युपत्राने युक्त असे किंवा त्यापासून वियुक्त असे प्रशासनपत्र दिले जाईल. **वेडा किंवा अज्ञान यांच्या उपयोगाकरता व लाभाकरता प्रशासनपत्र.**

**२४७.** मृत व्यक्तीच्या मृत्युपत्राच्या विधिग्राह्यतेशी संबंधित असलेला अथवा कोणतेही संप्रमाण किंवा प्रशासनपत्राचे प्रदान मिळविण्यासाठी किंवा प्रत्याहृत करण्यासाठी आणलेला कोणताही दावा प्रलंबित असताना, न्यायालयाला अशा मृत व्यक्तीच्या संपदेसाठी प्रशासक नियुक्त करता येईल व सर्वसाधारण प्रशासकाला असलेले, अशा संपदेचे वितरण करण्याच्या हक्काहून अन्य सर्व हक्क व अधिकार त्याला असतील आणि असा प्रत्येक प्रशासक न्यायालयाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाच्या अधीन असेल आणि त्याच्या निदेशानुसार तो कार्य करील. **दावा प्रलंबित असताना प्रशासन.**

## विशेष प्रयोजनांकरता प्रदाने

**२४८.** जर मृत्युपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही मर्यादित प्रयोजनासाठी मृत्युपत्रव्यवस्थापक नियुक्त केलेला असेल तर, संप्रमाण त्या प्रयोजनापुरते मर्यादित असेल, आणि त्याने आपल्या वतीने प्रशासन मिळविण्यासाठी मुखत्याराची किंवा अभिकर्त्यांची नियुक्ती केल्यास, मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र तदनुसार मर्यादित असेल. **मृत्युपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनापुरते मर्यादित संप्रमाण.**

**२४९.** जर सर्वसाधारणतः नियुक्त केलेल्या मृत्युपत्रव्यवस्थापकाने आपल्या वतीने मृत्युपत्र सिद्ध करण्यासाठी मुखत्याराला किंवा अभिकर्त्याला प्राधिकार दिलेला असेल आणि तो प्राधिकार विशिष्ट प्रयोजनापुरता मर्यादित असेल तर, मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र तदनुसार मर्यादित असेल. **विवक्षित प्रयोजनापुरते मर्यादित असे मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र.**

ज्या संपत्तीत व्यक्तीचा लाभप्रद हितसंबंध असेल तिच्यापुरते मर्यादित प्रशासनपत्र.

**२५०.** जेथे एखादी व्यक्ती, ज्या संपत्तीची ती एकमेव किंवा उत्तरजीवी विश्वस्त होती किंवा जीमध्ये तिचा स्वतःचा लाभप्रद हितसंबंध नव्हता अशी संपत्ती मागे ठेवून मृत्यू पावली असून जिने मागे कोणीही सर्वसाधारण प्रतिनिधी ठेवला नसेल किंवा जो त्या नात्याने कार्य करण्यास असमर्थ आहे किंवा राजी नाही असा एखादा प्रतिनिधी ठेवला असेल तर, अशा संपत्तीपुरते मर्यादित असे प्रशासनपत्र लाभाधिकाऱ्याला किंवा त्याच्या वतीने अन्य एखाद्या व्यक्तीला प्रदान केले जाऊ शकेल.

दाव्यापुरते मर्यादित प्रशासनपत्र.

**२५१.** जेव्हा मृत व्यक्तीच्या प्रतिनिधीला प्रलंबित दाव्यात पक्षकार करणे जरूरीचे असून, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासनास हक्कदार असलेली व्यक्ती कार्य करण्यास असमर्थ असेल किंवा राजी नसेल तेव्हा, उक्त दाव्यात अथवा उक्त कब्जातील किंवा दाव्यातील वादग्रस्त बाबींच्या संबंधात त्याच किंवा अन्य कोणत्याही न्यायालयात त्या पक्षांमध्ये किंवा अन्य कोणत्याही पक्षांमध्ये सुरू करण्यात येईल अशा अन्य कोणत्याही कब्जात किंवा दाव्यात मृतांचे प्रतिनिधित्व करण्याच्या प्रयोजनापुरते मर्यादित असेल व त्यात अंतिम हुकूमनामा केला जाऊन त्याची पूर्ण अंमलबजावणी होईपर्यंत अशा दाव्यातील पक्षांच्या नामनिर्दिष्ट व्यक्तीला प्रशासनपत्र दिले जाऊ शकेल.

प्रशासकांविरुद्ध आणावयाच्या दाव्यांत पक्षकार होण्याच्या प्रयोजनापुरते मर्यादित प्रशासनपत्र.

**२५२.** जर कोणत्याही संप्रमाणाच्या किंवा प्रशासनपत्राच्या दिनांकापासून बारा महिने संपण्याच्या वेळी, ज्याला ते प्रदान केलेले आहे तो मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक ज्या न्यायालयाने संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान केले ते जेथे अधिकारिता वापरले त्या राज्यात अनुपस्थित असेल तर, मृत्युपत्रव्यवस्थापकाविरूद्ध किंवा प्रशासकाविरूद्ध आणावयाच्या दाव्यातील पक्षकार होण्याच्या किंवा केला जाण्याच्या प्रयोजनार्थ आणि त्या दाव्यात केला जाईल असा हुकूमनामा अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ मर्यादित असे प्रशासनपत्र, न्यायालय त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीला प्रदान करू शकेल.

मृताची संपत्ती एकत्रित करण्याच्या व तिचे जतन करण्याच्या प्रयोजनापुरते मर्यादित प्रशासनपत्र.

**२५३.** मृत व्यक्तीची संपदा जतन करण्यासाठी तसे करणे जरूरीचे दिसून येईल अशा कोणत्याही प्रकरणी, ज्याच्या अधिकारितेत त्यापैकी कोणतीही संपत्ती असेल ते न्यायालय, त्यास योग्य दिसेल अशा कोणत्याही व्यक्तीस न्यायालयीन आदेशांच्या अधीनतेने, मृताची संपत्ती एकत्रित करणे व जतन करणे आणि त्याच्या संपदेला येणे असलेल्या ऋणांबाबत विमुक्ती देणे एवढ्यापुरते मर्यादित असे प्रशासनपत्र प्रदान करू शकेल.

सर्वसामान्य परिस्थितीत जी प्रशासनास हक्कदार झाली असती तिच्याहून अन्य व्यक्तीची प्रशासक म्हणून नियुक्ती.

**२५४.** (१) जेव्हा एखादी व्यक्ती, मृत्युपत्र न करता किंवा ज्याचे कार्य करण्यास राजी व सक्षम असलेला असा कोणीही मृत्युपत्रव्यवस्थापक नाही असे मृत्युपत्र मागे ठेवून मृत्यु पावली असेल तेव्हा, अथवा जेथे अशा व्यक्तीच्या मृत्युसमयी मृत्युपत्रव्यवस्थापक राज्याबाहेरील रहिवासी असेल आणि प्रशासन प्रदान केले जाण्यास सर्वसामान्य परिस्थितीत जी हक्कदार झाली असती अशा व्यक्तीहून अन्य एखाद्या व्यक्तीस संपदेचे किंवा तिच्या कोणत्याही भागाचे प्रशासन करण्यासाठी नियुक्त करणे न्यायालयास जरूरीचे किंवा सोईस्कर वाटेल तेथे न्यायालयाला रक्तसंबंध, हितसंबंधाचे प्रमाण, संपदेची सुरक्षितता आणि ती यथोचित प्रशासिली जाण्याची संभवनीयता लक्षात घेऊन, स्वविवेकानुसार आपणास योग्य वाटेल अशा व्यक्तीची प्रशासक म्हणून नियुक्ती करता येईल.

(२) अशा प्रत्येक प्रकरणी, न्यायालयाला योग्य वाटेल त्याप्रमाणे प्रशासनपत्र मर्यादित असेल वा नसेल.

## अपवादासह प्रदाने

अपवादास अधीन असे संप्रमाण किंवा मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र.

**२५५.** जेव्हा केव्हा प्रकरणाच्या स्वरूपामुळे अपवाद करण्याची आवश्यकता असेल तेव्हा, मृत्युपत्राचे संप्रमाण किंवा मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र अशा अपवादाच्या अधीनतेने प्रदान केले जाईल.

अपवादासह प्रशासनपत्र.

**२५६.** जेव्हा केव्हा प्रकरणाच्या स्वरूपामुळे अपवाद करण्याची आवश्यकता असेल, तेव्हा प्रशासनपत्र अशा अपवादाच्या अधीनतेने प्रदान केले जाईल.

## उर्वरित संपदेचे प्रदान

उर्वरित संपदेचे संप्रमाण किंवा प्रशासनपत्र.

**२५७.** जेव्हा संप्रमाणाचे किंवा मृत्युपत्रानेयुक्त किंवा त्यापासून वियुक्त प्रशासनपत्राचे अपवादासह प्रदान केले असेल तेव्हा, मृताच्या उर्वरित संपदेबाबत संप्रमाणास किंवा प्रशासनपत्रास हक्कदार असलेल्या व्यक्तीस, मृताच्या उर्वरित संपदेच्या संप्रमाणाचे किंवा, प्रकरणपरत्वे, प्रशासनपत्राचे प्रदान घेता येईल.

## अप्रशासित चीजवस्तूंसंबंधी प्रदान

अप्रशासित चीजवस्तूंसंबंधी प्रदान.

**२५८.** ज्याला संप्रमाण प्रदान केले आहे असा मृत्युपत्रव्यवस्थापक जर मृत्युपत्रकर्त्याच्या संपदेचा काही भाग अप्रशासित ठेवून मृत्यू पावला असेल तर, संपदेच्या अशा भागाचे प्रशासन करण्याच्या प्रयोजनार्थ नवीन प्रतिनिधी नियुक्त करता येईल.

२५९. संपूर्णपणे न प्रशासिलेल्या संपदेचे प्रशासनपत्र प्रदान करताना न्यायालयाला मूळच्या प्रदानांना लागू आहेत तेच नियम मार्गदर्शक असतील, आणि ज्यांना मूळची प्रदाने केली गेली असती त्याच व्यक्तींना ते प्रशासनपत्र प्रदान करील. **अप्रशासित चीजवस्तूंसंबंधीच्या प्रदानाबाबत नियम.**

२६०. जेव्हा मर्यादित प्रदान हे काळ लोटून गेल्यामुळे किंवा जेथवर एखादी घटना संभाव्य घटना घडेपर्यंतच्या काळापुरते ते मर्यादित होते ती घडल्यामुळे संपले असून, मृताच्या संपदेचा काही भाग तरीही अप्रशासित राहिला असेल तेव्हा, ज्या व्यक्तीला मूळ प्रदानें करण्यात आली असती त्यांना प्रशासनपत्र प्रदान केले जाईल. **जेव्हा मर्यादित प्रदान संपले असले तरीही संपदेचा काही भाग अप्रशासित राहतो तेव्हाचे प्रशासनपत्र.**

## प्रकरण तीन

### प्रदानांमध्ये फेरबदल व त्यांचे प्रत्याहरण

२६१. नावे आणि वर्णने यांतील चुका अथवा मृताच्या मृत्युची वेळ व स्थळ किंवा मर्यादित दानामधील प्रयोजन देताना झालेल्या चुका न्यायालयाला दुरुस्त करता येतील, आणि संप्रमाणाच्या किंवा प्रशासनपत्राच्या प्रदानात तदनुसार फेरबदल व विशोधन करता येईल. **कोणत्या चुका न्यायालयाला दुरुस्त करता येतील.**

२६२. जर मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र प्रदान केल्यानंतर एखादे क्रोडपत्र आढळून आले तर, रीतसर पुरावा घेऊन ओळख पटवण्यात आल्यावर ते प्रदानास जोडता येईल, आणि प्रदानात तदनुसार फेरबदल व विशोधन करता येईल. **मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र प्रदान करण्यात आल्यानंतर जेथे क्रोडपत्र आढळून येईल त्याबाबतीतील प्रक्रिया.**

२६३. संप्रमाणाचे किंवा प्रशासनपत्राचे प्रदान न्याय्य कारणाखातर प्रत्याहृत किंवा निर्भावित करता येईल. **न्याय्य कारणाखातर प्रत्याहृत करणे किंवा निर्भावित करणे.**

**स्पष्टीकरण.**---जेथे—

(क) प्रदान मिळवण्यासाठी केलेली कार्यवाही सारत: सदोष होती, अथवा

(ख) खोटी सूचना करून किंवा त्या प्रकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेली एखादी गोष्ट न्यायालयापासून लपवून प्रदान कपटपूर्वक मिळवले होते ; अथवा

(ग) प्रदान आधारभूत होण्याजोग्या अशा विधिदृष्ट्या सारभूत तथ्याचे असत्य अभिकथन करून,---मग असे अभिकथन अज्ञानाने किंवा अनवधानाने केले असले तरीही,---त्या मार्गाने प्रदान मिळवण्यात आले होते ; अथवा

(घ) परिस्थितीमुळे प्रदान निरुपयोगी व अप्रवर्ती झाले आहे ; अथवा

(ङ) जिला प्रदान करण्यात आले होते त्या व्यक्तीने या भागाच्या प्रकरण सातच्या उपबंधानुसार द्यावयाची जंत्री किंवा हिशेब सादर करण्यास ती व्यक्ती बुद्धिपुरस्सर व वाजवी कारणाशिवाय चुकली आहे किंवा त्या प्रकरणाखाली महत्त्वाच्या बाबतीत असत्य असलेली जंत्री किंवा हिशेब तिने दाखल केलेला आहे ;

असे असेल तेथे न्याय्य कारण असल्याचे मानले जाईल.

**उदाहरणे**

(एक) ज्या न्यायालयाने प्रदान केले होते त्याला अधिकारिता नव्हती.

(दोन) ज्या पक्षांना प्रावाहन काढावयास हवे होते त्यांना प्रावाहन काढल्याशिवाय प्रदान केले होते.

(तीन) ज्याचे संप्रमाण मिळवले होते तो मृत्युपत्र बनावट होते किंवा प्रत्याहृत केलेले होते.

(चार) ‘ क ’ ने ‘ ख ’ च्या संपदेचे त्याची विधवा म्हणून प्रशासनपत्र मिळवले. पण त्यानंतर असे उघडकीस आले की, ती त्याच्याशी कधीच विवाहबद्ध झाली नव्हती.

(पाच) ‘ क ’ ने ‘ ख ’ च्या संपदेचे जणू काही तो विनामृत्युपत्र मृत्यु पावला असल्याप्रमाणे प्रशासन मिळवले आहे, पण त्यानंतर एक मृत्युपत्र आढळून आले आहे.

(सहा) संप्रमाण प्रदान केल्यानंतर मागाहूनचे मृत्यूपत्र आढळून आले आहे.

(सात) संप्रमाण प्रदान केल्यानंतर, क्रोडपत्र आडळून आले असून मृत्युपत्राखाली केलेली मृत्युपत्रव्यवस्थापकांची नियुक्ती प्रत्याहृत केली आहे किंवा त्यात भर टाकली आहे.

(आठ) ज्या व्यक्तीला संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान केले होते ती मागाहून विकल मनाची झाली आहे.

## प्रकरण चार

### संप्रमाणे व प्रशासनपत्रे प्रदान करण्याच्या व प्रत्याहत करण्याच्या कार्यपद्धतीविषयी

**संप्रमाणे, इत्यादी प्रदान व प्रत्याहत करताना जिल्हा न्यायाधिशाची अधिकारिता.**

**२६४.** (१) जिल्हा न्यायाधीशाला आपल्या जिल्ह्यातील सर्व प्रकरणात संप्रमाणे व प्रशासनपत्रे प्रदान करण्याची व प्रत्याहत करण्याची अधिकारिता असेल.

(२) ज्यांना कलम ५७ लागू होते ती खेरीजकरून अन्य प्रकरणी, कलकत्ता, मद्रास आणि मुंबई या नगरांच्या [१]सीमेपलीकडील कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील कोणतेही न्यायालय, जेथे मृत व्यक्ती ही हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती असेल तेथे, राज्य शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्याला तसे करण्यास प्राधिकृत केल्याशिवाय संप्रमाणासाठी किंवा प्रशासनपत्रासाठी करण्यात आलेले अर्ज स्वीकारणार नाही.

**अविरोध प्रकरणांचा परामर्श घेण्यासाठी जिल्हा न्यायाधीशाचा प्रत्यायुक्त नियुक्त करण्याची शक्ती.**

**२६५.** (१) उच्च न्यायालयाला कोणत्याही जिल्ह्यात, ते विहित करील अशा स्थानिक सीमांच्या आत अविरोध प्रकरणी संप्रमाण व प्रशासनपत्र प्रदान करण्यासाठी जिल्हा न्यायाधीशाकरता कार्य करण्यास, त्याला योग्य वाटतील असे न्यायिक अधिकारी प्रत्यायुक्त म्हणून नियुक्त करता येतील :

परंतु, राजसनदेने प्रस्थापित न झालेल्या उच्च न्यायालयांच्या बाबतीत, अशी नियुक्ती राज्य शासनाच्या पूर्वसंमतीशिवाय केली जाणार नाही.

(२) याप्रमाणे नियुक्त केलेल्या व्यक्तींना "जिल्हा प्रत्यायुक्त" असे म्हणण्यात येईल.

**संप्रमाण व प्रशासन यांच्या प्रदानाबाबत जिल्हा न्यायाधीशाची शक्ती.**

**२६६.** संप्रमाणाचे व प्रशासनपत्राचे प्रदान आणि सर्व तत्संबंधित बाबी यांच्या संबंधात जिल्हा न्यायाधीशाला, त्याच्या न्यायालयात प्रलंबित असलेल्या कोणत्याही दिवाणी दाव्यासंबंधी किंवा कार्यवाहीसंबंधी कायद्याद्वारे त्याच्या ठायी निहित केलेल्या आहेत तशाच शक्ती व तसेच प्राधिकार असतील.

**जिल्हा न्यायाधीश व्यक्तीला मृत्युपत्रीय कागदपत्रे हजर करण्याचा आदेश देऊ शकेल.**

**२६७.** (१) जिल्हा न्यायाधीश कोणत्याही व्यक्तीला, मृत्युपत्रीय असलेला किंवा तसा असल्याचे दिसते असा जो कोणताही कागद किंवा लेख अशा व्यक्तींच्या कब्जात किंवा तिच्या नियंत्रणाखाली असल्याचे दाखवता येईल, तो हजर करण्याचा व न्यायालयात आणण्याचा आदेश देऊ शकेल.

(२) असा कोणताही कागद किंवा लेख अशा व्यक्तीच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली आहे असे दाखवून दिले नाही तरी तिला अशा कागदाची किंवा लेखाची माहिती आहे असे समजण्यास कारण असेल तर, न्यायालय त्या व्यक्तीस, त्याबाबत तपासणी घेतली जाण्याच्या प्रयोजनार्थ उपस्थित राहण्यासाठी निदेश देऊ शकेल.

(३) अशी व्यक्ती न्यायालयाकडून तिला विचारण्यात येतील अशा प्रश्नांची खरी उत्तरे देण्यास आणि तसा आदेश मिळाल्यास, असा कागद किंवा लेख हजर करण्यास व पुढे आणण्यास बांधलेली असेल आणि उपस्थित न राहण्याच्या किंवा अशा प्रश्नांची उत्तरे देण्याच्या किंवा तसा कागद अगर लेख पुढे आणण्याच्या कामी कसूर झाल्यास, ती एखाद्या दाव्यातील पक्षकार असती व तिने अशी कसूर केली असती तर ती ज्या शिक्षेस पात्र झाली असती तशाच शिक्षेस भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याखाली पात्र होईल.

(४) कार्यवाहीचा खर्च न्यायाधीशाच्या विवेकाधीन असेल.

**संप्रमाण व प्रशासन यासंबंधात जिल्हा न्यायाधिशाच्या न्यायालयाची कार्यवाही.**

**२६८.** संप्रमाणाचे व प्रशासनपत्राचे प्रदान करण्यासबंधीची जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयाची कार्यवाही ही, यात यापुढे अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीज करून, प्रकरणाच्या परिस्थितीनुसार शक्य असेल तेथवर, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) द्वारे विनियमित केली जाईल.

**संपत्तीच्या संरक्षणाकरता जिल्हा न्यायाधिशाने केव्हा व कसा हस्तक्षेप करावयाचा.**

**२६९.** (१) मृत व्यक्तींच्या मृत्युपत्राचे संप्रमाण दिले जाईपर्यंत किंवा संपदेचा प्रशासक नेमला जाईपर्यंत मृत व्यक्तींच्या संपत्तीचा कोणताही भाग ज्याच्या अधिकारितेत स्थित असेल तो जिल्हा न्यायाधीश, अशा संपत्तीच्या संरक्षणासाठी, तिच्यात आपला हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या विनंतीवरून आणि संपत्तीला हानी किंवा नुकसान पोहचण्याचा धोका आहे असे न्यायाधीशाला वाटेल त्या सर्व अन्य प्रकरणी हस्तक्षेप करण्यास आणि त्या प्रयोजनार्थ, त्याला योग्य वाटल्यास संपत्तीचा कब्जा घेण्यासाठी व ठेवण्यासाठी अधिकारी नियुक्त करण्यास प्राधिकृत असतो व त्याने तसे करणे आवश्यक असते.

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "आणि ब्रह्मदेश प्रांताच्या" हे शब्द गाळले.

(२) जेव्हा मृत व्यक्ती ही हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती असेल तेव्हा हे कलम लागू असणार नाही, तसेच जो भारतीय ख्रिस्ती विनामृत्युपत्र मृत्यू पावला असेल त्याच्या संपत्तीच्या कोणत्याही भागास देखील हे कलम लागू असणार नाही.

**२७०.** जर मृत व्यक्तीच्या मृत्युपत्राचे संप्रमाण किंवा संपदेचे प्रशासनपत्र मिळविण्यासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीच्या यात यापुढे उपबंधित केल्यानुसार सत्यापित केलेल्या विनंतीअर्जावरून, प्रकरणपरत्वे, मृत्युपत्रकर्त्याचे किंवा विनामृत्युपत्र व्यक्तीचे, तिच्या मृत्युसमयी ज्या जिल्हा न्यायाधीशाच्या अधिकारितेत स्थिर वास्तव्यस्थळ अथवा तिची कोणतीही जंगम किंवा स्थावर संपत्ती होती असे दिसून येईल तो न्यायाधीश असे संप्रमाण किंवा प्रशासनपत्र आपल्या न्यायालयाच्या मोहोरेनिशी प्रदान करू शकेल. **जिल्हा न्यायाधीश संप्रमाण किंवा प्रशासन केव्हा प्रदान करू शकेल.**

**२७१.** ज्या जिल्ह्यात मृताचे आपल्या मृत्युसमयी स्थिर वास्तव्यस्थळ नव्हते त्या जिल्ह्याच्या न्यायाधीशाकडे अर्ज करण्यात आला असेल तेव्हा, त्याचा निकाल दुसऱ्या जिल्ह्यात झाल्यास ते अधिक न्याय्य व सोयीस्कर होईल असा त्याचा अभिप्राय पडला तर, अर्ज नाकारणे अथवा तो प्रशासनपत्रासाठी केला असेल त्या बाबतीत, ते पूर्णपणे किंवा त्या न्यायाधीशाच्या स्वतःच्या अधिकारितेत असणाऱ्या संपत्तीपुरते मर्यादित असे प्रदान करणे, हे न्यायाधीशाच्या विवेकाधीन असेल. **ज्या जिल्ह्यात मृताचे स्थिर वास्तव्यस्थळ नव्हते त्या जिल्ह्याच्या न्यायाधीशाकडे केलेल्या अर्जाचा निकाल करणे.**

**२७२.** संप्रमाण व प्रशासनपत्र यांच्या प्रयोजनार्थ अर्ज आल्यावर, विवादयुक्त नसेल अशा कोणत्याही प्रकरणी, कोणताही जिल्हा प्रत्यायुक्त, जर यात यापुढे उपबंधित केल्यानुसार सत्यापित केलेल्या विनंती अर्जावरून, प्रकरणपरत्वे, मृत्युपत्रकर्त्याचे किंवा, विनामृत्युपत्र व्यक्तीचे तिच्या मृत्युसमयी अशा प्रत्यायुक्त्याच्या अधिकारितेत स्थिर वास्तव्यस्थळ होते असे दिसून आले तर ते प्रदान करू शकेल. **प्रत्यायुक्त हा संप्रमाण व प्रशासनपत्र प्रदान करू शकेल.**

**२७३.** संप्रमाण किंवा प्रशासनपत्र, ज्या राज्यात ते प्रदान केले असेल तेथे सर्वत्र, मृताच्या जंगम किंवा स्थावर अशा सर्व संपत्तीवर परिणामक असेल आणि ते मृताच्या सर्व ऋणकोंविरुद्ध व त्याच्या मालकीची संपत्ती धारण करणाऱ्या सर्व व्यक्तींविरुद्ध प्रातिनिधिक हक्काबाबत निर्णायक असेल आणि ज्याला असे संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान केले आहे त्या व्यक्तीकडे जे ऋणको आपली ऋणे फेडतील व ज्या व्यक्ती अशी संपत्ती तिच्या स्वाधीन करतील अशा सर्व व्यक्ती त्यामुळे पूर्णपणे दायित्वमुक्त होतील : **संप्रमाणाची किंवा प्रशासनपत्राची निर्णायकता.**

परंतु—

(क) उच्च न्यायालयाने, किंवा

(ख) जेथे मृताचे स्थिर वास्तव्यस्थळ त्याच्या मृत्युसमयी जिल्हा न्यायाधीशाच्या अधिकारितेत होते आणि असा न्यायाधीश राज्याच्या सीमांबाहेरील संबंधित संपत्तीचे व संपदेचे मूल्य दहा हजार रुपयांहून अधिक नाही असे प्रमाणित करील त्याबाबतीत, अशा न्यायाधीशाने,

प्रदान केलेली संप्रमाणे व प्रशासनपत्रे ही, त्या प्रदानाद्वारे अन्यथा निदेशिले नसेल तर, [१][[२]*** अन्य राज्यात] सर्वत्र तशीच परिणामक असतील.

[३][ब्रम्हदेश व एडन हे भारतापासून वेगळे झाल्यानंतर [४][भारतात] या कलमाचे परंतुक, ब्रम्हदेशात व एडनमध्ये फारकतीच्या दिनांकापूर्वी [५] प्रदान केलेल्या किंवा त्या दिनांकास प्रलंबित असलेल्या कार्यवाहीत त्या दिनांकानंतर प्रदान केलेल्या संप्रमाणास व प्रशासनपत्रास लागू असेल.]

[६][पाकिस्तान भारतापासून वेगळे झाल्यानंतर [७]**[८] [४][भारतात] ते परंतुक, फारकतीच्या दिनांकास पाकिस्तान ज्या राज्यक्षेत्रांचे बनले होते त्यांपैकी कोणत्याही राज्यक्षेत्रात त्या दिनांकापूर्वी प्रदान केलेल्या किंवा त्या दिनांकास प्रलंबित असलेल्या कार्यवाहीत त्या दिनांकानंतर प्रदान केलेल्या संप्रमाणात व प्रशासनपत्रासही लागू असेल.]

---

१. अनुकूलन आदेश, १९४८, अन्वये "संपूर्ण ब्रिटिश भारतात" या ऐवजी घातले.
२. अनुकूलन आदेश, १९५०, अन्वये "भारताच्या" हा शब्द गाळण्यात आला.
३. अनुकूलन आदेश, १९३७, द्वारे घातले.
४. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची याद्वारे "राज्ये" याऐवजी "भारत" हा शब्दोल्लेख घातला.
५. १ एप्रिल १९३७.
६. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे भर घातली.
७. १५ ऑगस्ट १९४७.
८. १९५३ चा अधिनियम ४२, कलम व अनुसूची तीन याद्वारे "भारताच्या" हा शब्द गाळला.

कलम २७३ च्या परन्तुकाखाली केलेल्या प्रदानांचे प्रमाणपत्र उच्च न्यायालयाकडे पाठवणे.

२७४. (१) जेथे कलम २७३ च्या परंतुकात निर्देशिल्याप्रमाणे परिणामक असलेले संप्रमाण किंवा प्रशासनपत्र उच्च न्यायालयाने किंवा जिल्हा न्यायाधीशाने प्रदान केले असेल तेथे उच्च न्यायालय किंवा जिल्हा न्यायाधीश त्याचे प्रमाणपत्र पुढील न्यायालयाकडे पाठवील, ते याप्रमाणे---

(क्) उच्च न्यायालयाने प्रदान केले असेल तेव्हा, अन्य उच्च न्यायालय किंवा, न्यायालयांपैकी प्रत्येकाकडे ;

(ख्) जिल्हा न्यायाधीशाने प्रदान केले असेल तेव्हा, असा जिल्हा न्यायाधीश ज्याला दुय्यम आहे त्या उच्च न्यायालयाकडे व अन्य उच्च न्यायालयांपैकी प्रत्येकाकडे.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले प्रत्येक प्रमाणपत्र, परिस्थितीनुसार शक्य असेल तेथवर, चौथ्या अनुसूचीमध्ये दिलेल्या नमुन्यानुसार दिले जाईल आणि असे प्रमाणपत्र ज्याच्याकडे येईल ते उच्च न्यायालय ते दप्तरदाखल करील.

(३) यात यापुढे कलमे २७६ व २७८ यांमध्ये उपबंधित केल्यानुसार विनंती-अर्जदाराने मत्तेचा कोणताही अंश अन्य राज्यातील जिल्हा न्यायाधीशाच्या अधिकारितेत स्थित असल्याचे निवेदन केले असेल तेथे, पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेले प्रमाणपत्र ज्या न्यायालयाने पाठवणे आवश्यक असेल ते न्यायालय, त्याची प्रत अशा जिल्हा न्यायाधीशाकडे पाठवील आणि अशी प्रत ज्याच्याकडे येईल तो जिल्हा न्यायाधीश, ती दप्तरदाखल करील.

संप्रमाणासाठी किंवा प्रशासनासाठी करावयाचा अर्ज योग्य रीतीने केल्यास व सत्यापित केल्यास त्याची निर्णायकता.

२७५. संप्रमाणासाठी किंवा प्रशासनपत्रासाठी करावयाचा अर्ज, यांत यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने केल्यास व सत्यापित केल्यास तो संप्रमाणाचे व प्रशासनपत्राचे प्रदान प्राधिकृत करण्याच्या प्रयोजनार्थ निर्णायक असेल ; आणि असे कोणतेही प्रदान न्यायालयाशी कपट करून मिळवले असल्यास ते प्रत्याहृत करण्यासाठी करावयाची कार्यवाही वगळता, त्या प्रदानात मृत्युपत्रकर्त्याचे किंवा विनामृत्युपत्रव्यक्तीचे त्या जिल्ह्यात आपल्या मृत्युसमयी कोणतेही स्थिर वास्तव्यस्थळ किंवा संपत्ती नव्हती एवढ्याच कारणाने आक्षेप घेतला जाणार नाही.

संप्रमाणासाठी विनंती-अर्ज.

२७६. (१) संप्रमाणासाठी किंवा मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्रासाठी करावयाचा अर्ज, इंग्रजीत किंवा ज्या न्यायालयात अर्ज करण्यात आला आहे त्याच्यापुढील कामकाजात सर्वसामान्यपणे वापरात असलेल्या भाषेत सुवाच्यपणे विनंती-अर्ज लिहून व सोबत मृत्युपत्र किंवा कलमे २३७, २३८ व २३९ यांमध्ये उल्लेखिलेल्या प्रकरणी त्याची प्रत, मसुदा किंवा त्याच्या मजकुराचे निवेदन जोडून करावा लागेल आणि त्यात पुढीलप्रमाणे निवेदन करावे लागेल :---

(क्) मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युची वेळ ;

(ख्) सोबत जोडलेला लेख हे त्याचे मृत्युपत्र व अंत्यलेख आहे ;

(ग्) ते रीतसर निष्पादित केले होते ;

(घ्) विनंती अर्जदाराच्या हाती किती किंमतीची मत्ता येण्याचा संभव आहे, आणि

(ङ्) अर्ज समप्रमाणासाठी असेल तेव्हा विनंती अर्जदार हा मृत्युपत्रामध्ये नामनिर्दिष्ट केलेला मृत्युपत्र व्यवस्थापक आहे.

(२) विनंती अर्जामध्ये या तपशिलाव्यतिरिक्त आणखी पुढील गोष्टी निवेदन कराव्या लागतील :

(क्) जिल्हा न्यायाधीशाकडे अर्ज करण्यात आला असेल तेव्हा, मृताच्या मृत्युसमयी त्याचे स्थिर वास्तव्यस्थळ किंवा काही संपत्ती त्या न्यायाधीशाच्या अधिकारितेत होती ; आणि

(ख्) जिल्हा प्रत्यायुक्ताकडे अर्ज करण्यात आला असेल तेव्हा, मृताचे त्याच्या मृत्युसमयी स्थिर वास्तव्यस्थळ अशा प्रत्यायुक्ताच्या अधिकारितेत होते.

(३) जेथे जिल्हा न्यायाधिशाकडे अर्ज केलेला असून, विनंतीअर्जदाराच्या हाती येण्याचा संभव असलेला मत्तेचा कोणताही अंश अन्य राज्यात स्थित असेल, तेथे प्रत्येक राज्यात अशापैकी किती मत्ता आहे ते व अशी मत्ता ज्यांच्या अधिकारितेत आहे ते जिल्हा न्यायाधीश कोणते हे देखील विनंतीअर्जात निवेदन करावे लागेल.

२७७. इंग्रजी किंवा न्यायालयापुढील कामकाजात सर्वसामान्यपणे वापरात असलेली भाषा खेरीज करून, अन्य कोणत्याही भाषेत मृत्युपत्र, त्याची प्रत किंवा खर्डा लिहिला असेल त्या सर्व प्रकरणी, ज्या भाषेसाठी न्यायालयीन अनुवादक नियुक्त केला आहे त्या अनुवादकाने केलेला अथवा जर मृत्युपत्र, प्रत किंवा खर्डा अन्य कोणत्याही भाषेत असेल तर, त्याचा अनुवाद करण्यास सक्षम असलेल्या कोणत्याही व्यक्तीने केलेला त्याचा अनुवाद विनंतीअर्जासोबत जोडावा लागेल आणि त्या बाबतीत, असा अनुवाद त्या व्यक्तीला पुढील रीतीने सत्यापित करावा लागेल, उदा. :— **कोणत्याही प्रकरणी मृत्युपत्राचा अनुवाद विनंतीअर्जासोबत जोडावयाचा न्यायालयीन अनुवादकाहून अन्य व्यक्तीने अनुवादाबाबत सत्यापन करणे.**

"मी (क, ख) असे अधिकथन करतो की, मूळ लेखाची भाषा व तिची लिपी मला वाचता येते व उत्तम समजते आणि त्याचा वरील अनुवाद यथार्थ व अचूक आहे."

२७८. (१) प्रशासनपत्रासाठी करावयाचा विनंतीअर्ज पूर्वोक्तानुसार सुवाच्यपणे लिहावा लागेल, आणि त्यात पुढील गोष्टी निवेदन कराव्या लागतील :— **प्रशासनपत्रासाठी विनंतीअर्ज**

(क) मृताच्या मृत्युची वेळ व स्थळ ;

(ख) मृताचे कुटुंबीय किंवा अन्य नातलग आणि त्याची, त्यांची निवासस्थाने ;

(ग) विनंती-अर्जदार कोणत्या अधिकाराने दावा सांगतो ;

(घ) विनंती-अर्जदाराच्या हाती किती किमतीची मत्ता येण्याचा संभव आहे ;

(ङ) अर्ज जिल्हा न्यायाधीशाकडे केला असेल तेव्हा मृताच्या मृत्युसमयी त्याचे स्थिर वास्तव्यस्थळ किंवा काही संपत्ती त्या न्यायाधीशाच्या अधिकारितेत स्थित होती ही गोष्ट ; आणि

(च) अर्ज जिल्हा प्रत्यायुक्ताकडे केला असेल तेव्हा मृताच्या मृत्युसमयी त्याचे स्थिर वास्तव्यस्थळ अशा प्रत्यायुक्ताच्या अधिकारितेत होते ही गोष्ट.

(२) जेव्हा जिल्हा न्यायाधीशाकडे अर्ज केलेला असून विनंती अर्जदाराच्या हाती येण्याचा संभव असलेला मत्तेचा कोणताही अंश अन्य राज्यात असेल तेथे प्रत्येक राज्यात अशापैकी किती मत्ता आहे आणि अशी मत्ता ज्यांच्या ज्यांच्या अधिकारितेत आहे ते न्यायाधीश कोणते हे आणखी विनंती-अर्जात निवेदन करावे लागेल.

२७९. (१) [1][भारतात] सर्वत्र परिणामक व्हावे असे अभिप्रेत असलेले मृत्युपत्राचे संप्रमाण किंवा संपदेचे प्रशासनपत्र मिळवण्यासाठी कलम २७३ च्या परंतुकात उल्लेखिलेल्यांपैकी कोणत्याही न्यायालयाकडे अर्ज करणारी प्रत्येक व्यक्ती आपल्या विनंतीअर्जात अनुक्रमे कलम २७६ व कलम २७८ द्वारे आवश्यक केलेल्या बाबींच्या जोडीस, याच्या निकटपूर्वी सांगितल्याप्रमाणे अशाप्रकारे परिणामक होण्याचे, अभिप्रेत असलेले असे त्याच मृत्युपत्राचे संप्रमाण व त्याच संपदेचे प्रशासनपत्र मिळवण्यासाठी त्याच्या प्रामाणिक समजुतीप्रमाणे अन्य कोणत्याही न्यायालयाकडे अर्ज करण्यात आलेला नाही असे, किंवा जेथे असा कोणताही अर्ज करण्यात आला असेल तेथे, कोणत्या न्यायालयाकडे तो करण्यात आला होता, कोणत्या व्यक्तीने किंवा व्यक्तींनी तो केला होता आणि त्यावर काही कार्यवाही झाली असल्यास, ती काय होती, हे निवेदन करील. **विवक्षित बाबतीत संप्रमाण किंवा प्रशासनपत्र याकरता केलेल्या विनंतीअर्जातील निवेदनात भर.**

(२) कलम २७३ च्या परंतुकाखाली असा कोणताही अर्ज ज्या न्यायालयाकडे केला असेल त्याला तो, स्वतःला योग्य वाटल्यास फेटाळता येईल.

२८०. संप्रमाणासाठी किंवा प्रशासनपत्रासाठी करावयाच्या विनंती अर्जावर सर्व प्रकरणी, विनंती अर्जदार व त्याचा वकील असल्यास तो वकील सही करील आणि विनंती अर्जदार पुढील रीतीने सत्यापित करील. उदा. :— **संप्रमाण, इत्यादीकरता करावयाचा विनंतीअर्ज स्वाक्षरित व सत्यापित करावयाचा.**

"मी (क, ख) वरील विनंतीअर्जातील विनंती अर्जदार असे अधिकथन करतो की, त्यात जे निवेदिले आहे ते माझ्या यच्चयावत् माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे."

२८१. जेथे संप्रमाणाकरिता अर्ज केला असेल तेथे मृत्युपत्रावरील साक्षीदारांपैकी निदान एकजण (आणता येण्याजोगा असेल तेव्हा) विनंतीअर्जाचे पुढील रीतीने किंवा पुढील आशयाचे सत्यापनही करील, ते असे :— **संप्रमाणाकरिता केलेल्या विनंतीअर्जाचे मृत्युपत्राच्या एका साक्षीदाराने सत्यापन करणे.**

"मी (ग), (घ), वरील विनंतीअर्जात उल्लेखिलेल्या मृत्युपत्रकर्त्याच्या अखेरच्या मृत्युपत्राच्या व अंत्यलेखाच्या साक्षीदारांपैकी एक असे अधिकथन करतो की, मी उपस्थित राहून उक्त मृत्युपत्रकर्त्याला त्यावर आपली स्वाक्षरी (किंवा निशाणी) करताना पाहिले (किंवा वरील विनंतीअर्जासोबत जोडलेला लेख हे आपले अखेरचे मृत्युपत्र व अंत्यलेख असल्याचे माझ्या समक्ष उक्त मृत्युपत्रकर्त्याने अभिस्वीकृत केले होते."

---

१. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'राज्ये' याऐवजी 'भारत' हा शब्दोल्लेख घातला.

विनंतीअर्जातील किंवा अधिकथनातील खोट्या प्रकथनाबद्दल शिक्षा.

**२८२.** ज्याचे सत्यापन करणे याद्वारे आवश्यक केले आहे अशा कोणत्याही विनंतीअर्जात किंवा अधिकथनात, सत्यापन करणाऱ्या व्यक्तीला जे खोटे असल्याचे ज्ञात आहे किंवा तसा तिचा विश्वास आहे असे कोणतेही प्रकथन अंतर्भूत असेल, तर अशा व्यक्तीने भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) याच्या कलम १९३ खाली अपराध केला असल्याचे मानले जाईल.

जिल्हा न्यायाधीशाच्या शक्ती.

**२८३.** (१) सर्व प्रकरणी जिल्हा न्यायाधीश किंवा जिल्हा प्रत्यायुक्त, त्याला योग्य वाटल्यास,—

(क) विनंती अर्जदाराची जातीने शपथेवर तपासणी करू शकेल ;

(ख) प्रकरणपरत्वे, मृत्युपत्राचे रीतसर निष्पादन किंवा विनंती अर्जदाराचा प्रशासनपत्र मिळवण्याचा हक्क याबाबत आणखी पुरावा मागवू शकेल.

(ग) मृताच्या संपदेत आपला कोणताही हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्तींना, संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान केले जाण्यापूर्वीची कार्यवाही येऊन बघण्यास पाचारण करणारी प्रावाहने काढू शकेल.

(२) ते प्रावाहन न्यायगृहाच्या एखाद्या सहजदृश्य भागी आणि त्याचप्रमाणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयातही लावण्यात येईल आणि ते काढणारा न्यायाधीश किंवा जिल्हा प्रत्यायुक्त निर्देशित करील अशा रीतीने ते अन्यथा प्रकाशित किंवा ज्ञात केले जाईल.

(३) जेथे मत्तेचा कोणताही अंश अन्य राज्यातील जिल्हा न्यायाधीशाच्या अधिकारितेत स्थित असल्याचे विनंती अर्जदाराने निवेदले असेल, तेथे प्रावाहन काढणारा जिल्हा न्यायाधीश त्या प्रावाहनाची एक प्रत अशा अन्य जिल्हा न्यायाधीशाकडे पाठवण्याची तजवीज करील व तो ते जणू काही त्याने स्वतः काढलेले प्रावाहन असल्याप्रमाणे त्याचरीतीने प्रकाशित करील, आणि ज्याने प्रावाहन काढले त्या जिल्हा न्यायाधीशास असे प्रकाशन झाल्याचे अधिकृतपणे कळवील.

संप्रमाण किंवा प्रशासनपत्र यांच्या प्रदानाविरुद्ध सावधानपत्र.

**२८४.** (१) संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान करण्याविरूद्ध द्यावयाचे सावधानपत्र जिल्हा न्यायाधीशाकडे किंवा जिल्हा प्रत्यायुक्ताकडे दाखल करता येईल.

(२) कोणत्याही जिल्हा प्रत्यायुक्ताकडे कोणतेही सावधानपत्र दाखल करण्यात आल्यावर तात्काळ तो त्याची एक प्रत जिल्हा न्यायाधीशाकडे पाठवील.

(३) कोणत्याही जिल्हा प्रत्यायुक्ताकडे कोणतेही सावधानपत्र दाखल करण्यात आल्यावर तात्काळ तो त्याची एकेक प्रत, ज्यांच्या अधिकारितेस मृताचे त्याच्या मृत्युसमयी स्थिर वास्तव्यस्थळ असल्याचे अभिकथन केले आहे, असा कोणी जिल्हा प्रत्यायुक्त असल्यास त्याला, आणि ज्याच्याकडे ती प्रेषित करणे जिल्हा न्यायाधीशाला समयोचित वाटेल अशा अन्य कोणत्याही न्यायाधीशाकडे किंवा जिल्हा प्रत्यायुक्ताकडे देण्यात येईल.

सावधानपत्राचा नमुना.

(४) परिस्थितीनुसार शक्य असेल तेथवर सावधानपत्र पाचव्या अनुसूचीमध्ये दिलेल्या नमुन्यानुसार केले जाईल.

सावधानपत्र दाखल करण्यात आल्यानंतर सावधानकर्त्याला नोटीस देऊन होईपर्यंत विनंती-अर्जावर कार्यवाही करावयाची नाही.

**२८५.** संप्रमाणाकरता किंवा प्रशासनपत्राकरता विनंती-अर्ज करण्यात आला असता, ज्या न्यायाधीशाकडे किंवा जिल्हा प्रत्यायुक्ताकडे अर्ज करण्यात आला आहे त्याच्याकडे त्याच्या प्रदानाविरुद्ध सावधानपत्र दाखल करण्यात आल्यानंतर अथवा अन्य एखाद्या प्रत्यायुक्ताकडे ते दाखल केल्याची नोटीस देण्यात आल्यानंतर, जिने ते दाखल केले त्या व्यक्तीला न्यायालयास वाजवी वाटेल अशी नोटीस देऊन होईपर्यंत त्या विनंती-अर्जावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

जिल्हा प्रत्यायुक्ताने संप्रमाण किंवा प्रशासनपत्र केव्हा द्यावयाचे नाही.

**२८६.** संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान करण्याला विरोध असेल अशा अथवा अन्यथा संप्रमाण किंवा प्रशासनपत्र आपल्या न्यायालयात दिले जाऊ नये असे स्वतःला वाटेल अशा कोणत्याही प्रकरणी, जिल्हा प्रत्यायुक्त संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान करणार नाही.

**स्पष्टीकरण.**---" विरोध " याचा अर्थ, कोणीही जातीनिशी किंवा आपल्या मान्यताप्राप्त अभिकर्त्याकरवी किंवा आपल्या वतीने काम चालवण्यास रीतसर नियुक्त केलेल्या वकिलाकरवी उपस्थित होऊन कार्यवाहीला विरोध करणे, असा आहे.

२८७. जेथे विरोध नाही, पण संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान करावे की न करावे याबद्दल अशा जिल्हा प्रत्यायुक्ताला शंका वाटत असेल अशा प्रत्येक प्रकरणी अथवा संप्रमाणाच्या किंवा प्रशासनपत्राच्या प्रदानासंबंधी किंवा प्रदानासाठी केलेल्या अर्जासंबंधी कोणताही प्रश्न उद्भवेल तेव्हा जिल्हा प्रत्यायुक्त स्वतःला योग्य वाटल्यास जिल्हा न्यायाधीशाकडे प्रस्तुत बाबींसंबंधाचे निवेदन प्रेषित करू शकेल आणि तो जिल्हा न्यायाधीश त्यास जरूरीचे वाटतील अशा अनुदेशांनुसार अर्जातील बाबीवर पुढील कार्यवाही करण्याचा निदेश जिल्हा प्रत्यायुक्ताला देऊ शकेल अथवा अशा अर्जाच्या बाबीसंबंधी, प्रस्तुत प्रदानासाठी अर्ज करणाऱ्या पक्षाला न्यायाधीशाकडे अर्ज करण्याची मोकळीस देऊन जिल्हा प्रत्यायुक्ताला पुढील कोणतीही कार्यवाही करण्यास मनाई करू शकेल. **विरोध नसेल अशा शंकास्पद प्रकरणी जिल्हा न्यायाधीशाकडे निवेदन प्रेषित करण्याची शक्ती.**

२८८. जेथे विरोध असेल त्याबाबतीत किंवा आपल्या न्यायालयात संप्रमाण किंवा प्रशासनपत्र नाकारले जावे असे जिल्हा प्रत्यायुक्ताचे मत असेल त्या प्रत्येक प्रकरणी, विनंतीअर्ज व त्यासोबत कोणतेही दस्तऐवज दाखल केले असल्यास ते जिल्हा न्यायाधीशाला सादर करता यावेत यासाठी अर्जदार व्यक्तीला परत करण्यात येतील ; मात्र, न्यायाच्या प्रयोजनांसाठी जिल्हा प्रत्यायुक्तास ते अडकवून ठेवणे जरुरीचे वाटले तर, आणि तसे करण्यास तो याद्वारे प्राधिकृत झाला असेल त्या प्रकरणी, ते तो जिल्हा न्यायाधीशाकडे पाठवील. **विरोध असेल त्याबाबतीत किंवा आपल्या न्यायालयात संप्रमाण किंवा प्रशासनपत्र नाकारले जावे असे जिल्हा प्रत्यायुक्ताला वाटेल त्या बाबतीतील प्रक्रिया.**

२८९. मृत्युपत्राचे संप्रमाण प्रदान करावे असे जेव्हा जिल्हा न्यायाधीशाला किंवा जिल्हा प्रत्यायुक्ताला वाटेल तेव्हा, तो ते सातव्या अनुसूचीमध्ये दिलेल्या नमुन्यानुसार आपल्या न्यायालयाच्या मोहोरेनिशी प्रदान करील. **संप्रमाणाचे प्रदान न्यायालयाच्या मोहोरेनिशी करावयाचे.**

२९०. मृत व्यक्तीच्या संपदेचे मृत्युपत्राच्या प्रतीने युक्त किंवा तीपासून वियुक्त असे प्रशासनपत्र देण्यात यावे असे जेव्हा जिल्हा न्यायाधीशाला किंवा जिल्हा प्रत्यायुक्ताला वाटेल तेव्हा तो ते सातव्या अनुसूची मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार आपल्या न्यायालयाच्या मोहोरेनिशी प्रदान करील. **प्रशासनपत्राचे प्रदान न्यायालयाच्या मोहोरेनिशी करावयाचे.**

२९१. (१) कलम २४१ खाली दिल्या जाणाऱ्या प्रदानाव्यतिरिक्त इतर बाबतीत, प्रशासनपत्र देण्यात येऊन जिच्याकडे ती जबाबदारी सोपवण्यात आली असेल ती प्रत्येक व्यक्ती जिल्हा न्यायाधीशाला एका प्रतिभूसह किंवा अधिक प्रतिभूंसह, मृताची संपदा रीतसर एकत्रित करण्यासाठी, हस्तगत करण्यासाठी व प्रशासित करण्यासाठी स्वतःला बांधून घेणारे बंधपत्र देईल व ते बंधपत्र तो न्यायाधीश सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेशित करील अशा स्वरूपात असेल. **प्रशासन बंधपत्र.**

(२) जेव्हा मृत व्यक्ती हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती असेल तेव्हा—

(क्) कलम २४१ खालील प्रदानाबाबत पोटकलम (१) ने केलेला अपवाद लागू होणार नाही ;

(ख्) जिला संप्रमाण प्रदान केले असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून जिल्हा न्यायाधीशाला तशाच बंधपत्राची मागणी करता येईल.

२९२. विनंती-अर्जाद्वारे करण्यात आलेल्या अर्जावरून आणि अशा कोणत्याही बंधपत्राखालील बंधनाचे पालन झालेले नाही अशी खात्री झाल्यास व प्रतिभूतीबाबतच्या किंवा मिळालेले पैसे न्यायालयात भरणा करावेत असा उपबंध करणाऱ्या अशा, न्यायालयाला योग्य वाटतील त्या अटींवर किंवा अन्यथा, न्यायालयाला ते बंधपत्र एखाद्या व्यक्तीच्या, तिच्या मृत्युपत्रव्यवस्थापकांच्या किंवा प्रशासकांच्या नावे अभिहस्तांकित करता येईल व तदनंतर जणू काही मुळात उक्त बंधपत्र न्यायालयाच्या न्यायाधीशाऐवजी त्या व्यक्तीला किंवा त्या मृत्युपत्रव्यवस्थापकांना किंवा प्रशासकांना देण्यात आले असावे त्याप्रमाणे ती किंवा ते त्यावरून तिच्या स्वतःच्या नावाने किंवा त्यांच्या आपापल्या नावाने दावा आणण्यास हक्कदार होतील आणि त्या बंधपत्राच्या भंगाबाबत वसूल करता येण्याजोगी संपूर्ण रक्कम सर्व हितसंबंधित व्यक्तींकरता विश्वस्त म्हणून त्यावरून वसूल करण्यास हक्कदार असतील. **प्रशासन बंधपत्राचे अभिहस्तांकन.**

२९३. मृत्युपत्रकर्त्याच्या किंवा विनामृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्युनंतर, सात पूर्ण दिवस संपून जाईपर्यंत मृत्युपत्राचे संप्रमाण प्रदान केले जाणार नाही, आणि चौदा पूर्ण दिवस संपून जाईपर्यंत प्रशासनपत्र प्रदान केले जाणार नाही. **संप्रमाण व प्रशासनपत्र प्रदान करण्याची वेळ.**

**ज्यांचे संप्रमाण किंवा मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र देण्यात आले आहे ती मूळ मृत्युपत्रे दफ्तरदाखल करणे.**

**२९४.** (१) प्रत्येक जिल्हा न्यायाधीश किंवा जिल्हा प्रत्यायुक्त मृत्युपत्रांसाठी एखादी सार्वजनिक नोंदणी कचेरी प्रस्थापित होईपर्यंत, तो ज्यांचे संप्रमाण किंवा मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र प्रदान करील ती सर्व मूळ मृत्युपत्रे आपल्या न्यायालयाच्या दफ्तरी दाखल करून जतन करील.

(२) राज्य शासन याप्रमाणे दफ्तरदाखल करण्यात आलेल्या मृत्युपत्रांचे जतन व निरीक्षण करण्यासाठी विनियम करील.

**विरोध असलेल्या प्रकरणांतील प्रक्रिया.**

**२९५.** जिल्हा न्यायाधीशापुढील ज्या प्रकरणी विरोध असेल अशा कोणत्याही प्रकरणी कार्यवाही, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५.) याच्या उपबंधानुसार शक्य होईल तितपत जवळ जवळ रीतसर दाव्याच्या स्वरूपात होईल व त्यामध्ये प्रकरणपरत्वे, संप्रमाणासाठी किंवा प्रशासनपत्रासाठी विनंतीअर्ज करणारा हा वादी असेल आणि जी प्रशासनास विरोध करण्यासाठी उपस्थित झाली असेल ती व्यक्ती प्रतिवादी असेल.

**प्रत्याहृत संप्रमाण किंवा प्रशासनपत्र परत स्वाधीन करणे.**

**२९६.** (१) जेव्हा संप्रमाणाचे किंवा प्रशासनपत्राचे प्रदान या अधिनियमाखाली प्रत्याहृत किंवा निर्भावित केले जाईल तेव्हा, जिला प्रदान करण्यात आले होते त्या व्यक्तीला संप्रमाण किंवा प्रशासनपत्र ज्या न्यायालयाने प्रदान केले त्याच्या तात्काळ स्वाधीन करावे लागेल.

(२) जर अशा व्यक्तीने याप्रमाणे संप्रमाण किंवा प्रशासनपत्र स्वाधीन करण्यात हेतूपुरःसर आणि वाजवी कारणाशिवाय कसूर केली तर, ती एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास किंवा दोन्ही शिक्षांस प्रात्र होईल.

**संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रत्याहृत होण्यापूर्वी प्रशासकाकडे किंवा मृत्युपत्रव्यवस्थापकाकडे केलेला भरणा.**

**२९७.** जेव्हा संप्रमाणाचे किंवा प्रशासनपत्राचे प्रदान प्रत्याहृत होईल तेव्हा अशा प्रदानाखाली त्याच्या प्रत्याहरणापूर्वी कोणत्याही मृत्युपत्रव्यवस्थापकाकडे किंवा प्रशासकाकडे सद्भावपूर्वक केलेल्या सर्व भरण्यांमुळे ते करणाऱ्या व्यक्तीला, असे प्रत्याहरण झाले असले तरीही, वैध विमुक्ती मिळेल ; ज्याने अशा प्रत्याहृत प्रदानाअन्वये काही व्यवहार केला असेल असा मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक, ज्या व्यक्तीला नंतर संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान करण्यात येईल ती जे भरणे वैधपणे करू शकली असती ते भरणे त्याने केले असता तेवढे पैसे स्वतःकडे ठेवून घेऊ शकेल व स्वतःची प्रतिपूर्ती करू शकेल.

**प्रशासनपत्र नाकारण्याची शक्ती.**

**२९८.** यात यापुढे काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे मृत व्यक्ती ही मुस्लिम, बौद्ध किंवा सूट दिलेली व्यक्ती अथवा जिला कलम ५७ लागू होत नाही अशी हिंदू, शीख किंवा जैन व्यक्ती असेल तेथे, या अधिनियमाखाली प्रशासनपत्रासाठी करण्यात आलेल्या कोणत्याही अर्जास, काही कारणांस्तव मंजुरी नाकारण्याचा आदेश करणे हे न्यायालयाच्या विवेकाधीन असेल, मात्र त्याला ती कारणे लेखी नमूद करावी लागतील.

**जिल्हा न्यायाधीशाच्या आदेशांवर अपिले.**

**२९९.** जिल्हा न्यायाधीशाने या अधिनियमाद्वारे त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या आधारे केलेल्या प्रत्येक आदेशावर, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) याचे जे उपबंध अपिलांना लागू आहेत त्यानुसार उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

**उच्च न्यायालयाची समवर्ती अधिकारिता.**

**३००.** (१) जिल्हा न्यायाधीशाला या अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या सर्व शक्ती वापरण्यास जिल्हा न्यायाधीशांच्या बरोबरीने उच्च न्यायालयाला समवर्ती अधिकारिता असेल.

(२) ज्यांना कलम ५७ लागू होते त्यांहून अन्य कोणत्याही प्रकरणी, कलकत्ता, मद्रास व मुंबई या नगरांच्या [१]*** सीमांबाहेरील कोणत्याही स्थानिक क्षेत्रावर याद्वारे प्रदान करण्यात आलेली समवर्ती अधिकारिता वापरताना कोणतेही उच्च न्यायालय, मृत व्यक्ती जेव्हा हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती असेल तेव्हा, राज्य शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्याला तसे करण्यास प्राधिकृत केले नाही तोपर्यंत, संप्रमाण किंवा प्रशासनपत्र यांसाठी केलेले अर्ज स्वीकारणार नाही.

**मृत्युपत्र-व्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला दूर करणे व उत्तराधिकाऱ्यासाठी उपबंध.**

**३०१.** उच्च न्यायालय, त्याच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावरून, कोणत्याही खाजगी मृत्युपत्रव्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला निलंबित, दूर किंवा पदविमुक्त करू शकेल आणि ज्याचे पदधारण संपुष्टात येईल अशा कोणत्याही मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकाच्या पदांवर अन्य व्यक्ती उत्तराधिकार मिळण्याची आणि अशा उत्तराधिकाऱ्याच्या ठायी संपदेची कोणतीही संपत्ती निहित होण्याची तजवीज करू शकेल.

**मृत्युपत्र व्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला निदेश.**

**३०२.** जेथे या अधिनियमाखाली कोणत्याही संपदेबाबत संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान केलेले असेल तेथे उच्च न्यायालय, त्याच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावरून मृत्युपत्रव्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला कोणतेही सर्वसाधारण किंवा विशेष निदेश देऊ शकेल.

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "आणि ब्रम्हदेश प्रांताच्या" हे शब्द गाळले.

## प्रकरण पाच

### स्व-अपकृत्यजन्य मृत्युपत्रव्यवस्थापकांविषयी

**३०३.** अधिकारी मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक अस्तित्वात नसताना जी व्यक्ती मृताच्या संपदेत ढवळाढवळ करते किंवा मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या पदासंबंधीचा अन्य कोणताही व्यवहार करते ती याद्वारे स्वतःला स्व-अपकृत्यजन्य मृत्युपत्रव्यवस्थापक करून घेते. **स्व-अपकृत्यजन्य मृत्युपत्रव्यवस्थापक.**

**अपवाद.**---(१) मृताच्या मालाबाबत, तो जतन करण्याच्या किंवा त्या व्यक्तीच्या उत्तरक्रियेसाठी तरतूद करण्याच्या प्रयोजनार्थ अथवा कुटुंबाच्या किंवा संपत्तीच्या निकडीच्या गरजांसाठी ढवळाढवळ करण्याने स्व-अपकृत्यजन्य मृत्युपत्रव्यवस्थापक होत नाही.

(२) मृताला दुसऱ्याकडून मिळावयाच्या मालाबाबत कामाच्या समान्य क्रमानुसार व्यवहार करण्याने स्व-अपकृत्यजन्य मृत्युपत्रव्यवस्थापक होत नाही.

#### उदाहरणे

(एक) मृताचा काही माल ' क ' वापरतो किंवा देऊन टाकतो किंवा विकतो अथवा स्वतःचे ऋण किंवा उत्तरदान भागविण्यासाठी घेतो अथवा मृताला येणे असलेली ऋणे स्वीकारतो. तो स्व-अपकृत्यजन्य मृत्युपत्रव्यवस्थापक आहे.

(दोन) मृताने आपल्या हयातील आपली ऋण वसूल करण्यासाठी व आपला माल विकण्यासाठी ' क ' ला अभिकर्ता म्हणून नियुक्त केले असून तो, त्याचा मृत्यू झाल्याचे कळल्यावरही तसे करणे चालू ठेवतो. त्याचा मृत्यू झाल्याचे कळल्यानंतर केलेल्या कृतींबाबत अभिकर्ता स्व-अपकृत्यजन्य मृत्युपत्रव्यवस्थापक आहे.

(तीन) ' क ' हा मृताचा मृत्युपत्रव्यवस्थापक नसताना त्या नात्याने दावा आणतो. तो स्व-अपकृत्यजन्य मृत्युपत्रव्यवस्थापक आहे.

**३०४.** जेव्हा एखादी व्यक्ती जेणेकरून ती स्व-अपकृत्यजन्य मृत्युपत्रव्यवस्थापक होईल अशा प्रकारे वागलेली असते तेव्हा अधिकारी मृत्युपत्रव्यवस्थापकाकडे किंवा प्रशासकाकडे केलेले भरणे आणि प्रशासनाच्या रीतसर क्रमानुसार केलेले भरणे वजा केल्यानंतर तिच्या हाती जी मत्ता राहिली असेल तिच्या व्याप्तीपर्यंत ती व्यक्ती, अधिकारी मृत्युपत्रवस्थापकाला किंवा प्रशासकाला अथवा मृताच्या कोणत्याही धनकोला किंवा उत्तरदानग्राहीला उत्तरदायी असते. **मृत्युपत्र व्यवस्थापकाचे दायित्व.**

## प्रकरण सहा

### मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या व प्रशासकाच्या शक्तींविषयी

**३०५.** मृत व्यक्ती हयात असताना तिला जशी शक्ती होती त्याप्रमाणे मृत्युपत्रव्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला मृताच्या मागे राहिलेल्या सर्व वादकारणांबाबत वाद आणण्याची तशीच शक्ती असेल व मृताची ऋणे वसूल करण्यासाठी तशीच शक्ती त्याला वापरता येईल. **मृताच्या मागे राहिलेली वाद, कारणे व मृत्युसमयी येणे असलेली ऋणे याबाबत.**

**३०६.** भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) यात व्याख्या केल्यानुसार अब्रूनुकसानी, हमला किंवा पक्षकाराच्या मृत्यूस कारणीभूत न होणाऱ्या अन्य शारीरिक क्षती खेरीजकरून, व जेथे मागितलेली दाद पक्षकाराच्या मृत्यूनंतर उपभोगता येऊ शकत नसेल किंवा ती देणे निरर्थक होईल अशीही प्रकरणे खेरीजकरून, एखाद्या व्यक्तीच्या मृत्युसमयी तिच्या बाजूने किंवा विरुद्ध विद्यमान असतील ती ती सर्व देणी-घेणी आणि कोणतीही कारवाई किंवा विशेष कार्यवाही चालवण्याचे किंवा तीत बचाव देण्याचे सर्व हक्क तिच्या मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकाच्या बाजूने आणि त्याच्या विरुद्ध टिकून राहतात. **मृताला असलेली देणी-घेणी अथवा त्याचे किंवा त्याच्या विरोधी कारवाई अधिकार त्याच्यामागे मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक याच्या बाजूने किंवा त्याच्या विरुद्ध टिकून राहतात.**

#### उदाहरणे

(एक) एका अधिकाऱ्याचे दुर्लक्ष किंवा कसूर याचा परिणाम म्हणून रेल्वेमार्गावर टक्कर होते आणि उतारूला गंभीर दुखापत होते, पण ती मृत्यूस कारणीभूत होण्याजोगी नाही. कोणतीही कार्यवाही केल्याशिवाय तो त्यानंतर मृत्यू पावतो. वादकारण मागे टिकून राहत नाही.

(दोन) ' क ' घटस्फोटासाठी दावा आणतो. ' क ' मृत्यू पावतो. त्याच्या प्रतिनिधीकडे वादकारण टिकून राहत नाही.

**संपत्तीची विल्हेवाट करण्याची मृत्युपत्रव्यवस्थापकाची किंवा प्रशासकाची शक्ती.**

**३०७.** (१) पोटकलम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने, मृत्युपत्रव्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला आपणास योग्य वाटेल अशा रीतीने कलम २११ खाली त्याच्या ठायी निहित झाली असेल अशा मृताच्या संपूर्ण संपत्तीची संपूर्णतः किंवा अंशतः विल्हेवाट करण्याची शक्ती असते.

**उदाहरणे**

(एक) मृताने आपल्या संपत्तीच्या भागाचे विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दान केले आहे. मृत्युपत्रव्यवस्थापकाने मृत्युपत्रित दानाला अनुमती दिलेली नसून त्याची विषयवस्तू तो विकतो. विक्रय विधिग्राह्य आहे.

(दोन) मृत्युपत्रव्यवस्थापक स्वविवेकानुसार मृताच्या संपदेचा एक भाग गहाण ठेवतो. गहाण विधिग्राह्य आहे.

(२) जर मृत व्यक्ती ही हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती असेल तर, पोटकलम (१) द्वारे प्रदान झालेली सर्वसाधारण शक्ती पुढील निर्बंधाच्या व शर्तीच्या अधीन असेल, उदा.---

(एक) मृत्युपत्रव्यवस्थापकाचा याप्रमाणे आपल्या ठायी निहित झालेल्या स्थावर संपत्तीची विल्हेवाट करण्याची शक्ती ही, त्यास नियुक्त करणारे मृत्युपत्र या संबंधात जे कोणतेही निर्बंध घालील त्यास अधीन असते. मात्र, त्यास संप्रमाण प्रदान केलेले असेल आणि ज्या न्यायालयाने त्यास संप्रमाण प्रदान केले त्याने लेखी आदेशाद्वारे त्यास आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थावर संपत्तीची आदेशाने परवानगी दिलेल्या रीतीने विल्हेवाट करण्याची परवानगी दिली असेल, तर गोष्ट अलहिदा.

(दोन) ज्या न्यायालयाने प्रशासनपत्र प्रदान केले त्याच्या पूर्वपरवानगीशिवाय प्रशासकाला---

(क) कलम २११ खाली त्याच्या ठायी त्या त्या काळी निहित झालेली कोणतीही स्थावर संपत्ती गहाण ठेवता येणार नाही. प्रभारित करता येणार नाही अथवा विक्रयाद्वारे, दानाद्वारे, विनियमाद्वारे किंवा अन्यथा हस्तांतरित करता येणार नाही, किंवा

(ख) पाच वर्षाहून अधिक मुदतीकरता अशी कोणतीही संपत्ती भाडेपट्ट्याने देता येणार नाही.

(तीन) मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने, प्रकरणपरत्वे, खंड (एक) किंवा खंड (दोन) चे व्यतिक्रमण करून केलेली संपत्तीची विल्हेवाट संपत्तीत हितसंबंधित असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीच्या विनंतीवरून शून्यकरणीय असते.

(३) अशा प्रकरणी कोणतेही संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान केले जाण्यापूर्वी, प्रकरणपरत्वे, पोटकलम (१) आणि पोटकलम (२) चे खंड (एक) व खंड (तीन) यांचा किंवा पोटकलम (१) आणि पोटकलम (२) चे खंड (दोन) व (तीन) यांचा मजकूर त्यावर पृष्ठांकित केला जाईल किंवा त्यासोबत जोडला जाईल.

(४) संप्रमाण किंवा प्रशासनपत्र हे, पोटकलम (३) खाली आवश्यक केल्याप्रमाणे तो खर्डा पृष्ठांकित न केल्यामुळे किंवा त्यासोबत न जोडल्यामुळे विधिबाह्य होणार नाही. तसेच अशा पृष्ठांकनाच्या किंवा जोडपत्राच्या अभावी मृत्युपत्रव्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला या कलमाच्या उपबंधांना सोडून अन्यथा वागण्याचा प्राधिकार मिळणार नाही.

**प्रशासनाच्या सर्वसाधारण शक्ती.**

**३०८.** मृत्युपत्रवस्थापकाला किंवा प्रशासकाला आपणांस कायदेशीरपणे वापरता येतील अशा खर्चविषयक अन्य कोणत्याही शक्तीशिवाय आणखी व त्यात न्यूनता न येता, पुढील गोष्टींवर खर्च करण्याची शक्ती असेल.---

(क) त्याने प्रशासिलेल्या कोणत्याही संपदेच्या कोणत्याही संपत्तीची योग्य देखभाल किंवा व्यवस्थापन यांसाठी जरूरीची असतील अशी कामे, आणि

(ख) उच्च न्यायालयाच्या संमतीने अशा संपत्तीबाबत वाजवी व योग्य असतील अशी धार्मिक, धर्मादायी व अन्य उद्दिष्टे आणि अशा सुधारणा.

**मुशाहिरा किंवा अभिकरण आकार.**

**३०९.** मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक हा, महाप्रशासक अधिनियम, १९१३ (१९१३ चा ३) द्वारे किंवा त्या खाली, त्या त्या काळी महाप्रशासकाबाबत निश्चित केलेल्याहून अधिक दराने कोणताही मुशाहिरा किंवा अभिकरण आकार मिळवण्यास किंवा ठेवून घेण्यास हक्कदार असाणार नाही.

३१०. जर कोणत्याही मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने मृताच्या संपत्तीचा कोणताही भाग प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे खरेदी केला तर, विकलेल्या संपत्तीत हितसंबंधित असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीच्या विनंतीवरून विक्रय शून्यकरणीय असतो. **मृतांच्या संपत्तीची मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने केलेली खरेदी.**

३११. जेव्हा अनेक मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक असतात, तेव्हा सर्वांच्या शक्ती कोणत्याही विरूद्ध निदेशाच्या अभावी, ज्याने मृत्युपत्र सिद्ध केले असेल किंवा प्रशासन पत्र मिळवले असेल अशा त्यांच्यापैकी कोणाही एकाला वापरता येतील. **अनेक मृत्युपत्रव्यवस्थापकांच्या किंवा प्रशासकांच्या शक्ती एकाने वापरण्याजोग्या.**

### उदाहरणे

(एक) मृताला येणे असलेल्या ऋणावरील परिमोचन हक्क सोडून देण्याची शक्ती अनेक मृत्युपत्रव्यवस्थापकांपैकी एकाला आहे.

(दोन) भाडेपट्टी अभ्यर्पित करण्याची शक्ती एकाला आहे.

(तीन) मृताची जंगम किंवा स्थावर संपत्ती विकण्याची शक्ती एकाला आहे.

(चार) उत्तरदान अनुमत करण्याची शक्ती एकाला आहे.

(पाच) मृतापत्र प्रदेय असलेल्या वचनचिठ्ठीवर पृष्ठांकन करण्याची शक्ती एकाला आहे.

(सहा) मृत्युपत्राने 'क', 'ख', 'ग' व 'घ' यांना मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून नियुक्त केले आहे आणि त्यांच्यापैकी दोघे असले की गणपूर्ती होईल असा निदेश दिला आहे. एकट्या मृत्युपत्रव्यवस्थापकाला कोणतीही कृती करता येणार नाही.

३१२. अनेक मृत्युपत्रव्यवस्थापकांपैकी किंवा प्रशासकांपैकी एकाचा किंवा अधिकांचा मृत्यू होताच, मृत्युपत्रात किंवा प्रशासनपत्राच्या प्रदानात विरूद्ध निदेश नसेल तर, त्या पदाच्या सर्व शक्ती एका किंवा अधिक उत्तरजीवींच्या ठायी निहित होतात. **अनेक मृत्युपत्रव्यवस्थापकांपैकी किंवा प्रशासकांपैकी एकाच्या मृत्यूनंतर शक्ती राहणे.**

३१३. अप्रशासित चीजवस्तूंच्या प्रशासकाला, अशा चीजवस्तूंबाबत मूळ मृत्युपत्रव्यवस्थापकाला असतात त्याच शक्ती असतात. **अप्रशासित चीजवस्तूंच्या प्रशासकाच्या शक्ती.**

३१४. अज्ञानदशेपुरत्या प्रशासकाला सर्वसामान्य प्रशासकाच्या शक्ती असतात. **अज्ञानदशेपुरत्या प्रशासकाच्या शक्ती.**

३१५. जेव्हा संप्रमाणाचे किंवा प्रशासनपत्राचे प्रदान विवाहित स्त्रीला करण्यात आलेले असते तेव्हा, तिला सर्वसामान्य मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकाच्या शक्ती असतात. **विवाहित मृत्युपत्रव्यवस्थापिकेच्या किंवा प्रशासिकेच्या शक्ती.**

## प्रकरण सात

### मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकाच्या कर्तव्यांविषयी

३१६. मृताच्या स्थितीला साजेशा रीतीने जरूर ते त्याच्या उत्तरक्रियेचे विधी करण्यासाठी त्याने त्या प्रयोजनासाठी पुरेशी संपत्ती मागे ठेवली असल्यास पैसे पुरवणे हे मृत्युपत्रव्यवस्थापकाचे कर्तव्य असते. **मृताच्या उत्तरक्रियेबाबत.**

३१७. (१) संप्रमाणाच्या किंवा प्रशासनाच्या प्रदानापासून सहा महिन्यांच्या आत, किंवा ज्या न्यायालयाने संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान केले असेल ते न्यायालय नेमून देईल अशा आणखी अवधीच्या आत मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक, कब्जात असलेली सर्व संपत्ती आणि सर्व घेणी आणि कोणत्याही व्यक्तीकडून येणे असलेल्या ज्या ऋणांना मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक या नात्याने तो हक्कदार असेल ती सर्व ऋणे यांचा संपूर्ण व खरा अंदाज अंतर्भूत असणारी जंत्री सादर करील आणि तशाच रीतीने, प्रदानापासून एक वर्षाच्या आत, किंवा उक्त न्यायालय नेमून देईल अशा आणखी अवधीच्या आत आपल्या हाती आलेली असेल ती मत्ता आणि कशा रीतने ती उपयोजिलेली आहे किंवा विल्हेवाट केली आहे ते दर्शवणारा संपदेचा हिशेब सादर करील. **जंत्री व हिशेब.**

(२) उच्च न्यायालयाला या कलमाखाली जंत्री किंवा हिशेब कोणत्या नमुन्यानुसार सादर करावयाचा ते विहित करता येईल.

(३) या कलमाखालील जंत्री किंवा हिशेब सादर करण्यास न्यायालयाने आज्ञा केल्यावर, जर मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने त्या आज्ञेचे अनुपालन करण्यात उद्देशपूर्वक कसूर केली तर, त्याने भारतीय दंड संहितेच्या कलम १७६ खाली अपराध केला असल्याचे मानले जाईल.

(४) उद्देशपूर्वक केलेली खोटी जंत्री किंवा हिशेब या कलमाखाली सादर करणे हा त्या संहितेच्या कलम १९३ खालील अपराध असल्याचे मानले जाईल.

**विवक्षित प्रकरणी जंत्रीमध्ये भारताच्या कोणत्याही भागातील संपत्तीचा समावेश करावयाचा.**

**३१८.** जेथे संप्रमाणाचे किंवा प्रशासनपत्राचे प्रदान, [१]* * * [२][भारतात] सर्वत्र परिणाम असण्याच्या उद्देशाने केलेला असेल त्या सर्व प्रकरणी, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक मृताच्या चीजवस्तूंच्या जंत्रीत त्याच्या [२][भारतात] असलेल्या सर्व जंगम व स्थावर संपत्तीचा समावेश करील, आणि प्रत्येक राज्यात असलेल्या अशा संपत्तीचे मूल्य अशा जंत्रीत वेगवेगळे दाखवले जाईल आणि संप्रमाणावर किंवा प्रशासनपत्रावर, त्याच्याशी संबंधित असलेल्या संपत्तीची मग ती [२][भारतात] कोठेही स्थित असो-संपूर्ण रक्कम किंवा मूल्य यांनुरूप फी आकारण्याजोगी असेल.

**मृताच्या संपत्तीबाबत व त्याला येणे असलेल्या ऋणांबाबत.**

**३१९.** मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक, मृतांची संपत्ती व त्याच्या मृत्युसमयी त्याला येणे होती ती ऋणे वाजवी तत्परतेने एकत्रित करील.

**सर्व ऋणांआधी खर्च द्यावयाचे.**

**३२०.** मृताचा दर्जा व योग्यता यांनुसार वाजवी प्रमाणात उत्तरक्रियेचा खर्च आणि त्याच्या मृत्यूपूर्वीच्या एका महिन्यातील भोजन व निवारा यांचा खर्च व वैद्यकीय परिचर्येची फी धरून मृत्युशय्येवर असताना आलेला खर्च हे सर्व ऋणांआधी दिले जातील.

**अशा खर्चानंतर द्यावयाचे खर्च.**

**३२१.** संपदेचे प्रशासन करण्यासाठी जरूर असेल अशा कोणत्याही न्यायिक कार्यवाहीसाठी किंवा तिच्याबाबत आलेला खर्च धरून, संप्रमाण किंवा प्रशासनपत्र मिळवण्याचा खर्च हा उत्तरक्रियेचा खर्च व मृत्युशय्येवर असताना आलेला खर्च दिल्यानंतर पाठोपाठ दिला जाईल.

**त्यानंतर विवक्षित कामांबद्दलची मजुरी द्यावयाची व नंतर अन्य ऋणे.**

**३२२.** मृताकडून, त्याच्या मृत्यूच्या निकटपूर्व तीन महिन्यांत कोणत्याही मजुराने, कारागीराने किंवा घरगड्याने केलेल्या कामाबद्दल देय असलेली मजुरी त्यानंतर देण्यात येईल आणि त्यानंतर मृताची अन्य ऋणे त्यांच्या त्यांच्यात पूर्वाक्रम असल्यास त्यानुसार देण्यात येतील.

**पूर्वोक्तांवाचून सर्व ऋणे समसमान व हिस्सेरशीने द्यावयाची.**

**३२३.** पूर्वोक्तावाचून कोणत्याही धनकोला दुसऱ्यापेक्षा पूर्वक्रम मिळण्याचा अधिकार असणार नाही ; पण मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक, त्याची स्वतःची ऋणे धरून त्याला ज्या ऋणांची माहिती असेल अशी सर्व ऋणे, मृताच्या मत्तेची व्याप्ती असेल तेथवर समसमान व हिस्सेरशीने फेडील.

**भारतात अधिवास नसेल त्याबाबतीतील जंगम संपत्तीचे ऋणांच्या फेडीकडे उपयोजन.**

**३२४.** (१) जर मृताचा अधिवास [२][भारतात] नसेल तर, त्याची ऋण फेडण्याकडे करावयाचे त्याच्या जंगम संपत्तीचे उपयोजन [२][भारताच्या] कायद्याद्वारे विनियमित होईल.

(२) पोटकलम (१) च्या आधारे ज्याला आपल्या ऋणाच्या एखाद्या भागाची रक्कम मिळाली असेल असा कोणताही धनको, अशी रक्कम त्याने अन्य ऋणकोच्या लाभासाठी हिशेबात धरल्याशिवाय मृताच्या स्थावर संपत्तीपासून येणाऱ्या उत्पन्नातील हिश्श्यास हक्कदार असणार नाही.

(३) जेथे मृत व्यक्ती हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती असेल तेथे हे कलम लागू असणार नाही.

**उदाहरण**

जेथे मुद्रांकित संलेखांना मुद्रांकित नसलेल्या संलेखापेक्षा पूर्वाक्रम आहे अशा देशात 'क' चा अधिवास असून तो ५,००० रुपये इतक्या मूल्यांची जंगम संपत्ती आणि १०,००० रुपये इतक्या मूल्याची स्थावर संपत्ती आणि मुद्रांकित संलेखावरील १०,००० रुपये इतक्या रकमेची ऋणे व मुद्रांकित नसलेल्या संलेखावरील तितक्याच रकमेची ऋणे मागे ठेवून मृत्यू पावतो. मुद्रांकित संलेख धारण करणाऱ्या ऋणकोंना जंगम संपदेच्या उत्पन्नातून त्याच्या ऋणांपैकी निम्मी मिळतात. मुद्रांकित नसलेल्या संलेख्यावरील ऋणे फेडण्याकडे स्थावर संपदेचे उत्पन्न, अशा ऋणांपैकी निम्मी ऋणे फेडली जाईपर्यंत उपयोजित करावयाचे आहे. त्यामुळे ५,००० रुपये शिल्लक राहतील व ते सरसकट सर्व ऋणकोंमध्ये त्यांच्याप्रत देय राहील त्या रकमेच्या प्रमाणात वाटावयाचे आहेत.

---

१. १९५२ चा अधिनियम ४८, कलम ३ व अनुसूची २ यांद्वारे 'भारताच्या' हा शब्द गाळला.

२. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'राज्य' याऐवजी 'भारत' हा शब्दोल्लेख घातला.

३२५. प्रत्येक प्रकारची ऋणे कोणत्याही उत्तरदानापूर्वी फेडली पाहिजेत. **ऋणे उत्तरदानापूर्वी फेडावयाची.**

३२६. जर मृताची संपदा कोणत्याही समाश्रित दायित्वांस अधीन असेल तर जेव्हा जेव्हा ती दायित्वे देय होतील तेव्हा ती निभावण्यास पुरेसे हानिरक्षक मिळाल्याशिवाय मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक कोणतेही उत्तरदान पावते करण्यास बांधलेला नसतो. **मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक हा निरीक्षणाशिवाय उत्तरदाने पावती करण्यास बांधलेला नसतो.**

३२७. जर ऋणे, जरुरीचे खर्च व विनिर्दिष्ट उत्तरदाने पावती केल्यानंतर, सगळी सर्वसाधारण उत्तरदाने संपूर्णपणे पावती करण्यास मत्ता पुरेशी नसेल तर ती उत्तरदाने अवसित होतील किंवा सारख्याच प्रमाणात कमी होतील, आणि मृत्युपत्रांतर्गत असलेल्या कोणत्याही विरुद्ध निदेशाच्या अभावी मृत्युपत्रव्यवस्थापकाला एका उत्तरदानग्राहीला दुसऱ्यापेक्षा अधिमान देऊन त्याला उत्तरदान पावते करण्याचा किंवा स्वतःच्या किंवा जिच्याकरता तो विश्वस्त असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या उत्तरदानाकारणे कोणतेही पैसे ठेवून घेण्याचा अधिकार नसतो. **सर्वसाधारण उत्तरदाने घट पावणे.**

३२८. जेथे एखादे विनिर्दिष्ट उत्तरदान असून ऋणे व जरूरीचे खर्च देण्यास मत्ता पुरेशी असते तेथे विनिर्दिष्ट वस्तू त्यात कोणतीही घट न करता उत्तरदानग्राहीकडे सुपूर्द केली पाहिजे. **ऋणे फेडण्यास मत्ता पुरेशी असते तेव्हा विनिर्दिष्ट उत्तरदान घट न पावणे.**

३२९. जेथे निदर्शक उत्तरदाने असून ऋणे व जरुरीचे खर्च देण्यास मत्ता पुरेशी असते तेथे ज्या निधीतून उत्तरदानग्राहीचे उत्तरदान पावते करण्याचे निदेशित केले असेल तो संपेपर्यंत अशा निधीतून ते उत्तरदान पावते केले जाण्याचा अधिमान्य दावा त्याला सांगता येतो, आणि जर निधी संपल्यानंतरही उत्तरदानाचा एखादा भाग देण्याचा राहिला असेल तर, उर्वरित अंशासाठी सर्वसाधारण मत्तेविरुद्ध त्याला अशा अदत्त उर्वरित रकमेचे ते उत्तरदान असल्याप्रमाणे त्या उत्तरदाग्राहीचे स्थान राहते. **ऋणे व जरूरीचे खर्च देण्यास मत्ता पुरेशी असते तेव्हा निदर्शक उत्तरदानाखाली हक्क.**

३३०. जर ऋणे व विनिर्दिष्ट उत्तरदाने भागवण्यास मत्ता पुरेशी नसेल तर, उत्तरदानांमध्ये त्यांच्या प्रत्येकी रकमांच्या प्रमाणात हिस्सेरशीने घट करण्यात येईल. **विनिर्दिष्ट उत्तरदाने हिस्सेरशीने घट पावणे.**

**उदाहरण**

‘क’ ने ‘ख’ ला ५०० रुपये किंमतीची हिऱ्याची आंगठी व ‘ग’ ला १,००० रुपये किमतीचा घोडा मृत्युपत्राद्वारे दिलेला आहे. मृत्युपत्रकर्त्यांची सर्व चीजवस्तू विकणे जरूरीचे असल्याचे आढळून आले आहे ; आणि ऋणे फेडल्यानंतर त्याची मत्ता फक्त १,००० रुपये एवढी होते. या रकमेपैकी, रुपये ३३३-५-४ ‘ख’ ला आणि रुपये ६६६-१०-८ ‘ग’ ला द्यावयाचे आहेत.

३३१. घट करण्याच्या प्रयोजनार्थ, हयातीकरता दिलेले उत्तरदान, वर्षासन निर्माण करण्याकरता मृत्युपत्राने विनियोजित केलेली रक्कम आणि वर्षासन निर्माण करण्याकरता कोणतीही रक्कम विनियोजित केली नसेल तेव्हा वर्षासनाचे मूल्य, हे सर्वसाधारण उत्तरदान असल्याचे समजले जाईल. **घट करण्याच्या प्रयोजनार्थ सर्वसाधारण म्हणून समजावयाची उत्तरदाने.**

## प्रकरण आठ

### उत्तरदानाला मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने अनुमती देण्याविषयी

३३२. उत्तरदानग्राहीचा आपल्या उत्तरदानावरील हक्क, पूर्ण होण्याकरिता मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकाच्या अनुमतीची जरुरी असते. **उत्तरदानग्राहीचा हक्क पूर्ण होण्याकरिता अनुमती जरुरीची.**

**उदाहरण**

(एक) इम्पिरिअल बँक ऑफ इंडियाकडे निक्षेपित असलेला आपला सरकारी रोखा ‘क’ हा ‘ख’ ला आपल्या मृत्युपत्राने देतो. मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या अनुमतीशिवाय रोखे सुपूर्द करण्याचा बँकेला प्राधिकार नाही, त्याचप्रमाणे ‘ख’ ला त्याचा कब्जा घेण्याचाही अधिकार नाही.

(दोन) ‘ख’ कडे भाड्याने असलेले आपले कलकत्त्याचे घर ‘क’ ने आपल्या मृत्युपत्राने ‘ग’ ला दिले आहे ‘ग’ ला मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकाच्या अनुमतीशिवाय भाडे घेण्याचा हक्क मिळत नाही.

विनिर्दिष्ट उत्तरदानाला मृत्युपत्र व्यवस्थापकाने दिलेल्या अनुमतीचा परिणाम.

**३३३.** (१) विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दानाला मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने दिलेली अनुमती ही, संपत्तीचे स्वरूप किंवा परिस्थिती यामुळे ती संपत्ती विशिष्ट पद्धतीने हस्तांतरित केली जाणे आवश्यक नसल्यास, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक म्हणून असलेला त्याचा त्या उत्तरदानातील हितसंबंध निर्निहित होऊन उत्तरदानग्राहीच्या मृत्युपत्रित दानाचा विषय हस्तांतरित होण्यास, पुरेशी असते.

(२) ही अनुमती शाब्दिक असून शकेल, आणि ती व्यक्त असू शकेल आणि मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकाच्या वर्तनावरून उपलक्षित होऊ शकेल.

**उदाहरणे**

(एक) मृत्युपत्रान्वये एक घोडा दिलेला आहे. मृत्युपत्रव्यवस्थापक त्याची विल्हेवाट करण्यासाठी उत्तरदानग्राहीला विनंती करतो किंवा त्रयस्थ पक्ष तो घोडा मृत्युपत्रव्यवस्थापकांकडून खरेदी करण्याचा प्रस्ताव मांडतो आणि तो त्या पक्षाला उत्तरदानग्राहीला विनंती करण्याचा निदेश देतो. उत्तरदानाला दिलेली अनुमती उपलक्षित आहे.

(दोन) एका निधीचे व्याज उत्तरदानग्राहीच्या अज्ञानदशेत त्याच्या निर्वाहासाठी उपयोजित करावे असे मृत्युपत्राने निदेशित केले आहे. मृत्युपत्रव्यवस्थापक ते त्याप्रमाणे उपयोजित करण्यात सुरुवात करतो. ही संपूर्ण मृत्युपत्रित दानाला अनुमती आहे.

(तीन) एका निधीचे 'क' ला व त्यावर पश्चात 'ख' ला मृत्युपत्रित दान देण्यात आले आहे. मृत्युपत्रव्यवस्थापक निधीचे व्याज 'क' ला पावते करतो. 'ख' च्या मृत्युपत्रित दानाला ही उपलक्षित अनुमती आहे.

(चार) मृत्युपत्रकर्त्याची सर्व ऋणे फेडल्यानंतर पण विनिर्दिष्ट उत्तरदाने भागवण्यापूर्वी मृत्युपत्रव्यवस्थापक मृत्यू पावताच उत्तरदानांना अनुमती असल्याचे गृहित धरता येईल.

(पाच) जिला विनिर्दिष्ट वस्तू मृत्युपत्राने देण्यात आली आहे ती व्यक्ती तिचा कब्जा घेते आणि मृत्युपत्रव्यवस्थापकाकडून कोणताही आक्षेप न येता ती स्वतःजवळ ठेवून घेते. त्याची अनुमती गृहित धरता येईल.

सशर्त अनुमती.

**३३४.** उत्तरदानाला मृत्युपत्रव्यवस्थापकाची किंवा प्रशासकाची अनुमती सशर्त असू शकेल, आणि जिचे पालन करण्यास भाग पाडण्याचा त्याला अधिकार आहे अशी ती शर्त असून तिचे पालन झाले नसेल तर, अनुमती नाही असे मानावयाचे.

**उदाहरणे**

(एक) सुलतानपूर येथील आपल्या जमिनी 'क' हा 'ख' ला मृत्युपत्राने देतो. मृत्युपत्राच्या दिनांकास आणि 'क' च्या मृत्युसमयी त्या १०,००० रुपयांच्या गहाणास अधीन होत्या. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी गहाणावरून देय असलेली रक्कम 'ख' मर्यादित अवधीत भरील या शर्तीवर मृत्युपत्रव्यवस्थापक मृत्युपत्रित दानाला अनुमती देतो. रक्कम भरली जात नाही, तेथे अनुमती नाही.

(दोन) आपल्याला उत्तरदानग्राहीने काही पैशांचा रक्कम दिली पाहिजे या शर्तीवर मृत्युपत्रव्यवस्थापक मृत्युपत्रित दानाला अनुमती देतो. पैसे दिले जात नाहीत. तथापि, अनुमती विधिग्राह्य आहे.

स्वतःच्या उत्तरदानाला मृत्युपत्रव्यवस्थापकाची अनुमती.

**३३५.** (१) जेव्हा मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक उत्तरदानग्राही असेल तेव्हा, मृत्युपत्रित दान अन्य व्यक्तीला दिले असता जशी त्याची अनुमती आवश्यक असते त्याचप्रमाणे त्याच्या स्वतःच्या उत्तरदानास त्यावरील त्याचा स्वत्वाधिकार पूर्ण होण्याकरता ती आवश्यक असते आणि त्याची अनुमती तशाच रीतीने, व्यक्त किंवा उपलक्षित असू शकेल.

(२) संपत्तीचे प्रशासन करण्याच्या आपल्या रीतीनुसार जर त्याने अशी कोणतीही कृती केली की, जिचा संबंध त्याच्या उत्तरदानग्राही या भूमिकेशी जोडण्यासारखा आहे आणि मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक या भूमिकेशी जोडण्यासारखा नाही तर, अनुमती उपलक्षित असेल.

**उदाहरण**

मृत्युपत्रव्यवस्थापक मृत्युपत्राने दिलेल्या घराचे भाडे किंवा सरकारी रोख्यांवरील व्याज घेतो आणि ते स्वतःच्या उपयोगाकरता उपयोजित करतो, ही अनुमती आहे.

**३३६.** उत्तरदानाला मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने दिलेल्या अनुमतीमुळे ते मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूपासून परिणामक होते. **मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या अनुमतीचा परिणाम.**

**उदाहरणे**

(एक) उत्तरदानग्राही आपले उत्तरदान मृत्युपत्रव्यवस्थापकाकडून त्यास अनुमती मिळण्याआधी विकतो. मृत्युपत्रव्यवस्थापकाने मागाहून दिलेली अनुमती खरेदीदाराच्या लाभार्थ प्रवर्तित होते आणि उत्तरदानावरील त्याचा स्वत्वाधिकार पूर्ण करते.

(दोन) 'क' हा 'ख' ला मृत्युपत्राने १,००० रुपये आपल्या मृत्यूपासूनच्या व्याजासहित देतो. 'क' च्या मृत्युपासून एक वर्ष संपून जाईपर्यंत मृत्युपत्रव्यवस्थापक 'ख' च्या उत्तरदानाला अनुमती देत नाही. 'ख' हा 'क' च्या मृत्यूपासून व्याजाला हक्कदार आहे.

**३३७.** मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूपासून एक वर्ष संपेपर्यंत कोणतेही उत्तरदान पावते करण्यास किंवा सुपूर्द करण्यास बांधलेला नसतो. **मृत्युपत्र व्यवस्थापकाने उत्तरदाने केव्हा सुपूर्द करावयाची.**

**उदाहरण**

आपल्या मृत्युनंतर सहा महिन्यांच्या आत आपली उत्तरदाने पावती करण्यात यावी असे 'क' आपल्या मृत्युपत्राने निदेशित करतो. एक वर्ष संपेपर्यंत ती देण्यास मृत्युपत्रव्यवस्थापक बांधलेला नाही.

## प्रकरण नऊ

### वर्षासनाचे प्रदान व त्याचे संविभाजन यांविषयी

**३३८.** जेथे मृत्युपत्राने वर्षासन दिलेले असून ते सुरू होण्यासाठी कोणतीही वेळ निश्चित केलेली नसेल तेथे मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूपासून ते सुरू होईल आणि त्या घटनेच्या लगतनंतरचे एक वर्ष संपताच पहिले प्रदान केले जाईल. **मृत्युपत्राने कोणतीही वेळ निश्चित केली नसेल त्याबाबतीतील वर्षासनाची सुरुवात.**

**३३९.** जेथे वर्षासन दर तिमाहीस किंवा दरमहा दिले जावे असा निदेश असेल तेथे, पहिले प्रदान मृत्युपत्रकर्त्यांच्या मृत्युनंतर, प्रकरणपरत्वे, पहिल्या तिमाहीच्या किंवा पहिल्या महिन्याच्या अखेरीस देय होईल. आणि मृत्युपत्रव्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला योग्य वाटल्यास, ते देय असेल तेव्हा दिले जाईल. पण मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक वर्षअखेरपर्यंत ते देण्यास बांधलेला असणार नाही. **दर तिमाहीस किंवा दरमहा द्यावयाचे वर्षासन प्रथम केव्हा देय होते.**

**३४०.** (१) जेथे मृत्युपत्रकर्त्यांच्या मृत्यूपासून एक महिन्याच्या किंवा अन्य कोणत्याही कालविभागाच्या आत अथवा विवक्षित दिवशी वर्षासनाचे पहिले प्रदान केले जावे असा निदेश असेल तेथे, पहिले प्रदान जेव्हा करण्याचे मृत्युपत्राने प्राधिकृत केले असेल त्या सर्वात आधीच्या दिवसाच्या वर्षदिनी क्रमवर्ती प्रदाने करावयाची असतात. **दिलेल्या अवधींच्या आत किंवा विवक्षित दिनांकास पहिले प्रदान करावयाचे असे निर्देशित केले असेल त्या बाबतीतील क्रमवर्ती प्रदानांचे दिनांक, प्रदानांच्या दिनांकापूर्वी वर्षासनधारकाचा मृत्यु.**

(२) जर प्रदानाच्या वेळांच्या मध्यंतरकालात वर्षासनधारक मृत्यु पावला तर, वर्षासनाचा संविभाजित हिस्सा त्याच्या प्रतिनिधीला देण्यात येईल.

## प्रकरण दहा

### उत्तरदानासाठी तरतूद करण्याकरता पैशांची गुंतवणूक करण्याविषयी

**३४१.** विनिर्दिष्ट नसलेले उत्तरदान जेथे हयातीकरता दिले असेल तेथे मृत्युपत्राने देण्यात आलेली रक्कम उच्च न्यायालय कोणत्याही सर्वसाधारण नियमाद्वारे प्राधिकृत किंवा निदेशित करील अशा रोख्यात वर्षाअखेर गुंतवली जाईल, आणि त्यांचे उत्पन्न जसजसे देय म्हणून प्रोद्भूत होईल तसतसे उत्तरदानग्राहीला देण्यात येईल. **जेथे विनिर्दिष्ट नसलेले उत्तरदान हयातीकरता दिले असेल तेथे मृत्युपत्राने दिलेल्या रकमेची गुंतवणूक.**

**३४२.** (१) जेथे एखाद्या भविष्यकालीन वेळी द्यावयाचे असे सर्वसाधारण उत्तरदान दिलेले असेल तेथे, मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक ते भागवण्यास पुरेशी इतकी रक्कम कलम ३४१ मध्ये उल्लेखिलेल्या रोख्यात गुंतवील. **भविष्यकालीन वेळी द्यावयाच्या सर्वसाधारण उत्तरदानाची गुंतवणूक, मध्यंतरीच्या व्याजाची विल्हेवाट.**

(२) मध्यंतरीचे व्याज हे मृत्युपत्रकर्त्याच्या अवशिष्ट संपदेचा भाग होईल.

वर्षासनासाठी प्रभारित किंवा विनियोजित असा निधी नसेल त्या बाबतीतील प्रक्रिया.

**३४३.** जेथे मृत्युपत्राने एखादे वर्षासन दिले असून त्याच्या प्रदानाचा प्रभार कोणत्याही निधीवर ठेवलेला नसेल किंवा ते भागविण्यासाठी तो निधी बाजूला काढून ठेवलेला नसेल तेथे, विनिर्दिष्ट रकमेचे सरकारी वर्षासन खरेदी केले जाईल, किंवा, असे कोणतेही वर्षासन मिळवणे शक्य नसेल तर, वर्षासन निर्माण करण्यास पुरेशी इतकी रक्कम कलम ३४१ मध्ये उल्लेखिलेल्या प्रकारच्या रोख्यांत त्या प्रयोजनासाठी गुंतवली जाईल.

समाश्रित मृत्युपत्रित दानाचे अवशिष्ट उत्तरदानग्राहीला हस्तांतरण.

**३४४.** जेथे मृत्युपत्रित दान समाश्रित असते तेथे मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक उत्तरदानाची रक्कम गुंतवण्यास बांधलेला नसतो, पण कोणी अवशिष्ट उत्तरदानग्राही असल्यास, त्याने उत्तरदान देय झाले तर ते भागविण्यासाठी पुरेशी प्रतिभूती दिल्यावर, असा मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक त्यास संपदेचा संपूर्ण अवशिष्ट हस्तांतरित करू शकेल.

विशिष्ट रोख्यांत गुंतवण्याचा निदेश न देता मृत्युपत्राने हयातीकरता दिलेल्या अवशिष्टाची गुंतवणूक.

**३४५.** (१) जेथे मृत्युपत्रकर्त्याने एखाद्या व्यक्तीला हयातीकरता आपल्या संपदेचा अवशिष्ट, तो कोणत्याही विशिष्ट रोख्यांत गुंतवण्याचा कोणताही निदेश न देता मृत्युपत्राने दिलेला असेल तेथे, कलम ३४१ मध्ये उल्लेखिलेल्या प्रकारच्या रोख्यात त्यापैकी जितका अवशिष्ट मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी गुंतवलेला नसेल तितका अवशिष्ट पैशात रूपांतरित केला जाईल आणि अशा रोख्यांत गुंतवला जाईल.

(२) मृत व्यक्ती जर हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती असेल तर, हे कलम लागू असणार नाही.

विनिर्दिष्ट रोख्यांत गुंतवण्याचा निदेश देऊन मृत्युपत्राने हयातीकरता दिलेल्या अवशिष्टाची गुंतवणूक.

**३४६.** जेथे मृत्युपत्रकर्त्याने एखाद्या व्यक्तीला हयातीकरता आपल्या संपदेचा अवशिष्ट, तो विवक्षित विनिर्दिष्ट रोख्यांत गुंतवला जावा या निदेशासह मृत्युपत्राने दिलेला असेल तेथे, विनिर्दिष्ट प्रकारच्या रोख्यांत संपदेपैकी जितकी संपदा त्याच्या मृत्युसमयी गुंतलेली नसेल तितकी पैशात रूपांतरित केली जाईल आणि अशा रोख्यांत गुंतवली जाईल.

रूपांतरणाची व गुंतवणुकीची वेळ व रीत.

**३४७.** कलमे ३४५ व ३४६ यांमध्ये कल्पिले आहे असे रूपांतरण व गुंतवणूक मृत्युपत्रव्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला योग्य वाटेल अशा वेळी व तशा रीतीने करण्यात येईल ; आणि असे रूपांतरण व गुंतवणूक पूर्ण होईपर्यंत, निधी याप्रमाणे गुंतवला म्हणजे, त्याच्या उत्पन्नावर त्या त्या काळी ज्या व्यक्तीला हक्क मिळू शकेल त्या व्यक्तीस, निधीचा जो भाग याप्रमाणे गुंतवलेला नसेल अशा भागाच्या बाजारभावावर (मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूच्या दिनाकांस असेल त्याप्रमाणे ते संगणित करावयाचे) दरसाल दरशेकडा ४ दराने व्याज मिळेल :

परंतु, मृत व्यक्ती हिंदु, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती असेल तेव्हा, गुंतवणूक पूर्ण होण्याआधीचा व्याजाचा दर, दरसाल दरशेकडा ६ असेल.

अज्ञान व्यक्तीला मृत्युपत्रित दानाच्या तात्काळ प्रदानाचा किंवा कब्जाचा हक्क असून तिच्या वतीने एखाद्या व्यक्तीस ते पावते करण्याचा निदेश नसेल त्या बाबतीतील प्रक्रिया.

**३४८.** (१) जेव्हा मृत्युपत्रित दानाच्या तरतुदींनुसार उत्तरदानग्राहीला मृत्युपत्राने दिलेल्या पैशाच्या किंवा वस्तूच्या तात्काळ प्रदानाचा किंवा कब्जाचा हक्क असेल, पण तो अज्ञान असून त्याच्या वतीने कोणत्याही व्यक्तीस ते पावते करण्याचा निदेश नसेल तेव्हा, उत्तरदानग्राही पाल्याधिकरणाचा पाल्य नसल्यास संप्रमाण किंवा मृत्युपत्रयुक्त प्रशासनपत्र ज्याने किंवा ज्याच्या जिल्हा प्रत्यायुक्ताने केले त्या जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयात मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक उत्तरदानग्राहीच्या खाती ते जमा करील किंवा सुपूर्द करील.

(२) जर उत्तरदानग्राही पाल्याधिकरणाचा पाल्य असेल तर उत्तरदान पाल्याधिकारणाकडे त्याच्या खाती जमा केले जाईल.

(३) प्रकरणपरत्वे, जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयात किंवा पाल्याधिकरणाकडे ते याप्रमाणे जमा केले म्हणजे ते याप्रमाणे दिलेल्या पैशाबाबत विमुक्ती मिळण्यास पुरेसे होते.

(४) या कलमाखाली पैसे जमा करण्यात आल्यावर ते सरकारी रोख्यांच्या खरेदीत गुंतवले जातील व ते त्यांवरील व्याजासह प्रकरणपरत्वे, न्यायाधीश किंवा पाल्याधिकरण निदेशित करील त्यानुसार, त्यांस हक्कदार असलेल्या व्यक्तीला हस्तांतरित किंवा तिच्याकडे पावते केले जातील अथवा तिच्या लाभार्थ अन्यथा उपयोजिले जातील.

## प्रकरण अकरा

### उत्तरदानाचे उत्पन्न व व्याज यांविषयी

विनिर्दिष्ट उत्तरदानाच्या उत्पन्नावर उत्तरदानग्राहीचा स्वत्वाधिकार.

**३४९.** विनिर्दिष्ट उत्तरदानाचा उत्तरदानग्राही त्याचे काही निव्वळ उत्पन्न असल्यास त्याला मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूपासून हक्कदार असतो.

**अपवाद.**—जे विनिर्दिष्ट मृत्युपत्रित दान, त्याच्या तरतुदींनुसार समाश्रित असते, त्यात, मृत्युपत्रकर्त्याचा मृत्यू होणे व उत्तरदान निहित होणे या घटनांच्या दरम्यानचे उत्तरदानाचे उत्पन्न समाविष्ट नसते. त्याचे निव्वळ उत्पन्न हे मृत्युपत्रकर्त्यांच्या संपदेच्या अवशिष्टाचा भाग बनते.

### उदाहरणे

(एक) ' क ' हा आपल्या मेंढ्याचा कळप ' ख ' ला मृत्युपत्राने देतो. ' क ' चा मृत्यू आणि त्याच्या मृत्युपत्रव्यवस्थापकाने केलेली सुपूर्दगी याच्या दरम्यान मेंढ्यांची लोकर कातरली जाते किंवा काही मेंढ्या कोकरांना जन्म देतात. लोकर व कोकरे ही ' ख ' चा संपत्ती आहे.

(दोन) ' क ' हा आपले सरकारी रोखे ' ख ' ला मृत्युपत्राने देतो. पण ' ग ' च्या मृत्यूपर्यंत त्यांची सुपूर्दगी लांबणीवर टाकतो. ' क ' चा मृत्यू व ' ग ' चा मृत्यू यांच्या दरम्यान जे व्याज देय होते ते ' ख ' चे आहे आणि तो अज्ञान नसल्यास ते जसजसे मिळेल तसतसे त्याला दिले पाहिजे.

(तीन) मृत्युपत्रकर्ता ' क ' ला त्याच्या वयाला १८ वर्षे पूर्ण होतील तेव्हा द्यावयाच्या अशा आपल्या सर्व ४ टक्के दराच्या सरकारी वचनचिठ्ठ्या मृत्युपत्राने देतो. जर ' क ' तितक्या वयाचा झाला तर त्याला त्या चिठ्ठ्या मिळण्याचा हक्क आहे, पण मृत्युपत्रकर्त्याचा मृत्यू आणि ' क ' ला १८ वर्षे पूर्ण होणे याच्या दरम्यान त्याच्याबाबत जे व्याज प्रोद्भूत होते ते अवशिष्टाचा भाग बनते.

**अवशिष्ट उत्तरदानग्राहीचा अवशिष्ट निधीच्या उत्पन्नावर स्वत्वाधिकार.**

**३५०.** सर्वसाधारण अवशिष्ट मृत्युपत्रित दानाखालील उत्तरदानग्राही मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूपासून अवशिष्ट निधीच्या उत्पन्नास हक्कदार असतो.

**अपवाद.**---जे सर्वसाधारण अवशिष्ट मृत्युपत्रित दान त्याच्या तरतुदींनुसार समाश्रित असते त्यात, मृत्युपत्राने दिलेल्या निधीवर मृत्युपत्रकर्त्याचा मृत्यू व उत्तरदानाची निहिती यांच्या दरम्यान जे उत्पन्न प्रोद्भूत होईल ते समाविष्ट नसते. असे उत्पन्न त्याची जणू काही विल्हेवाट केलेली नसावी त्याप्रमाणे संक्रांत होते.

### उदाहरणे

(एक) मृत्युपत्रकर्ता मृत्युपत्राने ' क ' या अज्ञान व्यक्तीला आपल्या संपदेचा अवशिष्ट देऊन, तिच्या वयाला १८ वर्षे होतील तेव्हा तिला तो द्यावा असा निदेश देतो. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूनंतरचे उत्पन्न ' क ' चे आहे.

(दोन) मृत्युपत्रकर्ता मृत्युपत्राने ' क ' ला त्याच्या वयाला १८ वर्षे पूर्ण होतील तेव्हापासून आपल्या संपत्तीचा अवशिष्ट देतो. जर ' क ' ला तितके वय पूर्ण झाले तर तो अवशिष्ट मिळण्यास हक्कदार आहे. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूनंतर त्याबाबत जे उत्पन्न प्रोद्भूत झालेले आहे त्याची जणू काही विल्हेवाट केलेली नसावी त्याप्रमाणे ते संक्रांत होते.

**सर्वसाधारण उत्तरदान देण्याची वेळ निश्चित केलेली नसते त्या बाबतीतील व्याज.**

**३५१.** जेथे सर्वसाधारण उत्तरदान देण्यासाठी कोणतीही वेळ निश्चित केलेली नसते तेथे, मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूपासून एक वर्ष संपताच व्याज चालू होते.

**अपवाद.**---(१) जेथे मृत्युपत्राने उत्तरदान ऋण फेडण्यासाठी दिलेले असते तेथे, व्याज मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूपासून चालू होते.

(२) जेथे मृत्युपत्रकर्ता हा उत्तरदानग्राहीचा आई-वा-बाप किंवा अधिक दूरचा पूर्वज असेल अथवा त्याने उत्तरदानग्राहीच्या आई-वा-बापाची जागा घेतली असेल तेथे उत्तरदानावर मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूपासून व्याज चालू होईल.

(३) जेथे मृत्युपत्राने अज्ञानाला एखादी रक्कम, तिच्यातून त्याचा निर्वाह खर्च देण्याच्या निदेशासह दिलेली असते, तेथे मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूपासून व्याज प्रदेय असते.

**वेळ निश्चित असेल त्या बाबतीतील व्याज.**

**३५२.** जेथे सर्वसाधारण उत्तरदान देण्यासाठी वेळ निश्चित केलेली असते तेथे याप्रमाणे निश्चित केलेल्या वेळेपासून व्याज चालू होते. अशा वेळेपर्यंतचे व्याज मृत्युपत्रकर्त्याच्या संपदेच्या अवशिष्टाचा भाग बनते.

**अपवाद.**---जेथे मृत्युपत्रकर्ता हा उत्तरदानग्राहीचा आई-वा-बाप किंवा अधिक दूरचा पूर्वज असून अथवा स्वतः त्याने उत्तरदानग्राहीच्या आई-वा-बापाची जागा घेतली असून, उत्तरदानग्राही अज्ञान असेल तेथे, मृत्युपत्राने निर्वाहाकरता विनिर्दिष्ट रक्कम दिलेली नसल्यास, किंवा मृत्युपत्रात विरुद्ध निदेश नसल्यास उत्तरदानावर मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूपासून व्याज चालू होईल.

**व्याजाचा दर.**

**३५३.** मृत्युपत्रकर्ता हा हिंदू, मुस्लिम, बौद्ध, शीख किंवा जैन किंवा सूट दिलेली व्यक्ती असेल ते प्रकरण खेरीजकरून सर्व प्रकरणी व्याजाचा दर, दरसाल दरशेकडा ४ असेल वा त्या अपवाद प्रकरणी तो दरसाल दर शेकडा ६ असेल.

मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूनंतरच्या एका वर्षात वर्षासनाच्या थकबाकीवर व्याज नाही.

३५४. जरी वर्षासनाचे पहिले प्रदान करण्यासाठी मृत्युपत्राने मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूनंतरचे एक वर्ष संपण्यापूर्वीचा कालावधी निश्चित केला असला तरीही, त्या वर्षासनाच्या थकबाकीवर मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूनंतरच्या एक वर्षात व्याज प्रदेय नसते.

वर्षासन निर्माण करण्याकरता गुंतवावयाच्या रकमेवर व्याज.

३५५. जेथे काही पैशांची रक्कम वर्षासन निर्माण करण्याकरता गुंतवण्याचे निदेशित करण्यात येते तेथे, तिच्यावर मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्यूपासून व्याज प्रदेय असते.

## प्रकरण बारा

### उत्तरदान परत करण्याविषयी

न्यायालयाच्या आदेशाखाली पावते केलेले उत्तरदान परत करणे.

३५६. जेव्हा मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने न्यायालयाच्या आदेशाने उत्तरदान पावते केलेले असते तेव्हा, सर्व उत्तरदाने पावती करण्यास मत्ता अपुरी असल्याचे आढळून आल्यास त्या उत्तरदानग्राहीला ते परत करण्यास सांगण्याचा मृत्युपत्रव्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला हक्क असतो.

स्वेच्छेने पावते केले असल्यास परतावा नाही.

३५७. जेव्हा मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने स्वेच्छेने एखादे उत्तरदान पावते केलेले असते तेव्हा, सर्व उत्तरदाने पावती करण्यास मत्ता अपुरी असल्याचे दिसून आले असता ते परत करण्यास उत्तरदानग्राहीला तो सांगू शकत नाही.

कलम १३७ खाली दिलेल्या आणखी अवधीच्या आत शर्तीचे पालन झाल्यामुळे उत्तरदान देय झाले असेल त्या बाबतीतील परतावा.

३५८. जेव्हा मृत्युपत्राने शर्तीच्या पालनाकरता विहित केलेला अवधी शर्तीचे पालन न होता लोटला असेल आणि तद्नंतर मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने कपटाशिवाय मत्तेचे वितरण केले असेल अशा प्रकरणी, जर शर्तीच्या पालनाकरता कलम १३७ खाली आणखी अवधी दिलेला असून तद्नुसार शर्तीचे पालन करण्यात आले असेल तर, मृत्युपत्रव्यवस्थापकाकडे किंवा प्रशासकाकडे उत्तरदान मागता येणार नाही, पण ज्यांना त्याने ते पावते केलेले आहे ते, ती रक्कम परत देण्यास दायी असतात.

यथाप्रमाण परतावा करण्यासाठी प्रत्येक उत्तरदानग्राहीवर केव्हा सक्ती करता येईल.

३५९. जेव्हा मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने सर्व मत्ता उत्तरदाने भागवण्यासाठी खर्चून टाकली असून, त्याला ज्याची पूर्वी माहिती नव्हती ते ऋण फेडण्यास त्यानंतर त्याला भाग पाडले असेल तेव्हा यथाप्रमाण परतावा करण्यास प्रत्येक उत्तरदानग्राहीला सांगण्याचा मृत्युपत्रव्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला हक्क असतो.

मत्तेचे वितरण.

३६०. जेथे धनकोंनी किंवा अन्य व्यक्तींनी मृताच्या संपदेविरुद्ध असलेल्या त्यांच्या मागण्या आपल्याकडे पाठवून देण्याबाबत, मृत्युपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने उच्च न्यायालय कोणत्याही सर्वसाधारण नियमाने विहित करील अशा अथवा असा कोणताही नियम केलेला नसेल तर उच्च न्यायालय प्रशासनार्थ दाव्यात देऊ शकेल अशा नोटिसा दिलेल्या असतील तेथे, मागण्या पाठवून देण्यासाठी त्यात उल्लेखिलेला अवधी संपताच, त्याला आपणास ज्ञात अशा कायदेशीर मागण्या चुकत्या करण्यासाठी मत्ता किंवा तिचा कोणताही भाग वितरित करण्याची मोकळीक असेल, आणि अशा वितरणाच्या वेळी त्याला जिच्या मागणीची माहिती नव्हती अशा कोणत्याही व्यक्तीप्रत तो याप्रमाणे वितरण केलेल्या मत्तेबद्दल दायी असणार नाही :

परंतु, ज्यांना ज्यांना ती मत्ता किंवा तिचा कोणताही भाग मिळाला असेल त्यांच्या हातून तो मिळवण्यासाठी त्याच्या पाठोपाठ जाण्याचा कोणत्याही धनकोला किंवा मागणीकाराला जो हक्क असेल त्यास यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे बाध येणार नाही.

धनको उत्तदानग्राहीकडे परतावा करण्याची मागणी करू शकेल.

३६१. ज्याच्या ऋणाची फेड झालेली नसेल तो धनको ज्याला आपले उत्तरदान पावते झालेले आहे त्या उत्तदानग्राहीकडे असे ऋण परत करण्याची मागणी करू शकेल. मग मृत्युपत्रकर्त्याच्या संपदेची मत्ता त्याच्या मृत्युसमयी ऋणे व उत्तरदाने ही दोन्ही पावती करण्यास पुरेशी असोत वा नसोत ; आणि मृत्युपत्र व्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने उत्तरदान स्वच्छेने पावते केलेले असो वा नसो.

उत्तरदानग्राहीला प्रदान मिळालेले नसताना किंवा कलम ३६१ खाली परतावा करण्याची त्याच्यावर सक्ती झालेली असताना ती ज्याला संपूर्णपणे प्रदान झाले आहे त्याला परतावा करण्यास केव्हा भाग पाडू शकत नाही.

३६२. जर मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी सर्व उत्तरदाने पावती करण्यास मत्ता पुरेशी असेल तर, ज्याला आपले उत्तरदान मिळालेले नसेल तो किंवा कलम ३६१ खाली परतावा करण्याची ज्याच्यावर सक्ती झालेली असेल तो उत्तरदानग्राही मृत्युपत्रव्यवस्थापकाने केलेल्या अपव्ययामुळे मत्तेत मागाहून तूट आली तरी ज्याला संपूर्ण प्रदान झाले असेल त्या उत्तरदानग्राहीस परतावा करण्यास भाग पाडू शकत नाही, मग त्याला उत्तरदान दावा करून मिळालेले असो वा त्याशिवाय मिळालेले असो.

**३६३.** जर मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युसमयी मत्ता सर्व उत्तरदाने भागवण्यास पुरेशी नसेल तर, ज्याला आपले उत्तरदान मिळालेले नसेल त्या उत्तरदानग्राहीने ज्याला प्रदान झाले त्या उत्तरदानग्राहीला परतावा करण्यास सांगण्यापूर्वी, प्रथम मृत्युपत्रव्यवस्थापकाविरुद्ध किंवा प्रशासकाविरुद्ध, तो पतदार असल्यास, कार्यवाही केली पाहिजे ; पण मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक दिवाळखोर असेल किंवा प्रदान करण्यास दायी नसेल तर, प्रदान न मिळालेला उत्तरदानग्राही प्रदान मिळालेल्या प्रत्येक उत्तरदानग्राहीला यथाप्रमाण परतावा करण्यास भाग पाडू शकतो.

**ज्याला प्रदान झाले नाही अशा उत्तरदानग्राहीने मृत्युपत्रव्यवस्थापक पतदार असल्यास प्रथम त्याच्याविरुद्ध केव्हा कार्यवाही केली पाहिजे.**

**३६४.** एका उत्तरदानग्राहीने दुसऱ्याला परत करावयाची रक्कम, जर संपदा योग्य रीतीने प्रशासिली गेली असती तर, प्रदान केलेले उत्तरदान जितक्या रकमेने कमी करावयास हवे होते तीहून अधिक असणार नाही.

**एका उत्तरदानग्राहीने दुसऱ्याला परतावा करण्याबाबत मर्यादा.**

**उदाहरण**

'क' ने 'ख' ला २४० रुपये, 'ग' ला ४८० रुपये आणि 'घ' ला ७२० रुपये मृत्युपत्राने दिलेले आहेत. मत्ता फक्त १,२०० रुपये इतकी आहे आणि ती योग्य रीतीने प्रशासिली तर तिच्यातून २०० रुपये 'ख' ला ४०० रुपये 'ग' ला आणि ६०० रुपये 'घ' ला देता येतील. 'ख' साठी काहीही न ठेवता 'ग' व 'घ' यांना त्याची उत्तरदाने संपूर्णपणे पावती करण्यात आली आहेत. 'ख' ८० रुपये परत करण्यास 'ग' ला व १२० रुपये परत करण्यास 'घ' ला भाग पाडू शकेल.

**३६५.** परतावा सर्व प्रकरणी व्याजाशिवाय असेल.

**परतावा व्याजाशिवाय करावयाचा.**

**३६६.** ऋणे व उत्तरदाने भागवल्यानंतर मृताच्या संपत्तीचा अधिशेष किंवा अवशिष्ट, मृत्युपत्राने कोणतीही अवशिष्ट उत्तरदानग्राही नियुक्त केला असेल तेव्हा त्याला देण्यात येईल.

**नेहमीची प्रदाने केल्यावर राहिलेला अवशिष्ट भाग अवशिष्ट उत्तरदानग्राहीला द्यावयाचा.**

**३६७.** जेथे [1][भारतात] आपला अधिवास नसलेली एखादी व्यक्ती, [1][भारतात] व आपल्या मृत्युसमयी जेथे तिचा अधिवास होता त्या देशात अशा दोन्ही ठिकाणी मत्ता मागे ठेवून मृत्यू पावली असेल आणि [1][भारतात] तेथील मत्तेबाबत संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान करण्यात आले असेल, आणि अधिवासाच्या देशातील मत्तेबाबत त्या देशात प्रशासन प्रदान करण्यात आले असेल तेथे, [1][भारतातील], प्रकरणपरत्वे, मृत्युपत्रव्यवस्थापकाला किंवा प्रशासकाला, कलम ३६० मध्ये उल्लेखिलेल्या अशा नोटिसा दिल्यानंतर आणि त्यांमध्ये उल्लेखिलेला अवधी संपताच आपणास ज्ञात असतील अशी कायदेशीर देणी चुकती केल्यानंतर, मृताच्या संपत्तीचा कोणताही अधिशेष किंवा अवशिष्ट [1][भारताबाहेर] राहणाऱ्या ज्या व्यक्ती त्यास हक्कदार असतील त्यांच्यामध्ये स्वतः वितरित करण्याऐवजी अधिवासाच्या देशातील, प्रकरणपरत्वे, मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकाच्या संमतीने, तो अधिशेष किंवा अवशिष्ट त्या व्यक्तींमध्ये वितरित करण्यासाठी त्यांच्याकडे हस्तांतरित करता येईल.

**वितरणासाठी मत्तेचे भारतातून अधिवासाच्या देशातील मृत्युपत्रव्यवस्थापकाकडे किंवा प्रशासकाकडे हस्तांतरण.**

## प्रकरण तेरा

### धूळधाणीबद्दलच्या, मृत्युपत्रव्यवस्थापकाच्या किंवा प्रशासकाच्या दायित्वाविषयी

**३६८.** जेव्हा मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक मृताच्या संपदेचे दुरूपयोजन करतो किंवा तिला हानी किंवा नुकसान पोचवतो तेव्हा तो याप्रमाणे घडून आलेली हानी किंवा नुकसान भरून देण्यास दायी असतो.

**धूळधाणीबद्दल मृत्युपत्रव्यवस्थापकाचे किंवा प्रशासकाचे दायित्व.**

**उदाहरणे**

(एक) मृत्युपत्रव्यवस्थापक संपदेतून एक आधाररहित देणे चुकते करतो. तो हानी भरून देण्यास दायी आहे.

(दोन) नोटिशीद्वारे नवीकरण करता येण्याजोगा असा एक मूल्यवान भाडेपट्टा मृताकडे होता व मृत्युपत्रव्यवस्थापक नोटीस योग्य वेळी देण्याबाबत हयगय करतो. मृत्युपत्रव्यवस्थापक हानी भरून देण्यास दायी आहे.

---

१. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'राज्ये' याऐवजी 'भारत' हा शब्दोल्लेख घातला.

(तीन) मृताकडे एक भाडेपट्टा होता. त्याचे मूल्य त्याबद्दल द्यावयाच्या भाड्यापेक्षा कमी होते, पण विशिष्ट वेळी नोटीस देऊन तो समापित करता येण्यासारखा होता. मृत्युपत्रव्यवस्थापक नोटीस देण्याची हयगय करतो. तो हानी भरून देण्यास दायी आहे.

**संपत्तीचा कोणताही भाग हस्तगत करण्याची उपेक्षा केल्याबद्दल मृत्युपत्रव्यवस्थापकाचे किंवा प्रशासकाचे दायित्व.**

**३६९.** जेव्हा मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक मृताच्या संपत्तीचा कोणताही भाग हस्तगत करण्याबाबत हयगय करून मृताच्या संपदेस हानी पोचण्यास कारणीभूत होतो तेव्हा, तो ती रक्कम भरून देण्यास दायी असतो.

**उदाहरणे**

(एक) मृत्युपत्रव्यवस्थापक मृताला पतदार व्यक्तीकडून येणे असलेल्या ऋणावरील हक्क संपूर्णपणे सोडून देतो किंवा जो ऋणको संपूर्ण ऋण फेडण्यास समर्थ आहे त्याच्याशी तडजोड करतो. मृत्युपत्रव्यवस्थापक ती रक्कम भरून देण्यास दायी आहे.

(दोन) दावा मुदतबाह्य झाला आहे अशी तक्रार करणे ऋणकोला शक्य होईपर्यंत मृत्युपत्रव्यवस्थापक ऋणासाठी दावा आणण्याबाबत हयगय करतो आणि त्यामुळे संपदेला ऋण गमवावे लागते. मृत्युपत्रव्यवस्थापक ती रक्कम भरून देण्यास दायी आहे.

## भाग दहा

## उत्तराधिकार प्रमाणपत्रे

**या भागाखाली प्रमाणपत्रे प्रदान करण्यावर निर्बंध.**

**३७०.** (१) ज्यावरील अधिकार कलम २१२ किंवा कलम २१३ नुसार प्रशासनपत्राद्वारे किंवा संप्रमाणाद्वारे प्रस्थापित करणे आवश्यक असते अशा कोणत्याही ऋणाबाबत किंवा रोख्याबाबत या भागाखाली उत्तराधिकार प्रमाणपत्र (या भागात यापुढे "प्रमाणपत्र" म्हणून निर्देशिलेले) प्रदान केले जाणार नाही :

परंतु, मृत भारतीय ख्रिस्ती व्यक्तीच्या चीजवस्तूंना किंवा त्यांपैकी कोणत्याही भागास हक्कदार असल्याचा दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही ऋणाबाबत किंवा रोख्याबाबत प्रमाणपत्र प्रदान केले जाण्यास, या अधिनियमाखाली त्यावरील अधिकार प्रशासनपत्राद्वारे प्रस्थापित होऊ शकतो या कारणाने या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही.

(२) या भागाच्या प्रयोजनांकरता "रोखा" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(क) केंद्र सरकारची किंवा राज्य शासनाची कोणतीही वचनचिठ्ठी, ऋणपत्र, पुंजरोखा किंवा अन्य रोखा ;

(ख) [१][युनायटेड किंग्डमच्या] संसदेच्या अधिनियमाने भारताच्या महसुलावर प्रभारित केलेला कोणताही कर्जरोखा, ऋणपत्र किंवा वर्षासन ;

(ग) एखाद्या कंपनीचा किंवा अन्य निगमित संस्थेचा कोणताही पुंजरोखा किंवा ऋणपत्र अथवा तिच्यातील शेअर ;

(घ) स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्याच्या वतीने काढलेले कोणतेही ऋणपत्र किंवा पैशाबद्दलचा अन्य रोखा ;

(ङ) [२][राज्य शासन] **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जो रोखा या भागाच्या प्रयोजनार्थ रोखा असल्याचे घोषित करील असा अन्य कोणताही रोखा.

**प्रमाणपत्र प्रदान करण्याची अधिकारिता असलेले न्यायालय.**

**३७१.** ज्याच्या अधिकारितेत मृत व्यक्ती आपल्या मृत्युसमयी सर्वसामान्यतः राहत होती तो जिल्हा न्यायाधीश किंवा जर त्यावेळी तिला स्थिर वास्तव्यस्थळ नसेल तर, ज्याच्या अधिकारितेत मृताच्या संपत्तीचा कोणताही भाग आढळेल, तो जिल्हा न्यायाधीश या भागाखाली प्रमाणपत्र प्रदान करू शकेल.

**प्रमाणपत्रासाठी अर्ज.**

**३७२.** (१) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) यात वादीने किंवा त्याच्या वतीने दावा अर्ज स्वाक्षरित व सत्यापित करण्यासाठी विहित करण्यात आलेल्या रीतीने अर्जदाराने किंवा त्याच्या वतीने स्वाक्षरित व सत्यापित केलेल्या विनंती-अर्जाद्वारे अशा प्रमाणपत्रासाठी जिल्हा न्यायाधीशाकडे अर्ज केला जाईल, त्यामध्ये पुढील तपशील असेल. तो तपशील असा :---

(क) मृताच्या मृत्यूची वेळ ;

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे घातले.

२. "गव्हर्नर जनरल-इन कौन्सिल" हे शब्द अनुकूलन आदेश, १९३७ व अनुकूलन आदेश, १९५० द्वारे वरीलप्रमाणे अनुकूलित केले.

(ख) मृताचे त्याच्या मृत्युसमयीचे सर्वसामान्य निवासाचे स्थान आणि ज्याच्याकडे असा अर्ज करण्यात आला त्या न्यायाधीशाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत ते निवासस्थान नसेल तर मृताची त्या सीमांच्या आतील संपत्ती ;

(ग) मृताचे कुटुंबीय किंवा अन्य जवळचे नातलग आणि त्यांची त्यांची निवासस्थाने ;

(घ) विनंती-अर्जदार कोणत्या हक्काने दावा सांगतो ;

(ङ) प्रमाणपत्र प्रदान करण्यास किंवा ते प्रदान केले असेल तर त्याच्या विधिग्राह्यतेस कलम ३७० खाली किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधाखाली किंवा अन्य कोणत्याही अधिनियमितीखाली, अडथळा नसणे ; आणि

(च) ज्यांच्याबाबत प्रमाणपत्रसाठी अर्ज केलेला आहे ती ऋणे व रोखे.

(२) जर विनंती-अर्जात असे कोणतेही प्रकथन असेल की, जे, ते सत्यापित करणाऱ्या व्यक्तीला खोटे असल्याचे ज्ञात असेल किंवा तसा तिचा विश्वास असेल, किंवा खरे असल्याबद्दल तिला विश्वास नसेल तर त्या व्यक्तीने भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५) याच्या कलम १९८ खाली अपराध केला असल्याचे मानले जाईल.

[१][(३) मृत धनकोला येणे असलेल्या ऋणाबाबत किंवा ऋणांबाबत अथवा त्यांच्या अंशाबाबत अशा प्रमाणपत्रासाठी अर्ज करता येईल.]

**अर्ज आल्यावरची प्रक्रिया.**

**३७३.** (१) जर अर्ज विचारार्थ स्वीकारण्यास कारण आहे असे जिल्हा न्यायाधीशांचे समाधान झाले तर, तो त्या अर्जाच्या सुनावणीसाठी दिवस निश्चित करील आणि अर्जाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवसाची नोटीस---

(क) न्यायाधीशाच्या मते ज्यास अर्जाची विशेष नोटीस द्यावयास हवी अशा कोणत्याही व्यक्तीवर बजावण्याची, आणि

(ख) न्यायगृहाच्या एखाद्या ठळक भागी चिकटवण्याची आणि उच्च न्यायालयाने तिच्या प्रकाशनासंबंधात केलेल्या नियमांच्या अधीनतेने न्यायाधीशास योग्य वाटेल अशी अन्य कोणतीही रीत असल्यास तशा रीतीने, प्रकाशित करण्याची,

तजवीज करील आणि निश्चित केलेल्या दिवशी किंवा त्यानंतर व्यवहार्य होईल तितक्या लवकर प्रमाणपत्र मिळण्याचा अधिकार संक्षिप्त रीतीने निर्णीत करण्याच्या कामाला लागेल.

(२) जेव्हा न्यायाधीश, प्रमाणपत्र मिळण्याचा अधिकार अर्जदाराचा आहे असा निर्णय करील तेव्हा, न्यायाधीश प्रमाणपत्र त्यास प्रदान करण्याचा आदेश करील.

(३) जे कायद्याचे किंवा तथ्याचे प्रश्न इतके गुंतागुंतीचे व अवघड आहेत की, ते संक्षिप्त कार्यवाहीत निर्णीत होण्याजोगे नाहीत असे वाटते, ते प्रश्न निर्णीत केल्याशिवाय न्यायाधीश प्रमाणपत्र मिळण्याचा अधिकार निर्णीत करू शकत नसला तरीही, जर अर्जदार हा सकृतदर्शनी त्यावर सर्वोत्तम हक्क असणारी व्यक्ती आहे असे दिसत असेल तर न्यायाधीश त्याला प्रमाणपत्र प्रदान करू शकेल.

(४) जेव्हा प्रमाणपत्रासाठी एकापेक्षा अधिक अर्जदार असतील, आणि अशांपैकी एकाहून अधिक अर्जदार मृताच्या संपदेत हितसंबंधित आहेत असे न्यायाधीशाला दिसून येईल तेव्हा, प्रमाणपत्र कोणास प्रदान करावयाचे याचा निर्णय करताना, न्यायाधीश, अर्जदारांच्या हितसंबंधाची व्याप्ती व त्यांची अन्य बाबीतील योग्यता लक्षात घेईल.

**प्रमाणपत्रातील मजकूर.**

**३७४.** जेव्हा जिल्हा न्यायाधीश प्रमाणपत्र प्रदान करील तेव्हा त्यात तो, प्रमाणपत्रासाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली ऋणे व रोखे विनिर्दिष्ट करील, आणि जिला प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले असेल त्या व्यक्तीला त्याद्वारे रोखे किंवा त्यांपैकी कोणतेही रोखे---

(क) यांवरील व्याज किंवा लाभांश घेण्यास, किंवा

(ख) ते परक्रामित किंवा हस्तांतरित करण्यास, किंवा

(ग) त्यांवरील व्याज किंवा लाभांश घेणे आणि ते परक्रामित किंवा हस्तांतरित करणे या दोन्ही गोष्टी करण्यास,

अधिकार प्रदान करू शकेल.

१. १९२८ चा अधिनियम १४, कलम २ द्वारे घातले.

**प्रमाणपत्राच्या प्रदानग्राहीकडे प्रतिभूतीची रीतसर मागणी.**

**३७५.** (१) जिल्हा न्यायाधीशाने कलम ३७३ च्या पोट-कलम (३) किंवा पोटकलम (४) खाली पुढील कार्यवाही करण्याचे योजिले असेल अशा कोणत्याही प्रकरणी तो न्यायाधीश ज्या व्यक्तीला प्रमाणपत्र प्रदान करण्याचे त्याने योजले असेल त्या व्यक्तीला, प्रमाणपत्राच्या प्रदानाची पूर्ववर्ती शर्त म्हणून, तिला मिळालेल्या ऋणांचा व रोख्यांचा हिशेब देण्यासाठी आणि ती ऋणे व रोखे यांना संपूर्णतः किंवा त्यांच्या कोणत्याही भागास हक्कदार असतील अशा व्यक्तींच्या हानिरक्षणासाठी एका जामीनदारासहित किंवा अनेक जमीनदारांसहित अथवा अन्य पुरेशा प्रतिभूतिनिशी न्यायाधीशाला बंधपत्र करून देण्याची मागणी करील व अन्य कोणत्याही प्रकरणी तो तसे करू शकेल.

(२) विनंती-अर्जाद्वारे करण्यात आलेल्या अर्जावरून आणि आपल्या समाधानाला पुरेसे कारण दाखवण्यात आल्यावर व आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणे प्रतिभूतीबाबतच्या अशा किंवा मिळालेले पैसे न्यायालयात भरणा करावेत, असा उपबंध करणाऱ्या अशा अटींवर किंवा अन्यथा जिल्हा न्यायाधीशाला ते बंधपत्र किंवा अन्य प्रतिभूती एखाद्या योग्य व्यक्तीच्या नावे अभिहस्तांकित करता येईल, आणि तद्नंतर ती व्यक्ती जणू काही मुळात ते बंधपत्र किंवा प्रतिभूति न्यायालयाच्या न्यायाधीशाऐवजी तिला देण्यात आलेली असावी त्याप्रमाणे त्यावरून तिच्या स्वतःच्या नावाने दावा आणण्यास व त्याखाली वसूल करण्याजोगी असेल अशी रक्कम सर्व हितसंबंधित व्यक्तींचा विश्वस्त म्हणून वसूल करण्यास हक्कदार होईल.

**प्रमाणपत्राचे विस्तारण.**

**३७६.** (१) या भागाखालील प्रमाणपत्रधारकाच्या अर्जावरून जिल्हा न्यायाधीशाला प्रमाणपत्राचा त्यात मुळात विनिर्दिष्ट न केलेल्या ऋणावर किंवा रोख्यावर विस्तार करता येईल, आणि अशा प्रत्येक विस्तारित प्रमाणपत्राला, ज्या ऋणावर किंवा रोख्यावर प्रमाणपत्र विस्तारित केलेले असेल तो जणू काही त्या प्रमाणपत्रात मुळात विनिर्दिष्ट केलेला असावा त्याप्रमाणे तसाच परिणामक असेल.

(२) प्रमाणपत्र विस्तारित केल्यावर ज्यावर प्रमाणपत्र विस्तारित केलेले असेल अशा कोणत्याही रोख्यावरील व्याज किंवा लाभांश घेण्याबाबतचे अथवा तो परक्रामित किंवा हस्तांतरित करण्याबाबतचे अधिकार प्रदान करता येतील, आणि कलम ३७५ मध्ये उल्लेखिलेल्या प्रयोजनांसाठी मूळच्या प्रमाणपत्राचे प्रदान झाल्यावर जसे घेता येते त्याच रीतीने, बंधपत्र किंवा आणखी बंधपत्र किंवा अन्य प्रतिभूती घेता येईल.

**प्रमाणपत्र व विस्तारित प्रमाणपत्र यांचे नमुने.**

**३७७.** परिस्थितीनुसार शक्य होईल तितपत आठव्या अनुसूचीमध्ये दिलेल्या नमुन्यानुसार प्रमाणपत्रे प्रदान केली जातील व ती प्रमाणपत्रे विस्तारित केली जातील.

**रोख्यांबाबतच्या अधिकारांबाबत प्रमाणपत्रांचे विशोधन.**

**३७८.** जेथे जिल्हा न्यायाधीशाने प्रमाणपत्रधारकाला प्रमाणपत्रकात विनिर्दिष्ट केलेल्या रोख्यांबाबत कोणताही अधिकार प्रदान केला नसेल अथवा नुसता रोख्यावरील व्याज किंवा लाभांश घेण्याचा किंवा तो परक्रामित किंवा हस्तांतरित करण्याचा अधिकार प्रदान केला असेल तेथे न्यायधीशाला, विनंती-अर्जाद्वारे करण्यात आलेल्या अर्जावरून आणि आपल्या समाधानाला पुरेसे कारण दाखविण्यात आल्यावर, कलम ३७४ मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणताही अधिकार प्रदान करून किंवा त्यांपैकी एका अधिकाराऐवजी दुसरा प्रदान करून प्रमाणपत्र विशोधित करता येईल.

**प्रमाणपत्रांवरील न्यायालय फी वसुल करण्याची पद्धत.**

**३७९.** (१) प्रमाणपत्राकरता किंवा प्रमाणपत्राच्या विस्तारणाकरता केलेल्या प्रत्येक अर्जासोबत ज्याच्याकरता अर्ज करण्यात आला त्या प्रमाणपत्राबाबत किंवा प्रमाणपत्राच्या विस्तारणाबाबत, न्यायालय फी अधिनियम, १८७० (१८७० चा ७) खाली प्रदेय असलेल्या फी इतकी रक्कम जमा करावी लागेल.

(२) जर अर्ज मान्य झाला तर, अर्जदाराने निक्षेपिलेली रक्कम पूर्वोक्तानुसार प्रदेय असलेली फी दर्शविण्याकरता वापरावयाचा मुद्रांक खरेदी करण्याकरता न्यायाधीशाच्या निदेशानुसार खर्च केली जाईल.

(३) पोटकलम (१) खाली मिळालेली असून पोट कलम (२) खाली जी खर्च केलेली नाही अशी कोणतीही रक्कम जिने तिचा निक्षेप केला असेल त्या व्यक्तीला परत केली जाईल.

**प्रमाणपत्राचा स्थानिक विस्तार.**

**३८०.** या भागाखालील प्रमाणपत्र [१]* * * [२]* * *

[३][भारतात] सर्वत्र परिणामक असेल.

[४][ब्रम्हदेश व एडन हे भारतापासून वेगळे झाल्यानंतर [३][भारतात] हे कलम ब्रम्हदेशात व एडनमध्ये फारकतीच्या दिनांकापूर्वी प्रदान केलेल्या किंवा त्या दिनांकास प्रलंबित असलेल्या कार्यवाहीत त्या [५]दिनांकानंतर प्रदान केलेल्या प्रमाणपत्रास लागू असेल.]

---

१. १९५२ चा अधिनियम ४८, कलम ३ व अनुसूची दोन यां द्वारे 'सर्व' हा शब्द गाळला.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'भारताच्या' हा शब्द गाळला.

३. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'राज्ये' याऐवजी 'भारत' हा शब्दोल्लेख घातला.

४. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे घातले.

५. १ एप्रिल १९३७.

[1][पाकिस्तान भारतापासून वेगळे झाल्यानंतर [2]* * * [3][भारतात] ते कलम फारकतीच्या दिनांकास पाकिस्तान ज्यांचे बनले होते त्यांपैकी कोणत्याही राज्यक्षेत्रात त्या दिनांकापूर्वी प्रदान केलेल्या किंवा त्या दिनांकास प्रलंबित असलेल्या कार्यवाहीत त्या दिनांकानंतर प्रदान केलेल्या प्रमाणपत्रासह लागू असेल.]

**प्रमाणपत्राचा परिणाम.**

**३८१.** या भागाच्या उपबंधांच्या अधीनतेने, जिल्हा न्यायाधीशाचे प्रमाणपत्र, त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ऋणांच्या व रोख्यांच्याबाबत ज्या व्यक्ती अशी ऋणे देणे लागतात किंवा अशा रोख्यांवरून दायी असतात त्या व्यक्तींविरूद्ध निर्णायक असेल, आणि कलम ३७० चे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण झाले किंवा अन्य वैगुण्य असले तरीही जिला प्रमाणपत्र प्रदान केले आहे त्या व्यक्तीला अशा सर्व व्यक्तींनी सद्भावपूर्वक अशी ऋणे फेडली किंवा तिच्याशी अशा रोख्यासंबंधी व्यवहार केले की, त्यामुळे अशा व्यक्ती त्यासंबंधात पूर्णपणे दायित्वमुक्त होतील.

**[4][विदेशी राज्यातील भारतीय प्रतिनिधीने प्रदान केलेल्या किंवा विस्तारित केलेल्या आणि अन्य विवक्षित बाबतीतील प्रमाणपत्राचा परिणाम.**

**३८२.** परिस्थितीनुसार शक्य होईल तितपत आठव्या अनुसूचीमधील नमुन्यानुसार असलेले प्रमाणपत्र जेव्हा---

(क) एखाद्या परकीय देशाकडे दूताधिकारपत्रे देऊन पाठवलेल्या भारतीय प्रतिनिधीने त्या देशातील रहिवाशाला दिलेले असेल ; अथवा

(ख) भाग ' ख ' राज्यांतील रहिवाशाला त्या राज्याच्या जिल्हा न्यायाधीशाने भाग ' ख ' राज्ये (कायदे) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ३) च्या प्रारंभापूर्वी प्रदान केलेले असेल किंवा अशा नमुन्यानुसार त्याने विस्तारित केलेले असेल ; अथवा

(ग) जम्मू व काश्मीर राज्यातील रहिवाशाला त्या राज्याच्या जिल्हा न्यायाधीशाने भाग ' ख ' राज्ये (कायदे) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ३) च्या प्रारंभापूर्वी प्रदान केलेले असेल किंवा अशा नमुन्यानुसार त्याने विस्तारित केलेले असेल

तेथे भारतात त्या प्रमाणपत्राला न्यायालय फी अधिनियम, १८७० (१८७० चा ७) मध्ये या भागाखालील प्रमाणपत्राबाबत जे उपबंध आहेत, त्यानुसार त्यावर मुद्रांक लावला जाईल तेव्हा, या भागाखाली प्रदान केलेल्या किंवा विस्तारित केलेल्या प्रमाणपत्रासारखेच ते परिणामक होईल.]

**प्रमाणपत्राचे प्रत्याहरण.**

**३८३.** या भागाखाली प्रदान केलेले प्रमाणपत्र पुढीलपैकी कोणत्याही कारणांवरून प्रत्याहृत केले जाऊ शकेल, ती अशी :—

(क) प्रमाणपत्र मिळवण्यासाठी केलेली कार्यवाही सारतः सदोष होती ;

(ख) खोटे सूचन करून किंवा त्या प्रकरणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेली एखादी गोष्ट न्यायालयापासून लपवून ते प्रमाणपत्र मिळवले होते ;

(ग) प्रमाणपत्र त्याच्या प्रदानास आधारभूत होण्याजोगा असा जो कायद्याचा मुद्दा असेल त्यास सारभूत अशा तथ्याचे असत्य अभिकथन करून, त्या मार्गाने मिळवण्यात आले होते--- मग असे अभिकथन अज्ञानामुळे किवा अनवधानाने केले असेल तरीही हरकत नाही ;

(घ) परिस्थितीमुळे प्रमाणपत्र निरूपयोगी व अप्रवर्ती झाले आहे ;

(ङ) प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेली ऋणे किंवा रोखे समाविष्ट असलेल्या चीजवस्तूंबाबतच्या दाव्यात किंवा अन्य कार्यवाहीत सक्षम न्यायालयाने केलेल्या हुकूमनाम्यामुळे किंवा आदेशामुळे प्रमाणपत्र प्रत्याहृत करणे उचित झाले आहे.

**अपील.**

**३८४.** (१) या भागाच्या अन्य उपबंधांच्या अधीनतेने, जिल्हा न्यायाधीशाने या भागाखालील प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठी, नाकारण्यासाठी किंवा प्रत्याहृत करण्यासाठी दिलेल्या आदेशावर उच्च न्यायालयाकडे अपील होऊ शकेल आणि उच्च न्यायालयाला योग्य वाटल्यास ते अपिलान्ती करील त्या आदेशाद्वारे कोणत्या व्यक्तीला प्रमाणपत्र द्यावे ते घोषित करू शकेल आणि जिल्हा न्यायाधीशाला असे निदेशित करू शकेल की, त्यासाठी त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यावर तद्नुसार त्याने ते प्रदान करावे व आधीच दुसरे कोणतेही प्रमाणपत्र प्रदान केलेले असल्यास, ते निष्प्रभावी करावे.

---

१. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे घातले.

२. १९५२ चा अधिनियम ४८, कलम ३ व अनुसूची दोन द्वारे ' भारताच्या ' हा शब्द गाळला.

३. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूचीयांद्वारे ' राजे ' या ऐवजी ' भारत ' हा शब्दोल्लेख घातला.

४. १९५७ चा अधिनियम ३४, कलम २ द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी घातले.

(२) पोटकलम (१) खालील अपील, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) खालील अपिलासाठी दिलेल्या अवधीच्या आत दाखल केले पाहिजे.

(३) जिल्हा न्यायाधीशाचा या भागाखालील आदेश, पोटकलम (१) च्या उपबंधांच्या आणि उच्च न्यायालयाकडे करावयाचे निर्देशन व त्याने करावयाचे पुनरीक्षण याबाबतचे व न्यायनिर्णयाचे पुनर्विलोकन याबाबतचे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) मधील उपबंध त्या संहितेच्या कलम १४१ ने जसे लागू केले आहेत, त्याप्रमाणे त्यांच्या अधीनतेने, अंतिम असेल.

**प्रमाणपत्रावर पूर्वीच्या प्रमाणपत्राचा, संप्रमाणाचा किंवा प्रशासनपत्राचा परिणाम.**

**३८५.** या अधिनियमाने उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, मृत व्यक्तीच्या चीजवस्तूबाबत त्याखाली प्रदान केलेले प्रमाणपत्र, मृत व्यक्तीच्या संपदेबाबत, जर असे प्रमाणपत्र किंवा संप्रमाण किंवा प्रशासनपत्र पूर्वी प्रदान केलेले असेल आणि असे पूर्वप्रदान अंमलात आले असेल तर, विधिबाह्य असेल.

**विधिबाह्य प्रमाणपत्राच्या धारकाकडे सद्भावपूर्वक केलेले विवक्षित भरणे विधिग्राह्य करणे.**

**३८६.** जेथे या भागाखालील प्रमाणपत्र, कलम ३८३ खाली ते प्रमाणपत्र प्रत्यहृत करण्यात आल्याच्या कारणाने किंवा कलम ३८४ खालील अपिलीय आदेशात नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला प्रमाणपत्र प्रदान केल्याकारणाने किंवा पूर्वी एखादे प्रमाणपत्र प्रदान केले असल्याकारणाने किंवा अन्य कोणत्याही कारणाने निष्प्रभावी झाले असेल किंवा विधिबाह्य असेल तेथे निष्प्रभावित किंवा विधिबाह्य प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या ऋणांविषयी व रोख्यांविषयी त्या प्रमाणपत्राच्या निष्प्रभावनाबाबत किंवा विधिबाह्यतेबाबत अज्ञानात असल्यामुळे त्याच्या धारकांकडे केलेले सर्व भरणे किंवा त्याच्याशी केलेले व्यवहार, अन्य कोणत्याही प्रमाणपत्राखालील मागण्यांच्या तुलनेत ग्राह्य धरले जातील.

**या अधिनियमाखालील निर्णयांचा परिणाम आणि त्याखाली प्रमाणपत्र धारकाचे दायित्व.**

**३८७.** कोणत्याही पक्षांमधील अधिकाराबद्दलच्या कोणत्याही प्रश्नांवर या भागाखाली दिलेल्या निर्णयामुळे त्याच पक्षांमधील कोणत्याही दाव्यात किंवा अन्य कोणत्याही कार्यवाहीत त्याच प्रश्नाची संपरीक्षा करण्यास आडकाठी होते असे धरले जाणार नाही आणि ज्या व्यक्तीला कोणतेही संपूर्ण ऋण किंवा रोखा किंवा त्याचा कोणताही भाग अथवा कोणत्याही रोख्यावरील काहीही व्याज किंवा लाभांश मिळेल अशा कोणत्याही व्यक्तीवर, त्यास विधितः हक्कदार असणाऱ्या व्यक्तीला त्यांचा हिशेब देण्याचे जे दायित्व असेल त्यावर या भागातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होतो असा त्याचा अर्थ लावला जाणार नाही.

**या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता जिल्हा न्यायालयाची अधिकारिता कनिष्ठ न्यायालयांच्या ठायी विनिहित करणे.**

**३८८.** (१) राज्य शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जिल्हा न्यायाधीशाहून कनिष्ठ श्रेणीच्या कोणत्याही न्यायालयाच्या ठायी जिल्हा न्यायाधीशाचे कार्याधिकार वापरण्याची शक्ती विनिहित करता येईल.

(२) याप्रमाणे ज्याच्या ठायी शक्ती विनिहित झाली आहे अशा कोणत्याही कनिष्ठ न्यायालयाला आपल्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत, या भागाने जिल्हा न्यायाधीशाला प्रदान केलेल्या सर्व शक्तींचा वापर करण्यास जिल्हा न्यायाधीशांच्या बरोबरीने समवर्ती अधिकारिता असेल, आणि जिल्हा न्यायाधीशासंबंधीचे या भागाचे उपबंध अशा कनिष्ठ न्यायालयाला, ते जणू काही जिल्हा न्यायाधीश असल्याप्रमाणे लागू असतील :

परंतु, कलम ३८४ च्या पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेले असे कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशावरील अपील जिल्हा न्यायाधीशाकडे होऊ शकेल, उच्च न्यायालयाकडे नाही, आणि ते पोटकलम जिल्हा न्यायाधीशाच्या आदेशावर करण्यात आलेल्या अपिलातील आपल्या आदेशाद्वारे जी घोषणा व निदेश देण्यास उच्च न्यायालयाला प्राधिकृत करते अशी कोणतीही घोषणा व निदेश जिल्हा न्यायाधीशाला स्वतःला योग्य वाटल्यास अपिलातील आपल्या आदेशाद्वारे देता येईल.

(३) कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशावर केलेल्या अपिलातील जिल्हा न्यायाधीशाचा निकटपूर्व पोटकलमाखालील आदेश, उच्च न्यायालयाकडे करावयाचे निर्देशन व त्याने करावयाचे पुनरीक्षण याबाबतचे व न्यायनिर्णयाचे पुनर्विलोकन याबाबतचे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) मधील उपबंध त्या संहितेच्या कलम १४१ ने जसे लागू केले आहेत त्याप्रमाणे त्यांच्या अधीनतेने अंतिम असतील.

(४) या भागाखालील कोणतीही कार्यवाही कनिष्ठ न्यायालयातून काढून जिल्हा न्यायाधीशाला एकतर ती स्वतः निकालात काढता येईल, किंवा जिल्हा न्यायाधीशाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आत स्थापन झालेल्या आणि ती कार्यवाही निकालात काढण्याचा प्राधिकार असलेल्या अशा अन्य न्यायालयाकडे ती वर्ग करता येईल.

(५) पोटकलम (१) खालील अधिसूचनेत कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील कोणतेही कनिष्ठ न्यायालय विशेषकरून किंवा अशा न्यायालयाचा कोणताही वर्ग विनिर्दिष्ट करता येईल.

(६) कोणत्याही अधिनियमितीच्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनार्थ जिल्हा न्यायाधीशाला दुय्यम असलेले किंवा त्याच्या नियंत्रणाधीन असलेले असे कोणतेही दिवाणी न्यायालय या कलमाच्या प्रयोजनासाठी जिल्हा न्यायाधीशाहून कनिष्ठ श्रेणीचे न्यायालय असल्याचे मानले जाईल.

**३८९.** (१) जेव्हा या भागाखालील प्रमाणपत्र कलम ३८६ मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणत्याही कारणामुळे निष्प्रभावी किंवा विधिबाह्य झालेले असेल तेव्हा त्याचा धारक, ज्या न्यायालयाने ते प्रदान केले त्याच्या रीतसर मागणीवरून, त्या न्यायालयाच्या ते स्वाधीन करील. **निष्प्रभावी व विधिबाह्य प्रमाणपत्रे परत स्वाधीन करणे.**

(२) जर तो याप्रमाणे ते परत स्वाधीन करण्यास बुद्धिपुरस्सर आणि वाजवी कारणाशिवाय चुकला तर तो एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

**३९०.** १८२७ चा मुंबई विनियम क्र. ८ यात काहीही असले तरी, या भागाखालील प्रमाणपत्रे आणि त्यासाठी करावयाचे अर्ज याबाबतचे कलम ३७०-पोटकलम (२) कलम ३७२-पोटकलम (१) खंड (च) आणि कलमे ३७४, ३७५, ३७६, ३७७, ३७८, ३७९, ३८१, ३८३, ३८४, ३८७, ३८८ व ३८९ मधील आणि मृत्युपत्रव्यवस्थापकांनी व प्रशासकांनी जंत्र्या व हिशेब सादर करण्याबाबतचे कलम ३१७ मधील उपबंध, जेथवर ते लागू करणे शक्य असेल तेथवर, अनुक्रमे दिनांक १ मे १८८९ नंतर त्या विनियमाखाली प्रदान केलेल्या प्रमाणपत्रांना व त्याखालील प्रमाणपत्रांसाठी करावयाच्या अर्जांना आणि याप्रमाणे प्रदान केलेल्या अशा प्रमाणपत्रांच्या धारकांनी जंत्र्या व हिशेब सादर करण्याबाबत लागू असतील. **१८२७ चा मुंबई विनियम ८ या खालील प्रमाणपत्राबाबतचे उपबंध.**

भाग अकरावा

## संकीर्ण

**३९१.** भाग आठवा, भाग नववा किंवा भाग दहावा यामधील कोणत्याही गोष्टीमुळे,— **व्यावृत्ती.**

(एक) जी अन्यथा विधिबाह्य झाली असती अशी कोणतीही मृत्युपत्रीय विल्हेवाट विधिग्राह्य होणार नाही ;

(दोन) अशी जी कोणतीही विल्हेवाट अन्यथा विधिग्राह्य झाली असती ती विधिबाह्य होणार नाही ;

(तीन) कोणतीही व्यक्ती, अन्यथा ती ज्यास हक्कदार झाली असती अशा कोणत्याही निर्वाहाधिकारापासून वंचित होणार नाही ; किंवा

(चार) महाप्रबंधक अधिनियम, १९१३ (१९१३ चा ३) वर परिणाम होणार नाही.

**३९२.** [निरसने] निरसन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १२) कलम २ व अनुसूची याद्वारे निरसित.

## अनुसूची पहिली

(पहा कलम २८)

**रक्तसंबंधाचा तक्ता**



## [१][अनुसूची दुसरी

भाग पहिला

(पहा कलम ५४)

(१) बाप व आई.

(२) (सापत्न भाऊ व बहिणी यांहून अन्य) भाऊ व बहिणी आणि त्यांच्यापैकी जे, विनामृत्युपत्र व्यक्तीच्या आधी मृत्यू पावलेले असतील अशांचे रेषीय वंशज.

(३) पैतृक व मातृक आजा-आजी.

(४) पैतृक व मातृक आजा-आजींची अपत्ये आणि त्यांच्यापैकी जी, विनामृत्युपत्र व्यक्तीच्या आधी मृत्यू पावलेली असतील अशांचे रेषीय वंशज.

(५) पैतृक व मातृक आजा-आजींचे बाप व आई.

(६) पैतृक व मातृक आजा-आजींच्या आई व बापाची अपत्ये आणि त्यांच्यापैकी जी, विनामृत्युपत्र व्यक्तीच्या आधी मृत्यू पावलेली असतील अशांचे रेषीय वंशज.

भाग दुसरा

(पहा कलम ५५)

(१) बाप व आई.

(२) (सापत्न भाऊ व बहिणी यांहून अन्य) भाऊ व बहिणी आणि त्यांच्यापैकी जे, विनामृत्युपत्र व्यक्तीच्या आधी मृत्यू पावलेले असतील अशांचे रेषीय वंशज.

(३) पैतृक व मातृक आजा-आजी.

(४) पैतृक व मातृक आजा-आजींची अपत्ये आणि त्यांच्यापैकी जी, विनामृत्युपत्र व्यक्तीच्या आधी मृत्यू पावलेली असतील अशांचे रेषीय वंशज.

(५) पैतृक व मातृक आजा-आजींचे बाप व आई.

(६) पैतृक व मातृक आजा-आजींच्या आई व बापाची अपत्ये आणि त्यांच्यापैकी जी, विनामृत्युपत्र व्यक्तीच्या आधी मृत्यू पावलेली असतील अशांचे रेषीय वंशज.

(७) सापत्न भाऊ व बहिणी आणि त्यांच्यापैकी जे, विनामृत्युपत्र व्यक्तीच्या आधी मृत्यू पावलेले असतील, अशांचे रेषीय वंशज.

(८) भावांच्या किंवा सापत्न भावांच्या विधवा आणि बहिणींचे किंवा सापत्न बहिणींचे विधुर.

(९) पैतृक किंवा मातृक आजा-आजींच्या अपत्यांच्या विधवा किंवा विधुर.

(१०) विनामृत्युपत्र मरण पावलेल्या व्यक्तीच्या मृत रेषीय वंशजाच्या ज्या विधवांनी किंवा विधुरांनी, विनामृत्युपत्र मरण पावलेल्या व्यक्तीच्या मृत्युपूर्वी पुन्हा विवाह केलेला नसेल अशा विधवा किंवा विधुर.]

## अनुसूची तिसरी

(पहा कलम ५७)

कलम ५७ मध्ये वर्णन केलेल्या विवक्षित मृत्युपत्रांना व क्रोडपत्रांना लागू असलेले भाग सहाचे उपबंध. कलमे ५९, ६१, ६२, ६३, ६४, ६८, ७०, ७१, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८०, ८१, ८२, ८३, ८४, ८५, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९५, ९६, ९८, १०१, १०२, १०३, १०४, १०५, १०६, १०७, १०८, १०९, ११०, १११, ११२, ११३, ११४, ११५, ११६, [२][११७], ११९, १२०, १२१, १२२, १२३, १२४, १२५, १२६, १२७, १२८, १२९, १३०, १३१, १३२, १३३, १३४, १३५, १३६, १३७, १३८, १३९, १४०, १४१, १४२, १४३, १४४, १४५, १४६, १४७, १४८, १४९, १५०, १५१, १५२, १५३, १५४, १५५, १५६, १५७, १५८, १५९, १६०, १६१, १६२, १६३, १६४, १६५, १६६, १६७, १६८, १६९, १७०, १७१, १७२, १७३, १७४, १७५, १७६, १७७, १७८, १७९, १८०, १८१, १८२, १८३, १८४, १८५, १८६, १८७, १८८, १८९ आणि १९०.

---

१. १९९१ चा अधिनियम ५१, कलम ७ द्वारे मूळ अनुसूचीऐवजी ही अनुसूची घातली (९ डिसेंबर १९९१ रोजी व तेव्हापासून).

२. १९२९ चा अधिनियम २१, कलम १४ द्वारे घातले.

### पूर्ववर्ती कलमे लागू करण्याबाबत निर्बंध व आपरिवर्तने

१. त्यात अंतर्भूत असलेले काहीही, मृत्युपत्रकर्त्याला, तो जी संपत्ती आंतरजीवरीत्या अन्यक्रामित करू शकला नसता ती मृत्युपत्राने देण्यास, अथवा ही कलमे लागू नसती तर तो ज्यांना कोणत्याही निर्वाहाधिकारापासून मृत्युपत्राने वंचित करू शकला नसता अशा कोणत्याही व्यक्तींना त्यापासून वंचित करण्यास प्राधिकृत करणार नाही.

२. त्यात अंतर्भूत असलेले काहीही, कोणाही हिंदूला, बौद्धाला, शिखाला किंवा जैनाला किंवा सूट दिलेल्या व्यक्तीला तो दिनांक १ सप्टेंबर १८७० पूर्वी जो हितसंबंध निर्माण करू शकला नसता असा कोणताही हितसंबंध संपत्तीत निर्माण करण्यास प्राधिकृत करणार नाही.

३. त्यात अंतर्भूत असलेले काहीही, दत्तकाच्या किंवा विनामृत्युपत्र उत्तराधिकाराच्या कोणत्याही कायद्यावर परिणाम करणार नाही.

४. कलम ७० लागू करताना "विवाह अथवा" हे शब्द गाळले जातील.

५. पुढीलपैकी कोणतीही कलमे म्हणजे कलमे ७५, ७६, १०५, १०९, १११, ११२, ११३, ११४, ११५ आणि ११६ ही अशा मृत्युपत्रांना व क्रोडपत्रांना लागू करताना, 'मुलगा', 'मुलगे' 'अपत्य', 'अपत्ये' या शब्दांत दत्तक अपत्याचा समावेश असल्याचे मानले जाईल; आणि 'नातवंडे' या शब्दात अपत्याच्या—मग ते दत्तक असो वा अंगज (natural born) असो-अपत्यांचा मग दत्तक असोत वा अंगज असोत-समावेश असल्याचे मानले जाईल; आणि 'सून' या शब्दप्रयोगात दत्तक मुलाच्या पत्नीचा समावेश असल्याचे मानले जाईल.

---

## अनुसूची चौथी

[पहा कलम २७४ (२)]

### प्रमाणपत्राचा नमुना

मी, क. ख. .......................... येथील उच्च न्यायालयाचा (किंवा, प्रकरणपरत्वे,) प्रबंधक (किंवा, प्रकरणपरत्वे,) या द्वारे असे प्रमाणित करतो की, दिनांक ........................ रोजी ..............................

येथील उच्च न्यायालयाने (किंवा, प्रकरणपरत्वे,) मृत ग. घ., मृत्युपूर्वी राहणार ..........................

याच्या मृत्युपत्राचे संप्रमाण (किंवा, याच्या संपदेचे प्रशासनपत्र) ङ. च. राहणार ..........................

.............................. यास आणि छ, ज., राहणार .................... यास प्रदान केले आहे आणि असे संप्रमाण (किंवा प्रशासनपत्र) [1]* * * [2][भारतात] सर्वत्र मृताच्या सर्व संपत्तीवर परिणामक आहे.

---

## अनुसूची पाचवी

[पहा कलम २८४ (४)]

### सावधानपत्राचा नमुना

दिनांक ........................ रोजी जो मृत्यू पावला तो मृत क. ख., मृत्यूपूर्वी राहणार ....................

याच्या संपदेबाबत, ग. घ. राहणार .................... याला नोटीस दिल्याशिवाय काहीही करण्यात येऊ नये.

---

## अनुसूची सहावी

(पहा कलम २८९)

### संप्रमाणाचा नमुना

मी, ........................ या जिल्ह्याचा न्यायाधीश, [किंवा (जेथे प्रत्यायुक्ताच्या अधिकारितेच्या सीमांचा निर्देश करावा) मध्ये संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान करण्यासाठी नियुक्त केलेला प्रत्यायुक्त] याद्वारे कळवतो की, दिनांक ........................ रोजी ........................ मृत्यूपूर्वी राहणार .................... यांचे अखेरचे मृत्युपत्र---त्याची एक प्रत यासोबत जोडण्यात आली आहे---माझ्यासमोर सिद्ध करण्यात आले व त्याची नोंदणी करण्यात आली आणि उक्त मृताची संपत्ती व त्याच्या मृत्युपत्राशी कोणत्याही प्रकारे संबंधित अशी घेणी यांचे प्रशासन करण्याचे आणि उक्त संपत्तीची व घेण्याची पूर्ण व खरी जंत्री करून ती या प्रदानाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत किंवा न्यायालय वेळोवेळी नेमून देईल अशा आणखी अवधीच्या आत या न्यायालयात सादर करण्याचे आणि त्याच दिनांकापासून एक वर्षाच्या आत किंवा न्यायालय वेळोवेळी नेमून देईल अशा आणखी अवधीच्या आत उक्त संपत्तीचा व घेण्याचा खरा हिशेब या न्यायालयाला देण्याचे अभिवचन मृत्युपत्रात नामित केलेल्या मृत्युपत्रव्यवस्थापकाने दिल्यावरून त्यास त्यांचे प्रशासनपत्र प्रदान करण्यात आले होते.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "भारताच्या" हा शब्द गाळला.

२. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची याद्वारे 'राज्ये' या उल्लेखाऐवजी 'भारत' हा शब्दोल्लेख घातला.

## अनुसूची सातवी

(पहा कलम २९०)

### प्रशासनपत्राचा नमुना

मी, ........................ या जिल्ह्याचा न्यायाधीश, [किंवा (येथे प्रत्यायुक्ताच्या अधिकारितेच्या सीमांचा निर्देश करावा) मध्ये संप्रमाण किंवा प्रशासनपत्र प्रदान करण्यासाठी नियुक्त केलेला प्रत्यायुक्त] याद्वारे कळवतो की, दिनांक ........................ रोजी ........................ मृत्यूपूर्वी राहणार ........................ यांची संपत्ती व घेणी यांच्या मृत्युपत्राशी कोणत्याही प्रकारे संबंधित अशी घेणी यांचे प्रशासन करण्याचे आणि उक्त संपत्तीची व घेण्याची पूर्ण व खरी जंत्री करून ती या प्रदानाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत किंवा न्यायालय वेळोवेळी नेमून देईल अशा आणखी अवधीच्या आत या न्यायालयात सादर करण्याचे आणि त्याच दिनांकापासून एक वर्षाच्या आत किंवा न्यायालय वेळोवेळी नेमून देईल अशा आणखी अवधीच्या आत उक्त संपत्तीचा व घेण्याचा खरा हिशेब या न्यायालयाला देण्याचे अभिवचन मृताच्या बापाने (किंवा, प्रकरणपरत्वे) ........................ याने दिल्यावरून त्यास त्यांचे प्रशासनपत्र प्रदान करण्यात आले होते.

---

## अनुसूची आठवी

(पहा कलम ३७७)

### प्रमाणपत्र व विस्तारित प्रमाणपत्र यांचे नमुने

.............................. यांच्या न्यायालयात

क. ख., यांस---

ज्याअर्थी, तुम्ही दिनांक ........................ रोजी पुढील ऋणे व रोखे याबाबत, भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ च्या भाग दहा खालील प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, ती अशी :---

**ऋणे**

| अनुक्रमांक | ऋणकोचे [1][नाव] | प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्याच्या दिनांकास व्याजासह ऋणाची रक्कम | ज्याद्वारे ऋण प्रतिभूत केले असा कोणताही संलेख असल्यास त्याचे वर्णन व दिनांक |
|---|---|---|---|
| | | | |

**रोखे**

| अनु-क्रमांक | वर्णन | | | प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्याच्या दिनांकास रोख्याचे बाजारमूल्य |
|---|---|---|---|---|
| | रोख्याचा विभेदक क्रमांक किंवा अक्षर | रोख्याचे नाव, शीर्षक किंवा वर्ग | रोख्याची रक्कम किंवा सममूल्य | |
| | | | | |

त्याअर्थी, तदनुसार तुम्हाला हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे आणि ते तुम्हाला ती ऋणे वसूल करण्याची [आणि] [ते रोखे] [वरील] [व्याज] [लाभांश] [घेण्याची] [परक्रमित करण्याची] [हस्तांतरित करण्याची] शक्ती प्रदान करत आहे.

आज, दिनांक ........................ रोजी.

जिल्हा न्यायाधीश.

---

१. १९५२ चा अधिनियम ४८, कलम ३ आणि अनुसूची दोन याद्वारे 'क्रमांक' याऐवजी घातले

........................... यांच्या न्यायालयात

दिनांक .................... रोजी क. ख. ने माझ्याकडे केलेल्या अर्जावरून, मी याद्वारे हे प्रमाणपत्र पुढील ऋणांवर व रोख्यांवर विस्तारित करत आहे, ती अशी :---

**ऋणे**

| अनुक्रमांक | ऋणकोचे [1][नाव] | विस्तारणासाठी अर्ज केल्याच्या दिनांकास व्याजासह ऋणाची रक्कम | ज्याद्वारे ऋण प्रतिभूत केले असा कोणताही संलेख असल्यास त्याचे वर्णन व दिनांक |
|---|---|---|---|
| | | | |

**रोखे**

| अनु-क्रमांक | वर्णन | | | प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्याच्या दिनांकास रोख्याचे बाजारमूल्य |
|---|---|---|---|---|
| | रोख्याचा विभेदक क्रमांक किंवा अक्षर | रोख्याचे नाव, शीर्षक किंवा वर्ग | रोख्याची रक्कम किंवा सममूल्य | |
| | | | | |

हे विस्तारण क. ख. ला. ती ऋणे वसूल करण्याची [आणि] [तो रोखा] [वरील] [व्याज] [लाभांश] [घेण्याची] [परक्रमित करण्याची] [हस्तांतरित करण्याची] शक्ती प्रदान करत आहे.

आज, दिनांक .................... रोजी.

जिल्हा न्यायाधीश.

**अनुसूची नववी.**--(अधिनियमिती निरसित) निरसन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १२)---कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

---

१. १९५२ चा अधिनियम ४८, कलम ३ आणि अनुसूची दोन यांद्वारे 'क्रमांक' याऐवजी घातले.

जोडपत्र

## प्रत्यायोजित विधिविधान उपबंध (विशोधन) अधिनियम, १९८३

१. (१) * * * * * **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) तो केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल त्या दिनांकास अंमलात येईल आणि त्या अधिनियमाच्या अनुसूचीत नमूद केलेल्या निरनिराळ्या अधिनियमितीच्या संबंधातील विशोधनासाठी निरनिराळे दिनांक नेमून देता येतील.

**२.** अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमितीमध्ये, याद्वारे त्या अनुसूचीच्या तिसऱ्या स्तंभात नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत व त्या रीतीने विशोधन करण्यात आले आहे. **विवक्षित अधिनियमितीचे विशोधन.**

### अनुसूची

(कलम २ पहावे)

**विशोधने**

| अनुक्रमांक | संक्षिप्त नाव | विशोधने |
|---|---|---|
| * | * * | * * * * |
| १७ | भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ (१९२५ चा ३९). | (१) कलम २२३ मध्ये, "राज्य शासनाने यासंबंधात" या शब्दानंतर "**शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे" हे शब्द दाखल करण्यात येतील. |
| | | (२) कलम २३६ मध्ये, "राज्य शासनाने यासंबंधात" या शब्दानंतर "**शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे" हे शब्द दाखल करण्यात येतील. |
| | | (३) कलम २३६ नंतर व "प्रकरण दोन मर्यादित प्रदानांविषयी" या शीर्षकापूर्वी पुढील कलम दाखल करण्यात येईल. |
| | नियम राज्य विधानमंडळापुढे ठेवणे. | (४) "**२३६क,** कलम २२३ आणि कलम २३६ अन्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल." |

# THE INDIAN SUCCESSION ACT, 1925

# भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५

## इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abatement | १. घट पावणे | [S. 327-m.n.] |
| | २. घट करणे | [S. 328] |
| absolutely bequest | अबाधित मृत्युपत्रित दान | [S. 138-m.n.] |
| absolutely | १. पूर्णपणे | [S. 271] |
| | २. अबाधितपणे | [S. 101-ill. (ix)] |
| accredit | दूताधिकारपत्रे देऊन पाठवणे | [S. 382 (a)] |
| accrue | उपार्जित होणे | [S. 184-ill.] |
| accrue due | देय म्हणून प्रोद्भूत होणे | [S. 170-ill (i)] |
| accrue upon | (— वर) प्रोद्भूत होणे | [S. 350-except.] |
| accumulate | संचित करणे | [S. 117 (i)] |
| acknowledegement | अभिस्वीकृती | [S. 63 (c)] |
| ademption (of legacies) | (उत्तरदानांचे) लोपन | [Part VI-Chap. XVI-heading] |
| adjudication | अभिनिर्णय | [S. 198 (2)] |
| administration | प्रशासनपत्र | [S. 290-m.n.] |
| administration bond | प्रशासन बंधपत्र | [S. 291-m.n.] |
| administrator | प्रशासक | [S. 2 (a)] |
| Administrator General | महाप्रशासक | [S. 214 (1) (ii)] |
| administratrix | प्रशासिका | [S. 315-m.n.] |
| admiral | नौसेनाधिपति | [S. 65-ill. (v)] |
| adultery | परगमन | [S. 219-ill. (i)] |
| advancement | प्रागदायांश | [S. 49-m.n.] |
| after or upon failure of (bequest) | (मृत्युपत्रित दान) निष्फळ झाल्यानंतर किंवा होताच. | [S. 116] |
| agency charges | अभिकरण आकार | [S. 309] |
| agent | अभिकर्ता | [S. 241] |
| alienate | अन्यक्रामित करणे | [S. 59-expl. (1)] |
| allegation | अभिकथन | [S. 263-expl. (c)] |
| allow (an application) | (अर्ज) मान्य करणे | [S. 379 (2)] |
| ambassador | राजदूत | [S. 12] |
| amend | विशोधित करणे | [S. 261] |
| anniversary | वर्षदिन | [S. 340 (1)] |
| annuitent | वर्षासनधारक | [S. 340 (2)] |
| annuity | वर्षासन | [S. 331] |
| annul | निर्भावित करणे | [S. 263] |
| apparent owner | दृश्यमान मालक | [S. 201-m.n.] |
| appellate order | अपिलीय आदेश | [S. 386] |
| appointment | १. नियुक्ती | [S. 175] |
| | २. विनियुक्ती | [S. 67] |
| apportionment | संविभाजन | [Part IX-Chap-IX-heading] |

## इंग्रजी-मराठी शब्दसूची—चालू

| | | |
|---|---|---|
| appropriate for | —साठी विनियोजित करणे | [S. 174] |
| ascertain | विनिश्चित करणे | [S. 26 (2)] |
| ascribe | कारणसंबंध जोडणे | [S. 66 (2) (d)] |
| as nearly as may be | होईल तितक्या जवळपास | [S. 295] |
| as nearly as the circumstances admit | परिस्थितीनुसार शक्य असेल तेथवर | [S. 274 (2)] |
| assault | हमला | [S. 306] |
| assets | मत्ता | [S. 217] |
| assign | अभिहस्तांकित करणे | [S. 375 (2)] |
| as soon as may be practicable | व्यवहार्य होईल तितक्या लवकर | [S. 373 (1)] |
| as the case may be | प्रकरणपरत्वे | [S. 169] |
| at issue | वादग्रस्त | [S. 251] |
